म. सं. णे

| विषय | लेखक | सन |
|---|---|---|
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव | |

σ/Γ
22

[illegible]

Moro Lakshman Tatachar
bought on the 17th Feb 189

कोल्हापुर येथील राजाराम कालेजचे प्रिन्सिपाल साहेब यांणीं

दुसरें बक्षीस दिलेलें.

# जरठोद्वाह.

( एक दुःखपरिणामी नाटक. )

हें

रा. रा. पुरुषोत्तम भास्कर डोंगरे,

कारकून तालुका अलीबाग

यांणीं रचिलें

तें

रा. रा. केशव रावजी गाडगीळ कारकून,

मार्किट पोष्ट—आफिस—मुंबई, यांणीं

मुंबई येथें,

"जगदीश्वर" छापखान्यांत छापविलें.

सन १८९० ईसवी.

किंमत १ रुपया. ( ट. हा. दीड आणा )

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून,
तत्संबंधी सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्याकडे राखिले आहेत.

# जरठोद्वाह[1] नाटक.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## नांदी.

श्लोक ( युग्म. )

श्रीमच्छंकर, सर्वशक्ति, निगमागम्य, स्वयंभु, प्रभु ॥
सर्वाभीष्टद, सर्वमंगल, सदा सर्वेश, शर्माब्धि जो– ॥
त्यातें–स्वैर पिशाचकिन्नरगणीं, घोर श्मशानांगणीं, ॥
अंगीं चर्चुनिभस्म, सस्मितमुखें, गौवाहनीं बैसुनी, ॥१॥
कण्ठीं दारुण–चण्ड–भूषण फणी, कर्णीं मणी गोमटे ॥
रुद्राक्ष स्फटिक, त्रिशूल डमरू हस्तीं मृगा घेउनी, ॥
दंती–चर्म नृतुंड-माल धरुनी; रात्रंदिनीं नाचवी,
थैं थैं, जें झणिं पार्वतीसह,अशा कर्मा नमस्कारितों ! ॥२॥

सूत्रधारः—( रंगभूमीवर येऊन आणि यथासांप्रदाय शिष्टाचार संपादून सभाजनांची प्रार्थना करितो. )

ओंव्या.

॥ प्रथमारंभीं जगन्नाथा ॥ वंदितों, चरणीं ठेवोनि माथा ॥
॥ मग साधुसंतांसि तत्वतां ॥ नमस्कार माझा साष्टांग॥१॥
॥ पुढती नमूं गुरु-परंपरा; ॥ त्या उपरी मातापितरां; ॥
॥ सुरां, भूसुरां, नरेश्वरां ॥ सविनय प्रणाम पैं ॥ २ ॥
॥ मग कविजनांचें वृंद सोज्वळ ॥ तैसींच कुल दैवतें ग्राम-
॥ दैवतें सकळ ॥ यांच्या चरणीं खालवोनि भाळ ॥ वंदन
॥ सादरें आचरितों ॥ ३ ॥
॥ अनंतर श्रोत्यांचिया पायां ॥ नमनें दंडवतें करोनियां ॥
॥ आज्ञा मागतों दावावया ॥ पुढील रचना ॥ ४ ॥

---

१ जरठ = म्हातारा, आणि उद्वाह = लग्न; "म्हाताऱ्यानें केलेलें लग्न"

॥ अल्पस्वल्प येवोनि विचार ॥ वेडे वांकुडे शब्द चार ॥
॥ वदतों त्यांचा समाचार ॥ श्रोतीं प्रेमें घेईजे ॥ ५ ॥
॥ कीं भले करिती हाकाटी ॥ विवाहांची बिघडली रहाटी ॥
॥ तेणें अनर्थ उठाउठी ॥ होताति कोणी बघा ना ॥ ६ ॥
॥ त्यांतलाच येक प्रकार ॥ जरी मी अग्रबुद्धि पामर ॥
॥ सादर करितों सविस्तर ॥ सावधानें अवधारा ॥ ७ ॥
॥ तयारीला गृहाभीतरीं ॥ जातों; बैसा स्वस्थ मध्यंतरीं ॥
॥ नतरी कोण्ही पिशुन कुतरीं ॥ येतील तुम्हां दर्डाया ॥८॥

( येणें प्रमाणें प्रार्थना करून सूत्रधार जातो. )

# अंक १ ला.

## प्रवेश १ ला.

स्थळ:—महंमदवाडी; बाळासाहेबांच्या वाड्याचा रस्ता.
वेळ:—मध्यरात्र.

( एक पोलीस शिपाई व नाईक गस्त घालीत येतात. )

**शिपाई**:—हूकुम डर? ए कोन है? (पडद्यापलीकडे)"रय्यत"

**नाईक**:—ए तूं बिल्ल्यावगर कायकूं रातके वखत फिरते. ज्याव पिछे आपने मकानकूं. ( दोघे पुढें चालूं लागतात. )

**शिपाई**:—( लांब स्वर काढून ) ओ—पेरेवाले; पेरेवाले; ए देवडीवाले. ( पडद्यापलीकडे, लांब हेल काढून ) हो. हो.

**शिपाई**:—हुश्शार रौ. ( दोघेही पुढें चालूं लागतात. )

**शिपाई**:—कायव नाईक, ह्येच फळियेंत् त्ये माजी काठवाडच्या परधानाच्चे चिरजीव, बाळासाहेब ऱ्हात्यात ऱ्हवका?

**नाईक**:—व्हय. काय विव्या इक्त्यामंदींच इसरलास समद? अर, सा सात वरसा माग ह्येच ठिकानीं आपुन त्यांच्या लग्नामंदी आडवा तिडा धा दिस हात मारला ना? स्मर्नांच नतुमच अक्षीं राव इतुष्टच.

**शिपाई**:—त्येची मातुस्त्री बगा, लई पुन्यप्रानी व्हता.

**नाईक**:—ल्येका, व्हताकाय ह्मंतोस? हैता हयात् आजतक्क नौसारीस.

**शिपाई**:—ह्योवि ह्मंतात लईच थ्वार मानुस हाये. बर, नाईक, याक इचारतो. ह्ये वगा, आपल फौजदारसाव आन् बाळासाब यांच ह्मंतात लईच इतुष्ट पडलया. थित कुनी ह्माळसाबाई हाये ह्मंतात; ती बगा, अक्षी त्या लालावर भाळलिया जनु.

**नाईक**:—अर, चुपराव यडझव्या. तिचाबि ऱ्हवरा हितच ऱ्हातो. अन ह्ये जर का कुनी ऐकल तर रे यज्या? अर पन्

---

१ बोळांत; बिर्दींत

त्यांच्या वाड्याजवळ तो कोन् यवडा वरडा करतुया? चाल झट् तिकड (जरा पुढें जाऊन) हूकुम डर? (पडद्यापलीकडे) "रोंद"

नाईकः—वाट् रोंद ? ( पडद्यापलीकडे ) "पट रोंद"

नाईकः—अर, आपल जमादारसावबी थितच बोलत्यात बाळासायबाच्या वाड्याप. ( जरा पुढें जाऊन ) जमादारसाव, अव जमादारसाव. ( बाळासाहेबांच्या वाड्याशीं येतात. )

जमादारः—( दरवाजा खडखडावीत ) ए, अंदर कौन है ? दिंडीदरवाजा खोल्ता है की नहीं ?

देवडीवालाः—( पडद्यांतून ) अरे ज्या; आपने रस्तेसें ज्या.

नाईकः—अर, तू कोन मानूस हाईस का कोन् ? अर, भाईर जमादारसाव उब हायताना ?

देवडीवालाः—(पडद्यांतून बाहेर येऊन) मंग; काय म्हंतात?

जमादारः—ये अंदर क्या चलाया है ?

देवडीवालाः—वाघ्यामुरळीचा नाच.

जमादारः—क्या ? वाघ्याके मुरलीका नाद ! अरे, ऐसा कैसा ? ढब्बक, ढब्बक, ढब्बक !! ये सब अब्बी बंद करो, ऐसे फोजदार सावका होकोम होता है.

देवडीवालाः—बन् ! कावर ? अन् फौजदाराचा हूकुम, अन् आमच्या म्हाराजास्नी !

नाईकः—अर, म्हाईत न्हाईका वारेली[1] नी भिल या ल्वोकानी हरदम शेरात पुंडाई मांडलिया, म्हनूनशेनी सरकारन येकसा हुकुम सोडलाया की, राती बाराच्या अंबला म्होर कोनीबी भाईर फिरू न्हाई, नी काई गान बजावनबी करू न्हाई म्हुनशान्.

देवडीवालाः—बर, पुसूनशी येतो आतून.

देवडीवालाः—( आंतजाऊन येतो ) अव, अमी काई फोजदाराचा हुकूम ऐकत न्हाई. अजून बारा वाजायाला अर्दा घंटचा वखत हाये.

१ भिलासारखी एक रानटी जात आहे.

जमादारः—आछा, कुछ फिकीर नहीं. ये अदमी सरकारकाभि होकोम जुमानता नहीं. मैं अभी फोजदार सावके पास जाताहूं; ( शिपायांकडे पाहून ) और तुम् आपने रोंद पर जाव.

शिपाई व नाईकः—अच्छा.

( तिघे निघून जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—मल्हाररावाचा दिवाणखाना.

वेळः—मध्यरात्र; साडेबारा वाजण्याचा सुमार.

( मल्हारराव बिछान्यावर निजला आहे; इतक्यांत म्हाळसाबाई येऊन त्याजवळ बसते. )

म्हाळसाबाईः—( आपल्याशींच ) कायबाई, झोंप ही ! अजून आपले निजलेलेच. लोकांना थंडीनें खाल्लं आहे, नी माझ्याच पाठीमागं उकाडा कोठला ? हुश्श. ( वारा घेते. ) अहाहा, श्रीमंतांना या हिंवाळ्याच्या रात्री किती मजेच्या जात असतील ! श्रीमंतांची, नी त्यांतून मुख्यत्वें करून नव्या तरुण श्रीमंतांची, या दिवसांत नी असल्या या जिकडे तिकडे सामसूम असलेल्या ऐन मध्यरात्रीच्या भरांत तर पराकाष्टेची गम्मत असेल. आणखी मग, जर करतां बाळासाहेब नी त्यांच्या सगुणाबाई यांच्या सारखा हरण हरिणीचा साजिरागोजिरा, विलासी, नी एकमेकांवर जीव का प्राण करणारा, असा अति सुबक जोडा एकत्र मिळाल्यावर मग त्या सुखाला तर पारावारच नसेल ! ! ( जरा थांबते ) आज या गोंधळाच्या निमित्तानं तरी त्यांच्या निजायच्या खोलीला माझे पाय लागले. काय बाई तो थाटमाट ! आधीं एक गुडघाभर रुजामा; त्यावर तो टोलेजंग छप्परपलंग; त्यावर एक नाजुकशी चौफेर मच्छरदानी; त्यावर हिरव्या-पिंवळ्या-शेंद्री झालरी; त्यांच्यावर तो बे-

ताचाच हंडीचा उजेड. जवळच छुवकड्याशा मेजावर अत्तर, गुलाब; एके ताटांत सुवासिक हारगजरे; कोपऱ्यांत एक सतार; एक सुंदर हस्तिदंती बुद्धिबळांचा जोड; एके बाजूला तो मोठा थोरला आरसा;—किती तरी बाई तेथल्या एकेक पदार्थाचें वर्णन करूं? सारी रात्र पुराची नाहीं. संपत्ति विपुळ असून मेला विलास भोगण्याला तरी मनुष्य चतुर नी रासिकच पाहिजे. नाहीं तर जळीं मेलीं धनगरं थोडींका आहेत? ( जरा थांबते ) बरं आह्मीं दोघी बसलों असतां बाळासाहेबांची स्वारी एकटीच कां बरं तेथें भरपोषाखानिशीं येऊन गेली ? वायकोला झांक दाखवाला तर नसेल ना आपल्या ? कायवाई चालण्याचा झोंक तरी त्यांचा ? किंवा आपल्याला तर पहायला आले नसतील? अहाहा, काय रत्न मी लागून गेलें आहें ! छेः त्यांच्या वायकोला मी बटीक शोभेन. ( विचार केलासें करून ) वरं, नाहीं ह्मणावं तर दोनदां तीनदां त्यांनीं मजकडे रोंखून पाहिलं. अनी एकदां तर फुललेल्या कमळा प्रमाणें हास्यमुख नजरेस पडलं. मग यांतलं इंगित काय ? पुन्हा, आमचा जेव्हां जेव्हां एकमेकांना दृष्टीस पडण्याचा याच्या पूर्वी प्रसंग आला, तेव्हां दरवेळीं ते असेच बघत. सईबाई ह्मणते तशांतलं तर नसेल ना हें ? बरं, पण मी त्यांना त्यावेळेस कशी दिसलें असेन बरं ? ( एक आरसा घेऊन त्यांत आपलें तोंड पाहते ) काय बाई, हे दोन केंस पहा कसे मेले कपाळावर आले आहेत ते ! किती विशोभित दिसतात ! कुंकुं तरी पहा कसं जरा तिरकस लागलं घाईनं !! अनी ती मेली अंजिरी चोळी—

मल्हार०:—(खोंकतात)खो—ख्खो—ख्खोः; ( जरामोठ्यानें ) ख्खोः

बाळसाबा०:—( पुटपुटते. ) जागे झाले वाटतं ? जळा मेला हा खोंकला. यानं तर पुरेपुरेसं करून सोडलन. लघ्वी बंद झाल्याचं नुस्तंच बरं झालं, तर आतां खोंकलाच !

मल्हार०:–( उठून बसतात ) तू कवा आलीग ?

म्हाळसाबा०:–मघांशींच आलें.

मल्हार०:–मंग अजून का निजत न्हाई? अन् आलशात काय रातिचं तोंड बघती? म्होरल्या जल्मीं कसबीन व्हावं लागल ना? ठ्येव त्ये समदे दागिन्ये उतरून प्येटींत. अन त्ये जलीचं लुगडं पन फ्येडून ठ्येव.

म्हाळसाबा०:–ठेवीनजा मग. (मनांत) आपण कसे दिसलों असूं हें तर पाहिलं पाहिजे. मग ठेऊं सर्व काढून.

मल्हार०:–अग, मंग कां ? आतां का न्हाई ? गावांत धूम दगे चाललेती. बर, त्यवडा खलबता अन् ज्येठीमध आन ब-गू इकड.

म्हाळसा०:–पण खलबत्ता कशाला? नुस्तीच तोंडांत धरावी.

मल्हार०:–आन म्हतल, आनावा. अग, सुपाली, लवंग नीं ज्येठीमध येक ठिकानी कुटून चिमूट तोंडांत टाकावी म्हंजे कफ सुटतो. कळ्ळ ?

म्हाळसा०:–( त्रासून ) कळ्ळं (खलबत्ता आणून देते. )

मल्हार०:–( औषध कुटीत ) अग, आतां तू नीज बर.

म्हाळसा०:–मलाबाई झोंपच येत नाहीं कशीती! डोकं-मेलं भिरभिर फिरताहे एकसारखं.

मल्हार०:–मंग जरा डोकं थोपटूं का ?

म्हाळसा०:–( मनांत त्रासानें ) माझं कपाळ थोपटा ! ( उघड ) माझ्या मनांत होतं जरा पायाला लावीन नी मग निजेन. ( लाजून तोंड मुरकते. )

मल्हार०:–अग, मंग जवा मी निजलों व्हतो तवाच का-न्हाई लाऊनशान टाकल ?

म्हाळसा०:–( मनांत ) कर्म आपलं !

मल्हार०:–ए, ह्ये बग नीज लागत नसली तर जरा हिकडे येऊन कूट ये.

म्हाळसा०:—( जरा त्रासयुक्त स्वरानें ) निजतें बाई आतां. मला येते झोंप. ( बिछान्यावर अंग टाकते ) ( मनांत ) देवा, आतां कशी गत करूं ? ( आळे पिळे देते ) पण बाळासाहेबांच्या मनांत माझा कांहीं तरी सुरेखपणा उतरला असेल का ? असेलसा वाटतो आजच्या त्यांच्या करण्यावरून. सुरेख पुरुष पाहून जसं आम्हांला त्यांचं वेड लागतं तसं त्यांनाही बायकांचं लागत असेल. दोघांना एकमेकांची सारखीच जरूरी आहे. अहाहा ! मग ग काय ! (जरा थांबते) त्यांना पुन्हा केव्हां पाहीनसं झालं आहे. जर कांहीं तसंच असलं तर येईल उघडकीस. अनी जर बाई दैव योगानं तसा योग घडून आलाच तर—सूं—सूं—अशी त्यांना कडकडून—( डोळे मिटून एके कुशीवर वळून उजवा हात लांबवून कोणाच्या अंगावर टाकिल्या सारखा करते. )

मल्हार०:—अग ये, ह्ये चूनं पाह्यल कस रुचकल लागत त्ये. ऊठ ह्ये पहातर खर. ( तिला हालवतो. )

म्हाळसा:—हें कायबाई ? आधीं झोंप लागत नाहीं; लागली तर उगीच हालवायचं. ( मनांत ) अरेरे, यावेळेस मन अगदीं अमृताचे घुटके घेत होतं—

मल्हार०:—ए, पन ह्ये तोंडात तर टाकून बग.

म्हाळसा०:—इश्श ! मी नाहीं बाई, असली भुक्की केलेली सुपारी खायची म्हाताऱ्यासारखी.

मल्हारराव०—अग, माला म्हातारी म्हंतीस ? मंग तू म्हाताली माझी बायकू. तुला न्हाईका व्हायच म्हाताल ? तुला खायाला कमी हाये ? का ल्यायाला कमी हाये ? का डागिन्याला ? व्होल कोंत कमी हाये ?

म्हाळसा०:—( मनांत ) जळें मेले ते दागिने. आग कां लागेना त्यांना. एक नाहीं धड, नी भाराभर चिंध्या कशाला !—( उघड ) नुस्ते मेले टोपली भरून आंगावर दागिने घातले,

१ असा सात्कार प्रेमाच्या वेळी होतो.

पण झोंप येईल का त्यांनीं?उलटे खुपतात मात्र. डागिने, डागिने, डागिनें; मेलें सारा दिवसभर तेंच. ( अंगावरून डागिने काढते ) हे घ्या आपले सारे.

मल्हार०:–राग म्हंजे अगदीं नाकावल. दे तर् दे.

( म्हाळसा बाई अश्रु ढाळूं लागते. )

मल्हार०:–अग, लडायाला काय झाल ? लडती का ? मी बोल्लोका तुला ? उगी. ( कुरवाळूं लागतो व चुंबन करण्यास आपलें तोंड पुढें करितो. )

म्हाळसा०:–इश्श हें असलं नाहीं बाई मला आवडत, हिडिस. ( एकीकडे होते ) जें नाहीं करायचं तें करायचं; अनी जें करायचं तें नाहीं करायचं. राग येईल नाहीं तर काय करील ? ( कपाळाला आंठ्या घालते. )

मल्हार०:–आपुन त बावा निजतो. तू बस बडबड करीत ह्वावी त्यवडी. ( डोक्यावरून पांघरूण घेऊन निजतो. )

म्हाळसा०:–बडबड कशाची आपल्या कर्माची करूं ? ( मनांत ) असले हे आह्मां गाईंना चिखलांत रुतविणारे जे कोणी असतील, ते शुद्ध मूर्ख किंवा पाषाणहृदयच ह्मटले पाहिजेत. यांना तरी कां एकट्यांनाच दोष द्यावा ? मूळ चूक–ही चूक नव्हे, कसाईपणा–आपल्या आईबापांचाच कीं नाहीं ? त्यांना तरी दोष कां द्या ? असलीं वडील माणसं मिळणं हें तरी आपल्या मागल्या जल्मींचं भोग्तृत्व. तर सर्व दोष आपलाच आहे, असं ह्मणून निमूट बसावं. ( जरा थांबून ) आज रागानें यांना जरा लाऊन बोलल्यें हें चांगलं नाहीं केलं. आतां रागाऊन काय उपयोग ? व्हायचं तें होऊन चुकलं. या योगानं आपले उलटे हाल होतील. पदरीं पडलं पवित्र झालं. निदान जितक्या गोष्टींत राहवेल, तितक्या गोष्टींत तरी पापा पासून दूर राहून पुढल्या जल्माला आणखीं पापाच्या राशी करून न ठेवाव्या हें फार चांगलं. राम–राम–राम राम. ( देवाचें स्मरण करीत निजते.

पडदा पडतो.

## प्रवेश ३ रा.

स्थळः—बाळासाहेबाचा वाडा; देवडी.
वेळः—मध्यरात्र; एकवाजण्याचा सुमार.

( देवडीवाला हरीपाठ ह्मणत बसला आहे. )

देवडीवालाः—॥ (अभंग ) हरी मुखी ह्मना; हरी मुखी ह्मना ॥ पुन्याची गनना कोन करी ॥ हा ॥ पुन्याची गनना कोन करी ॥ हा ॥ हा—हा. ( लांब स्वर काढून ) काय बिद्या थंडी कडकडा खातिया. कालोख तरी घनघोर पडलाया. हुसूस्—कडकडकड अर द्येवार ! परशोप तरी जरा जाऊन बसाव ( अगटीजवळ गेलासें करतो ) ॥ देवाचिये द्वारी उभा खिनभरी ॥ त्येन्ये मुक्ति च्यारी साधियेल्या ॥ हा ॥ त्येने मुक्ति चारी साधियेल्या ॥ हा ॥ असोनि संसारी जिव्हे व्येग करी—

( पडद्या पलीकडे घाबरत घाबरत शब्द होतो. ) भरे, धावाले, धावाले, धावाले—अये, चोय चोय; अले चोय ये. अहो पावंये; अहो पावये ! अले, नकोले नकोले, ए;—ए ( जरा उंच ) ओ—ओ; ( तोंड दाबल्याचा शब्द )

देवडीवालाः—अं, यवड्या अपरातीच्या वक्ती कोन किचाळतोय ? अरिच्या, ह्मोटह्मोट्यान ! कुनी भूतबीत त न्हाईना—मल्हाररावाच्या वाड्याचा पाया भरताना ह्मंतात नऊ ज्वाडपी जिवंत गाडलीती. ती कवा कवा वरडतात; त्यातल त कोनी न्हाई ह्ये ? अं, पावयें ! पोह्ये मांगतय जनु कुनाप तरी !! आपन आपल द्येवाच नाव घ्येव कस ! ॥ ग्यान देव ह्मन्ये यासाचा ह्ये खून ॥ द्वारकेचा राना पांडवाघरी ॥ हा ॥ द्वारकेचा राना पांडवाघरीं ॥

( पडद्या पलीकडे फिरून शब्द होतो. ) अग, आईग !

---

१ अगटी. २ ह्माळसाबाईचा भाऊ यशवंतराव ऊर्फ पाव्हणे.

अरे नकोरे मारूं; अरे जीव घेऊं नकारे बाबानों अरे देवारे काय हा घात ! ! मेलें, मेलें, मेलें–ओ–ओ ( मोठ्यानं ) अं–अं–

देवडीवालाः–( कानोसा घेऊन आपल्याशींच ) हा कुनाचा तरी वायकूचा गळा दाबल्याचा सबद यतुय बगा. ह्मोरच्या वाड्यात काईबी तरी दगा हाये. दुसऱ्या मजल्यावर जामदार निजल्येती त्यांसनी तरी जाऊनशानी उटवाव ( उठूं लागतो. )

( इतक्यांत बाळासाहेब व गुणाजीबावा येतात. )

बाळासाहेबः–( हळूच गुणाजी बावास उद्देशून ) जामदार आपण कांहीं ह्मणा समोरच्या वाड्यांत गर्दी आहे.

देवडीवालाः–( बाळासाहेबांस ) व्हय सरकार समोरच्या दिवानखान्यांत मघां ह्माळसाबाईच्या रडन्यावानी सबद आला.

बाळासाहेबः–मी पण तसाच ऐकला. ( दिंडीदरवाज्याच्या फटींतून पाहून ) होय जामदार, मधल्या पटांतगणांतही लोक कुजबुजताहेत. पण हा उजेड कोणीकडून येत आहे. जामदार आतां हे स्पष्ट पहा. ( दोघेजण त्या फटीतून पाहतात. )

( पडद्यापली कडे ) " जमादार काय समजलांत मादरचोदाची आतां खोडकीच तोडतों. गोंधळ बंदकरीत नाहींत ? " " सच्चीबात फोजदारसाब–अरे मय्यन मरजाताहूं रे मरजाताहूं–कुइ दुष्मननें मुजकुं फत्तरसें मारडारा"– " अबबबब. मेलोंरे मेलों. पळा–पळा. "

बाळासाहेबः–हां समजलों. तिकडून ते शेंदाडशिपाई भवानराव व पोलीस जमादार आपल्या येथला गोंधळ बंद करायाला येत होते तों–त्यांचाच केला या चोरांनीं गोंधळ. अरे, हे पहा सारे त्यांच्या आंगावर धांवले !

गुणाजीः–पुढं ह्मणणें काय ?

बाळासाहेबः–दुसरें काय ? पाहूं समोरच्या वाड्यांत काय समाचार आहे तो. ही संधीपण बरी आहे आंतजाण्याला.

गुणाजीः–( देवडीवाल्यास ) पुंजाजी ते पट्टे द्या एकेक

आपल्याला. अनी ह्या दुसरे पाहारेकऱ्यांना बसवा इथें (तसें करून) बाळासाहेब, दोन कमरेला पिस्तुलं असूंद्या. चला पडा बाहेर आतां. बोला "चांग भले."

(तिघेजण मधल्या पटांगणांत येतात.)

गुणाजीः–इथें एक पिसू देखील नाहीं. दिंडी तर खुली आहे. मी होतों आंत मग तुह्मीं या मागून. (इकडे तिकडे पाहून) अरे बाळासाहेब कोठें? आंत गेले? (इतक्यांत खाड्कन ती दिंडी लागते) अरेरे, घात झाला! बाळासाहेब अडकले आंत आतां कसं करूं? (घाबरून) पुंजाजी, शिडी लाव जलदी इधर या उघड्या खिडकीला (शिपाई झट्कन एक शिडी आणून खिडकीला लावतो तों ती पण बंद होते.) हाय, हाय! अता मात्र धडगत नाहीं त्यांची! देवा, माझं बछडं जाळ्यांत गुतलंरे. आतां तूं पाठीराखा त्याचा.(पडद्यांत पिस्तुलाचा आवाज होतो)"धो"

गुणाजीः–जीते रहो बेटा!(इतक्यांत दुसरा आवाज होतो)"धो"

गुणाजी०:–जीते! (ओरडून) बाळा साहेब, पट्टा घलाव. (पुंजाजीस) अरे आण तो धुमस खिडकी फोडून जाऊं आंत. (खिडकी फोडतो.)

(इतक्यांत भाऊसाहेब शिंदे दोन आरबांसह तेथें येतात.)

भाऊसाहेब०:–जामदार ही काय गर्दी आहे!

पुंजाजी०:–सरकार, दरोड्ये चोर हाईत आंत.

भाऊसाहेब०:-असं. चला तर (वर चढून जातात) जामदार, खिडकी पडलीना? आंत व्हा तर. बघतां काय?

गुणाजी०:–(दिवाणखान्यांत बोट दाखवितात.)

भाऊसाहेब०:–(तिकडे पाहून) शाबास! शाबास! बाळासाहेब, धन्य तुझी माऊली! हंः अगदीं बिजली सारखा चक् चक् चक् पट्टा चालला आहे!! हां, पुरे बाळासाहेब आतां; दारावर मात्र असा उभे ह्मणजे झालें. (चोरांस उद्देशून)

हीं तरी बघा बाहुलीं टकमक त्याचेकडे पहात खुंटा सारखीं उभीं आहेत. अरे, तुमच्यांतला कोण नाईक ?

भिल्लांचा नाईकः—( मुजरा करून ) जी सरकार, हमे रस्तम छूं.

भाऊसाहेबः—अरे, तूंतो पांवागडाच्या तिकडचा रे ?

भि० नाईकः—हां जी, सरकार.

भाऊसाहेबः—( मनांत ) सध्यां ही चौकशीची वेळ नव्हे. ( उघड ) बरें, आतां मुकाट्यानें तुमचीं हत्यारें टाकून आमच्या स्वाधीन व्हा; होणें असेल तर आपल्या देवाची कसम खा.

भि० नाईकः—हारूं सरकार. परमेसरनी कसम. ए लेवो मारूं हतियार ( तरवार खालीं ठेवतो. )

इतर भिल्लः—अने ए मारूं;ए मारूं; ए मारूं पण लेवो. ( एकामागून एक सगळे भिल्ल आपआपल्या तरवारी खालीं ठेवतात.)

भाऊसाहेबः—रस्तम तुह्मीं मुकाट्यानें आतां या आरबांबरोबर जा.

रस्तमः—हां, जी सरकार. पण सरकारनें चरणपर मारा एक अरज छे.

भाऊसाहेबः—असूंदे. तो उद्यां पाहूं.

( आरब आणि भिल्ल जातात; आणि इकडे बाळासाहेब भुईवर धाडकन् पडतात. )

भाऊसाहेबः—जामदार, धांवा धांवा; त्याला आधीं सांवरून धरा. खिडक्या उघडारे ह्या कोणी. डोळ्यांला पाणी लावा, जामदार. ( एका मनुष्याकडे पाहून ) कायहो मल्हारराव, तुह्मी बिछान्यावरच अजून ?

मल्हाररावः—( बिछान्यावरून उठून ) भाऊसाहेब, आपण मला आज जिवदान दिलत. नाहीं तर खचीत त्या धेडांनीं माझी लावलांगोळी—

१ गायकवाड सरकारच्या राज्यांतला एक प्रसिद्ध डोंगर.

भाऊसाहेबः—पुरे हो. सध्यां लौकर गुलाबपाणी आणा ह्मणजे झालें. ( मल्हारराव बाहेर जातात.)

भाऊसाहेबः—तें कोण आहे कोंपऱ्यांत ?

गुणाजीः—मल्हाररावाचं तिसरं कुटुंब, झाळसाबाई.

भाऊसाहेबः— ( मनांत ) अरेरे, अगदीं पोरसवदा आहे, पहा ! इतके दिवस ऐकत होतों कीं, शुद्ध चांदिणी आहे म्हणून. असेल खरी बुवा. ( उघड ) बाई, जरा तुम्हीं इकडे येऊन— ( ती लाजून जरा तोंड फिरविते ) हं, लाजूं नका. ही ती वेळ नव्हे. इकडे या आणि बाळासाहेबाला वारा—

गुणाजीः—हाय हाय ! हें इकडे बघा दिवाणसाहेब. ( बाळासाहेबांच्या दंडाकडे बोट दाखवितो. )

भाऊसाहेबः—खरेंच ! दंडावरली बंडी सुद्धां रक्तानें चिंब भरली आहे ! ! ओहोहो ! रक्तस्राव अधिकाधिकच होत आहे! बाई, जरा लौकर एक चिंधी द्या.

( झाळसाबाई अंगावरलें जरीचें लुगडें तट्कर फाडून चिंधी देते. )

भाऊसाहेबः—वा ! याला ह्मणावें प्रसंगावधान. जामदार, जखम अगदीं जखडून बांधा. ( जामदार जखम बांधतात. ) बांधली ? आतां त्यांना या बिछान्यावर घेऊं या. जामदार, बाळ जरा बेसावध आहे. ( बाळासाहेबांना बिछान्यावर निजवतात. )

भाऊसाहेबः—मला वाटतं, ही उशी त्या हाताखालीं टेंकण द्यावी, ह्मणजे रक्त खालीं उतरणार नाहीं. हात लोंबकळल्यानें इजाही जास्त होईल. ( झाळसाबाई हाताखालीं उशी सारखी ठेवते आणि गुणाजीबावा त्यांचें डोकें मांडीवर धरितात. )

झाळसाबाईः—( मनांत ) बाई, या उशीच्या निमित्तानें तरी यांचा स्पर्श घडला. ( अंग थरारविते. )

भाऊसाहेबः—बरं, बाई, आतां यांचें डोकें तुह्मी जरा मांडीवर

धरा. आणि–हां, नीट संभाळा बरें. ( जरा वांकड्या मानेनें पाहून ) हां तसेंच धरा; लाजूं नका–

झाळसा०–( शीर मांडीवर धरून मनांत ) अहाहा, दैवा, तुझी करणी फार विचित्र आहे! अरे, जी गोष्ट स्वप्नांत सुद्धां घडण्याची नाहीं, ती प्रत्यक्ष आजच्या या विघ्नांत घडून येते. नाहीं तर या राजबिंड्याचें डोकें आणि या हतभागेच्या मांडीला कशानें लागणार ? अस्तु. ( पदर सरसावते. )

भाऊसाहेबः–हां, असेंच; आणि जामदार, खालीं जाऊन हकीम[1] साहेबांकडे जलदी स्वार दवडा जा. जातांना वरती एक मशाल लावून द्या. ( गुणाजी बाबा निघून जातात. ) बरें, आतां त्या मागल्या खिडकीशीं कोण काळा काळा बेरड निजला आहे ?

झाळसाबाईः–( बाळासाहेबांकडे बोट करून हळूच ) हे आले ( लाजते ) तेव्हां तो चोर, दार लावतां लावतां, एकाएकीं मोठी किंचाळी फोडून जवळच धबकर जाऊन पडला !

भाऊसाहेबः–( त्याजवळ जाऊन) अरे, हें तर शुद्ध लांकूड बनलें. मशालजी, ही खिडकी उघडून याला खालीं चौकांत ढकलून दे.

( मशालजी खालीं लोकांना "पैस, पैस" करून प्रेत ढकलून देतो; आणि खालीं चौकांत ओरड होते )–

"महाराज येथें चौकांत आणखी दोन मुरदे आहेत."

भाऊसाहेबः–असूं द्या. आलों तिकडे. ( मल्हारराव गुलाबपाणी घेऊन येतात, त्यांना पाहून ) खासें. आतां आलांना! दिवाळीला गेलां ते दसऱ्याला परतलां ! बरें, चला आतां खालीं. पाहूं तिकडे काय गोंधळ आहे तो. या मल्हारराव. ( झाळसाबाईस उद्देशून ) बाई, डोक्यावर गुलाबपाण्याची घडी ठेवा. संभाळा बरें; दाराला कडी घ्या लावून. नाहीं तर येथें आतां गर्दी होईल. मशालजी, चल पुढें हो.

---

[1] वैद्य ( मुसलमानी शब्द .)

मशालजीः–जी सरकार. ( मशालजी, मल्हारराव व भाऊसाहेब जाऊं लागतात. )

बाळासा०:–( सावध होऊन, व डोळे जरा उघडून; हळूच ) कोण आहे ?

झाळसा०:–मी आहें. ( हळूच व गालांत हंसून ) आपली दासी झाळसा.

बाळासा०:–(हांसून) हं हं, आपण अहां का ? ( डोळे मिटतात. )

भाऊसाहे०:–( जातां जातां ) सावध झाले ?

झाळसा०:–नाहीं. उगीच तारेंत बरळताहेत. ( मनांत ) माणसाचा काय आप्पलपोटेपणा आहे पहा बाई ! बाळासाहेब दुःखांत आहेत; दिवाण साहेब घोरांत आहेत; अनी मी आनंदांत आहें ! !

भाऊसाहे०:–भिऊं नका. आतां हकीमसाहेब येतील. गुलाबपाण्याच्या घड्या ठेवा डोक्यावर आणि त्या जखमेवर पण जाथू मारा चालूंद्या पाण्याचा. कडी लावा.

झाळसा०:–( कडी लावावयास उठून मनांत ) अशी कडी कीं नाहीं बाई, रात्रंदिवस घालून सेवा करीत बसलें असतें. पण असलं काटून असणार आपल्या कपाळीं ! असलं सौख्य प्राप्त होण्याला एखादी भाग्यवान् सगुणाबाईच अवतरली पाहिजे. ( कडी लावते. ) ( पडदा पडतो. )

## प्रवेश ४ था

स्थळः–बाळासाहेबांचा दिवाणखाना.

वेळः–प्रातःकाळ; आठ वाजण्याचा सुमार.

( बाळासाहेब बिछान्यावर निजले आहेत; जवळ गुणाजी बावा व एक हुजऱ्या बसले आहेत. )

गुणाजीः–( आपल्याशींच ) आतांसा जरा डोळा लागला

आहे; ताप काय फणाणला आहे ! ( सगुणाबाई आंत डोकावतात असें पाहून हळूच ) या, या.

सगुणा०:–( आंत जाऊन, हळूच ) जामदार आता कसं आहे ?

गुणाजीः–आतां बरं आहे बरं सूनबाइ.

सगुणा०:– ( हंसून ) होय, आपण तीर्थस्वरूप बसलांच आहां डोळ्यांत तेल घालून जवळ. मग मला कां व्यर्थ एकटीलाच काळजी ? ( बाळासाहेबांच्या जखमेला कुरवाळते. )

बाळा०:–( जागे होऊन ) हाय ! ( डोळे उघडून ) आपणच का ? जरा कुरवाळा तसेंच गोड वाटतें. ( पुन्हा डोळे मिटतात. ) हा हा; हुस्–अहाहा, गोड वाटतें.

सगुणा०:–कोण आहे आंतल्या दारा पाठी मागं ? म्हाळसाबाई ? येतें बरं तिकडे. आपण त्या माझ्या खोलींत बसा.

बाळासा०– ( डोळे उघडून सगुणाबाईस विचारतात ) कोण कोण ? आपल्या– ( जरा चपापून ) म्हाळसाबाई का ? या या, ह्मणावें आंतच येऊन बसा. येथें कोणी कांहीं परका नाहीं. ( सगुणाबाई उठूं लागते तिला उद्देशून ) हां आपण उठूं नका. असेंच कुरवाळीत बसा. मला बरें वाटतें.

ह्माळसा०:– ( आंत येऊन, गालांत हंसत, सगुणाबाईस दुरूनच हळू विचारते ) बाई, आतां बरं आहेना ?

सगुणा०:– ( मानाडोलाविते; आणि बसावयास खूण करिते. )

बाळासा०:–हो, हो; आतां फार बरें आहे. आपल्या तिकडून जेव्हां काल इकडे आलों, तेव्हां मात्र फारच बिचलली होती प्रकृत.

गुणाजीः–बसा ह्माळसाबाइ, खालीं बसा. यजमानांची तबियत ठीक आहेना ?

ह्माळसा०:– ( माना डोलविते ) काल आपण मला चुडेदान दिलंत.

गुणाजीः—ग्यां कशाचं बाई ? ( बाळासाहेबांकडे बोट करून ) या माझ्या बाळानं दिलं. तुह्मां दोघींचं मंगळसूत्र बळकट म्हणूनच कालची निभावली. नाहीं तर आज काय अनर्थ कोसळला असता. ( म्हाळसाबाई लाजते. )

म्हाळसा०:— ( मनांत ) जळूमेलं असलं तें सौभाग्य. यापेक्षां मीच मेलें असतें तर बरं ! ( एक हुजऱ्या गुणाजी बावाच्या कानीं लागतो. )

गुणाजीः—बरं, येऊंदे त्यांना भेटीला.

सगुणा०:—कोण ?

गुणाजीः—रंगोपंत नवरंगे येताहेत भेटीला.

सगुणा०:—(ह्माळसाबाईस) बरं बाई, ह्या जवळच्या दालनांत आपण बसूं या, चिकाचे पडदे सोडूं ह्मणजे झालं.

ह्माळसा०:—हो तसंच बरं.

(दोघी जाऊन पडदे सोडून बसतात; व पश्चात् रंगोपंत येतात. )

गुणाजीः—या पंत; या; बसा.

रंगोपंतः—( बाळासाहेबांकडे हात करून ) तबियत ठीक आहेना स्वारीची ?

बाळासा०:—बरी आहे; रंगोपंत जवळ याहो असे दूर कां ?

रंगोपंतः—नाहीं. इथेंच बरें आपलें प्रशस्तपणीं.

सगुणाबाईः—(ह्माळसाबाईस उद्देशून ) हा मेला काळतोंड्या कशाला आला इथें ? याच मेल्यानं ह्मणतात कालचा घाला आणलान् तुमच्याकडे. अशी आपली कुणकुण आहे गावांत.खरंखोटं हरी जाणे !

ह्माळसा०:—असं ऐकतें खरं. पण बाई, ह्मण आहेना "चोरधरावा चोरीवर नी ( अगदीं हळूच हंसत ) जार धरावा खाटेवर." आमच्या दादाचं अनी या कलिपुरुषाचं अगदीं जिवश्य कंठश्य आहे.

सगुणा०:—घरांत वारंवार ह्मणत असतात कायसं " समानशील व्यसनेषुसख्य. "

झाळसा०:-तें कांहीं बाई मिथ्या नव्हे. बरं बाई,हे दोघे कोण नवेच त्यांना ( लाजते ) नमस्कार करिताहेत ?

( गवई आणि इंग्रजी मास्तर येऊन बाळसाहेबांस नमस्कार करितात. )

बाळासा०:-(उलट नमस्कार करून ) बसा मास्तरसाहेब; वस्तादजी बसा.

झाळसा०:-एक मास्तर नी एक गवई का ?

सगुणा०:-होय आह्माला महाराज साहेबांचा जारी हुकूम झाला आहे कीं, आह्माला इंग्रजी अवश्य आलं पाहिजे. ह्मणजे आमचं पहिलं काम आह्माला ताबडतोब मिळेल. फक्त इंग्रजी शिकण्याकरितांच आह्माला येथें आणिलं आहे.

मास्तर व गवईः-गुणाजी बावा राम राम; बरे खुशाल ?

झाळसा०:-ह्मणजे काठेवाडची दिवाणगिरी नव्हे ?

सगुणा०:-होय.

गुणाजीः-राम राम; रामराम. आज कांहीं यजमानाचं शिकणं होत नाहीं.

मास्तरः-तो कळला आहे सारा वृत्तांत. फक्त मी समाचाराला येत होतों, तों वाटेंत गवईबवा भेटले. तेही समाचारालाच येत होते.

गवइः-पणही कालची गोष्ट घडून कशी आली, याचा मोठा अंचबा वाटतो ! काळोखांत हेंच घर हुडकिलें कसें ? आपसुकासच दिंडो उघडी कशी सांपडली ? आणि मोजकेच अचूक जाऊन त्या ह्मातार्‍याला धरितात कसे ? इतकें होईपर्यंत देवडीवाले निजले होते कीं तत्सत् झाले ? मोठें नवल वाटतं बुवा याचें !!

झाळसा०:- खरंच बाई, सर्व असंच आश्चर्य करितात. पण—आतां मला आठवतं—काल गोंधळ आटोपल्यावर मी घरीं गेलें,

---

१ याचा संबंध सगुणा बाईच्या बोलण्याशीं आहे. दिवाणखान्याच्या एके बाजूला ह्या बोलताहेत व दुसरे बाजूला पुरुष मंडळी आहे.

तों हा मेला मुंजा, रंगोपंत नी आमचे दादा कांहीं कुजबुज करीत बसले होते. मग ह्यानंच लपून बसून दार उघडलं कीं काय चोरांना न कळे? अनी आमचे दादा, आपले दादाच आहेत!

रंगोपंतः—बाबासाहेब, याचें मोठें भारीसें गूढ कांहीं वाटायाला नको. अहो, आधीं त्यांच्या घरांत ईनबिन तिन माणसें; पुन्हा, सारीं ह्यातारीं कोतारीं. हें लग्न झाल्यापासून (हांसतो) जवान जवान गड्यांना अजीबात फांटा दिला. बरं, आहेत तीं सगळीं धांद्रीं. विसरलीं असतील दिंडी लावाला. न हीं तर चोरांची काय माय व्यायली होती आंत प्रवेश करण्याची? वाडा शुद्ध किल्ला आहे. आणि हेंहा खरें कीं, त्या गुलामांनीं पूर्वीं टेहळून ठेविलें असावें. (मनांत) आपलें आपल्याला माहीत. अंदरकी खून अस्मादिक जाने.

मास्तरः—पण यांत कोणी तरी घर-भेद्या-(इतक्यांत विश्वासराव येतात) यावें, यावें आपलीच कमत ता होती, राव साहेब. (हंसून) यांना त्या भिंतीशीं खुर्ची द्या हो.

विश्वासरावः—(हंसून) मेहरबान्, आपलेच ह्या आमच्या बांटची. (हिकडे तिकडे पाहून) ओ, लो. अगदीं फुल कोर्ट भरलें आहे बुवा.

गुणाजीः-रावसाहेब, आपण 'फु क्ो' ह्मणालां तो कोणहो? का, कोंकणी भोंको? (सर्व हांसतात) असलं नका बाबा, तुमचं हें हेंगडूबेंगडू बोलूं आमच्या जवळ.

मास्तरः—राहिलें. रावसाहेब, आजपासून साधें बोलत जा यांच्या कंपनीत.

गुणाजीः—हां मास्तरसाहेब, कुंपण घातलीत पुन्हा तुह्मी मध्यें—(मोठा हशा पिकतो) हे आणखी आले. यावं गणोबा. (गणोबा चोपदार येतात.)

गणोबाः-( बाळा साहेबांस मुजरा करून, सर्व मंडळीस ) रामराम, सर्व मंडळी.

सर्वः-रामराम,रामराम,गणोबा;बसा,या, असे पुढें या मागं कां?

मास्तरः-काल म्हणतात, सर्वस्वीं नागवलें होतें म्हाता-ऱ्याला चोरांनीं.

गुणाजीः-दहा बारा हजारांचं जवाहीर नी मोतीं लांबिवलं असतं खरं तेवढं, जर बाळा साहेब तेथें वेळेस पोंचले नसते तर. बाकी सोन्या नाण्याच्या पेट्या तेथें नव्हत्याच. त्या दाक्षिण्या-विषयीं लोभांत गुंतून ते मारकूट करीत होते तों आम्ही धांवलों चोंहोकडून.

विश्वासरावः-पहा,गुलामांनीं दरोडखोरांनीं कशी संधी साधली आहे ! महाराज साहेब तर तो काठेवाडांतला वडा दंगा मोडण्या-करितां सर्व लावलष्कर घेऊन गेले आहेत. राहिले इथे पोलिस. ते आपले आपल्यालाच संभाळण्यांत चूर झाले आहेत. बरें बाळासाहेब, आपल्यावर तीन खुनांचा चार्ज आहे कालचा. आहे कीं नाहीं ?

बाळासा०:-होय बाबा आहे खरा.

विश्वासरा०:-पण हे मेले कसे ?

बाळासा०:-त्यांचें असें झालें:-दिंडीदार उघडें पाहून आंत शिरलों. चौकांत गेल्यावर माझ्यामागें दिंडी लगेच लागली. इत-क्यांत एक चोर माझ्या मागेंच येऊन खेटला. मला शंका ये-ऊन मी पुंजाजी, पुंजाजी, करून हांक मारूं लागलों, तरी तो कांहींच सावपणाचें चिन्ह दाखवीत नाहींसें पाहून, लागलेंच झाडलें पिस्तुल त्याजवर. तो पडतो न पडतो तोंच दुसरा आला चालून अंगावर. त्याच्यावर दुसरें पिस्तुल रोखून धरून बार तर काढला; परंतु चाप लोटण्याच्या पूर्वींच तो पडला. तेव्हां तो खरा मेला कीं नाहीं म्हणून पहावयास जवळ गेलों मात्र, तों सर्पासारखा, सळसळ आला त्याचा पट्टा लखाखत मानेचा नेम

धरून. झप् दिशीं मागें सरून वार करून त्याला तर चीत् केलें फटक्यासरसें. पण त्याचा तो घाव माझ्या दंडावर पडला. तो मला खून चढल्यानें समजला नाहीं. मग चौकांत कोणी नाहीं असें पाहून वर गेलों. तों तिसरा दार लावित होता त्याचा तिथेंच पाडला मुर्दा.

म्हाळसाबाईः--काय सांगू बाई, कालची आठवण झाली कीं छाती उडूं लागते धडधड !

गणोबाः--बरं, दिवाणसाहेवांचं आपल्याला विचारणं आहे कीं, आतां त्या भिलांचं काय करायचं ?

बाळासा०ः--खरें मला पुसाल, तर त्यांना अजीबात सोडून द्यावे. त्यांनीं पोट कसें भरावें तें सांगा ? त्यांचे हक्क बाद केले; त्यांना भीक कोण कुत्रा घालतो ? आणि शेतभात कांहीं नाहीं. आणि दाद कांहीं लागत नाहीं. हे नवे नवे अधिकारी येतात; आणि कांहीं तरी नव्या जुन्या उलाढाली करितात. मग असें होतें.

गणोबाः--रुस्तम तरी असाच अर्ज करीत होता दिवाणसाहेवांपाशीं. सांगतों असा आपला निरोप जाऊन तर, दिवाणसाहेवांना.

बाळासा०ः--गणोबा, दिवाणसाहेवांना आणखी अशी माझी विनंति करा कीं, " कृपाकरून ह्मणावें त्यांच्या हक्कांचा विचार व्हावा. म्हणजे हे दंगेधोपे तरी बंद होतील; त्या भिल्लांना सोडून द्यावें; निदान रुस्तमला तरी मला बक्षीस करावें" कारण काल मला त्याणें वांचविलें, असें ह्मटलें पाहिजे.

गणोबाः--तें कसं ?

बाळासा०ः-तो जर हात करता तर त्याच्यापुढें माझी प्राज्ञा नव्हती. पण रामोशी, भिल्ल ही जात मोठी इमानी. थोडे दिवस हा आमच्या तीर्थरूपांच्या पदरीं होता. जामदारांचा खेळ गडीच.

म्हाळसा०ः--बाई, यावरून आपल्या जवळही माझं मागणं आहे कीं, बाळासाहेवांना आह्माला बक्षीस करावं. कारण, यांणीं आमचे दोघांचे प्राण वांचविले. ( हांसते. )

सगुणा०:- ( बाह्यात्कारीं हंसून मान डोलविते; मनांत ) काय हो ही आहे ! केवळ उल्लू झाल्या सारिखं बोलली.

गणोबा:-घेतों तर रजा आतां. ( मुजरा करतो. )

गुणाजी:-कोणरे, विड्यांचं तवक.

हुजऱ्या:-जी, ह्ये आनल. ( तबक घेऊन येतो. )

गणोबा:-( विडा घेऊन व पुन्हा मुजरा करून ) सर्व मंडळी, राम राम. ( जातो. )

रंगोपंत:-मी पण विचारतों रजा आतां.(ताटांतून विडा घेतो )

बाळासा०:-विडा घेतला पंत? (असें ह्मणून नमस्कार करावयास हात वर उचलितात, तों अंगठीवरचा हिरा चकन् चमकतो.)

रंगोपंत:- ( अंगठीकडे पाहून ) घेतला. पण बाळासाहेब, ही हिऱ्याची आंगठी नवीच कोणाची ? मी नाहीं कधीं यापूर्वी पाहिली आपल्यापाशीं. ( मनांत ) ह्माळसाबाईनें कांहीं त्याच्या बोटांत घालतांना मीं पाहिलें खरें रात्रीं. पुन्हा, तिची आंगठीं गेल्याविषयीं चौकशीही चाललीच आहे. बहुशा तीच ही असें वाटतें.

ह्माळसा०:- ( मनांत ) मेल्या कर्मा, तूं आलंस अखेरीला पुढं. आतां काय बोलतात न कळे !

बाळासा०:- ( मनांत ) पहा; जावें धर्म करायाला तें कर्म उभें राहतें ! तेथें गेलोंच नसतों ह्मणजे कां ही वेळ येती ? तिला नको नको ह्मणत असतां तिनें बळेंच घातली. बरें, पुढें मला शुद्धीच राहिली नाहीं तिची ह्या घटकेपर्यंत. नाहीं तर, हर युक्तीनें ती मल्हाररावाकडे पाठविली असती. असो. आतां प्रसंगाला अनुसरलें पाहिजे. ( उघड ) ही अंगठी कां ? हिरकणीची-( मंडळी हंसते. )

म्हाळसा०:- ( मनांत ) अहाहा, काय नामी उत्तर! हें बोलणं खचीत मलाच उद्देशून आहे. हिरकणीची !

रंगोपंत:-पण ह्मटलें, इतके दिवस कधीं नाहीं आढळली ती !

बाळासा०:–आज आपण पाहिलीत ना ? तर, आजच ती आह्मी पैदास्त केली असें समजा. (पुन्हा सर्व खोखो हांसतात.

रंगोपंत:-बरें, येतों बाळासाहेब. ( मनांत ) येथें कांहीं काळें बेरें आहे. परंतु सध्यांच त्याचा उपयोग नाहीं. असो, कांहीं चिंता नाहीं. ( उघड ) येतों, मंडळी बसा.

सर्व:–यावें. नमस्कार. ( रंगोपंत जातात. )

म्हाळसा०:–बाई, बरी मेल्याची टर उडाली ? या मेल्या दरोडेखोराला सर्वच चोर वाटतात !

विश्वास०:–मास्तरसाहेब, या आमच्या शहरांतली ही एक गाळींव वस्तु आहे. ओळखून ठेवा.

मास्तर:–दिसते खरी बुवा तशी.

गवई:–मीही येतों आतां यजमान साहेब. नऊ वाजून गेले. ( उठूं लागतो. )

मास्तर:–(त्यास बसवितो) बसा हो जरा. येथें राहायाला कोण आलें आहे ? साऱ्यांना एकाच वाटेनें जावयाचें आहे. बाळासाहेबांना तरी कर्मणूक होईल थोडी मंडळीच्या योगानें. ( गवई बसतात. )

विश्वासराव:–हो हो, बरें आठवलें. बाळासाहेब, ते दिवशीं गवईबावा आणि मी स्वदेशीकीर्तनाला गेलों होतों. तेव्हां त्या बावांनीं दोन तीन सुरस पदें ह्मटलीं. तीं गवई बवांनीं उचललीं तावडतोब. आपली ऐकावयाची इच्छा आहे काय ?

बाळासा०:–होहो; आपली अगदीं ना नाहीं.

म्हाळसा०:–सगुणाबाई येतें आतां—घरीं यायचं झालं उशीरच. ( उठूं लागते. )

सगुणाबा०–बाई, यवढं ऐकून चला.

म्हाळसा०:–बरं बाई.पण घरीं अगदीं तोडतोडून खातील जसे. ( बसते. )

( गुणाजी बावा तबला व तंबोरा आणून देतात. )

गुणाजीः– रावसाहेब, आपणच घ्या आतां तबला.

विश्वास०ः–हंः तें आपलें काम. (तबल्यावर हात मारितो. )

गवईः– ( तंबोरा घेऊन ) आ—आ. हं हंः (खांकरतो. )

( चाल; श्यामकर्ण जुपावे रथीं, होऊनी सारथी० )

" किति झालां वेडे पिसे उलटली मती ॥
धडधडित गळे कापितां, सोडिली निती !"॥ध्रु०॥

बाळासा०ः–रावसाहेब, ठेंका अगदीं बारिक आणि धीमा चालूं द्या.

गवईः–( पद पुढें चालवितात. )

"आह्मीं बऱ्या असुनि बायका; वाढवूं प्रीती॥निजबाळें, आह्मां प्राणासम भासती ॥ तुम्हीं दिवटे, आयत्यावरी खचुनि कोयती ॥ घालितां; चिरितसां पिलां स्वोदराप्रती ॥ चाल ॥ एकवार फाशीं पडतां मग फसगती ॥ पोरींस वाटते; बरवी आधोगती ॥ दैवासि बोल लाविती; हाल भोगिती ॥ चाल पहिली ॥ आडांत ह्मणती लोटलें त्याची क्षिती ॥ वाटती न. आह्मां दिधलें मांगा हातीं ॥ किति०॥१

आंवळ्याची मोटबांधितां, कशि न सूटती ? ॥ पुरासि बांध घालितां, कां न फूटती ? ॥ फांदिस बळें जुळवितां, सहज तूटती ॥ पोरांसि भुकी ठेवितां, खचित चोरिती ॥ चाल ॥ तशि, बळें जुळवितां मुलें मनीं फाटती ॥ शांतता सौख्य संसारिं तयां सोडिती ॥ किति वाया पळती; किति अज्यां लाविती ॥ चाल पहिली ॥ किति मेल्या; सोचा किती; कैक बाटती ! ! याकारण तुह्मीं. लाज कशि न वाटती ! ! ! ॥ किति० ॥ २ ॥"

मास्तरः–वा; मजा केली बवासाहेब. आणखी एक दुसरी चीज.

गवईः–वेळ झाला आहे मास्तरसाहेब. आतां उद्यां.

( सर्वांस पानसुपारी होते. )

विश्वासराव, मास्तर, आणि गवईः–( नमस्कार करून ) येतों आतां बाळासाहेब. रामराम, जामदार.

बाळासाहेब आणि गुणाजीः–यावें बरें; नमस्कार; रामराम. ( तिघे जातात. )

सगुणा०:–(पडद्यांतून) जामदार, झाळसाबाई रजा मागतात.

बाळासा०:–बरें आहे. असाच दयालोभ ठेवा ह्मणावें.( झाळसाबाई जाऊं लागते. )

सगुणा०:–थांबा बाई, कुंकूं लावाचें आहे. (दोघी जातात.)

गुणाजीः–अरे, पाहऱ्यावर, पडदा सोडा. आंत कोणाला येऊं देऊं नका आतां.

हुजऱ्याः–जी. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळः–भवानराव फौजदाराचें घर.
वेळः–तिसरा प्रहर.

फौजदार बिछान्यावर कण्हत उपडा पडला आहे; व जवळ रंगोपत बसला आहे.

रंगोपंतः–कां साहेब, कशी काय हालहवाल? आपल्याला काल वार झाले ह्मणतात?

फौजदारः–होय. तो दरोडा धरण्याला गेलों, त्या मारामारींत हे दोन तीन ( पाठीवर हात नेऊन दाखवितो ) लहान मोठे वार झाले. आज अंग अगदीं अंबलें आहे.

रंगोपंतः–( मनांत ) वारे शूर! पाठीवरचे वार दाखवितो! पळत होते पाय लावून ह्मणून पाठीवर वार खाल्ले. ( हंसतो ) हे धारराव, आणिक दरोडा धरण्याला धजणार, नांव कशाला! ( उघड ) असें नका बुवा लप्पनं छप्पनं सांगूं आपल्याजवळ. काय तो खरा मजकूर सांगाना.

फौजदारः–( मनांत ) याच्यापुढें कांहीं थातुर मातुर चा

लायचं नाहीं. ( त्याच्या कानाशीं लागतो ) पंत, तुमच्याजवळ खोटं कशाला? बाळासाहेबाकडला तो गोंधळ बंद कराला जात होतों. कारण काय ह्मणाल, तर, तें आपण जाणतांच.

रंगोपंतः—हो; जाणतों तर, तुझ्या ह्मणे डोरलें. ( हांसतो. )

फौजदारः—पंत, बाळासाहेब येथें रहाण्याला येण्याचे पूर्वी ती मजकडे पाहत असे हें आपल्याला माहीत आहेच.

रंगोपंतः—( मनांत ) या खापरतोंड्याकडे पहातो कोण ? ठोक्यांचें तपलें हें. उगीच तिनें सहज पाहिलें असेल, तों हे शिरोमणी लागले मनांत मिटक्या माराला. मी याज्करतां शंभर वांव्यांनीं बरा. ती मलाही धूप घालीना! ती याला पुसते! !

फौजदारः—पण, काल रांडेनें केलें काय, ती पहात होती आपल्या गच्चीवरून बाळासाहेबांकडे; आणि त्यांनीं जरा रुसून बसल्यासारिखें तोंड फिरविलें होतें. इतक्यांत मी त्यांच्या वाड्याच्या त्या मधल्या पट्टांगणांत गेलों, नी तिच्याकडे पाहिलें. तिच्या दृष्टीस मी पडलों मात्र, तों रांडेनें खिडकी कीं हो, घेतली बंद करून. मला काय पण संताप झाला ह्मणतां तेव्हां. पुन्हा, बाळासाहेबादेखत हा माझा पाणउतारा, बोला कसा खपेल तो !

रंगोपंतः—ह्मणून वाटतें, आपण हें रात्रीं उट्टें काढायला गेलां होतां ? पण " केलें तूस नी झालें मस. "

फौजदारः—( ऐकिलें न ऐकिलें असें करून ) हो, हो; बरी आठवण झाली. कालच्या दिवशीं त्यांची गांठ पडली होती एकांतीं ह्मणतात. मग ?

रंगोपंतः—पण, दैव पडलेंना गंडिया[1]. मी स्वतां त्या दिवाणखान्याच्या पुढल्या माडीच्या—एका खिडकींतून पाहिलें कीं, तिणें दिवाणखान्याला कडी लाविल्यावर, इकडे तिकडे कोणी नाहीं असें पाहून तिला जो कांहीं प्रेमाचा लोंढा आला, तो

१ पेशां ( गुजराथी शब्द. )

बोलतां सोय नाहीं. बाळासाहेब जरी अगदीं शुद्धीवर नव्हता तरी त्याचे तिनें मटामट खूप खरपुस मुके घेतले.

फौजदारः—पण असें करण्याला एकदम तिचा हिय्या कसा झाला ?

रंगोपंतः—बाळासाहेब आल्या दिवसापासून गच्चीवर अभ्यास कराला बसायचे. अनी ती आपल्या दुसऱ्या मजल्याचे सज्यावर नित्य यायची त्यावेळेस. मग प्रथम एकमेकांकडे डोळ्यांचें तारायंत्र करतां करतां, थोड्या दिवसांनीं हीं छेलछबेलीं गुलाबी पाखरें लागलीं एकमेकांशीं हंसाला गालांतल्या गालांत; मग झाल्या टिवल्या बावल्या शुरू. हें मीं आपल्या खिडकींतून कितिकदां पाहिलें आहे. फिरून कालची वेळ तर काय, फारच फांकडूहो ! !

फौजदारः—पण पुढं काय ?

रंगोपंतः—नीटसं दिसलं नाहीं. पण तिनें त्याचा हात आपल्या छातीवर घट्ट दाबून धरला होता—इतक्यांत बाहेर हकीमानें हाक मारिली. उठतां उठतां तिनें तो हातानें ‘ नको ’ ‘ नको ’ ह्मणत असतां, बळेंच कांहीं त्यांच्या बोटांत घातलें. तीच तिची ती सांडलेली आंगठी असावी. आज सकाळीं बाळासाहेबाच्या हातांत एक नवीच हिऱ्याची आंगठी पाहून ‘ कोठची ’ ह्मणून विचारतां त्यांनीं उडवाउडवीचींच टोंचून उत्तरें दिलीं.

फौजदारः—हो त्यांजकडून अंगठीविषयीं याद आली आहे. पंत, पण तुह्मी आंत कसे गेलां त्या दणक्यांत?धन्य तुमची बाबा !

रंगोपंतः—( भान न राहून झट्कर ) अहोराव, मी त्या चोरींतच होतों !! ( चपापून मनांत ) अरे, मी गाढव नव्हे ? हें काय बरळलों ! अरे, आग लागो या माझ्या आजच्या घाईला.

फौजदारः—काय ! तुह्मी चोरींत होतां ?

रंगोपंतः—छे हो. चोरींत होतों ह्मणजे चोरीच्या वेळीं तेथेंच होतों. आतांशीं आह्मीं तिच्या भावाशीं अगदीं सांजसकाळीं

मोठी रहसाळी ठेवली आहे. बहुतेक थोडेच दिवसांत लग्गा लागेल.

फौजदारः—पंत, तुह्मीं तर बावा, थापाथापी करून मला शुद्ध बोटेंच चाटायला लाविलें आहे. अरे गृहस्था, या असल्या कोऱ्याभरावणीनें माझ्या अब्रूच्यापरी अब्रूची, माझ्या शरीरापरी शरीराची आणि पैशापरी पैशाची सफ्फाई चांदी उडत आहे. आज काय वशी करणाच्या मुळ्याच घेतल्या; आज काय हेंच केलें, नी तेंच केलें. सर्व थोतांड रे !

रंगोपंतः—साहेब, तोंडच्या गोष्टी नव्हत या. 'किल्ला' घेववेल पण 'कांसोटा' घेणें फार मुष्किल आहे ! आहां कोठें आपण ! सर्व कामें मार्गानेंच व्हावीं लागतात. आज माझा पाय शिरकला; उद्यां आपला शिरकावतों; भितां कां? दमानें घ्या. बाळासाहेबाकडले तिचे सर्व प्रयत्न व्यर्थ पाडले, आणि आपण तिला सप्रेम अंतःकरण दाखविलें कीं, ही क्षुधित मधुमक्षिका इकडे वळेल ! अहो, राजांचा, स्त्रियांचा आणि वेलींचा असा कल आहे कीं, जो त्यांच्या जवळ जवळ असेल त्याजवरच लपटतात ! ! साहेब, तीं साधीं भोळीं माणसें; दोन अडव्या तिडव्या बाता दिल्या ठोकून ह्मणजे झालें. ( मनांत ) खुळ्या, तुझ्या डोळ्यांत तरी माती टाकण्याला जास्त सायास नकोत. ( त्याच्या हातावर टाळी देऊन हांसतो. ) हो, हो. हो !!

फौजदारः-बरें तें असो—मग आज घेऊं का बाळासाहेबांच्या घराचा झाडा अंगठी करितां ? कसातरी तो घोडा मधून उडाला पाहिजे; ह्मणजे आपला डाव लौकर साधेल.

रंगोपंतः—अंगठी सांपडणें आतां अशक्य. असलीच तर तो त्या विषयीं आतां पक्का सावध झाला असेल. न सांपडल्यास मात्र अब्रू घेतल्याबद्दल महाराजसाहेब तुमचीं पाळें मुळें खणतील. बाळासाहेब महाराजांचा अगदीं जिवाचा कलिजा आहे.

फौजदारः—पण एक दिवस त्याला पुरा तावडीस आणला

पाहिजे. म झ्या या जखमांपेक्षां तिनें उद्दामपणानें केलेला अ-वमान जास्ती सलताहे.

रंगोपंतः—तें होईल हो. आपण धीर मात्र धरा, ह्मणजे झालें. येतों आतां राम राम.

फौजदारः—रामराम. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ६ वा.

स्थळः—झाळसाबाईचा रंगमहाल.

( झाळसाबाई पलंगावर तळमळत पडली आहे; जवळ बाईजी बसली आहे. )

बाईजीः—बाळा असं कायबरं करतेस ? खायचं नाहीं ह्मणजे काय ? 'खातें खातें' ह्मणतां तिसरा प्रहर व्हायला आला. मनुष्याला कांहीं तरी विवेक पाहिजे कीं नको ?

झाळसा०:—(तिच्या गळयावर हात टाकून) बाईजी, तुह्मीच सांगा विवेक कसा धरूं. अंगाची लाही लाही होत आहे. रात्रींची झोंप मुळींच नाहीं.

बाईजीः—अग झोंप कस्ची येते गोळाभर अन्न गेल्याशिवाय? ( तिचा हात धरून ) अगगग, किति कढत हा ! आज दोन दिवस झाले; मेला कांहीं तरी कमी व्हावयाचा होता. जीभ पाहूं. अग, अगदीं फटफटीत पडली ! लागवणकरांच्या दिलीत हाताला यश नाहींना ? आश्चर्य मोठें ! बरं खरंच सांग, तुला काय होतं तें.

झाळसा०:—बायजी, काय होतं तें मला सांगतां येत नाहीं बाई. ( मनांत ) हें खरंच आहे. ( डोळयानां पाणी आणून, उघड ) बोलाला लागलें तर घसा अगदीं कोरडा पडतो.

बाईजीः—जरा डाळींबाचा ल्याही करूं का ? ( झाळसाबाई 'नको' असें मान हालवून दर्शविते. ) तूं नाहींच घ्यायचीस ठाऊक आहे मला. थोडं कांहीं 'खा' ह्मटलं तर लगेच 'ओ'

---

१ चाटण. २ अचा उच्चार झटकन करावयाचा.

कराला लागतेस. आज दीड दिवसांत धड वांसभर अन्न नाहीं पोटांत. माणसानें जगावं तरी कसं बाई ! ( झाळसाबाई उठूं लागते ) अग, चाललीस कोठे वाऱ्यासारखी ? तिकडे कशाला जातेस ? समोरच बाळासाहेब अभ्यास करताहेत गच्चीवर. तुला कोण काय ह्मणेल ? ( तिच्या मागोमाग जाते ) बाळा, सज्जांत वारा फार मारतो; मागें चल. चलतेसना ?

झाळसा०:-बायजी, जरा थांबा. इथें मला जरा बरं वाटतें. ( बायजी तिला मागें नेऊं लागते ) नाहीं. मी, तो गोंधळी आला आहे, त्याचं गाणं तरी ऐकून येईन. ( एका चाकरास उद्देशून ) हिम्मत, ए हिम्मत, त्या गोंधळ्याला हाक मार रे इकडे. ( बाळासाहेबाकडे चोरून पहाते. )

हिम्मतः— ए गोंधळी, अई आव रे अई आव.

गोंधळीः—जी, आलो. ( पुढें येतो. )

झाळसा०:—अरे, तो पिंगा ह्मण पाहूं. ( बाळासाहेबाकडे चोरून पहाते. )

गोंधळीः—जी, म्हंतो. ( तुंतुण्याची खुंटी पिळतो. )

बाईजीः—( मनांत ) हीं एकमेकांकडे पाहतात तरी चोर चोरून किति वेळां ? बाळासाहेबांनीं तरी बूक पहा कसं खुबीनं आड धरिलं आहे. शर्त झाली आतां मात्र.

गोंधळीः ( सूर लावतो ) री–री, यं–यं. ( गातो. )

॥ गाणें ॥

"॥ चल सकेरि माझि सजनि ग, दोघिजनी ॥ व्रंदावनिं घालुनि पिंगा ॥ ध्रु० ॥ निर्गुन होती, सगुन झाली ॥ नामारूपालागीं आली ॥ ( कटावासारखी चाल पुढें ) जळचर, वणचर, सत्वें[1] बणली ॥ मणुक्ष चेहीं येउनी ठयेली ॥ नवविध भक्ति ख्येळ ख्येळली ॥ हुतुतु हमामा घालु लागली ॥ गोपींशीं गोपांशीं, गोफांशीं ॥ ( चाल

१ प्राणी.

पहिली ) येळ येळिं धांगडधिंगा ॥ चल सकेरि माझि सजनि ग दोघीजनी ॥ व्रंदावनिं घालूं ग पिंगा ॥ १ ॥"

हिम्मतः-( मनांत ) रंगोपंत, ह्मंतो ते खर. काय लबाड आहे ही ! मनांतून बाळासाहेबाकडे तर पहायच; पन दिसन्यांत कोनी ह्मनेल जणुं गान ऐकत बसली. ( उघड ) मी ह्मनू बाईसाहेब, "जिव जातो ग बाय, मला कुठेतरी दडवा." ( आदा करितो. ) "जिव जातो ग बाई, मला कोठेंतरी दडवा."

झाळसा०:-हें रे काय मेल्या? शरम आहे कीं नाहीं तुझ्या जिवाला माझ्या देखत असला पचकळपणा करण्याची ? ( बाळासाहेबाकडे तोंड करून किंचित् गालांत हांसते. ) या शहरांतल्या तुह्मां लोकांना फार पचकळपणा कराला पाहिजे !

हिम्मतः-' जिव जातो ' ' जिव जातो, ' खचीत जातो-

झाळसा०:-पुरेरे मेल्या, मरसना कां एकदांचा. (गोंधळ्यास) अरे ए ती मैना ह्मण पाहूं, मैना.

गोंधळीः-व्हय, जी. ( सूर लावतो. ) री-री, यं—

बाईजीः-( मनांत ) आतां पहा, कशी मुखचर्या टवटवीत दिसते ती इचीं! यांतच कांहीं तरी आहे मर्म. हें दुखणं एरव्हींचं नव्हे.

गोंधळीः-री-री, यं-( गातो. )

॥ गाणं ॥

" मरुणि जाईण गे तुजवरूणी ॥ जिवलग संगातिनी ॥ ध्रु०
मैने, तुझा ग पिंजरा परवारी ॥ राजविजाच्या घरीं ॥१॥
मैने, कां गे तूं रागांत ॥ केळीच्या बागांत ॥ २ ॥
मैने, तुझा गे निजध्यास ॥ दिला तोंडिचा घांस ॥ ३ ॥
मैने, तुझ्या गे रूपाची ॥ दंडि बांधिली पौंची ॥ ४ ॥
मैने, झिजलों गे मजलागे ॥ ध्यान तुझेंच लागे ॥ ५ ॥

( सईबाई अकस्मात् येऊन पाठीमागून झाळसाबाईचे डोळे झांकते.)

म्हाळसा०:–( तिचा हात चाचपून ) माझी सईबाईग, सई बाई, होय; खचित. सोड, आतां कशाला धरितेस ?

सईबाई:– ( डोळे सोडून ) बाई, तुझं नशीब थड. काम फत्ते ! ( इतक्यांत बाळासाहेब तिच्या दृष्टीस पडतात. ) आ-हा हा हा! हेंच कां तें ताट ! अगदीं बाई, पंचपक्वान्नांनीं भरलं आहे हो. ( दोहीं आंखांशीं, कडकड बोटें मोडते ) नाहींपेक्षां आह्मीं मेल्या तुकडेमोड्या ! पण तुला तरी खायला तोंड कुठें मोकळं आहे !

बाईजी:–( मनांत ) आतां मुळींच मनांतला संशय फिटला. ही पोर या कजागेच्या नादानें अगदीं सफाई बुडेल.

हिम्मत:– ( मनांत ) हं. ही आहे इचीं वाटेदार सोबती न. ( उघड ) " सवती सवतीच भांडन, रसबाई राळ्याच कां-डण;" आतां, " रसबाई राळ्याच कांडण. ( नाचतो. )

" रसबाई राळ्याचे कांडण " हब, हब, हब, यलकोट मल्हार !

म्हाळसा०:–च्यापरे, मेल्या. तोंड अटीप आपलं.

( पडद्यापलीकडे ) "कोण आहे ले? मादल चोदा, हिमत्या."

हिम्मत:–( तिकडे बघून ) अरे बापरे, बाबासाहेब आले काठी घेऊन मालाला दिंडी दलवाज्यानं. पौबालाले पवबाला ! ( हंसत, पळत सुटतो. )

( म्हाळसाबाई, सई बाई वगैरे गोंधळ्यावांचून सर्व मंडळी पटा-पट पळते. )

मल्हारराव:–( बाहेर येऊन) कायरे, गालवाच्या लेका, प-लालास ? समदा यळ थटा ह्मजी. ( गोंधळ्या कडे पाहून ) तूं कोणले ?

गोंधळी:–( राम राम करून ) बाबासाहेब, मी ? मी गोंधळी.

मल्हारराव:–अन कशाचा घालितो तूं गोंधळ ?

---

१ म्हाळसाबाईचा नवरा मल्हारराव.

गोंधळीः—ख्वोटाचा सरकार, आपल्या.

मल्हारराव:—मंग, इथ का ? चल निघ.

गोंधळीः—म्हाराज, माझा पैसा द्याकि.

मल्हारराव:—अन कुनी घ्येतला ?

गोंधळीः—माझ गान ऐकल ना मंडळीनी.

मल्हारराव:—मंग, ज्यानीं ऐकलं त्ये द्येतील.

गोंधळीः—पन् त्ये गेल्ये निंगून समदे.

मल्हारराव:—तूं पन जा निंगून त्यांच्या मागनं. जात न्हाई का ? हिमत्या, द्ये दोन गचांड्या गुलामाला. ( निघून जातो. )

गोंधळीः—वा, वा; भल्ये सरदार. व्वेवा चिनून पैका. येक-दाच व्हईल त्याच चंदन ! ( गोंधळी जातो. )

पडदा पडतो.

## अंक पहिला समाप्त.

# अंक २रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ— बाळासाहेबांचा वाडा.

वेळः— रात्र. १० वाजण्यचा सुमार.

( गुणाजीबोवा देवडीवर बसले आहेत इतक्यांत विश्वासराव येतात. )

**विश्वासरावः**—जामदार, आज आपल्याकडून अगदीं निकडी चं बोलावणं आलं होतं. आधीं नवाची तोफ झाल्यावर मी घरीं आलों. अनी नुक्ते चार घांस घेतले होते. तों आला आपला निरोप. तसाच उठलों नी आलों. अनी इथें तर कांहीं नाहीं.

**गुणाजीः**— रावसाहेब, वेळ तशीच आहे.

**विश्वास०ः**— ( विस्मयानें ) ह्मणजे?

**गुणाजीः**—जरा इकडे या. रावसाहेब, आतां बोलण्याला फुरसद नाहीं. इतकें मात्र सांगतों कीं, तुह्मी ताबडतोब माडीवर जाऊन बाळासाहेबांला हर प्रयत्नानें वरच्या वरतींच आडकावा.

**विश्वासरावः**— पण असं कां ?

**गुणाजीः**— आतां दहा वाजतांना पुणेकर रामा भराड्याचा तमाशा आहे मोहित्यांच्या वाड्याच्या पलिकडल्या वाड्यांत. तेव्हां सर्व मनुष्यें तिकडे लोटतील. मग इकडे रस्त्याच्या बाजूला दरवाजा आहे तो, ज्याला त्या ह्मातार्‍यानं आतांशीं कुलूप घातलं आहे— त्याचें कुलूप सई बाईची दासी उघडून कडी काढून ठेवणार; नंतर आपले राजश्री वर चढून जाणार; अनी मग या राघूचं व समोरच्या मैनेचं लग्न लागणार !

**विश्वासरावः**— वा. वा. वा! सुरेख मुहूर्त शोधून काढला. हें कन्यादान सईबाईनें घडवून आणलेलं दिसतं. बरं मंत्राक्षता कोण टाकणार ?

गुणाजीः– ( हांसून ) आपले रंगोपंत; अनी दक्षणेला भवानराव शिलेदार.

विश्वासरावः– अँ? हें नाहीं बुवा समजलों. इतक्यांत याचा डंका कोणी केला ?

गुणाजीः– समोरच्या वाड्यांत चिमा आहे ती, तिनें या दोघांची कुजबूज ऐकली, तिनं सांगितलं हिमत्याला; हिमत्याकडून रंगोपंताला; त्यानं फौजदाराला. मग या दोघांचा बेत झाला कीं, बाळासाहेब वर जाण्यापूर्वीं फौजदारानें वर जाऊन बसावें. ते आले कीं बेधडक त्यांना खालीं ढकलून द्यावं ! रंगोपंताकडे त्यांनीं पोलीस मुकाम्यानें आणून बसवले आहेत. ते येणार मग साथीला; शेवटीं बाळासाहेबांवर कांहीं तरी आळ लादणार.

विश्वासरावः-जामदार, पण हें आपल्याला कसं समजलं ?

गुणाजीः–आज संध्याकाळीं ही गोष्ट कळवण्याकरितां रंगोपंत फौजदार कचेरींत गेला. फौजदार गेला होता बाहेर. मध्यंतरीं एका शिपायाची नी नैरंग्याची खूप तेरीमेरी झाली. फौजदार आल्यावर त्याची नी ह्याची फार दोस्ती पाहून शिपाई घाबरला; नी ‘ आतां हा आपली कागाळी करतो कीं काय’ ह्मणून हा त्याचं बोलणं आडून ऐकत होता. त्यांत हें निघालं. त्यांतच या शिपायाला फटके मारून घालवून देण्याचं ठरलं. तेव्हां त्याणें ही खबर ताबडतोब मजकडे आणली. तो शिपाई आमच्या तिकडलाच ओळखीचा आहे. मग मनांत असं आणलं कीं, आतां बाळासाहेबांना तर बचावूंच, पण या विघ्नसंतोषांनाही चांगलीच अद्दल घडविली पाहिजे. त्याला सांगितलं “ बाबारे, मला सांगितलेंस हें फार बरं केलंस. चाकरी विषयीं बिलकूल भिऊं नकोस. पण इतकं कर कीं, याच तुझ्या पोलीसच्या पेहरावानें या समोच्या वाड्यांत जाऊन तेथें ‘ पाव्हणे, ‘पाव्हणे’ ह्मण. ह्मणजे एक काटकोळा–उंच–काळा माणूस येईल. त्याच्या कानांत रंगोपंतानं बाळासाहेबांविषयीं फौजदाराला कळवलेली हकीगत

सांग; नी ह्मण कीं, रंगोपंतांचं व फौजदार साहेबांचं आपल्याला सांगणं आहे कीं " कोणाला नकळत आतांच्या आतां दादरावर जाऊन बसा. व बाळासाहेब आले कीं, द्या त्यांना तळीं लोटून." आतां काय होईल कीं फौजदार जाईल वर. त्याला बाळासाहेब असें समजून पाव्हणे देतील ढकलून. अशी गंमत होईल.

**विश्वासराव**:-भलेशाबास ! खूप केलीत. शिपायाचे तरी आपल्यावर महत् उपकार ह्मणायचे. घेईन त्याला मीं आपल्या दिमतीला ह्मणजे झालें. आतां जातों मी वर-

**गुणाजी**:-इकडे आरडा ओरड झाली, कीं यागम्मत पाहायला गच्चीवर. तोंवेरी मी येथेंच वसतों.

( विश्वासराव वर जातात व गुणाजीबावा स्मरणी घेऊन तेथेंच बसतात. )

**गुणाजी**:-(आपल्याशींच) तिकडे तमाशा तर झाला सुरू. (अमळशानें) हां हें कुलूप नी कडी काढली वाटतं-(पुन्हा अमळशानें ) अनी हीं ओरड झाली पहा-( कानोसा घेतात. )

( विश्वासराव व बाळासाहेब गच्चीवर येतात. )

**बाळासाहेब**:-( खालीं पाहून ) अरे ही काय बकरकुदाई ? पोलिस इथें कां? वारा कोणाला घालताहेत? आणि तो जवळ कोण ? रंगोपंत ?

**हुजऱ्या**:-ते शहरचे फौजदार, त्या जिन्यावरून आतांच चढत होते त्यांना कोणीं खालीं ढकलून दिलें; ते बेशुद्ध पडले. ह्मणून त्यांचे जमादार वरतीं जाऊन त्या ढकलणाराला ओढून आणताहेत खालीं.

(इतक्यांत, एक पोलीस जमादार एका मनुष्याला ओढीत आणतो.)

**जामदार**:-चलो हरामखोर बेवकूफ साले. ए क्या बडा हमामा किया है तुन्ने ! बहानचोद ! चलो, दरेक इसम उस्कूं दोदो लाथा देव. ( लाथा मारतो. )

**तो मनुष्य**:-( रडत ) अं-अं-अं, जमादार मी येसबा शिरके;

मला कशालाहो इनाकारन मारता जमादार साहेब ? ( रडतो ) हूं-उं-ऊं.

जमादारः—अरे, किधर शिरते, बहान्चोद? चोर साले. चलो नीचे; तेरे बापके सामने चलो. (पोलीस शिपायांस संबोधून) भाईओ, उस्कूं कैदी रख्खो; और—

( मल्हारराव धांवत धांवत बाहेर येतात; व इतर गर्दी जुळते.)

मल्हाररावः—अहो, माला गुलमाला चोलाला; दोन लाथा जाफा माला. ( काठी उगारून मारायास धांवतो. )

गुणाजीः—( पुढें होऊन ) थंबाला बाबासाहेब. नाहीं तर पलाल एखादे.

मल्हाररावः—वा, जी वा ! गुणाजी बोवा, हीच थट्टेची यळ ना ?

गुणाजीः—अहो, तसं नव्हे. पणज्या मनुष्याला 'चोर' 'चोर' ह्मणून लाथा बुक्यांनीं तुडवीत आहेत, तो चोरचना? नाहीं तर साप ह्मणून दोरच झोडीत सुटाल.

( इतक्यांत सज्यांत शब्द होतो ) "अग आईग, माझ्या दादा लाचग मारताहेत वदावद. कोणी तरी सोडवा हो त्याला सोडवा!"

गुणाजीः—अहो, शिपाई बावा, अहो शिपाई बावा त्याला सोडा, सोडा तो बाबासाहेबांचा मेव्हणा लागतो.(जवळ जाऊन) येसवा तुह्मीच का राव ?

मल्हाररावः—काय हो थिपाई बवा, तुह्मी माणूस की जनावल. डोळ्याच्या खाचा झाल्याका यवढ्यातच? चला व पावने घरात. हळद गुळ द्या हो—यान्ला खायला. ( यशवंतरावाला धरून निघून जातो. )

जमादारः—( तोंडाला हात लावून चपापून स्तब्ध उभा राहतो. )

रंगोपंतः—( मनांत ) हा बावा अजब तमाशा झाला.

---

१ शिरके" याच्या ऐवजीं जमादार "शिरते" असें चुकीनें समजतो।

(उघड) जमादार उभे राहून काय पाहतां? गाडी आणून फौजदार साहेबांना घरीं नेऊं या. चला, यांना गाडीपर्यंत नेऊं उचलून. ( जमादार व पोलीस, फौजदाराला उचलून नेतात; व सर्व पोलीस वगैरे जातात. )

**विश्वासराव**:—बाळासाहेब, भली गुलामांची कंबक्ती जिर ली. फार गमजा लावीत होते.

**बाळासाहेब**:—( मनांत ) विश्वासराव आला नसता तर आजचा हा प्रसंग खचीत आपल्यावरच गुजरावयाचा. हुँः याच विश्वासरावाला मघाशीं मी विघ्न ह्मणत होतों. देवानें मोठी खैर केली. रंगोपंताला त्याच्या खोलींत तिसऱ्या प्रहरीं येसबापाशीं बोलतांना ऐकिलें, त्यांतलें इंगीत आतां पुरें कळलें. काय ह्मणे "त्याच्या गटारांतल्या पाण्यानें दाढीमिशा बोडून गांवभर धिंड काढीन!" सांपडलों असतों तर याला कांहीं कमतरता झाली असती काय? अरे, मी मुलगा कोणाचा? या शहरांत कां आलों? कोणीं आणलें? आणि काय करीत होतों? व काय दशा झाली असती परिणामीं? असो, आज वडिलांची पुण्याई, ह्मणूनच बचली. परंतु अतःपर बिलकूल तिच्याकडे ढुंकून सुद्धां पाहावयाचें नाहीं, हाच कानाला खडा लावून घेतों. ( कानाला चिमटा घेतात ) किती मूर्खपणा हा! किती पाजीपणा! कीं असले बेअकली विचार करून तिच्या दुःखाची कींव करायची!!

**विश्वासराव**:—बाळासाहेब मोठी मौज झाली. चला आपला डाव संपवूं. पाऱ्हण्यांना आज खूप मुष्टिमोदक मिळाले. ) बाळासाहेब व विश्वासराव जातात. )

**रंगोपंत**:—फौजदाराची रवानगी केली. आतां एकदां शिरक्यांचा समाचार घेऊं ( मनांत ) काय शिंच कराला जावं एकनीं होतं भलतंच. ते दिवशीं दरोड्याचं संधान केलं. कशा करतां तर हिस्सा मिळेल ह्मणून. त्यांत बाळासाहेबांची उडाली चंगळ; भिल्लांचे हक्क खुले झाले; आह्मांला मिळाला बदलौकीक,

अनी फौजदार व पोलीस यांना मिळाला दोटभर हग्या मार. आणि आजचं असं. गेलों गणपती करायला तों त्याचं झालं *केल्टें. ( तोंड दाबून हांसत हांसत जातो. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—मल्हाररावाच्या वाड्याचा सज्जा.

वेळः—दिवसास तिसरा प्रहर.

( झाळसाबाई एकटीच सज्जांत बसली आहे. )

झाळसा०:—( आपल्याशींच ) हंः पहा, तेरवांची गोष्ट कोणत्या थराला गेली ! मात्र त्यांच्या वरची रट्टे खायची पाळी चुकली येवढं बरं-पण बाई, गच्चीवर यायचं नांवच अगदीं सोडून दिलं कसं तें. याला आज चार दिवस झाले. परवांच्या दिवशीं थोडी झुळुक तरी दिसली. काल नी एरवां मुळीं ती दिसत नाहीं. नाहीं ह्मणावं तर त्या दिवसापर्यंत दोघांना एकमेकांच। जसा कांहीं छंदच भरून गेला होता. घटकाभर सुद्धां पाहिल्या शिवाय करमत नव्हतं. ( जरा थांबून ) मेली, इथें दिसीत यायची, का कोठें खिडकींत उभी रहायची सुद्धां मला आतां बंदी झाली आहे. केव्हां केव्हां चोरून मारून यावं, तेव्हां मेलं दर्शनच नाहीं ! किती दिवसांचा विभु, नी तो एकाएकीं, सारा एका घटकेंत ढांसळला ! ! खालीं जाऊं चला. नाहीं तर दादा येईल मेला कर्मासारखा, पाठोपाठ. ( मागें पहात, पहात खालीं जाऊं लागते; आणि इकडे बाळासाहेब आपल्या गच्चीवर येतात. )

झाळसा०:—( जरा थबकून ) गच्चीवरच्या खोलींत अभ्यासाला येताहेत वाटतं. हो, खरंच. तीं बुकं आहेत तीं बगलेंत. तर आपण या दाराच्या फटींतून पाहूंया लपून, ते इकडे नजर फेंकतात कीं नाहीं. ( दाराआड लपते. )

*माकड.

(इतक्यांत बाळासाहेब येतात; आणि गच्चीवर इकडे तिकडे फिरतात; व म्हाळसाबाईच्या वाड्याच्या सज्ज्यांत दृष्टि देतात.)

बाळासाहेबः— ( आपल्याशींच, हळू ) गरीब बापडी ! आज कोठें दिसत नाहीं येथें. काल आणि परवां तिचा येण्याचा बेसुमार झाला. येई, जाई; पुन्हा येई, पुन्हा जाई; इकडे डोकावी, तिकडे डोकावी; ततक्यांतच 'चला खालीं' म्हणून खस्कन् तिच्या अंगावर कोणीं ओरडावें. करते काय बिचारी ! गळाला अडकलेल्या मत्सीप्रमाणें तळमळ तळमळ करीत होती. माशाचा एकदां जीव गेला म्हणजे तरी सुटला ह्मणावयाचा. ( विचारांत गर्क झाल्यामुळें, असावधपणें, जरा मोठ्यानें बोलूं लागतात. ) परंतु, हा मदनरूपी गळ, अशा या दीन अबलांच्या कोमळ काळिजाला एकदां झोंबला ह्मणजे यावज्जीव अंतःकरणाला मोठमोठीं घरें पाडून, पुरी हाल अपेष्टा झाल्यावर, अखेरीला जीव घेतो. बिचाऱ्या पुन्हा, इहलोकींच्या व परलोकींच्या सौख्यालाही मुकतात! हर, हर ! मासोळीचीही गति यांजपेक्षां दसपट बरवी. असल्यांचे आईबाप तरी किती अधम ह्मणावे कीं, स्वहिताकरितां, पोटच्या गोळ्यांच्या हिताहिताकडे केवळ डोळेझांक करितात ! धिक् त्यांचें जिणें— "जैसा, खाटिक पाळिल्या बकरिचा कापी गळा हें तसें" ! ! शिव शिव ! ! ! ( खिन्न मुद्रा करितात व जरा स्तब्ध होतात. )

बाळासा०:— ( पुन्हा ) अहाहा, तिचा दयाळु तरी किती स्वभाव आहे पण ! आपल्याकरितां प्राण्यांचा संहार होतो, या करितां मांसाहार सुद्धां तिणें वर्ज केलासें ऐकतों. सर्व मनुष्यांशीं किती नम्रपणें वागते. शहाणी आणि धूर्त दिसते कशी आहे! काय तें पद ? परवांच्या दिवशीं आपण लपून पहात होतों; तेव्हां ती ह्मणत होती तें ! काय बरें ? ( दातांमध्यें अंगठ्याचें नख धरून आकाशाकडे पाहतो. ) हो आठवलें ( मोठ्यानें ह्मणूं लागतात. )

पदः-चाल, त्याचा हरि विकला ॥ हरि विकला० ॥

"मर्जी देवाची ॥ देवाची ॥ इच्छा मनुष्याची ॥ ध्रु० ॥ ( याला, ) वाटे पालखींत बैसावें ॥ देव ह्मणे यासि ( पायिं ) चालवावें ॥ मर्जी देवाची ॥ देवाची ॥ १ ॥"

वाळासा०:-तिचें हें पद आहें आपलें धावडकुटी;मूळ खरें पद काय, तें आपल्याला ठाऊक नाहीं. तथापि, तिच्या त्या वेळेच्या स्थितीला व प्रसंगाला कितीतरी अनुलक्षून होतें. ह्मणजे, आपला तो बेत फसल्याच्या दुसऱ्या दिवशींच सकाळीं हें तिणें म्हटलें! काय विचारीनें ते दिवशीं येथें पुनःपुन्हा येऊन, मयूरीसारखा क्षणोक्षणीं टाहो फोडावा ! ! ( जरा थांबून, मोठ्यानें ) हंः, अशा या पद्मिनीला, असला हा अजापाळ थेर्डा नवरा ! विधात्या, ज्या वेळेस त्यांची ग्रंथी त्वां मारिली, तेव्हां तुला वार्धक्यातिशयामुळें श्रम होऊन निद्रा आली होती कायरे ? ( हांसतो ) हंहंः अरे, खरखरित अशा फाटक्या कांवळ्याला, नव्या कोऱ्या, मौल्यवान शालजोडीचें नाजुक फर्द जोडणाऱ्याला धनगर कोण न म्हणेल ? कुंभाराचें काम तुजकडे जें नेमिलें आहे, तें यथार्थ होय. सारासारविचाररहिताला तेंच योग्य. ( तर्जनी[1] हालवितो ) धिक् तुझें वय ! धिक् तुझें कर्तव्य ! धिक् तुझें ज्ञान ! धिक्कार असो तुझ्या योजनेला ! ! ह्माताऱ्या, असा हा विजोड जोडा निर्मिलास ! ! !

( म्हाळसाबाई एकदम पुढें होऊन मोठ्यानें तेंच पद म्हणते. )

म्हाळसा०:-

" मर्जी देवाची ॥ देवाची ॥ इच्छा मनुष्याची ॥ ध्रु० ॥ ॥ याला वाटे, पालखींत बैसावें ॥ देव ह्मणे यासि पायीं चालवावें ॥ मर्जी देवाची ॥ हो, देवाची ॥ इच्छा मनुष्याची ॥ १ ॥ ( पुन्हा पुन्हा हेंच ह्मणते. )

वाळासाहेबः-( मनांत ) अरे, इनें हें सर्व ऐकिलें तर !

---

१ हाताच्या आंगठ्या जवळचें वोट.

चला जाऊं येथून. नको; जरा थांबूंया, येथें आपलें तोंड फिरवून. (तोंड फिरवितात. )-तिच्या पुरें ध्यानांत येऊं द्या कीं, आपण तिजकडे बुद्धच्या पहात नाहीं.

झाळसा०:- (एक ईड भुईवर आपटून) अग बाई, हें वरून धबकन् काय पडलं खालीं ? अरेरे! इकडेच येत आहे.

(बाळासाहेब तिकडे पाहतात, तों ती दृष्टीस पडते व झाळसाबाई, ईड हातांत धरून त्यांच्याकडे पाहून स्मितहास्य करिते; परंतु ते पुन्हा आपलें तोंड फिरवितात. )

झाळसा०:-( मनांत ) बाई चार दिवस कां दिसले नाहींत यांतलं बीज समजलं. पण असं बिनसाला मजकडून काय अपराध झाला बरें? कां रुसले? (आपल्याशींच बारिक किनरीच्या आवाजानें, बाळासाहेबांकडे तोंड करून गाते. )

(पद. )

" सई, रुसले हरि करूं काय ॥ काय गे ॥ आणि समजावुनि प्रभुरायगे ॥ध्रु०॥ मज ऐकवि मुरली नाद ॥ नाद गे ॥ हा योग गडे तूं साध गे ॥ माझा नाहीं यासि तिळवाद ॥ वाद गे ॥ लावि सत्वर माझी दादगे ॥ जरा होऊंदे वादसंवाद ॥ वादगे ॥ मग पुण्य इशीं अगाध गे ॥ चाल ॥ याणें सोडिला बाई माझा संग कीं ॥ हा करितो असे नित्य ढंग कीं ॥ मी पाहुनि मनामध्यें गुंग कीं ॥ चाल पहिली ॥ सांगा काय करूं उपाय ॥ उपाय गे ॥ आणि समजावुनि प्रभुरायगे ॥ सई रुसले० ॥ १ ॥

( हें पद ती गात असतां रंगोपंत आपल्या घरांतून तोंड बाहेर काढितो व खिडकी खाडकन् वाजवितो व ती खालीं पाहते.

रंगोपंतः-(गातो)-

"॥ जडली तुझी माझी प्रीत॥अरे गुणिरायारे॥ जडली तुझी माझी प्रीत ॥ ध्रु० ॥ " ( तान आलाप व हावभाव दाखवितो )

ह्माळसा०:—इश्श, मेली हिंगाची फोडणी कोणी जाळली भल-त्याच वेळेला ! काय बाई भसकन् घाण आली ही ! असल्या या घाणीनें मेली भूक सुद्धां पळाली ! (तोंड फिरवून नाक दाबते आणि मनांत ह्मणते ) खरंच ' लवंग नी वेलदोडा ' अनी हा मेला मध्यें हिंगाचा खडा कशाला ?

रंगोपंतः—( आर्यार्ध[1] )

" ॥ कोणी मला पुसाना॥कोणी मला पुसाना ॥कोण असे ? काय बैसलों अधमीं ॥ ( पुनः पुनः ह्मणतोः— )

बाळासाहेबः—( आपल्या गच्चीवरून ) ( श्लोकार्ध )

" ऐसें असोनि तरि शंख फिरे भिकारी ॥ प्रारब्ध हीन असतां विधि काय तारी ॥ "

रंगोपंतः—"शंख अडोशी, शंख पडोशी, शंख शंखके भाई." !!

बाळासाहेबः—( आर्या[2] ) पार्थपयोधर गर्जे । स्पर्धा मंडूक तूं किती करिशी ! ॥ त्याचे पुढें डुरुरुरू । डरांव डरांव शब्द हे किती करिशी" !! ॥ १ ॥ चला, आपला अभ्यास राहिला तसाच. ( निघून जाऊं लागतात. )

ह्माळसा०:—( मनांत ) मेल्या, आतां बोल काय बोलतोस तें. पण अगबाई न पाहतां—( पडद्यांत ) बाळा ए बाळा. )

ह्माळसा०:—बाईजी आली वाटतं हाका मारीत इकडे. ( बाई-जी येते )

बाईजीः—बाळा, तुला वेड लागलं. घटकेघटके वर काय येतेस ? चल लौकर; खालीं थोरौतीण बाई[3] येसवापाशीं बोलत आहे, ती तुला हाक मारमारून दमली; आणि तूं इकडे वर.

---

१ शिष्टाईला गेला असता अंगदाचें रावणाला पहिलें भाषण"हे रात्रि-चर राजा, रामाचा दूत अंगदाभिदमी ॥ कोणी मला० ॥ मोरोपंत. ॥

२ कर्णाचा मानभंग करण्याकरितां शल्य असें त्याला ह्मणतो. ( कर्णपर्व )

३ सईबाई, तिची मैत्रीण.

( तिला रंगोपंत व बाळासाहेब दिसतात ) ( हळूच ) बाळा, तूं निखालस ताळ सोडलास. मी करूं तरी काय आतां? मला मूल नाहीं, नी बाळ नाहीं; तुझ्यावर कायतो माझा जीवका प्राण. तुझ्या करितां गणगोत, घरदार सगळं देशीं[1] सोडून, दादल्याला घेऊन, चार वर्षं झालीं येथें आल्यें. पदर मोडून घरधनी नी मी, दुसरें चिऱ्हाड करून खशावशा गुजराण करितों; अनी दोघें तुमच्याकडे निपोटी चाकरी करितों. इतकें कशाकरितां, तर माझी पोर माझ्या डोळ्यां आड होऊं नये ह्मणून. बाळा, तुझीं दोन मुलं पाहिलीं, आणि तुह्मीं उभयतां सुखें नांदतां पाहिलीं, कीं मग ईश्वर करो, नी आमचे दोघांचे डोळे तुमच्या देखत झांकोत. मग कृतकृत्य झालों. देव कधीं गाऱ्हाणं ऐकेल तेंव्हां खरं ! ( बाईजी ह्माळसाबाईला पोटाशीं धरून रडते; व पुन्हा बोलूं लागते ), पण बाळा, असं भलते भलते वेडेचार करून नको ग, आतां ह्मातारपणीं आमच्या तोंडाला काळोखी आणूं. ( ह्माळसाबाई स्फुंदूं लागते; तिचें चुंबन करून आणि तिचें तोंड कुरवाळून ) बाळा, अशी रडूं नको ग. माझं काळीज तडतड तुटत आहे ! अग देशीं असतांना सगळी अलमदुनिया तुझ्या चांगुलपणाची वाखाणणी करी, तेंही मला माहीत आहे; अनी आतां अशी पिशासारखी कां झालीस, हेंही मीं त्या दिवसापासून पुरें ताडलें. बाई, मी तुझी आई, तिला आजदीन पावेतों या गोष्टी विषयीं एक चकार शब्द नाहीं. अनी ती, खालीं आलेली कवटाळी, ती तुझी हित पाहणारी सख्खी बहीण ना ? आतां मला लौकर, थोडक्यांत काय असेल तें खरं खरं सांग बाळा. हां आटोप जलदी. डोळे पुस कशी. ( बाईजी तिचे डोळे पुसते) बाळा, तें तुझं ते दिसचं करणं मला अगदीं रुचलं नाहीं !

ह्माळसा०:– ( रडत ) बाईजी, सांगू काय कर्म कथा आपली? आतां देव मरण देईल लौकर तर बरं. इतःपर जगण्यांत

---

1 दक्षिणेंत; गांवीं.

सौख्य तें कोणतं ? मुलांवर दृष्टि देऊन काळ कंठीन ह्मटलं, तर तीं अजून नाहींत. आणि पुन्हा, तीं त्याऱ्या जन्मांत होण्याची मुळीं सुद्धां आशा नाहीं. पैशाचें सौख्य ह्मणेन, तर हल्लीं 'सोमल खाईन ' असं मनांत आणिलं तरी, हातीं एक छदाम नाहीं. बरं, खाण्यापिण्याचे दिखीत हाल चाललेले तुह्मीं पहातच आहां. पुढं मागं तरी तो पैसा चोरं पोरंच लुटणार ! मला रांडमाणसाला कोण पुसतो मग? आणखी यजमानांच्या अगर माहेरच्या माणसांच्या कडून सुख मिळायचं, तें तर एकीकडेच; परंतु, उलटे कैद्यासारखे हाल भोगविताहेत मला ! बाईजी खरंच सांगा, त्यांचा म्यां काय बरं अपराध केला आहे असा ?

बाईजीः—एकूण, मनमानेल तसं परपुरुषाशीं वागणं कांहीं अपराध होत नाहीं मग ? वा ! फार चांगलं! यापेक्षां अपराधाला कां शिंगं असतात मुली? खूळ सारं. हेंच का तुला मीं शिकवलं तें? अनी हाच का तूं लिहिणं पुसणं शिकलीस त्याचा उपयोग ?

म्हाळसा०:—बायजी, ज्यापक्षीं ही सारी गोष्ट तुमच्या प्रत्यक्ष निदर्शनाला आली, आणि तुह्मीच तिजविषयीं निक्षून विचारतां, त्यापक्षीं आतां तिची फोड करणं मला भाग आलं. तशांतून माझीं आईबापं काय तीं तुह्मीं दोघे. जन्म देणारी आई लहानपणींच सोडून गेली; तिची आठवण सुद्धां बुझाली. बापानें कसायाप्रमाणें आपली तुंबडी भरून गांवीं स्वस्थपणें गार होऊन बसला आहे- तो, मी ' मेलें कीं जिती आहें ' याची दादपण घेत नाहीं. प्रत्यक्ष सख्खा वडील भाऊ, तो जसा वैराऱ्यासारखा मला पाण्यांत पाहतो ! नाहीं तरी हा, पुढें या धनदौलतीची नी माझी वाताहत करणारच ! !

बाईजीः—बाई हें चऱ्हाट पुरे. हें मी सर्व जाणतें. सारांश काय तो कळूंदे झट्कन्. तीं मेली वर येईल कदाचित् एखादी.

म्हाळसा०:—बायजी, तुमच्याकडे बोलाला माझी जीभ कां-

पते थरथर. ( रडूं लागते ) पण, आतां धीर करूंचका ? माझ्या व्रये, आतां मला क्षमा अनी दया एक तुझ्यावांचून कोण करीलग, या भुईवर ? मी निर्लज्ज होऊन ओकतें तर आतां तुमच्या पुढं सगळं. ( जरा मन स्वस्थ करून बोलूं लागते. )

" माझें लग्न पहिल्यानें, सायखेड्याच्या पाटलाच्या धाकट्या चिरंजिवाशीं ठरून आह्मांला दोघांना हळद देखील चढविली होती. पण मग इतक्यांतच इकडचं मागणं येतांच, लोकं 'नको नको' ह्मणत असतां, व तूंही ढळढळां रडत असतां, बाबांनीं व दादांनीं माझी आंगावरली हळद उतरून मला इकडे ओईरली, हें तुला ठाऊक आहेच—हा मेला पैसा आहे कींनाहीं, ह्मा पाहिजे त्या मनुष्याकडून पाहिजे तें करवितो—बाई ग, तुझी माझ्यावर दूध पाजून वाढविण्या पुरती मात्र सत्ता. पुढें तुला कोण विचारतोबाई? तशांत, तूं माझी धर्मांची आई. असो. तेव्हां तूं रडस, ह्मणून मी रडें; पण, मी तेव्हां अजाण असल्यानें मला त्याचं खरं कारण समजेना. एकदां वाटे, 'बाईजी उगीच कां रडते वेड्यासारखी ? मला आतां दागिने मिळतील पुष्कळ; गोड गोड खायाला मिळेल चांगलं; कामकाज कांहीं नको कराला; चांगल्या चांगल्या मौजा दृष्टीस पडतील बडोद्यास.' परंतु, पुढें मग लग्नांत यांना जेव्हां पाहिलं, तेव्हां कसंसंच वाटायला लागलं! पुढें, जसजशी पणांत येऊं लागलें तसतसं अधिकाधिकच मन खाऊं लागलं. मनाला मेली तिकडे बघाला चिळसच वाटे!! पण हें सांगाचं कोणापाशीं? शेवटीं, फळशुभनाचे दिवशीं जेव्हां आह्मां दोघानां खोलींत घातलं, तेव्हां अनुभवाला आलं कीं,'आपल्या सर्व आयुष्याचा बाजार बाजार होणार,' असें ह्मणून कर्माला हात लावून बसलें. त्या वेळेला असें झालें कीं, आतां काय डोकें फोडूं? का विष खाऊं? कीं तळीं विहिरी सोधूं ? किंवा खाईंत उडी घालूं ? करूं तरी काय? पुढें मनांत आलें कीं, आतां अन्न पाणी सोडून म,

रावं हें बरं, तर अब्रू तरी वांचेल. असा मनाचा पुरा निर्धार करून दुखणं घेतलं; खाणं पिणं तोडित चाललें; एकसारखं अंथरूण धरून राहिलें. माझी अशी दशा पाहून तूं दिखीत माझ्या जिवा करितां धाईं धाईं रडस, त्याचें मला फार वाईट वाटे; पण बाई, करूं काय? तुला खरं कारण सांगाला मला धीर तरी कोठें होई?"

बाईजीः—पुरे बाई, फार लांवण लावतेस.

ह्माळसा०ः—एके दिवशीं सईबाई आली माझ्या भेटीस. तिणं माझं हें कृत्य पुरं ताडलं. अनी मग तिनें खोदून खोदून; हंसत हंसत असे कांहीं विनतोड प्रश्न विचारिले कीं, मला बिलकुल कांहीं नाकारतांच येईना. अखेरीला मजजवळ गोड गोड बोलून, माझ्या मनांतलं सर्व काढून घेतल्यावर, ममताळुपणें माझे डोळे पुसून, व मला लाडुकपणें कंवटाळून धरून, ती म्हणाली "मेले; उगीच कां आपला प्राण देतेस? माझं नाहीं का तुझ्याच सारखं झालं होतं. धीर धर; माझ्यावर पूर्ण भरंवसा ठेव. सांगतें याजवर नीट ध्यान दे. अग, पुरुषांची जातच अप्पल पोटी, कृतघ्न, नी घातकी. या मेल्यांचीं लांकडं मसणांत गेलीं तरी मेले हे आमच्या सारख्या पोरी बुडवायला तयार नवरे! या योगानें जर त्या बायकांचें पाऊल वांकडं पडलं तर त्यांना त्यापासून पाप आहे का? छे., कांहीं एक नाहीं. असल्या नवऱ्यांना मात्र मेल्यांना अक्षयीं नरकांत लोळावं लागतं किड्यां सारखं. मरेना का, तो मेला ह्मातारा! त्यांत तुझं कांहीं कमी होत नाहीं. ब्राह्मणांच्यागत, आपलं विरूप नाहीं कांहीं करीत. कायती नथच मात्र घालाची नाहींना नाकांत! नाहीं घातली मेली दिवसाची! मग, तूं कां आपला जीव देतेस व्यर्थ? त्याच्या कपाळीं आतां पोरं नसतील, ह्मणून तुझ्याही नाहींत काग बाई!" असें ह्मणून ती खो खो हांसली!!! मला बाई, लाज वाटली मनांत. मग मी ह्मटलं "तुझं पुढं म्हणणं काय

यावर ?" तेव्हां ती म्हणाली " हे पहा तुमच्या समोरच्या वाड्यांत नवसरीहून बाळासाहेब ह्मणून आले आहेत नवीनच रहायाला. ते ह्मणतात अगदीं मदनाचा पुतळा आहेत. आणि तुझं रूपतर रतीलाही रतिभार मागं टाकील असं आहे." बाायजी, ती जशी बोलली तसं सांगत आहें. यांत बाई, छक्केपंजे मला मुळीं कळत नाहींत.

बाईजीः—बाळा पुढं चालूंदे.

ह्माळसा०:—ती ह्मणाली " तर, तूं दररोज त्यांजकडे चोरून पहात जा अनी हंसत जा. मग जसा नाग पुंगीला लुब्ध होऊन, क्षणभर आपला कठोर स्वभाव सोडून, डोलूं लागतो तशी पुरुषांची जात कितीही दृढनिश्चयाची असली, तरी या योगानें क्षणांत नादलुब्ध होऊन गुंगून जाते." मीं ह्मटलं " पण त्यांची बायको पाहिली ती माझ्याच येवढी वयानें असून मजपेक्षां सुरेख दोन कांकणं जबाद भरेल." ती ह्मणाली " वेडे, कलमी आंबा खाल्ला, ह्मणून रसीक माणसाला अंजीर कडू लागेल काय?तें कांहीं असो,पण मीं सांगितलेलें आहे तसें कर,नी मग पुढं काय होईल तें यच्चयावत् मला सांगत जा. त्या उपरची सर्व तजवीज मी पार पाडीन. हें माझें वचन घे." असं ह्मणून तिनं माझ्या हातावर टाळी दिली. या प्रमाणें तिनें मला शिकवून चढीस लावण्याचा प्रत्यहीं यत्न चालविला तरी दिखीत माझ्या मनाची तसं करण्याला उचल होईना कारण,एक तर हें पापकर्म, आणि दुसरं भीतीमुळें मनच धजावत नसे. त्या नंतर आठचार दिवसांनीं त्यांची सुंदर गोजिरी मूर्ति सहजच नजरेस पडली. त्या वेळेपासून मनानें तिकडे जरा कल खाल्ला. परंतु, त्या चोरीच्या दिवशीं असा कांहीं चमत्कार घडून आला कीं, तेणें करून तिनें सांगितलेल्या कांहीं गोष्टींची प्रचीती येऊन, जसी एखादी भुकेलेली मधमाशी मधाचं पोळं पाहून एकदम त्यावर उडी घालून चिकटून बसते, तशी तेव्हां पासून मज पापिणीची मनोवृत्ति,

एकाएकीं त्यांच्या रूपांत जी अनन्यभावानें गढून गेली आहे, ती आतां कधींच परतेलशी आशा नाहीं; तिला परत ओढीन ह्मटलं तर मधमाशीसारखं, सर्व शरीर तुटून तुटून पडेल; पंचप्राण जातील, तथापि ती परतणार नाहीं! त्यांच्या शिवाय इतर पुरुष आतां मला बाप, भाऊ होत! मला आतां भूक, तहान झोंप, भय, लज्जा, पाप पुण्य—काडीमात्र उरलं नाहीं. बाईजी पोटांत जें इतके दिवस कळमळत होतं तें सगळं ओकलें. आतां माझा जीव का—सा—वी—स—( डोळे फिरवून मूर्छित पडते; व मोठ्यानें सुस्कारे टाकते. )

बाईजीः—हाय, हाय! बाळा, सावध हो, सावध हो. हाय रे; डोळे पहा कसे पांढरे केलेन! अरे, कोणी पाणी आणारे इच्या टाळूवर घालाला !!

( येसबा पाणी घेऊन वर धांवत येतो. )

यशवंतरावः—आल्यात्या कशाला इनाकारन हिते? हाता पायान्ला नाहीं न्हायला जीव. अन ह्येरीच करतात जिन्याची येरझार शंभरदा ‘ नको नको ’ म्हनत असता.

बाईजीः—येसबा, जरा गर्दी मोडाल तर आतां शुद्धीवर येईल. ( तिच्या डोळ्यांना व टाळूवर पाणी लावते व वारा घालते. इतर सर्व खालीं जातात. )

बाईजीः—बाळा, डोळे उघड. असं काय बरं? ( मनांत ) या अजारानं ही लौकर बरी होतां दिसत नाहीं. बरी तरी कशी होणार? हँ, औषध तरी मेलं काय ह्माडवाणी आहे! कधीं कधीं तर औषधाकरितां विष्टाही चारतात, असं वैद्य सांगतात; त्यांतलंच हें!! ( तिच्या कडे पाहून ) बाळा; उघडलेसका डोळे? चल खालीं जाऊं, जरा सुंठीची कढी देतें; म्हणजे पित्त उखळलं आहे तें बसेल. मेले हे दिवस आधीं पित्ताचे, अनी ही वेळाही पित्ताचीच आहे. ( तिला धरून चालूं लागते. )

ह्माळसा०ः—( बाईजीच्या खांद्यावर मान टाकून ) चल-

मराठी ग्रंथसंग्रहालय. ठाणे.

बाई, आतां पित्त मजबरोबर एकदांच बंद बसेल. ( दुःखाचा सुस्कारा टाकते; व दोघी जातात. )

## प्रवेश ३ रा.

स्थळः—सरकारी तुरुंग; अधिकाऱ्याची खोली.

( विश्वासराव व गुणाजी बावा बोलत बसले आहेत. )

विश्वासरावः—जामदार कशी काय खबरबात ? एक आठवड्यांत नाहीं यायला सांपडलं तिकडे. अजून तरी त्या रंग्याची नी त्या भवान्याची खैरी जिरली कीं नाहीं ?

गुणाजीः—छे, छेः, तसें कालत्रयीं घडणें नाहीं. बावा, तो रंग्या एरंड्या सापाची अवलाद आहे. बारावर्षांचा डाव उगवून काढील! परवां झालें काय, भवानरावाकडे उपटून सूळ काढून, बळेंच गेलों त्यांच्या समाचाराला. तेथें हे रंगाजी आणखी त्यांची चांडाळ चौकडी बसलीच होती. जवळ बुद्धिबळांचा पट पडलेला पाहून मीं ह्मटलें, " रंगोपंत तुमची बुवा बुद्धिबळाच्या कामांत मोठी तारीफ ऐकतों. तर दोन हात होऊं देतां का?" तेव्हां तो काय ह्मणाला " जामदार सांप्रत आमचीं निराळींच बुद्धिबळें चाललीं आहेत. ह्मणजे, एखाद्या सात मजल्यावर चीला खालीं आणावयाची !" मग दुसरा काय ह्मणतो " ती खालीं जर न येईल तर शह लावून आणूं !" तिसरा बोलतो "अहो, नुस्ता शहसा काय, पण काडशहा पाठीमागें काडशह देऊन मात उडवूं !" शेवटीं भवानराव बोलले " पंत, काडशहांत एखादें मोहरं आड येत असलं तरी तेंही लोळवूं !! " पाहिली अन्योक्ति हीं. सगळा रोख आमच्या राजश्रींवर आणि त्या गरीब बापडीवर आहे. तिनें तर बिचारीनें अगदीं ह्मणतात अंथरूण धरिलें आहे निखालस.

विश्वासरावः—आमच्या स्वारीचा नाद जरा कमी झालासा दिसतो.

गुणाजीः—आहे खरं कांहीं तसं. पण रावसाहेब, या टोळ भैरवाचं मला थरत भय वाटतं. क्षणांत काय करतील याचा भरंवसा नाहीं. त्या नवरंग्याचे दिवसांतून नऊ रंग उडतात! कालच त्याणें फौजदाराला एक घुबड शनवारीं पैदा करून आणाला सांगितलं. त्याचं काय करायचं तें समजलं काय? रविवारीं, मध्यरात्रीं, एखाद्या पिंपळाच्या पाराखालीं, रक्त-मांसाचा नैवेद्य करून,त्याची पूजा करायची; अनी मग त्याच्या-पुढें डोळे मिटून मंत्रजप करायचा. त्यानंतर तें विलक्षण भयंकर भयंकर शब्द करूं लागतें. ते ऐकून मंत्र जर जरा चुकला, तर तात्काळ तो मेलाच समजावा. भ्यायला नाहीं तर; तेंच पाखरूं माणसाच्या वाणीनें बोलून आपल्या सर्व आंगच्या अवयवांचा उपयोग सांगूं लागतें. त्याचं बोलणं संपण्यापूर्वीं त्याला मारलं पाहिजे. नाहीं तर हाच उलटा मरेल! अमुक ठिकाणच्या मांसाचं असं असं केलं असतां रुपं बनतं; अमुक ठिकाणचं मांस एखाद्याला विड्यांत दिलं तर तो वश होतो; फलाण्या ठिकाणचे रक्ताचा टिळा कपाळीं रेंखून एखाद्याच्या घरांत रात्रीं, पौर्णिमा अमावास्येला गेलं तर तो कोणाला दिसत नाहीं; त्याला मात्र सर्व दिसतात काळोखांत सुद्धां! काय सांगूं विश्वासराव, आपल्याला; तो हजार गोष्टी बोलला त्या मला नाहीं आठवत. कोणाला वश करितो आणखी कोणाच्या घरीं दरोडा घालतो, भगवानाला माहीत. वेडबीड लावाचा कदाचित् बुवा बाळासाहेबांला. यांना चार दिवस नौसरीस नेऊं चला. आतांशीं, रंगोपंताच्या कोठडींत रात्रींचे, वीरमंत्री काय येत असतात; उदबत्या, अबीर, सुवासिक फुलं, यांचा काय भवकारा चाललेला असतो; आमच्या व मल्हाररावाच्या वाड्याच्या दरम्यान् भारलेलीं लिंबें, सुया टोंचलेलीं व शेंदूर लावलेलीं किती पडत असतात. हो, हो; बाळासाहेबांच्या धोत्रांवर पांच पन्नास बिब्याच्या फुल्या आपोआप कशा पडल्या? नको बुवा,

त्या पिशाच्चाचं नांव नको. मला त्याचं थरत् भय वाटत. बाळासाहेबांनाच येथून नेऊं चला.

विश्वासराव:—जामदार,या त्यांच्या गप्पांत कांहीं राम नाहीं. आतां या कलियुगांत बीर, पीर, सगळे लयाला गेले आहेत.

गुणाजी:—असं काय ह्मणतां रावसाहेब ? मारवाडांत गांवावरला पाऊसच्या पाऊस बांधतात ! अहो, दहीं घुसळावें तुमच्या इथें अनी लोणी आमच्या घरीं! येथें एक ह्मातारा चांभार आहे. तो ह्मणतात साप आंगांत आणून बोलवितो. पाहिजे असेल तर हा चमत्कार पहायाला जा एखादे वेळीं. एके वेळेस तर त्यानं–एक फकीर चंद्रग्रहणाच्या दिवशीं मेमदाबादेहून तेथली एक लहानशी सुंदर मस्जीद बीर–मंत्रानं उडवून, तिच्या घुमटावर बसून खग्रासाच्या काळोखांतून तिला आपल्या गांवीं नेत होता; तें ह्यानें येवतेश्वराच्या खालच्या अंगाला नदींत जप करीत असतांना पाहून, त्याला त्या मस्जीदी सकट खालीं पाडिलं. पुढें तो ह्याला गयांवयां करूं लागला तेव्हां 'जागच्या जागीं ती इमारत परत नेऊन ठेव' असें बोलून त्या फकिराला डोळे मिटावयास सांगून, पापणीला पापणी नाहीं लागली तों ह्या चांभारानें, तो व ती इमारत, मेमदाबादेस पोहोंचविली ! तुह्मां इंग्रजी शिकलेल्या लोकांना हें खरं देखील वाटणार नाहीं ! !

विश्वासरा०:—कांहीं बुवा, त्याचा अंत लागत नाहीं पुरा. काल दिवाण साहेब सांगत होते, अशाच गोष्टी निघाल्या वरून, कीं, 'सयाजी महाराज साहेबानां मारण्यासाठीं—एकदां शनवारीं दिवाळीची अमावास्या पडली होती—त्या दिवशीं एक गुप्त अनुष्ठान बसलें होतें. थोरले महाराज दिवे लागतांना कांहीं एक कारण नसतां एकाएकीं मूर्च्छना येऊन बेशुद्ध पडले. पदरच्या पंचाक्षऱ्याला हें कळतांच येऊन प्रथम त्यानें त्यांच्या

१ बडोदें येथील स्मशानभूमीचें स्थान.

सभोंवताली वेताच्या छडीनें एक रेघ फिरवून, अंगावर मंतरलेले उडीद टाकून नंतर चौघा राजपुत्रांना विशेष विशेष स्थळें सांगून, चारही दिशांना शोध करण्याला पाठविले. तों अकराच्या सुमाराला, एका तेल्याच्या तळघरांत, एक उंच म्हातारा द्राविडी ब्राह्मण, तेलानें आंघोळ करून, कपाळाला शेंदूर व अक्षता लावून, अंगावर ताज्या मारलेल्या रेड्याचें थबथबीत कातडें पांघरून, अगदीं उघडा नागडा, हातांत एक नागवी तरवार घेऊन, एका नवीन मेलेल्या बाळंतिणीच्या प्रेतावर बसून, त्याच्या पुढें त्याची अष्टभुजा देवी आहे, जवळ एक पेटलेला टेंभा भडाडताहे, एके बाजूला दारू, मांस, तांबडीं काळीं फुलें आहेत, दुसरीकडे तोंडांत बोळा देऊन वस्त्रालंकारानीं आणि तांबड्या फुलांच्या माळानीं सजविलेली, मळवट भरलेली अशी सुलक्षणी सहा वर्षांची कुंवारी हातपाय बांधून घेतलेली कावरी बावरी टिपें गाळीत पडली आहे, असा तो डोळे मिटून जप करतांना आढळला! त्याचा तिकडे गळा उडविला, आणि इकडे थोरले महाराज साहेब गाढ झोंपेंतून जागें व्हावें, तसे खाडकन् उठून बसले!! हाच जर आणखी एक तास जास्ती जाता, आणि त्यानें त्या मुलीचा बळी देवीला अर्पण केला असता, तर कांहीं एक उपाय चालला नस्ता.

गुणाजीः—एकूण हें इंद्रजिताच्या विजयीरथाच्या विध्वंसाप्रमाणें घडलें. रावसाहेब, बोलतां बोलतां संध्याकाळ झाली. सरतेशेवटीं इतकें सांगतों कीं, या भीतीमुळें माझ्या जिवाला रात्रं दिवस घोर लागला आहे. मग आपल्याला या गोष्टी खऱ्या वाटोत खोट्या वाटोत

विश्वासरा०ः—खरेंच. विषाची परीक्षा कशाला पाहिजे? आणि फिरून दोन चार महिने बाळासाहेब तिकडे गेले तर हा नाद तरी कमी होईल. करतों मी त्याची तजवीज. आपण अगदीं निष्काळजी असा.

---

१ महाराज गणपतराव, खंडेराव, आनंदराव व मल्हारराव.

गुणाजीः—करा कांहीं बवा असें; येतों आतां. दयालोभ.

विश्वासरा०—( हांसून ) हें काय विचारणें. शिपाय, हापिसाला रजा सांग. (जातो.)

## प्रवेश ४

( बाळासाहेब सर्व मंडळींचे नमस्कार, मुजरे घेत घेत दिंडी दरवाज्यानें बाहेर येतात. )

बाळासा०ः—कायते विश्वासराव नाहीं भेटले जातांना. अरे, कोणी त्यांना बोलवा जा. जामदार, बाबासाहेबांना भेटून येतों. (मनांत) नये जाऊं. ते कोठें आमची पर्वा करितात. नाहीं; गेल पाहिजे. ज्याचा थोरपणा त्याला. आपण पायाशुद्ध चालावें लोकांचें आपल्याला काय !

( इतक्यांत झाळसाबाई सज्ज्यांत चिकाच्या पडद्याआड येते. )

झाळसाबा०—(मनांत) आज जाताहेत ह्मणून जें ऐकिलं तें अक्षरशःखरं. काय कारण बरं? आणिक इतक्यांतच गाडी कोठची? भरहांशीलाची? ती पण साडेनवाला येते अनी दहाला निघते. ( घड्याळाकडे पाहून ) सध्यांतर सहावाजून पांच मिनिटं झालीं. मुहूर्तोबिहीर्ताचं तंत्र असेल कांहीं. पण आतां हे एकटेच नाहीं जात; तर माझे पंच प्राणही जाताहेत त्यांजबरोवर. कारण त्यांनीं जरी माझा नाद सोडिला आहे, तरी त्यांच्या नादावर माझा जीव आहे; ते गेल्यावर सर्वच मावळलं. हर, हर!

( इतक्यांत विश्वासराव लगबगीनें धांवत येतात .)

विश्वासरा०—हं, हं, बाळासाहेब, असें एका एकीं जाणें ठरलें? फिरून उभयतां बरोबर? ( मनांत ) बहुधा हीं आमचीं फळें यांना भोंवलीं असतील.

बाळासाहेबः—अकराच्या लोकलेनें[1] रुस्तम आला मला नौसरीस नेण्याला. हें पत्र पहा—( पत्र पुढें टाकितात. ) आमच्या कारभाऱ्या कडून आलें तें.

---

१ आगगाडी.

झाळसा०:– ( मनांत ) मेल्या बेरडा, रस्तमा ते दिवशीं आलास माझा गळा दाबाला; अनी आज जीव न्यायला आलास कायरे ? ही रे, कोण मेल्या मारण्याची अशी विलक्षण चाल ही ? नुस्त्या दृष्टिसुखालाही अंतरलेंना यावेळे पासून !

विश्वासरा०:–(आश्चर्य मुद्रा करून)पत्र, घाई घाईनें लिहिलें आहे. काय फराटे मारले आहेत ! धड वाचत दिसीत नाहीं. ( अडखळत वाचतात )

"आई साहेब यांची प्रकृति काल तिसरे प्रहरीं एका एकीं–"वसू मार" ( जरा थांबून ) अं, "वसूमार ! घाबरी झाली" !! हं हं " वेसुमार घाबरी झाली; " त्यांची प्राकृति झाली घाबरी, आणि याणीं खालीं सगळी एक मात्रा ( हांसतो ) हो, हो. ( पुढें वाचतात ) " आणि आपण उभयतां भेटीला येण्याविषयीं त्यांनीं एक सारखा जि न ध्यास"–"नाहीं निजध्यास" ( हांसतो ) हं :—

बाळासाहे०:--( जरा रागावून ) हें काय रावसाहेब ? लोलोकांची घाई कोण ? नी आपण हंसत बसलां आहां. तुह्मी बसा हंसत, आह्मी वरतून बाबासाहेबांची रजा घेऊन येतों. माझी गाडी तेवढी राहूं द्या. बाकी सर्व चालूं लागा. ( सर्व जातात. )

झाळसा०:–बरंच झालं, एकटेच येताहेत. माडीवर कोणी नाहीं. आतां माझं सामराज्य. आपणही माडीवरच्या खोलींत जाऊं चला. ( तिकडे जाते. )

( बाळासाहेब माडी चढूं लागतात. )

झाळसा०:–( किनरीच्या स्वरानें गाते. )

" अजि रस्तमहा नेतो मत्प्राणाला ॥ सखेकाळ कोठूनि आला ॥ ध्रु० ॥ नाहिं सुचत मला कामधाम आणि धंदा ॥ आठवितां सुभालेचंद्रा ॥ " ( पुन्हा तेंच तेंच ह्मणते. )

---

१ मोडी ' ज ' आणि ' न ' सारखेच दिसतात. २ बाळा साहेबांचें मूळ नांव ( पाळण्यांतलें )

बाळासाहेबः—अं, “ अजिरस्तमहा! नेतोमत्प्राणाला ! ! ” ( आश्चर्य मुद्राकरून ) ऐकूं तरीया ही हिची कृति. ( जिन्यांत उभेराहून ऐकतात. )

झाळसा०:—( मनांत ) अजून वर आलें नाहींत, त्या अर्थी हे गाणें ऐकताहेत खात्री पूर्वक. ( उघड ) “ नाहिं सुचत मला कामधाम आणि धंदा ॥ आठवितां सुभालचंद्रा ॥ मुळिंपासुनि मी होतें यांच्या छंदा ॥ तरिनदया सुभालचंद्रा ॥ चाल ॥ सांवळी मूर्ति अजिपाहूं ॥ युक्तिनें बहुत समजाऊं ॥ उत्तम गुण त्यांचे गाऊं ॥ चाल पहिली ॥ नसे धीर मला जिवहा व्याकुळ झाला ॥ सखेकाळ कोठुनि० ॥ ”

बाळासाहेबः—( आपल्याशींच ) आतां मात्र कमाल झाली. इर्चा कामाग्नीची ज्वाला पूर्ण शिखरास पोहोंचली आहे. आपण देखील त्यांत एकदां पतंगवत् जळत होतों. करितां येथून झटकन् दूर व्हावें कसें. ( वरचढून जातात. )

बाळासाहेबः—( हाका मारितात. ) बाबासाहेब, बाबासाहेब; ( झाळसाबाई हंसून पुढें येते; तिला उद्देशून ) बाबासाहेब आहेतका वर ?

झाळसा०:—( गालांत हांसून ) जरा आपण इकडे येऊन बसावं. येतील इतक्यांत.

बाळासा०:—( मनांत ) येथें बसणें अगर बोलणें निखालस मूर्खपणाचें काम आहे. ( उघड ) निरुपाय आहे बसण्याला, याचा राग नसावा. भेटीला आलों होतों ह्मणून आपण कृपा करून सांगा बाबासाहेबांना. ( मागें फिरतात. )

झाळसा०:—( आणखी पुढें होऊन) महाराज, यजमान अथवा घरचीं दूसरीं कोणीं चाकर माणसं जरी येथें नाहींत, तरी ही आपली दासी आपल्या सेवेस कमतरता न—( बाळासाहेब जिना उतरूं लागतात. )

झाळसा०:—( त्यांच्याकडे धांव घेऊन ) हं, हं. घटकेचा

कांहीं प्रहर-( दीनवाणीनें ) महाराज, ही दासी कांहीं अनोळखी नाहीं, अनी ही माडी ही-

( पडद्यापलीकडे ) बाळासाहेब, समदेभाईरगेल्ये. माडीवर येकल्या बाईसायबा बिगर कोनी न्हाई. त्यांची व्हईल भ्येट व्हावी तर !

( बाळासाहिब शरमून झरझर जिना उतरून खालीं जातात. )

बाळासा०:-( मनांत ) हा तो कुचका हिम्मत असेल. मुळारंभीं एक चूक घडली कीं, ती सुधाराला जों जों जावें, तों तों त्याचा वेळेस खिळा बनतो. आतां बोलून उपयोग तो कोणता. इत उत्तर तरी केलेला दृढनिश्चय न टळो. (जातात. )

झाळसा०:-शेवटीं स्वारी गेली अं? चाऱ्ही दिशा कश्या उदांस भासूं लागल्या एका त्यांच्या जाण्यानें. ( पुन्हा सज्जांत जाते. ) अयाई, हाच सज्जा आणि हीच पुढची गच्ची, जीं पाहूनच माझा जीव गार होई, तीं मला या क्षणीं पिशाच्चपुरी सारखीं वाटतात ! हेंच तें राधाकृष्णाचं चित्र ज्याचं इकडे भीं चुंबन केलं कीं, तिकडे कितीही राग आला असला तरी खुद्कन् हसायचं; आणि हीच मी ती, जी आपल्याला मोठी धन्य मानीत असे कीं, अशा मदनाच्या पुतळ्याला मी आवडल्यें. गेल्या, बाई, त्या साऱ्या गोष्टी लयाला गेल्या. आतां कधींच त्यांची आशा उरली नाही. अरेरे, पहिल्या संकल्पा प्रमाणें वागते तर या यातनांतून केव्हांच सुटलें असतें !आतां त्याचें फार वाईट वाटतं. भूक तहान यांच्या वेदना पुरवल्या; परंतु अंतःकरणाला लागलेले जे विंगळे ते कसे सोसूं ग बाई आतां? नको, नको आतां हें मला जग नको; भाऊ नको; बंद नको; थूः त्या धन दौलतीवर. या देहाचीसुद्धां आस राहिली नाहीं. देवा, असला हा दुर्दैवी, पापी, गांजलेला, आजन्म पावेतों कष्टच भोगण्याला निर्मिलेला, सर्वांनीं ज्याचा सर्वदां अव्हेर केलेला, अ-

१ निखारे.

सला हा हतभाग्य देह निरर्थक उत्पन्न तरी कशालारे केलास? यापेक्षां दगड धोंडा कां केलं नाहींस मला! असा जीव तरी ठेवून उपयोग काय? रिकामा या धरत्री मातेला भार मात्र होणार. ( एकदांच किंचाळते. ) आई, धरणी माते, या समईं तूं मोठं पोट करून मज अनाथाला ठाव दे आपल्या उदरांत. ( धडकनभुईवर अंग टाकते. ) ( पडदा पडतो. )

## प्रवेश ५ वा.

स्थळः—मल्हार रावाच्या वाड्याचा सज्जा.

वेळः—दिवे लागल्यावर एक घटका.

( म्हाळसाबाई झांपड लागून पडली आहे; इतक्यांत बायजी तिचा शोध करीत येते. )

बायजीः—बाई, पोरीला हुडकूं तरी कोठे जाऊन? मला बाई भीति वाटते त्या सज्जांत जांयला. बाळा, ए बाळा; अं, तिकडे फुसफुस कोण करतं? वात तरी घेऊंदे बाई. (उजेड घेऊन पुढें जाते.) अग आईग! पोरगी एकटीच पडली आहे. कोण बापडीची दाद घेतं? ( जवळ जाऊन ) बाळा, उठग; संध्याकाळीं बेटा, कोणी निजतंकाग वेडे? माझी बाई कशी. ( तिचें तोंड कुरवाळते. )

म्हाळसा०ः—( झोपेंत बरळते ) पण माझं ऐकाचं नाहींना अगदीं? बघाहो असं कायगडे, ते दिशींची आठवण सुद्धां जावीना? चुंबन केल्यावर कोण बरं प्रेमानं मजकडे पाहून हंसलं? मी नाहींना; आतां कांहीं हा पदर सोडाची नाहीं.

बायजीः—बाई, बोलतेस कोणाशीं? ( तिजकडे पाहून ) अरे, हीं अजून झोंपेंतच आहे. ( तिला हालविते. ) अग ए वेडे, ए वेडे, ऊठ; छेः कांहीं नाहीं, झोंपेंतच!

म्हाळसा०ः—हां लोटा; हातानें लोटा; पायानें लोटा सोडाची मिळून नाहीं. अगग, सुटलेग, सुटले हातचे! हां हे पुन्हा

धरिले पहा ! ! ( असें ह्मणून बायजीलाच कवटाळून धरिते.)

बाईजीः—बाळा, जागी हो; जागी हो. मी बाईजी—

ह्माळसाबाईः—( सावध होऊन, लाजून चटकन् दूर होते. ) कर्मा, स्वप्नांतही तें सौख्य कपाळीं लागूं दिलं नाहींस ! यापरीसें जीव घेनास एकदांचा ह्मणजे सुटलें. पण पूर्व कर्म कोण भोगील मग ? बायजी, भोंवळ आली—(पुन्हा मूर्छित पडते. )

बाईजीः—( आपल्याशींच ) समजल्यें. हा परिणाम धड दिसत नाहीं हिची आधींच प्रकृति धुपणीस लागली आहे. त्यांत तिचं मन जें बहकलं आहे तें अनावर आहे. खरंच तिनं तरी अशा तरुणपणांत देह कसा जाळावा ? हर, हर; असावे तसे पति असून ही देवांच्या, रुषींच्या, राजांच्या बायकांचीं मनें या काळिजखाद्या रोगानें बेफाम करून सोडलीं; तर ही नवी तरणी हरणी या थेरड्या काळविटा बरोबर कशी समाधान पावेल ? उन्हाळ्यांत, उन्हांनं तापून जाऊन, तहान भागविण्या करितां, हरण जसें म्रुगजळामागं उड्या घेतं, तशीच ही बापडी बाळासाहेबांच्या करितां बावरी होऊन, भीड, भय एकीकडे ठेवून फिरे. आणि परिणामीं तेही म्रुगजळासारखे अवचित् दिसेनासे झाले! देवा, पुढं इची गतिकाय ? माझे तर उपाय खुंटले अवघे. आतां आपला देवावर हवाला ! ! ( जवळहात जोडून बसते. )

ह्माळसाबाईः—( शुद्धिवर येऊन, मनांत ) एवी तेवी चोहींकडे माझी फट फजीती लोकांनां माहीत पडली असेलच; एवी तेवी कसातरी जीव हा जाणारच; तोंडाला काळोखी तर आली; यच्च यावत् विचार करकरून थकलें. तर मग मेला मनांत आलेला बेत तरी कां फुकट दवडावा? ( उघड ) बाईजी, माझं एक मागणं आहे. पण रागावणार नाहींसना ?

बाईजीः—अहारे कर्मा ! बाळा, बोल; बोल काय असेलतें मन खुलं करून. आंतबाहेर ठेवूं नको. पोरी तुझ्यावर स्वप्नांत तरी रागावेन का ?

म्हाळसा०:–नाहीं. पण भय वाटतं त्याचं. मात्र बाहेर फुटायचं नाहींना तें ?

बाईजी:–मुली, तूं कितीग शंकेखोर आहेस ! छापील कागदावर करार का पाहिजे लिहून द्यायला? असं काय मेलं राज्य द्यायचं आहे आपल्याला कोणाचं ?

म्हाळसा:–राज्य नाहीं; पण त्याचतोडीचं आहे.(जरा थांबून) मला बाई, लाज वाटते बोलाला. बरं, पण कुठे कुठे बोलणार नाहींसना, कुणाजवळ ?

( बाईजी तोंड फिरवते. )

म्हाळसा०:–ऐक तर. हें पहा, मधाशीं झोंपेच्या गुंगींत मी व बाळासाहेब आगगाडीच्या वाघिणींत एकाच कोंचावर एकमेकां जवळ शेजारीं–

बाईजी:–( हळूच ) बाळा, जरा थांब. जिन्यांत पाय वाजताहेत. ( सईबाई दबत दबत येते; तिला पाहून ) सईबाई, अशी येग इकडे, लांब लांब कां ? आज रात्रीचंसं येणं केलं बाई?

सईबाई:–सुंद्राताई, करारनामा कोणाचा लिहून घेत होतीस? बाई, गुप्त गुप्त झालं म्हणून त्याला कांहीं शीमा आहे कीं नाहीं? बाईजी केवळ तुझ्या आई करेतां जरी जास्त म्हटली तरी शोभेल. बोल काय बोलाचें तें.

( म्हाळसाबाई मौन धरिते. )

सईबाई:–हां, समजलें. माझ्या देखत बोलाचं नसेल. ( माना हालविते. )

म्हाळसा०:–तुझ्या समक्ष बोलाला काय झालं बाई ?

सईबाई:–बोलतर; मुहूर्त का पाहिला पाहिजे त्याला?

म्हाळसा:०–बोलूं काय बाई? तसं सांगण्या सारखं नाहीं, हो.

सईबाई:–सांगण्यासारखं नाहीं, म्हणूनच सांगत नाहींस

---

१ डब्यांत; हा 'व्याग न' शब्दाचा अपभ्रंश होय. २ पेक्षां.

हो. आह्माला बाई, तुमच्या सारख्या शिकलेल्या बायकांगत खांचा खोंचा कुठे कळतात बोलण्यांतल्या? आह्मी पडलों बोलून चालून भाबड्या. खुळ्या ह्मणून येतों तुमच्याकडे तीन तीनदां चरत्रटपणा कराला. ( रुसून बसते. )

झाळसा०:–सईबाई, याला काय ह्मणावं ?

सईबाई:–कुत्रीम! ( मनांत ) मीं ऐकला आहे तुझ्या बोलण्याचा उगम.

झाळसा०:–बाई. माझं भाषण अगदींच बेभरंशीना ?

सईबाई:–हो, नुक्तंच असं वाटूं लागलं.

झाळसा०:–अनी इतके दिवसांची गडी आज फुकट गेली तर?

सईबाई:–अद्याप गेली नाहीं; जाण्याच्या बेतांत मात्र आहे. अग, तुझं इंगित मला ठाऊक; नी माझं तुला. चोरतेस कशाला?

बाईजी:–पुरे करा दोघी जणी. भर तीनसांजची किचकिच कशाला? पदर पसरतें बाई तुह्मांला. माझं डोकं दिखीत चढलं या योगानं.

झाळसा०:–तिला आहे बाई, कांहीं झालं कीं आपली हुजत घ्यायची संवय. बोलूंदे किती बोलेल तें एकटीला. हे मी मूग[1] खातें. ( तोंड धरिते. )

सईबाई:–( कपटानें हंसून ) 'पाद्रीला पावस्याचं मीस' तोंड मिटून धरशील तर काय झालं? ( जरा थांबून ) तुह्मांला दोघीन्ला आला आहे माझा कंटाळा. त्या अर्थी येथें बसूंतरी कशाला ? अरे, मेणा इकडे घ्या. ( झाळसाबाईस उद्देशून ) येतें बाई; बायजी येतें. ( मोठ्या झणकाऱ्यानें निघून जाते. )

झाळसा०:–थांब ग; गेलीस? तुझी मर्जी बाई.

बाईजी:–( ती गेली असें पाहून ) 'असंगाशी संग नी प्राणाशीं गांठ' आली गोष्ट ताळ्याला! तुला किती दिवस सावध

---

१ गप्प राहणें.

करीत होतें. बरं, तें जळो. तुझा मगासचा काय मनसोवा होता सांगण्याचा तो समजूंदे पाहूं लौकर.

ह्माळसा०:–( तिच्या कानाशीं लागते )असं करणार. कोणी मला कांहीं नांव ठेवो; कांहीं सांगो; हें मिळन फिरणं नाहींच. एवीतेवी सर्वस्वाची हानी झालीच; अनी जीवही जाणारच आज नाहीं उद्यां तरी. कां, बोलत कां नाहींस आतां?

बाईजीः–बोलूं काय? हें ऐकून माझा जीव थाऱ्यावर नाहीं. हें अथ पासून इति पर्यंत नाटक होणार तुझ्या जन्माचं! यांत संदेह नाहीं. यावर काय उत्तर द्यावं? काय करावं? काय संवरावं? योग्य कोणतं ? अयोग्य कोणतं? तुझं सुख कशांत होईल? दुःख कसं सरेल? या विषयीं या वेळीं मला बाई, कांहीं एक सुचत नाहीं. तर ‘ नरो वा कुंजरो वा ’ ( कानांवर हात ठेविते ) आपलं ‘राम शिवा गोविंदा’ तूं अनी तुझा विचार काय पाहिजे तें करा. मी ‘ जा ’ ही सांगत नाहीं, नी मोडताही घालीत नाहीं. ईश्वर तुला चांगली वाट दाखवो. ( डोळे मिटून देवाचें ध्यान करते. )

ह्माळसा०:–बाईजी, आतांच तूं घरीं जा बाबांकडे.[1] माझा दृढ निश्चय झाला.

बाईजीः–मुली, तुला सोडून कशी जाऊं ग ? बरं तुझ्या करितां मोहपाश तोडला, पण तूं नीट विचार कर. तूं ह्मणत्येस “त्यांची दासी झालेली पुरवलं मला” पण त्यानां हें पुरवेल का? तूं गेलीस आणि त्यांनीं तुझा अंगिकार केला नाहीं-अनी असं तर घडणारच–मग तुला पुरा पस्तावा होईल. वडवाघुळा प्रमाणें मध्येंच लोंबकळावं लागेल ! अशा फसून जाऊन कितीक तर घरदार, भाऊबंद, आपली जात, देश या सर्वांना मुकून देशधडीला लागून, बाटल्या आहेत, मेल्या आहेत ! !

ह्माळसा०:–बायजी तशीच वेळ आली, तर ही कुडी, नी हे

१ बायजीचा नवरा. त्यांच्या येथें रहात नसे.

प्राण, एकत्र तुला भेटणार नाहींत. हीच आपली अखेरची भेट. ( बाईजीला भेटते. )

बाईजी:-( आसवें ढाळीत ) बाळा, बोलवत नाहीं. खालीं जातें. ( तिला कवटाळून धरून चुंबन करिते. ) बाळा, ईश्वर तुझें कल्याण करो ! ( निघून जाते. )

झाळसा०:-समय आणिबाणीचा बेतला खरा. या प्रसंगीं मन जर जरा कचरलं कीं, वेळ जाईल निघून. मग काय उपयोग ? ( इकडे तिकडे पाहून ) बरंच झालं. घरीं अजून कोणी आले नाहींत. तर आधीं खोली बंद करून पुढल्या कामास लागावं. ( दार बंद करिते. ) ( पडदा पडतो. )

अंक दुसरा समाप्त.

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला

स्थळ:–आगगाडीचा पहिल्या क्लासचा डबा.

वेळ:-चांदिणी रात्र. ( बाळासाहेब व तरुण मराठे सरदाराचा वेष घेतलेली झाळसा बाई बोलत आहेत. )

बाळासा०:–सरदारसाहेब, इकडे कोणीकडे जाणार?

मराठासरदार:–( हांसून ) आपल्याचकडे.

बाळासा०:–ह्मणजे ?

मराठासरदार:–ह्मणजे. आपण देशीं चाललां आहां; मी-ही आपल्या देशीं जाणार.

बाळासा०:–पण उतरायचें कोठें ?

मराठासरदार:–आपल्या पलीकडे चार पावलं.

बाळासा०:–ह्मणजे नौसरीच्या पुढल्या स्टेशनावर होय ?

मराठासरदार:–हो. त्याच भागाला.

बाळासा०:–बरं पण सरदार साहेब आपलें नांव नाहीं कळलें अजून.

मराठासरदार:–( हंसून ) नाहीं बुवा आपलें नांव सांगणार. हंसाल एखादे तें ऐकून. बरें पण आपलें काय अगोदर? बाळासाहेब नव्हे ?

बाळासा०:–होय,तेंच या देहाला ह्मणतात. पण आतां आपलें-

म०सरदार:–मला मनोहर ह्मणतात. नांव मात्र सोनुबाई.

बाळासा०:–खरें ह्मणाल, तर आपल्याला हेंच नांव योग्य. नांव यथार्थ आहे. बरें, दक्षिणेंत जाण्याचें कारण? जाहागिरी व वास्तव्य तिकडेच आहे वाटतें ?

म०सरदार:–हो मूळचे आह्मी तिकडचेच. परंतु हल्लीं आज पांच वर्षें बडोद्यांतच वस्ती आहे.

बाळासा०:-वडोदे राजधानींत आणि पांच वर्षे ! आणि परस्परांना एकमेकांचा ओळख नाहीं ! मोठें आश्चर्य आहे !!!

म०सरदारः-आपण जरी मला ओळखीत नाहींत, तरी मी आपल्यास पुरें ओळखितों.

बाळासा०:-( त्याच्याकडे नीट न्याहाळून पाहून ) वाटतें खरें कीं, मीं आपल्याला पुष्कळदां पाहिलें असावें. पण बरो-बर खात्री पटत नाहीं.

मराठासरदारः-ठीकच आहे. ज्याची आपल्याला गरज नाहीं त्याची ओळख कोण ठेवितो.

बाळासा०:-( हांसून )नाहीं पण आतां खचीत राहील. बरं देशीं जाण्याचा हेतु काय ?

मराठासरदारः-सूर्त शरीराला चैन नाहीं हेंच.

बाळासा०:-ऐन तारुण्याच्या उमेदींत आपण पिकुटलेल्या पाना प्रमाणें फिके दिसतां,असें दुखणें तरी काय? किंवा बाहेरची कांहीं पीडा आहे ?

म०सरदारः-कांहीं पीडा खरी. ( हास्यमुख करितो. )

बाळासा०:-( जरा थांबून ) आतां ध्यानांत आलें. दुसरें काय ? माणसें गेलीं असतील चार सहा महिने तिकडे माहेर-पणाला, तेव्हां स्वारी लागली इकडे चुळमुळ करायला. ( हांस-तात ) होय; तेंच हो, तेंच.

मराठासरदारः-आपण तर्क केला तो बरोबर; पण इथे जरा उलट प्रकार आहे.

बाळासा०:-हां हां; असे या वाटेवर. बोलून चालूनच बा-हेरची पीडा आहे तर ! याला धन्वंतरी आणिक पंचाक्षरी काय रडतील?( हांसतात ) सरदार साहेब चैन नाहीं असें ह्मणू नका. तर चैन नाहीं थट्टेची क्षमा असावी.

---

१ पिशाचाची बाधा.२ इष्कबाजी. ३ शरीराला समाधान;आरामनाहीं. ४ यथेच्छभोग विलास नाहीं

मराठासरदारः- ( हांसत ) यांत जर अपराध नाहीं तर क्षमा कशाला ? आपण खरं तें बोललां.

बाळासाः०-( हांसत ) एकूण घरच्या माणसांच्या हातीं आपण तुरी देणार ?

म०सरदारः-हो, यांत काय संशय ! नाइलाजा मुळें देणें भाग आहे. ( हास्यमुख करितो. )

( दोघे जरा शांत बसतात. )

म०सरदारः-बाळासाहेब, आज आपली भेट झाली हें मोठं भाग्यच समजायचं. माझ्या भांबावलेल्या चित्ताला आपल्या संगतीनें फार सुख वाटलं. ज्यांच्या ज्यांच्या थोर पुण्याई असतील त्यांनाच असलीं रत्नें लाधायचीं.

बाळासा०:-मनोहरराव, असें आपण ह्मणावें मला; आणि मी ह्मणतों आपल्याला.

म०सरदारः-आजची शुद्ध दशमीची रात्र. अहाहा, अरण्याची मौज पण काय नामी दिसत्याहे. जणुं कांहीं, गंधर्वकन्या आणि वनदेवता यांचा, हें रान, विलास भोगण्याचा रंगमहालच बनून गेलं आहे.

बाळासाहे०:-होय, बरोबर बोललां. पहा, हीं जागो जागीं भुईबरावर असलेलीं हिरवीं चार धान्याचीं शेतें जणुं हिरव्या मखमालीच्या गाद्याच पसरलेल्या आहेत; मध्यें मध्यें अगाऊ पेरलेलीं ज्वारी, बाजरी, कपाशी इत्यादिकांचीं पिकलेलीं व उंच वाढलेलीं शेतें, जशा कांहीं पिंवळ्या, पांढऱ्या, काळ्या अशा उश्या, गिर्द्याच ठेवल्या आहेत; गाडीच्या नादाला भिऊन मधून मधून ससे, कोल्हीं इत्यादि धान्य खाण्यास आलेलीं रानटी जनावरें, जशीं बिच्छाने सफा करणाऱ्या दासीच्या हाताला भिऊन तत्स्थानापन्न असणारीं रक्तभक्षक पाळींव जनावरें पळतात तशा टणा टण उड्या मारीत आहेत; जिकडे तिकडे स्फटिका सारख्या निर्मळ झिरप्या व झरे, जशा कांहीं स्वच्छ-

१ ढेंकूण, पिसा.

उदकानें झाऱ्या व गड्वच भरून ठेविले आहेत; स्थळोस्थळीं छोट्या छोट्या तलावांतून शेवाळीच्या सपाटीवर जीं कमळें, कमोदें, कल्हारें इत्यादि प्रफुल्लित झालेलीं आहेत, तीं जणुं काय पुष्पांचीं सुंदर सुंदर ताटेंच ठेविलीं आहेत; कडेकपारांत असणारी हुमणीं, घुवडें जशीं कांहीं कोणीं गोष्टी सांगताहेत त्यांला हुंकाराच देताहेत; हे पहा, ठिकठिकाणीं लताकुंजरूपी मच्छरदानी घातलेले मंचकही पडलेले आहेत; केव्हां केव्हां बामळीचीं बनें येतात, त्या जणुं काहीं ठाईं ठाईं कनाथीच लटकाविल्या आहेत; कोठें कोठें मोठे प्रवाह आहेत; त्यांजवर आकाशाचें प्रतिबिंब पडून, जसे रंगमहालांतून जंगी आरसे असतात, तसे ते चकाकताहेत; रा[१]ळ आणि बुलबुल पक्षी, हे जसे कांहीं सक्त पाहरा करीत व करमणुकी करितां किनरी झाडीत बसले आहेत; कोठें कोठें, जनानखान्यांत रावणाऱ्यां प्रमाणें, हरीण मोरें, माकड, वान्नर मुकाट्यानें वावरताहेत; आणि आकाशरूपी छताला चंद्र व चांदिण्या या मूनलाइटचें झुंबर हंड्याच जणुं टांगिल्या आहेत. असा अप्रतिम रंगमहाल सार्वभौमराजाच्या राणीला तरी प्राप्त होईल काय ?

**मरा०सरदारः**–बाळासाहेब, सर्व खरें; परंतु नुस्त्या गंधर्वकन्या, अथवा नुस्त्या वनदेवता, गंधर्वां शिवाय अगर वनदेवां वांचून क्रीडा कोणाशीं करणार ? त्यांची योजना नाहीं केली ? कल्पना करा. हा आपण उभयतां बसलेला आगगाडीचा डबा, आपल्या सारख्यांच्या रंगमहालाच्या तोडीला कांहीं अंशीं तरी भरेल. पहा, येथें गाद्या, कोंच, हंडी, पाणी, तोंड व हात पुसावयाचे रुमाल, मोरी (जरा गालांत हंसून) सर्व कांहीं गोष्टींची नीट समजून घ्याल तर तयारी आहे ! परंतु जर करितां एका प्रियपात्राचें साह्य नाहीं, तर मग हा सर्व येवाढा खटाटोप व्यर्थच कींनाहीं !

१ रात किडा.

बाळासा०:-हो, असें तर खरेंच; परंतु जवळ तें नसलें तर आणणार कोठून? शिकस्त झाली बुवा. तेवढीच कमतरता बरं चट्कन् आपल्या नजरेंत आली, पहा. ( हांसतात ) हो, हो, हो.आपल्याला सांप्रत प्रियपात्रावांचून दुसरेंतेसरें दिसतच नाहीं.

म०सरदार:-यांत काय संशय ? प्रस्तुत यावेळेस तर माझें चित्त माझ्या प्रियपात्राच्या रूपांत असें कांहीं गढून गेलं आहे कीं, मला असें वाटतें कीं, मी प्रत्यक्ष आपल्या प्रियपात्राशींच बोलत आहें; व तेंही मजशीं पूर्वीं कधींच नाहीं इतक्या उल्हासानें, तसेंच खुलास अंतःकरणानें, हांसत खेळत माझ्या शेजारीं बसलें; जणुं काय तीं दोघें तुह्मी व मीच ! महाराज, माझ्या पुढें माझें प्रियपात्र किती साक्षात् रूपानें येऊन बसलें आहे याची आपल्याला कल्पना सुद्धां करतां येणार नाहीं.

बाळासा०:- (हांसत) हां, मनोहररावसाहेब, दूर रहा. नाहीं तर, कदाचित् अनंगाच्या रंगामध्यें गुंग होऊन, मीच तें आपलें प्रियपात्र समजून, माराल मलाच एखादी मिठी ! अहो, घ्या काय आपलें ?

म०सरदार:-यांत काय संशय ? आपण मला हुशार केलेंत इतक्यानें बरें झालें. नाहीं पेक्षां तो प्रसंग आलाच होता.

बाळासा०:-आपण दोघे सजातीय आहों ह्मणूनच बरें. नाहीं तर या घटकेला मोठा अनर्थ उडविला असतात. ( हांसतात ) हं; हं; हं;

म०सरदार:-आपण सजातीय ह्मणोत, पण मी विजातीय आहें.

बाळासाहेब:- ( हांसून ) काय ? तुह्मी पुरुष नाहीं.

म०सरदार:-माझा भाव 'मी मराठ मोळ्या पैकीं आहें' असें ह्मणण्याचा. याउपर आपण मला बायको समजा; काय चाहील तें करा.

बाळासा०:- ( मनांत ) स्वारीचें अगदीं देहभान सुटलें

आहे यावेळेस. ( उघड ) सरदार साहेब, किती हा नाद आपल्याला भरला आहे त्याचा ? याला लोकें काय ह्मणतील ?

म० सरदारः—याला नाद ह्मणतील, आणखी काय ? ( असें ह्मणून हातावर टाळी देतो. )

बाळासाहेबः—( मनांत ) यांच्या हातांतून बांगड्यांचा नाद ! छि, छिः हातांतलीं सोन्याचीं सलकडीं असतील. ( उघड ) ज्याच्या नादानें आपण राहूनें ग्रासलेल्या चंद्राप्रमाणें झालां आहां तें माणूस तरी कसें आहे ? आपल्या सारख्या सौंदर्याच्या खाणीला वेड लावणारें तसेंच असामान्य असलें पाहिजे !

मराठा सरदारः—हो, यांत काय संशय ? (हंसून) महाराज, आपण जर रागावणार नाहींत, आणि थट्टा माजणार नाहींत, तर सांगतों थेट आपलीच प्रतिमा आहे ! !

बाळासाहेबः—( हांसतात ) हो, हो, होः आतां मात्र पुरी कमाल उडविलीत बुवा.

म० सरदारः—( गंभीर मुद्रेनें ) हो; मी पूर्वींच मागणें मागितलें आहे, कीं आपण न रागावतील ह्मणून. खरें आहे तें सांगितलें. १

बाळासाहेबः—(मनांत ) याला आपण काय हंसावें ? हा तर सतरा अगर अठरा वर्षांचा बच्चा आहे. ह्माळसा बाईच्या करितां आपल्यालाही असाच चळ भरला होता. (उघड) मनोहरराव, हा नाद का सामान्य आहे हो? ह्यानें थोड्या दिवसांपूर्वीं माझीही अशीच दुर्दशा करून सोडिली होती !

म० सरदारः—कोणाकरितां बरें ?

बाळासाहेबः—( मनांत ) बोललों ही मोठी चूक केली. आतां नाकारतां कामा नये. ( उघड ) गोष्ट थोरामोठ्याच्या इथची आहे. असें आहे ' कोणाचें गांव घ्यावें पण नांव घेऊं नये ' ह्मणून सांगण्याची पंचाईत.

म० सरदारः—महाराज, मजवर आपला भरंवसा नाहीं ? पहा, ह्या जिव्हेवाटे त्यांपैकीं कोणाजवळ एक ' ब्र ' निघेल तर ही आपली. हिचें वाटेल तें करा. जी आपली फजिती, तीच माझी. यांत काडीमात्र अंतर नाहीं. (आपल्यागळ्यावर हात ठेवतो.)

बाळासाहे०:—असें आहे तर सांगतों आपल्या जवळ. बायकांच्या, विशेषें करून ह्मातार्‍यांच्या बायकांच्या, चेष्टा कशा काय असतात त्या पहाण्याच्या इराद्यानेंच फक्त आमच्या समोरच्या वाड्यांत एक सुंदर व सुस्वभावाची स्त्री राहत असे. तिजकडे केव्हां केव्हां बघत असें. जसजसें पाहूं लागलों तसतसें तिचें तें मोहक लावण्य पाहण्याची जास्तीच इच्छा होऊं लागली. तिच्या हें लक्षांत येऊन तिलाही तसेंच झालें; घटकेघटकेला एकमेकांच्या दृष्टादृष्टि होऊं लागल्या; पुढें चेष्टा सुरू झाल्या; असें करितां करितां संकेत ठरून एके रात्रीस तिच्याकडे जाण्याला सुद्धां तयार झालों होतों. आणि गेलों असतों ह्मणजे सर्वस्वाला आंचवलों असतों. पण दैवानें बाजू राखली.

म० सरदारः—अरेरे केवढी घाड पडली असेल विचारीच्या अंतःकरणाला यामुळें. बरं हल्लीं आपल्या मनांत तिजविषयीं कांहीं प्रीति, दया, माया आहे का ?

बाळासाहेबः—प्रीति नाहीं नी माया नाहीं. दया मात्र पोटभर आहे. या असल्या मूर्ख प्रीतीनें माझ्या जिवावर बेतली होती! आतां दया कां ह्मणाल, तर दीनाची दया कोणालाही येते.

म० सरदारः—( तोंड हिरमुसलें करून ) छीः, बिचारीचा घात झाला ! असा आशाभंग झाल्या कारणानें ती धाई धाई करून गत झाली असेल !

बाळासा०:—बिचारी अजून गत मात्र झाली नाहीं; होण्याच्या पंथालाच आहे ! प्राक्तन तिचें ! (कपाळाला हात लावतात आणि मोठ्यानें सुस्कारा टाकतात.)

म० सरदारः—यांत काय संशय ? जाण्याच्या पंथाला अ-

सलीच पाहिजे. मीच जर ती असती, तर आज हा तुमचा असा पदर धरून येथें आलीच असती. ( पदर धरितो ) बरें, जर ती आतां येथें आलीच असें समजा, तर तिचा आपण दयाळु अंतःकरणानें अंगिकार कराल कीं नाहीं ? माझें प्रियपात्र येथें जर मला भेटतें, तर यावेळीं त्याचे ओंठ नी गाल चुंबन करून करून लाल करून सोडले असते.

बाळासा०:–( खिन्न मुद्रा करून ) येथें कशाची येते ती गरीब बापडी त्या कैदखान्यांतून ! तशांतून आलीच असती तर तिला चांगला बंधूच्या नात्यानें उपदेश करून परत लाविली असती. कारण, एकदां पक्की अद्दल घडून जो कुमार्गांतून परतत नाहीं तो मनुष्य काय ?

म० सरदारः–फसाल बरें महाराज, प्रसंग बेतल्यावर. बरें मागें तिच्याशीं प्रियकराचें नातें असून आतां बंधूचें कां ? हं समजलों, आतेबंधूचें नातें असेल ? ( हांसतो ) मामाची मुलगी ही बायको करतात. पण इतकं कशाला ? बंधूच्या नात्यानं ह्मटलं ह्मणजे कांहीं बंधु होत नाहीं. (हांसून) नीट विचार करा. समय बेतल्यावर मोठमोठाल्या ऋषींचीही त्रेधाच उडाली[1] असें पुराणांत आहे.

बाळासाहेबः– आपण ह्मणतां तें खोटें नव्हे. कडक उन्हाळ्यांत वाऱ्याच्या झुळुकेची दिशा जशी क्षणोक्षणीं बदलते, तशी तरुणपणांत तरुण मनुष्यांची लहर केव्हां कशी फिरेल याचा नेम नाहीं. तरी पण सहसा परस्त्रीकडे मन ह्मणून वळायचें नाहीं.

म० सरदारः–आपल्या बोलण्यावर माझा नाइलाज आहे. परंतु जर मला असें कांहीं मंत्रसामर्थ्य असतें कीं, तेणेंकरून तिचंच प्रत्यक्ष रूप धरतां येतं तर मग पाहिलं असतं आपण प्रसन्न होतां कीं नाहीं ?

---

१ पराशर, विश्वामित्र, जैमिनी.

बाळासाहेब:–( हंसून ) आपल्यासारख्या रूपाचें निधान, आणि स्त्रीभावानें जर लाधलें असतें, तर मग काय पाहिजे होतें आणखी ? ह्या मर्त्यलोकांतच स्वर्गाचा अनुभव घेतला असता. परंतु असें कोणाच्या कपाळीं असणार ? फार तर काय, पण जर, जसें अगस्त्यऋषीनें तपोबलानें राजपुत्राला लोपामुद्रा केली, तसें विद्याप्रभावानें मला आपलीही मुद्रा लोपवितां आली असती, तर मीं आपल्याला इंद्राहूनही अधिक भाग्यशाली मानिलं असतं. कारण त्याला एकच शची; परंतु मला मग एका समयावच्छेदें करून एकाहून एक चढ अशा दोन दोहींकडे शचा प्राप्त झाल्या असत्या !

म० सरदार:–हो, हो; सगुणाबाईला तीच उपमा साजते. त्या तशाच आहेत. आणखी जर आपली तशीच मर्जी असेल, तर मीही आपली बायको होऊन आजन्मआपल्यासेवेंत राहीन. बोला.

बाळासा०:–(मनांत)आज आपण बोलण्यांत पार मर्यादेच्या बाहेर गेलों हें ठीक नव्हे;अनी या मनोहर पाडसानें तर आपल्यावर सुद्धां ताण केली. तर आतां बोलणें पुरे. (डब्याचे बाहेर तोंड काढून, उघड) सरदारसाहेब, भडोचच्या पुलावरून अशा चांदण्या रात्रीस त्या शहराची व नर्मदा बाईची काय शान मौज दिसते. ती आपण पाहून मी जरा आंग टाकणार होतों. पण भडोच केव्हांच किहो गेली ! मघांपासून मी आपला जरा गुंगींतच बरळताहें कांहीं तरी ! मी जरा लवंडतों घटकाभर परवानगी द्याल तर. मग आपण निजा, नी मी जागत बसेन.

मराठासरदार:–जशी आपली मर्जी. मी पण जरा पलीकडला खण रिकामा झाला आहे त्यांत होतों. केव्हां पासून आपल्याला अगदीं खेंटून बसावें लागलें होतें आपल्या पेट्याबिद्यां मुळें. तरी बरें यांत आपण आपल्या हुजऱ्यांना घेतलें नाहीं. पाय करा लांब.

---

१ द्रव्य, ठेवा.

बाळासा०:-( हांसत ) या थंडीला खेंटून शेजारीं कुणी असतें तर बरें होतें.

म० सरदार:-( दुसऱ्या खणांत जाऊन ) हें दिखीत गुंगींतच ना!

बाळासा०:-होय बुवा. ' कफल्लक-कफल्लक;आस्तीक-आस्तीक-आस्तीक. ( निजल्यानिजल्या मनांत ) हा छावडा मोठा नाजुक प्राणी आहे. त्याचं सौंदर्य-त्याची बोलण्याची ढब- त्याचा मिठास आवाज-मनमिळाऊपणा-प्रत्येक कांहीं, तारीफ करण्यालायक आहे. याला पाहून सतीचा पातिव्रत्यरूपी स्तंभ क्षणभर डळमळून तिचेंही अंतःकरण विरवळेल. मग इतरांची कथा काय? याला पाहणें ह्मणजे डोळ्यांचें पारणें फिटणें आहे. याला द्यावें स्त्रीचें रूप. मग आहाहाहा !-प्रति झाळसाबाईच. ( चपापून ) अँ! झाळसाबाई तर नाहींना आली या वेषानें. सर्व कांहीं जुळतें तिच्याशीं. मग कठिणरे बाबा. ( जरा थांबून ) मन आहे वेडें. सात कुलपांतली येथें येणार कशी? तें क्षणांत 'उंद्राला इंद्र, नी इंद्राला उंदीर करील. चला. आपण आपले निजूं कसे. ( बाळासाहेब अंमळशानें घोरूं लागतात; व झाळसाबाई आपला खरा वेष धरून पलीकडल्या खणांतून येते. )

झाळसा०:-आतां होय तशी जाय. यांना उठवायचें ( बाळासाहेबांना हळूच हालवून ) आतां उठाचनां-उठाचंना; नौसरी आली नजीक.

बाळासा०:-( अर्धवट जागे होऊन ) काय ? नौसरी आली !

झाळसा:०-पहावं गडे एकदां उठून.

बाळासा०:-( तोंडावरला पदर काढून ) अँ ! हें काय ! मनोहरराव कोठें आहेत ?

झाळसा०:-ते गेले मवांशींच. ( हांसते. )

बाळासा०:-(तिजकडे टक लावून बघून,मोठा सुस्कारा सोडतात.) "स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं ॥ देवो न जानाति कुतोमनुष्यः"

शिव, शिव, शिव! ह्माळसाबाई, तुमचें चरित्र झालें; पण माझें दुर्दैव उदेलें! आतां तोंडाला काय काळोखी येईल उभयतांच्या? हर हर, 'न भूतो न भविष्यति.' हायरे, कर्मा! जो भ्रम मानीत होतों तो खराच झालाना शेवटीं!! (डोळ्यांस पाणी आणितात) 'गेलों पुण्य करायला तों पाप वांट्यास आलं.' ह्माळसाबाई, मी जो आपल्याला वश होणार होतों, त्यांतला केवळ मुद्दा 'आपलें असाध्य दुखणें पाहून मला आपली अतिशय करुणा आली' हाच. 'आपली प्रकृति अत्यावस्थ बिघडली होती,' असें लोकांच्या सांगण्यांत आणि माझ्या प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येत असे. तेव्हां, ही कामज्वरानें विव्हळ होऊन, विरहानें क्षयाच्या पंथाला लागून, कदाचित् मरणारही, तर हा अभिश्राप आपल्या माथ्यावर न पडो, असा आपला माझा बरोबर ह्मणा, चुकीचा ह्मणा, समज होऊन, या हेतूनें त्या अन्यायाच्या परंतु अगत्याच्या गोष्टीला नाइलाजामुळें, एकवार रुकार दिला. आतां माझी आपल्याला कोंपरांपासून हात जोडून इतकीच विनंति आहे कीं, नुक्तेंच बोललेलें बंधूचें नातें जेणेंकरून कायम राहील, असें आपण उभयतांनीं वागलं पाहिजे.

ह्माळसा०:—महाराज, अजून तरी माझ्या मरण्याचा अभिश्राप कोठें चुकणार आहे अशानें? (हंसून) बंधूचें नातें ह्मणजे आतेबंधूचंना?

बाळासा०:—(मनांत) कसें तरी नौसरी पर्यंत बोलणें लांबविलें पाहिजे. (उघड) 'आते बंधु' हा शब्द पहिल्यानें मीं लाविला नाहीं आपल्या भाषणांत.

ह्माळसा०:—तर मग, तो टिपेंत खालीं दाखल करावा.

बाळासा०:—मला ती टीप साधावेयाची[1] नाहीं.

ह्माळसा०:—मनांत मेली एखादी गोष्ट साधायची असली तर ती साधेल.

---

1 साधणार नाहीं; किंवा साधण्याची जरूर नाहीं.

बाळासा०:–पण एखाद्या गोष्टीविषयीं कानाला खडाच लावला असला तर ?

झाळसा०:–ती गोष्ट होईपर्यंत खडा काढून ठेवावा. (हंसते)

बाळासा०:–मला त्या गोष्टीची पुरी ठोकर बसली आहे.

झाळसा०:–जोडा मना जोगा मिळाल्यावर, ठोकर लागली तरी तिची व्यथा फारशी जांचत नाहीं. ( हास्य मुख करिते. )

बाळासा०:–(मनांत)हिनें तर कोटीवर कोटी चढवून आमचें शरसंधान अगदीं मजीत पाडलें. ( उघड )ज्या मानानें आपण मजवरतीं प्रेम ठेविलें आहे, तसेंच जर ईश्वरावर ठेविलें असतें तर तो देखील प्रसन्न झाला असता.

झाळसा०:–माझे ईश्वर आपण; आपणच प्रसन्न व्हा म्हणजे माझे सर्व मनोरथ परिपूर्ण झाले.

बाळासा०:–बायकांच्या बोलण्यावर कदापि भरंवसा ठेवूं नये.

झाळसा०:–तरी पण जिणें आपल्यावरच भरंवसा ठेविला आहे, अशीच्या बोलण्यावर ठेवावा.

बाळासा०:–( मनांत ) इजपुढें बोलून पाड लागणें नाहीं. तर " मौनं सर्वार्थसाधनं. "

( भूईकडे दृष्टि लावून बसतात. )

झाळसा०:–महाराज,मौन्य धरून बसण्याची ही वेळ नव्हे. आजपर्यंत जें जें या हतभाग्येच्या हातानीं वाईट घडलं, जें जें साहस केलं, जीं जीं कारस्थानें रचिलीं, तीं तीं सर्व या पायांकरितां आणि याच पायांच्या सदयतेचा, थोरपणाचा, आणि या अबलेवर दाखिवलेल्या प्रीतीचा पूर्ण विश्वास धरून, या आजच्या अघटित कर्माला तयार झालें. त्याचें शेवटीं हें फळ काय ? ( मनांत ) आतां पुरी निराशा झाली. तर हा जीव ठेवून तरी फळ कोणतें ? ( उघड ) आजच मी घरदार, सोयरेधायरे, कीर्ति, पुण्य,–फार कशाला !–सर्वस्वाला मुकलें. आतां लाज

¹धनुष्याच्या शेवटांनांहीकोटी अशी संज्ञा आहे; व बोलण्यांतली कोटी

कशाचो ? तरी अतःपर जिकडे हे पाय तिकडे ही त्यांची दासी. जिती कुडी कांहीं त्यापासून दूर व्हावयाची नाहीं! कां महाराज, आतां कां मान खालीं घातली ? आतां मासोळीचीही गति मज अबलेपेक्षां दसपट बरवी आहे कीं नाहीं ? अगोदर, मत्साच्या तोंडाप्रमाणें माझें हें कोमल अंतःकरण, प्रेमगळानें आकर्षण करून घेऊन, मग मी विरहतापानें होरपळत असतां, निर्दय कोळ्याप्रमाणें, माझ्या दुःसह प्राणयातनांकडे दुर्लक्ष करणं बरोबर आहेना ? महाराज, कामानें विव्हळ झालेल्या स्त्रीचा परित्याग केला, तर बालहत्येचें पातक आहे ! आणि जर करितां ती स्त्री त्या योगानें मरेल तर स्त्रीहत्येचाही दोष माथीं बसतो ! !

बाळासा०:–( मनांत ) हीं आपलीं मतलबसिंधूंतलीं वाक्यें आहेत ! बोलूं द्या काय बोलते ती. ( चीड येईल असें स्मित हास्य करून भुईकडेच टक लावतात. )

झाळसा०:–महाराज, आतां मासोळीचीही गति मज अबलेपेक्षां दसपट बरवी आहे कीं नाहीं ? बोला. एक शब्द तरी बोला हिजबरोबर. इकडे पहा तरी. नाहीं पहावयाचं ? नाहीं ! नाहीं ? त्यापेक्षां हा जीव आतां ह्याच पायांशीं बळी देतें ! ( असें ह्मणून त्यांचे पुढें ताडकन् डोकें आपटते. )

बाळासा०:–हाय, हाय ! हा अनर्थ कोसळला. ( तिचें डोकें वर उचलून धरून ) हां, हां. झाळसाबाई, थांबा; धीर धरा. ( ती मूर्च्छा येऊन अंग टाकते. )

बाळासा०:–हरि, हरि, वाऱ्यानें जशी केळ उमदळून पडावी तशी या आघातानें ( नाकाशीं हात लावून ) श्वासोश्वास रहित विकळ पडली आहे. ( नाडी पाहून ) नाडी तरी पहा कशी धरसोड करते ! ( छातीवर हात ठेवून ) किति धस्स धस्स ऊर उडत आहे ! ! ( आपल्यालाच ) धिक् मूर्खा, अधमा

१ या वाक्याचा ताळा पृष्ठ ४१ वर पहा.

भालचंद्रा, जर त्वां या हरिणीचें चित्त पूर्वींच आपल्या कुचे-ष्टांनीं मोहिलें नसतें, तर आज हा तिला गळफांस कां आला असता? आणि स्वतांच्या गळ्यावर तरी कशाला ही गोण आली असती? " आदौ सुखमवाप्नोति ॥ निर्गमं प्राणसंकटं " मिरच्या खातांना गोड लागतात; मग निस्तरताना कां हायहुस? ( तिचें डोकें मांडीवर धरून ) झाळसाबाई, झाळसाबाई, हें काय बरें असें! ( तोंड कुरवाळतात ) डोळे उघडा; मला कां घाबरविता? हें काय बरें असें करावें? ( मनांत ) सावध झा-ल्याचें चिन्ह तर दिसूं लागलें. यास्तव या वेळेस येथें युक्तीच लढविली पाहिजे. ( झाळसाबाईच्या पाठीवरून हात फिर-वून ) झाळसाबाई, ए, झाळसाबाई, ए झाळसे,-( झाळसाबाई जरा वळून आपले हात बाळासाहेबांच्या दुसऱ्या मांडीवर टाकते. )

बाळासा०:-( हंसल्यासारखें करून ) ए, महा आळशे; ए माझ्या झाळसे, डोळे उघड कीं ग एकदांचे. ( थांबत थांबत ) ए- माझ्या प्रिये- झाळसे; ( झटकन् ) अग ए, माझ्या लाडक्ये प्रिये झाळसे; तुला हात जोडतों, एक शब्द तरी बोल.

झाळसा०:-( डोळे उघडून ) महाराज, दासीला काय आ-ज्ञा आहे!

बाळासा०:-उठून बसली रहा. याजशिवाय कांहीं नाहीं.

झाळसा०:-( बाळासाहेबांच्या मांडीवर जास्तीच डोकें चढ-वून ) तर मग मी या गोडशा उशिवरच डोकें ठेवून निजतें. मला उठवत नाहीं. आज्ञाभंगाची मला क्षमा असावी.

बाळासा०:-अग नौसरी जवळ आली ना वेड्ये?

झाळसा०:-बरं झालं. सासूबाईनां लौकर जाऊन भेटूं. पहां-टेस थोडी साखरझोंप तरी मिळेल आपल्या त्रिवर्गाला!

बाळासा०:-(मनांत) आतां कसें करावें? हें लफडें मुखानें सुटतां दिसत नाहीं. ही चालती बोलती विरक्त झालेली जळू

काळिजाच्या रक्ताला चिकटून बसणार! बरें झिडकारून टा-कीन, तात्काळ मरेल! न टाकिली, कीर्ति शोषील! 'कशी जडली' ह्मणून कोणी विचारलें, तर 'पाठीस लागून आली, हें ह्मणणें कोणी खरें मानणार नाहीं! बरें हिला विचारलें, तर वेळेस 'मला काढून आणलें' ह्मणून सांगणारच!! शाबासरे, दैवा! ही दिव्य अप्सरा पाठीस लागून येते आणि त्या जेल अप्सरेप्रमाणेंच ती मला दुःखाला कारण होते!! अथवा चोरांच्या रानांत आढळलेल्या भारी अवजड, बावनकशी सोन्याच्या लगडीप्रमाणें, हिचा अव्हेर करणें प्राप्त आहे! (चपापल्यासारखें करून, मनांत) मूढा मना, छित् छित् छित्–भुंग्यासारखें, इच्या मुखकमलांत काय आडकूं पाहतेंस? आतां तुझा ज्ञानसूर्य लोपला, तर त्यांत गुंतून फसशीलरे. इतक्यांतल्या इतक्यांत आपण आपल्यालाच विसरलों! तर इच्या तोंडावर पाणी सोडून इला तडजोडीनें सोडवूं या. (उघड तोंड कुरवाळींत कुरवाळीत) अग, जें माझें कल्याण तेंच तुझेंना? तर या तुझ्या करण्याच्यापायीं माझा सर्वस्वीं नाश आहे. पहा, आतां तूं बरोबर आलीस, तर मला लोकांत तोंड काढाला जागा आहे का? महाराज साहेब तर जोड्यासमोर सुद्धां उभे करणार नाहींत. न जाणों वेळेस जहागिरीही बंद करितील. हो, करतीलच यांत संदेह नाहीं. त्यांना असल्या गोष्टीची मनस्वी चिरड आहे. माहीत आहेना, आज दोनच महिन्यांच्या मागें स्वतांच्या गोतवळ्यांतलीच–बोलावयाची गोष्ट नव्हे–अगदीं जवळचीच एक नातलग, क्षणभर नवऱ्यावर रुसून वाड्यांत निघून गेली भेटीला. महाराज साहेबांना हें कळलें मात्र, तोंच त्यांनीं तिचा म्याना तसाच परभारें परत लावला. मग आपल्याला काय बरें शिक्षा होईल? याचा विचार तूंच कर. आपल्यावर फिर्यादी होतील; मुसक्या बांधून नेतील; लोक शेणमार कर-

१ जळू. २ खंडेराव महाराज.

तील; अखेरीला सजा मिळेल; यांत शंका नको. कल्पना कर, आपल्याला निरनिराळ्या ठिकाणीं जन्मभर नजरकैदेंत ठेविलें— आणि हें तर होणारच—तर यांत तुझा हेतु तो कसा सफळ होणार ? वरें थोड्याच काळानें ह्मातार्‍याच्या धनदौलतीची तूंच मालक होशील. मग तुला काय कमी ? तुझी तूं स्वतंत्र मालकीण. इतके दिवस दम खाल्लास त्याचा काय उपयोग ? सारें व्यर्थच कीं नाहीं ? तर, ऊठ, हा माझा स्वतांचा ब्राह्मणी मर्दानी दुसरा पोषाख आहे तो चढीव. तुझी सर्व चीजवस्त आण माझ्या पेटींत ठेवतों तूर्त. कारण, आपण स्टेशनावर गेलों न गेलों तोंच पहा, पोलीस या डब्याचा झाडा घ्यावयास येतात कीं नाहीं. तार तर आलीच असेल.

ह्माळसा०:—मी इकडे आल्यें हें त्यानां कसं कळणार.

बाळासाहे०:—कळेल यांत संशय नाहीं. नच कळलें तर नशीब मोठें. आतां माझ्या तरी धोरणानें चाल. (हंसून) तुझा उमदा चेहरा मर्दानी ब्राह्मणीबाण्यानें असा भव्य खुलेल कीं, जरी शिपाई झाडा घ्यायला आले, तरी त्यांची प्राज्ञा नाहीं तुला बायको सनजण्याची. माझा भर्जरी रुमाल दे डोक्यावर झोंकून. बोलण्यांत कचरून 'आं ऊं' करूं नको. अस्तु. आणीक एका तासाभर्‍यानें मुंबईची गाडी येईल. तिनें लगेच आज तर तुमची बिनबोभाट परत रवानगी करून देतों. तर मात्र ही वेळ बचावते. ती गाडी पांच वाजतां बडोद्यास पोहोंचते. वरें, पुढें कसें करणार मग ? (विचार केल्यासारखें करतात) अं—अं, सुचली तोड. (मान डोलवितात.) सुचली. (मनांत) आहे आपली लटपटीतच. (उघड) हें पहा, या तुमच्या, पेटींत ठेविलेल्या, मराठेशाई भरपोषाखानें गाडींत बसून, बडोद्यास उतरल्यावर, टांगा करून जा आपल्या बायजीकडे, ह्मणजे कांहीं एक खटराग उरली नाहीं. आणि तेथें आपला पोषाख बदलून

१ शिक्षा. २ गाडी.

घरीं जा. दुसऱ्या दिवशीं 'कोठें होतां' ह्मणून कोणीं विचारल्यास 'माझ्या बाबाची संध्याकाळीं एकाएकीं प्रकृति बिघडली ह्मणून गेलें होतें. तेव्हां त्यांचा बाखा जबर पाहून मला तेथें रहावें लागलें. घाई घाईनें गेल्यें ह्मणून घरांत सांगायचें राहिलें. त्यांनींही असेंच सांगावें, ह्मणजे झालें. हो, बरें आठवलें. हे खर्चाला घेऊन ठेवा (एक पिशवी देतात.)

ह्माळसा०:-(लाजत लाजत पिशवी घेऊन) मला-आतां असेंच परत जावें लागणार ना? (केविलवाणें तोंड करून) घरून जेव्हां निघालें तेव्हां या पायांची गांठ कशी पडते, याखेरीज मला कांहीं दिसलंच नाहीं. आपल्या ह्मणण्या प्रमाणें दोघांची पुरी दुर्दशा उडेल, 'छी थू' होईल; अफू खाऊन मरायची पाळी येईल, ह्या सर्व गोष्टी माझ्या ध्यानांत आल्या. -या दुष्ट लाखेच्या योगानें आपल्या सारखा अमोल सोन्याचा डागिना खराब होणार ना! (कपाळाला हात लावून रडते) त्यापेक्षां ती रांड पेटेना भटींत!! महाराज, आतां माझी कांहीं दशा होवो. मी तर परत जातेंच. परंतु आजपासून (पायांवर डोकी ठेवून) हे पाय नी ही त्यांची स्त्री ह्मणतां येत नाहीं-दासी-तारोत, मारोत, कांहीं करोत. (क्षणभर थांबून) त्यांच्यावर हा जीव आहे. (पाय घट्ट धरून) नाहीं पेक्षां जगत नाहीं. (स्फुंदून स्फुंदून रडते.) माझ्यानें यापलीकडे जास्त बोलवत नाहीं.

बाळासा०:-(तिच्या पाठीला हात लावून) ह्माळसाबाई, उठा. सर्व गोष्टी ईश्वरानें आपल्या आधीन ठेविल्या आहेत. माणसाचें कांहीं चालत नाहीं. आपण निखालस बाहुलीं आहों, तो नाचवील तसें नाचलें पाहिजे.

ह्माळसा०:-मी अशा ब्रह्मज्ञानानें उठाची नाहीं; नी 'ह्माळसाबाई' ह्मणून त्याहून उठायची नाहीं. मला मगाशीं हांका मारलेल्या शेवटल्या नांवानें हांक मारिली, आणि वचन दिलं, तरच उठेन!

बाळासा०:-( मनांत ) नाइलाज झाला. आतां बोलणें लांबवीत बसण्यांत हंशील नाहीं. स्टेशन जवळ आलें; ( उघड ) " अग, एमाझ्या लाडक्ये प्रिये झाळसे, ऊठ. माझ्यानें होईल तितकें करून तुला मी अंतर देणार नाहीं. अजून तरी ऊठ. "

( झाळसाबाई उठून बाळासाहेबांच्या गळ्याला मिठी मारिते. )

झाळसा०:-( हांसून व त्यांच्या हाताचें चुंबन करून ) बाई, पण अखेरीला आतेभावाचें अनी मामेबहिणीचें जोडपं जुळलं ना ? हें कांहीं व्यवहाराला नी शास्त्राला आड नाहीं येत. तरी देखील मला कांहीं ये वेळेची खुण पाहिजे चांगली. मी आपली पूर्वींच हातांत घातली आहे. ( बाळासाहेबांचा हात उचलून पहाते ) हें काय बाई.

बाळासा०:-सारा समजलों तुझा मनसोबा.(आपली हिऱ्याची आंगठी तिच्या बोटांत घालतात) झालें आतां तुझ्या मर्जीप्रमाणें?

झाळसा०:-(बाळासाहेबांचा उजवा हात घेऊन पुनःपुनः चुंबन करिते)हाच तो सोन्याचा हात ज्याणें बाई, आमचा दरोडा नाहीं फिरविला,तर माझं मन पक्कं फिरविलें. आईग, अजून त्या जखमेचा व्रण आहेच. ( हात कुरवाळते. )

बाळासाहेबः-पण ए, पहिल्यानें तूं आतां मामेबहिणीचा मामेबंधु हो अगोदर; नाहीं तर पोलिसकाका घालतील हातापायांत कडींतोडे दोघांच्या. चल नीघ कशी.

झाळसा०:-प्राणनाथ, ब्राह्मणीपोषाख करण्याला या दासीला-छेः आतां या ' दासीला ' का ? -या आपल्या लाडकीला आपणच शिकविलं पाहिजे. कारण, इला तो अभ्यास नाहीं. या करितां तो धडा हातांनीं हात धरून गिरवून दाखविला पाहिजे !

बाळासा०:-बरें, चला बुवा; सांपडलों आहे तुझ्या तडाख्यांत ! करतां काय इथे ? ( दोघें एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—राजवाड्यानजीक विठ्ठलमंदीर. वेळः—संध्याकाळ.

( बाळासाहेबाचे गवईबावा आणि इंग्रजी मास्तर देवदर्शनाला आलेले भेटतात. )

गवईः—नमस्कारहो, मास्तरसाहेब, नमस्कार.

मास्तरः—नमस्कार, नमस्कार बवासाहेब. आज इकडे स्वारी कोणीकडे ?

गवई.—( हंसत ) स्वारी नाहीं, सडाच आहे ह्मटलं. आज देवाची सर्वोत्कृष्ट पूजा बांधली आहे, असें ऐकून आलों दर्शनाला. मास्तरसाहेब, यजमान नौसरीला गेल्यापासून काय ती हीच आपली भेट. स्वारी उलटणार कधीं इकडे ?

मास्तरः—आजच आठ दिवसांनीं बाळासाहेब इथें ठेवलेले. तो बडा दरबार भरायचा आहेना, येत्याच्या पुढच्या सोमवारीं; त्याकरितां गेली आहे त्यांना महाराज साहेबांकडून थैली.

गवईः—मास्तर साहेब, कांहीं विचारतों याची क्षमा असावी. न जाणों ह्मणाल कदाचित् 'लहान तोंडीं मोठा घांस' महाराज साहेबांची बाळासाहेबांवर ह्मणतात जरा खप्पा मर्जी झाली आहे. यांतलें धोरण काय असावें बरें ?

मास्तरः—आपल्याला कोठें जलसा, कोठें बैठक, किंवा कोठें साठमारी, ह्या विचारून घ्या. अहो, इंदुप्रकाशांत आणि ज्ञानप्रकाशांत केवढी बाळ.साहेबां विषयीं टीका केली आहे !

गवई०:—तीं पडलीं भाईसाहेब, तुमचीं इंग्रजी बुकें. तीं कोठें आह्मी वाटायला शिकलों आहोंत ?

मास्तरः—शाबास, शाबास ! खूप बहार उडविलीत बवासाहेब. अरे गृहस्था, तीं मराठी वर्तमानपत्रकें आहेत. ( हांसतात ) हंः हं; पण वर्तमानपत्र ह्मणजे काय, हें तरी कोणच्या लेंकाला कळत आहे ?

---

१ निमंत्रण. २ हत्तीची आणि मनुष्याची झटापट.

गवई:-( हंसत हंसत ) पुरे हो, भाईसाहेब. ती थोडीशी खबर सांगाना.

मास्तरः-ऐका तर. ज्या दिवशीं बाळासाहेब गेले नौसरीला त्याच रात्रीं ती समोरची झाळसाबाई आहे ह्मणतात कीं नाहीं, ती ही, कोणी ह्मणतात त्यांणींच पळवून नेली; कोणी ह्मणतात तीच होऊन गेलीच स्वतां पळून !

गवई:-( कानावर हात ठेवून ) शिव, शिव ! त्या प्राण्याच्या हातून अशी नाहीं गोष्ट घडाची. आपला तर स्वर नाहीं बुवा वहात.

मास्तरः-आपण ह्मणतां तें सर्व खरें; परंतु 'जनाच्या तोंडाला हात कोण लावणार ?' असो इकडे घरांत झाला मोठा गवगवा; घरच्या माणसांनीं ठिकठिकाणीं सोधून पाहिली; सरकारवाड्यांत चौकशी केली; सईबाई थोरातीण ह्मणून कोणी आहे सरदारीण, तिच्याकडे पाहिलें; तिच्या इतर ओळखींच्या वरीं शोध केला; कोठें मिळून थांग लागेना. तळीं विहिरीही हुडकिल्या ! साऱ्या रात्रभर गोंधळ आपला.

गवई:-पुढें तजवीज ?

मास्तरः-तेव्हां त्यांच्या शेजारीं ते साडे अडीच शहाणे रहातात ते—

गवई:-रंगोपंत नवरंगे असतील ?

मास्तरः-त्यांनींच आपली अक्कल लढवून असा तर्क बांधिला कीं, ही बाळासाहेबांबरोबर गेली असावी; आणि भरींत भर झाळसाबाईच्या भावाला सईबाईकडूनही थोडीशी या बद्दल कुणकुण समजली. असा तांळा पडतांच, नवरंगे व झाळसाबाईचा भाऊ ह्यांनीं स्टेशनावर जाऊन तार केली. नौसरीस पोलिसनें तपास केला. तत्रापि शोध कळेना. नंतर, ती पळून बाळासाहेबांबरोबर गेलीच असली, तर ते तिला बहुशा पहांटेच्या गाडीनें परत लावून देतील; अथवा तिला ते भेटले न-

स० किंवा त्यांनीं धिःकारिलें असलें, तरीही तिला पहांटेस पर-त येण्याशिवाय दुसरी गति नाहीं. असा क्यास बसवून, भवानराव शिलेदार व रंगोपंत हे दोघे बसलेच होते गुप्तरीतीनें स्टेशनावर. तों ती पहांटच्या गाडींतून आली. मात्र कोणाला ओळखली नाहीं. परंतु—

गवई:–ओळखली कशी नाहीं बरें?

मास्तर:—हें मी आतां सांगणारच होतों. तिनें पुरुष वेष घेतला होता! तरीपण रंगोपंतानें तिचें तें कपट ताडलें.

गवई:—हें आपलें एक भारतच आहे. नंतर?

मास्तर:—नंतर, त्यांनीं एक बुरख्याची गाडी तयार करून ठेविली होती; त्या गाडीवाल्याला रंगोपंतानें ती इशाऱ्यानें दाखवितांच, त्यांच्या संकेताप्रमाणें, ती जें जें भाडें सांगेल तें तें पतकरून, "आपण सांगाल त्या ठिकाणीं नेतों" असें ह्मणून तिला गाडींत बसवून, त्यानें गाडीचे बुरखे सोडले आणि तकट भीमनाथाच्या[1] पलीकडच्या रानाचा मार्ग धरिला. अद्याप दोन सव्वादोन तास रात्र होती; अंधार मिट्ट पडला होता; दहिंवर ठिब् ठिब् झाडांवर कोसळताहे; गार वारा सुटला आहे; आणि गाडीच्या वाटसरांखेरीज एक चिटपाखरूंसुद्धां फिरत नाहीं. बिचारीनें गाडीचा पडदा वर सुद्धां केला नाहीं.

गवई:–कठीणच प्रसंग. पुन्हां चोरोम्यानं यायचं.

मास्तर:—गाडी जसजशी भररानांत जाऊं लागली तसतसे वाटसरांचे शब्द व कोंबड्याची आरवणी आणि गाड्यांचे आवाज, दूर दूर वाटूं लागले. आणखी रात्रीचा चिर्र–र् आवाज व नाकतोड्याचें चिंव चिंव कानाला फार झोंबूं लागलें. बऱ्याच वेळानें तिच्या ध्यानांत आलें कीं, आपण गांव सोडून लांब जात आहों. पुढें जों पडदा वर करून पहाते, तों चोहींकडे भयाण अरण्य. तें पाहून बापडीची बोबडी वळली! आपण कोणतें सोंग आण-

१ बडोदें शहरा पासून अंतरावर एक शंकराचे देवालय आहे.

लें आहे, व त्याची वतावणी कशी केली पाहिजे, हें ती क्षणांत विसरून, त्या गाडीवाल्याशीं गयांवयां करूं लागली; तिच्या जवळ कायसे पांच पन्नास रुपये होते रोख, ते देऊन आपला जिव न घेण्याविषयीं त्याच्या पायां पडूं लागली. इतक्यांत,जसा कांहीं तिला सोडवालाच आला आहे असा, भवानराव तरवार उगारून त्या गाडीवाल्याच्या अंगावर, त्याला मारण्याकरितां धांवला. गाडीवाला लगोलग गाडी घेऊन पळाला. तो जातो न जातो, तोंच भवानराव आपलें नांव सांगून तिला वश करण्या करितां तिची मिनतमाना करितो !

**गवई**:—एकूण, ' आगींतून निघून'—

**मास्तर**:—हो, ' फोंफाव्यांतच पडल्या'सारखें झालें. ती कांहीं केल्या वळेना. तो कांहीं केल्या पिच्छा सोडीना. शेवटीं, तो जेव्हां अगदीं निकरावर येऊन भिडला अंगाजवळ तेव्हां तिनें त्याला साफ झिटकारून सांगितलें कीं, " जर मेल्या, नुस्ता माझ्या अंगाला शिवशील, तर पहा ताडकन् भुईवर डोकें आपटून प्राण देईन. "

**गवई**:—अरेरे, जिचें नखसुद्धां दिसायाचें नाहीं तिची ही गति अं ! ! पुढें त्या मस्त लांडग्यानें त्या दुर्वळ हरिणीला दडपलेंच असेल ?

**मास्तर**:—नाहीं. तें असें झालें. विश्वासराव व गुणाजी बावा जामदार ह्यांनाही ती पळाल्याचा वृत्तांत समजून, न जाणों प्रसंगवशात् बाळासाहेबांवरही एखादें अरिष्ट येईल, अशा भीतीनें, या दोघांना नकळत, तेही पहांटच्या गाडीच्या वेळेवर, स्टेशनावरल्या त्या श्रीदत्ताच्या ( दोघे नमस्कार करितात ) देवळाजवळ, अंधारांत उभे ठाकले. फौजदाराला आणि नवरंग्याला एका गाडीच्या मागून कुजबुजतांना ऐकून विश्वासराव, गुणाजीबावा व त्यांचे शिपाई हेही त्यांच्या मागें मागें गुप्तरीतीनें जाऊं लागले. आणि जेव्हां झाळसाबाई निरुपाय होऊन दीन-

वाणी हंबरडे फोडूं लागलो, तेव्हां यांनीं चार चोहींकडून धांवून फौजदाराला व नवरंग्याला कैद केलें. हें सर्व लचांड दिवाणसाहेबांपर्यंत गेलें. विश्वासरावानें विनंति केली कीं, भवानराव जबरदस्तीनें तिला पळवीत होता. फौजदारानें उलट फिर्याद दिली कीं, बाळासाहेबा करितां हिला हे पळवून नेत असतां, मी त्यांस पकडण्याला गेलों. तों हे भागीजण असल्या मुळें त्यांणीं मलाच उफराटें पकडलें! 'दोन्हीही बडीं घराणीं आहेत; त्यांचा बदलौकीक न व्हावा;' म्हणून दिवाणसाहेबांनीं आंतल्या आंत दाबादाब करून सर्वांनांच धुडकावून लाविलें. अशी सर्वांची फजीती नी दैना दैना उडाली!!

**गवई**:—सारांष, बाळासाहेबांचीही या कामांत विना कारण नाचक्की झाली. अजून जरी ते बेतानें वागले तरी पुन्हा मर्जी बसण्याला हरकत नाहीं.

**मास्तर**:—बसण्याला काय झालें. परंतु बुवा साहेब, एकदां घडी ढांसळली कीं, पुनरपि ती पूर्ववत् नीट बसत नाहीं. बरें, रजा घेतों आतां. नमस्कार.

**गवई**:—नमस्कार. आठ रोजांनीं भेटी होतीलच वाड्यांत. ( दोघे जातात. )

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**:—बाळासाहेबांचा वाडा; गच्ची.

**वेळ**:—संध्याकाळ; सूर्यास्ताचा समय.

( बाळासाहेब उदासीनतेनें आपल्याशींच विचार करीत बसले आहेत. )

**बाळासाहेब**:—हर हर, धिःकार असो माझ्या जिण्याला! अरे, माझे वडील कसे? आमचा नांवलौकिक केवढा? आणि मी असा कसा कुलांगार जन्मलों? गेलेली संपत्ति मिळेल; गेलेली प्रीति पुन्हां संपादन करितां येईल; गेलेल्या विद्येचें पुनरु-

जीवन होईल; अहो, मसणांत गेलेली कायाही कळीं कार्वी परत येईल; परंतु वि[1]धे, गेलेल्या अब्रूला भंगलेल्या काचे प्रमाणं, पुन्हां साधण्याला देहांतींही मार्ग ठेविला नाहींस! संपत्ति, प्रीति, अब्रू इत्यादि कमावण्याला किती वेळ, किती सायास पडतात. आणि गमावण्याला सहज एका क्षणांत जातात. (जरा थांबून) "मानोऽपि महतां धनं" तें मानधन आमचें सर्व हारवलें अँ या पाईं! मान गेलेली पुरवली, तत्रापि मान जातां कामा नये. जितके दिवस महाराजसाहेब मला मान देत असत तितके दिवस सर्व मानकरी, दरकदार, मुत्सदीलोक माझा किती बोज राखीत असत आणि किती त्यांना माझी वचक असे. तेंच परवां दरबाराच्या दिवशीं महाराजांचें मजकडे यत्किंचित् दुर्लक्ष्य होतांच आमचें मान तात्काल कमी झालें. हँ. बरोबरच आहे भ्रमराच्या उड्या कमलावर कोठपर्यंत? कीं जेथपर्यंत सूर्याचे किरण त्याजवर प्रकाशमान होऊन त्याला विकसित ठेवितात तावत्काल. हीं आपल्या केल्या कर्माचीं फळें! केलेल्याचीं सुद्धां नव्हेत, मनांत आलेल्याचीं. (जरा थांबून) अरेरे, स्त्रीपुरुषांच्याही एकमेकांवर उड्या भ्रमरवतच होत. जोंपर्यंत तारुण्य देहामध्यें जाज्वल्य आहे, तोंपर्यंत प्रीतीचे लोट वहात असतात परस्परांवर. (इतक्यांत, सगुणा बाई पाय न वाजवितां हळूच वर येते.)

सगुणाबाईः—(मनांत) आपल्याशींच पुटपुटताहेत. त्या रांडेविषयीं कांहीं विचार असतील. आजचा बेत बरा साधला. तर निमूट ऐकूं या काय ह्मणतात तें.

बाळासाहेबः—जरठ झाल्यावर मग कोण कोणाला पुसतो? अहो, सख्खी बायकोही ढुंकून पहात नाहीं. परंतु पहा, भ्रमराप्रमाणें कैक प्रीतिजालांत अडकून मरतात कांहो! कित्येक प्रतीस्तव एकमेकांशीं झगडा करून तिला बळीही पडतात.

[1] दैव, ब्रह्मदेव.

आणि वस्तुतः, सौख्य क्षणिक. तात्पर्य, हें जाणूनही कोणाला तो ओढा सुटत नाहीं हें महदाश्चर्य होय ! ! ( जरा थांबून ) सर्पाला ' दृष्टिविष ' ह्मणण्या परीस तारुण्याला हें विशेषण अधिक शोभतें. सर्पाची गरळ एकाला बाधते. ह्याची गरळ एका समयावच्छेदें करून दोघांना बाधते. नाहीं तर ती कोठची ? मी कोठचा ? जात भिन्न भिन्न; आज एका वर्षाच्या पूर्वीपर्यंत ओळखदेळख नाहीं; त्या घटकेपावेतों फारशी तिची माझी बोलीभाषाही नाहीं ह्मटली तरी चालेल; आणि इतकें असून मजवर तिची प्रीति जडते कशी ? आणि ती माझ्या मागें लागून येते कशी नौसरीस ?

सगुणाबा०:–( मनांत ) पकडली स्वारीला मुद्यावर. पुढें होण्याला ही वेळ बरी आहे. ( चट्कन् पुढें सरसावून. ) जशी ही मी आल्यें तशी—

बाळासा०:–( मनांत ) अया ! तिचें नांव घेतलें नाहीं, हें बरें झालें. नाहीं तर आतां प्राणच खाती. ( उघड, परंतु तिजकडे न बघतां ) ब्रह्मदेवानेंच जर तिची आमची गांठ मारून ठेविली आहे तर ती येणारच कोठें असली तरी माझ्या मागून.

सगुणा०:–( त्यांच्या समोर होऊन ) पण मी भिन्नजातीची नाहीं; मी ब्राह्मणाची आहें; मराठ्या विराठ्याची नव्हे !

बाळा०:–( तिजकडे वळून, हंसत ) खचीत, बायको असावी तर अशीच असावी. ( तिच्या खांद्यावर हात टाकून ) ए, तूं चतुर खरी. परंतु अस्मादिकांना होतें माहीत तूं मागें आहेस ह्मणून. मी हें तुलाच अनुलक्षून बोलत होतों, हें तूं जाणलेंच असशील.

सगुणा०:–(एकीकडे सरून) पण ती आधीं भिन्नजातीची कोण ती मला सांगितली पाहिजे.

बाळा०:–(मनांत ) मोठी पिडा झाली ! ही तर तेच मुद्याचे

शब्द धरून बसली. येथें ह्मालसेची शकेल लढवूं या. (उघड) अग, भिन्नजातीची ह्मणजे विजातीय; आणि विजातीय ह्मणजे स्त्री आणि पुरुष; एवंच नवराबायको; आणि ह्मणून तूं आणि मी ! ( हांस्यमुख करितात. )

सगुणा०:—हं, चालूंद्या अर्थाचे अनर्थ व्हावे तितके. झाले आहेत तितके थोडेच ? ( कपाळाला आंठ्या घालते ) अशानं किं नाहीं बाई, मी आपला जीव देईन सांगून ठेवतें एकदाचं. मग तर्कशास्त्र राहील जागच्याजागीं. मी सगळं जाणतें. ( तोंड फिरविते. )

बाळा०:—( तिच्या समोर होऊन, हंसत ) अहो, जीव देईन ह्मणजे कोणाचा ? आणि कोणाला ?

सगुणा०:—कोणाचा ह्मणजे ? माझा स्वतांचा. अनी देईन जा, जवऱ्यामसण्याला. याच्यावर काय कोणाची सत्ता आहे ?

बाळा०:—( हंसत ) हें मात्र आपण बोलूं नये. कारण, कन्यादानाच्या वेळीं, आपल्या तीर्थ-रूपांनीं, त्याच्या स्वामित्वाचें पाणी (हात पुढें करून ) या ओंजळींत सोडलें आहे. तेव्हां अर्थात् त्याचा सर्व देण्याघेण्याचा अधिकारही आमच्याकडेच आहे.

सगुणा०:—घेऊन बसा आपला खुशाल! पण मी या योगानं काय करीन समजलं ?

बाळा०:—सांगितल्यावांचून कसें समजणार बुवा? बरं, सांगा तर पाहूं क य तें.

सगुणा०:—सांगूं काय.कपाळ ? वीष घेईन. (मान हालविते)

बाळा०:—( हंसतात ) हो, हो, हो; आपण थोडें चुकलां. ‘अतिविष’ जेथें ह्मणावयाचें तेथें ‘ विष ’ असें चुकीनें पडलें. आणि महिना दोन महिन्यांत ती वेळ आलीच आहे. दूरदर्शी माणसाची अशीच सर्व प्रकारची बुवा, अगाऊ तर्तुद असते हो, हो, हो. ( तिच्या हनुवटीला हात लावितात. )

---

१याचा ताळा६९पानावर पद्य.२ बाळंतपणांत याचा उपयोग असतो.

सगुणा०:-( हात झिडकारून ) माझ्या नाहीं वाई आंगाला हात लावायचा कुणी. साफ सांगतें.

बाळा०:-आह्मीं आपल्या आज्ञेनुरूपच केलें. हात कोठें लावला ? वोटें लाविलीं. फिरून तीं तरी अंगालाही नव्हत हो. हीं येथें लाविलीं ( पुन्हां हनुवटी कुरवाळतो. )

सगुणा०:-( हंसून ) जळ्ळं मेलं ! सारा दिवसभर थट्टा करायची; कांहींच्याबाहींच एखादं कोल काढायचं; नी हंसवायचं ह्मणजे झालं. बरं पण इकडून त्या रांडेचा नाद सोडायचा नाहींना ? मला तरी दूर करायचं जवळून. ह्मणजे मेली माझी तरी पीडा टळली एकदांची.

बाळा०:-( मनांत ) आतांसें हें गाणें थोडेंसें बेतावर आलें. ( उघड, व हंसून ) परंतु त्यांत आपलें तें कोणतें कमी झालें ? त्यांत आपला काय खर्च होतो ?

सगुणा०:-फिरून 'येरे माझ्या मागल्या' कांहीं जनाची मनाची भाडभीड तरी बोलाला ?

बाळा०:-कां बरें ? आपण उभयतांच येथें आहों. दुसरें कोणी नाहीं.

सगु०:-पण त्या ढालेगजीचें नांव सोडायचं नाहींना ? हें कळलें पाहिजे अगोदर.

बाळा०:-बरें हें अगोदर नाहीं कळलें तर चालेल कीं नाहीं ?

सगु०:-बरें, हे जे आमचे कीर्तिध्वज लागले आहेत, आणखी पुढंमागं केव्हां तरी यामुळं एखादा विशेष अनर्थ पाहण्याचं कर्माला लागणार, त्या पक्षीं माझ्या जिवाचीच एखादी बरी वाईट गत लागलेली चालेल कीं नाहीं ?

बाळासा०:-कशी बरं चालेल ?

सगुणा०:-तर, त्या जखणीचें तोंड कधींच पहातां कामां नये.

---

१ वाईट स्त्री.

बाळासा०:—ए, जखीण का ग, ती? तुझ्याच सारखी रंभा आहे!

( सगुणाबाई पाय आपटीत आपटीत जाऊं लागते. )

बाळासा०:—अग ए कैकये, चाललीस कोठें? जरा हळू तरी पावलें टाक; आमची ही गच्ची कोसळेल. ( तिला कवटाळून धरितात. )

सगुणा०:—( सुटण्याचा प्रयत्न करीत ) सोडा, सोडा मला. मेलं कोठें तरी जाऊन माझं काळं तोंड करूंद्या. ह्मणजे मी सुटलें नी आपणही सुटलां कसे!

( सगुणाबाई तोंड हिरमुसलें करून अश्रु ढाळूं लागते. )

बाळासा०:—तें सारें खरें. पण प्रिये, जाणार कोठें? ( तोंड कुरवाळतात. )

सगुणा०:—चुलींत नाहीं तर वैलांत. आतां आपणाला काय त्याचं?

बाळासा०:—( मनांत ) काम अगदीं निकरावर येऊन ठेपलें. अहाहा, " कोपोपाहितबाष्पबिंदुतरलं रम्यं प्रियाया मुखं " असें जें ह्मणतात तें खरं. (उघड)अग जरा थांब तरी; तुला खरं सांगूं का?

सगुणा०:—( तोंड एकीकडे करून ) नाहीं. खोटें सांगा.

बाळासा०:—ए, हा तुझा जरा विनोद केला. राग येऊं देऊं नको.

सगुणा०:—असला कसला मेला विनोद? प्राण जाईतों.

बाळासा०:—मी असें विचारतों, तुला एखादी गोष्ट सांगितली तर खरी वाटेल का?

सगुणा०—आजच कांहीं बाई साऱ्यांनींच पापांत हात धुतलेले नाहींत.

बाळासा०:—हें पहा, मागें जेव्हां पहिल्या प्रथमच माझ्या नांवाचा थोडाबहुत डंका पिटला, तेव्हांच तो सर्व नाद म्यां सोडून दिला. पण—

सगुणा०:—हं, आतां येऊंद्या सारं पुढं.

बाळासा०:—पण नोसरीहून आल्यावर एके दिवशीं त्या बिचारीच्या—

सगुणा०:—अहाहा, केवढी कींव तिची? ( हात ओंवाळते. )

बाळासा०:—अहो, पण पुरें तरी ऐकून घ्याल कीं नाहीं? त्या बिचारीच्या—

सगुणा०:—पुन्हा, त्या बिचारीच्या?

बाळासा०:—चुकलों महाराज. त्या डांखिर्नीच्या फुटक्या दैवाविषयीं मनांत खेद-नाहीं, चुकलों पुन्हां. खेद नव्हे, तर खंत वाटून आपल्या या लोकांच्या अशा अधमपणाच्या लग्नांच्या चालींचा विचार करीत असतां तिकडे एकाएकीं ती—

सगुणा०:—हं, अडूं नका.

बाळासा०:—ती त्या नित्याच्या जागेवर संध्याकाळीं आली. आणि काय सांगूं प्रिये, आमची परस्परांची दृष्टादृष्ट होतांच ढळढळां रडूं लागली. आर्वींच तिला अलिकडे अतिशय जांच होत आहेत; गावांत तर तिला तोंड सुद्धां काढण्याला जागा नाहीं कोठें; आणि तशांत विरह! मग काय पुसावें? माझ्या देखील डोळयांना खळ्कन पाणी आलें. तिचा बाप कसई; भाऊ रात्रंदिवस तिच्या बाइटावरच बसला आहे. नवरा पांसष्ट वर्षांचा थेर्डा! डोकी लुटलुट करते आणखी दुसरा, नेहमीं तिला भाजून पोळून काढतो. धड चाकर माणसें तरी तिचें कोठें ऐकतात? त्यांनींही बिचारीची पायमल्लीच चालविली आहे. तिचे हाल कुत्रा देखील खाणार नाहीं. आतां प्रिये, तूंच खरें सांग तिनें काय करावें?

सगुणा०:—( मनांत ) हे सांगतात हें कांहीं खोटं नव्हे. ( उघड ) मी काय सांगूं? हें तिचं कर्म.

बाळासा०:—अग, मी नुस्ता तिच्याकडे पाहतों तों तूं जीव

---

१ 'रा' चा उच्चार लांब.

द्यावयास तयार झालीस. खरें सांग तुला ह्यांतून कोणत्याही गोष्टीची तरी वाण आहे का ?

सगुणा०:—मग काय ? हें माझं नशीब. ( हास्यमुख करिते )

बाळासा०:—( हंसून )हांसली ! असो. असें तिला रडतांना पाहून माझा तर बुवा कंठ दाटून आला. आणि हे सारे माझ्या करितां तिचे हाल. ( डोळ्यांत आसवें येतात. )

सगुणा०:—( मनांत ) अहाहा, किती तरी बाई दयाशीळ स्वभाव हा ! या मुखचंद्रावरून हा आपला देह कुवंडी[1] करून टाकावा. आतां यांच्या अगदीं गळ्याला कडकडून घट्ट मिठीच घालावीशी वाटते; भाग्य माझं. ( उघड ) पण बाई, आमचं रडणं अगदीं फुकटचना ? तिकडे कोण लक्ष देतो ? ( बाळासाहेबांच्या डोळ्यांचीं आसवें आपल्या पदरांनीं पुसते. ) पण इतकं कांहीं बाई, बायकांच्यागत रडायला नको त्या सठवीकरितां.

( इतक्यांत झाळसाबाई आपल्या गच्चीवर येते. )

सगुणा०:—( तिला पाहून ) तरींच. ह्मटलं यवढं भरतं कशाचं आलं ?

बाळासाहेबः—( तिला पाहून व किंचित हंसून ) आलीग, आली. पाहिलेंस कसें सपडें आहें तें !

सगुणा०:—( मनांत ) खरंच, काय असेल तें असो. मीं दिखींत इला पाहिली कीं नाहीं, ह्मणजे मला दिखीत अशी भुरळ पडते कीं, इजकडे अगदीं टक लावून बघावं. कितिग बाई, नाजुक ही बायको ! तें कपाळ काय ? नी ओंठ काय. अनी बांधा तरी कसा अगदीं निटस आहे. घरीं इतका जो ध्यास लागला आहे तो बरोबर. इला पाहून बायका सुद्धां अशा वेडावतात. मग पुरुषांची कथा काय ? अग, पण मीच काय वेडावलें ? ह्यांनीं हें पाहिलं तर बरं नव्हे. ( उघड ) मेली सोन्याची सुरी झाली ह्मणून का उरांत खुपसाची आहे ?

---

1 ओंवाळून.

बाळासा०:–तूं कांहीं तरी भलत्याचा सलताच अर्थ घेतेस माझ्या बोलण्याचा. ऐक ती काय बोलत्याहे तें.

सगुणा०:–तिचं काय ऐकायचं ? लोकांना मेलं जसं अगदीं बोलतांच येत नाहीं ? ‘ नावडतीचं मीठ आळणी. ’ ( त्यांजकडे कात्या दृष्टीनें बघते. )

ह्माळसाबाईः–( त्या दोघांकडे ओझरती नजर करून ) अग बाई, आजच का बीज आहे ? चांद अगदीं खालीं जायच्या बेतालाच आहे. बाई, दक्षिणची कोर किती तरी वर चढलेली दिसते ! हें आपलं महर्गतेचं लक्षणच समजायचं !! ( जरा थांबून ) जवळच ती चांदणी तरी पहा कशी चम् चम् चमकत्याहे. आज दर्शन झालं हा आपला अलभ्य लाभच होय. हें माझ्या ध्यानीं मनीं पण नव्हतं. किती तरी बाई, युगं मध्यं तरीं लोटलीं ? ( असें ह्मणून सूत काढण्याच्या मिषानें उजव्या स्तनावरून किंचित् पदर दूर करते. )

सगुणा०:–( हळूच ) कायग मेली बजागडी आहे !

बाळा०:–( हळूच ) प्रिये, सर्व यथास्थित असूनही जर पुष्कळ बायकांचीं थेरें आपण ऐकतों, तर त्या मानानें ही फार फार चांगली.

सगुणा०:–हो,आपण उचलालच तिची बाजू. (माना वेळते.)

बाळा०:–असें का ? तर तुझीच कां होईना. ( असें ह्मणून तिचा उजवा हात आपल्या गळ्यावर ठेवतात. )

बाळा०:–( डाव्या हाताकडे पाहून ) अहाहा ! डाव्या हाता तूं शांत झालास.पण तुझ्या उजव्या बंधूची काय दशा ?

सगुणा०:–त्याला जरा लांब करून टाका त्या कवटाळीवर ह्मणजे होईल थंडगार !

ह्माळ०:–( हात जोडून ) जय देवा चंद्रा, तुझ्या रोहिणी

१ चंद्राला अठ्ठावीस (नक्षत्रं) स्त्रिया आहेत. त्यांत रोहिणीवर फार प्रीति.

सह, तुला ही मोहिती नमस्कार करते.( नमस्कार करून )देवा, हें मज दीनाचं जुनं सूत घे तुला नी नवं दे मला. ( सूत त्यां-च्याकडे तोंड करून टाकते. )

बाळासा०:—ए, पाहिलीस कशी चाणाक्ष आहे.

सगुणा:०— ( मनांत ) आहे खरी. ( उघड, माना वेळीत ) आहे ठाऊक. चाणाक्ष चाणाक्ष ती काय ? बायकांचं शहाणपण मेलं चुलीपुढें.

बाळासा०:—तूं नाहींच कबूल करायचीस.

ह्माळसा०:—( पाठमोरी वळून ) दादा, येतें हो खालीं. आज बीज ह्मणून वर आलें होतें चंद्रदर्शनाला. (इकडे वळून ) देवा, या चकोरीचें आयुष्य केवळ तुझ्याच दर्शनावर अवलंबून आहे. करितां असाच केव्हां केव्हां तुझा उदय होवो. ( बाळासाहे-बांकडे किंचित पाहून हात जोडते; व, नमस्कार करून पहात पहात, आणि अश्रु ढाळीत परत खालीं जाते. )

सगुणा०:-दैव बिचारीचें! (तिच्याही डोळ्यांना पाणी येतें.) कोमेजलेल्या कळी प्रमाणें सुखली आहे. स्त्रियांचं जिणं व्यर्थ. यावज्जीव पराधीन रहावयाचं ! बायकांचं सर्व सौख्य नवरा चांगला मिळाला तर आहे.

बाळासा०:—(तिचें चुंबन करून) प्रिये, तुलाही दया आ-लीना तिची ( मनांत ) खरी स्थिति उघड करण्याला ही वेळ बरी आहे. ( उघड ) प्रिय, यांतलें खरें इंगित काय, तें अजून सांगायचंच आहे.

सगुणा०:—( चटकन् समोर होऊन ) काय ? तर मग इत-का वेळ झालं तें सारं खोटंच. मेली पुरुषांची जातच कपटी, खोटी, खोल ! खरं काय, तें पडूं द्या अजून तरी मेलं बाहेर. या दुनियेंतल्या खऱ्याचंच बाई, आतांशीं वाटोळं झालं आहे.

बाळासा०:—ए, हें बघ तुजजवळ बोलण्याला मला धैर्यच होईना एकाएकीं.

सगुणा०:–होय तर, माझ्या धाकानं अगदीं सुखायचं झालं! जळ्लीं मेलीं इतकीं कारस्थानं चाललीं आहेत तीं मला विचारूनच आहेत.

बाळासा०:–प्रिये, ज्या दिवशीं आपण नौसरीस गेलों कीं नाहीं त्या दिवशीं तिनें मला आगगाडींत गांठून, माझे घट्ट पाय धरून—

सगुणा०:–तें कळलं आहे सारं. पण मग, चळ भरल्या सारखं घटके घटके येथें येऊन तिला पाहण्याशीं अनी या वरच्या गोष्टीशीं काय संबंध आहे?

बाळासा०:–त्या वेळीं 'मी तुला अंतर देणार नाहीं' असें मजपासून तिनें घेतलें आहे वचन; तें पाळावें कसें, असें मला झालं आहे. येथें येण्यांत माझा इतकाच उद्देश आहे कीं, येणें करून वचन तर मोडत नाहीं; तिकडे तर जाणें नाहीं. असें सुखासुखी पहातां पहातां ती आपणच होऊन कंटाळेल नी इकडचा अजीबात नाद सोडून देईल. नाद सुटल्यावर मग ती कांहीं करो, तिकडे मिळून पाहणें नाहीं. प्रथमारंभींच तिच्या चेष्टांकडे मीं लक्ष्य दिलें हीच मोठी घोड्यायेवढी चूक केली! तर ती आतां युक्तीनेंच निस्तरली पाहिजे. आतां माझें तुजजवळ इतकेंच मागणें आहे कीं, मी येथें केव्हां केव्हां यावें कीं नाहीं? ( हंसून ) येवढें फुकाफुकीचें सौख्य तरी तिला मिळूं देतेस का नाहीं?

सगुणा०:–( बाळासाहेबांना मिठी मारून ) मी कांहीं इतकी निर्दय नाहीं. त्यांच्या घरीं गेल्यास वेळेस आपल्या जिवाला जडजोखीम आहे ह्मणून हा माझा इतका अट्टहास. बोलतां असंच जर खरं असलं तर येथें येण्याला मजकडून आतां मोकळीक आहे. पण घरून तिकडे जाणं होणार नाहींना मग? शपथ अगदीं माझ्या गळ्याची?

बाळासा०:–शपथ. वेड आहे तुला. मी असा नाहीं फसाचा हो.

सगुणा०:—ह्मणूनच मागें फसत होतां. बरं, पण तीच होऊन इकडे आली तर मग ? ( हास्यमुख करिते. )

बाळासा०:—( हंसून ) मग तुझ्या आज्ञे प्रमाणें करायाचं.

सगुणा०:—( हंसून ) जळ्ळी मेली माझी आज्ञा. तिला पुसतो कोण ? केव्हांच कोणीकडे कांहींच्या वाहींच करायचं, तें मेलं कळणार तरी कसं मला ? लहानपणच्या खोड्या मला ठाऊक नसतील तेव्हांना ? ( काणी नजर करून किंचित् हास्य मुखानें बघते. )

बाळासा०:—ए, तुला आहे घडी घडी टोमणे उगीच मारायची संवय. पण प्रथमतः आपण खालीं जाऊं चल अगोदर; आणि मग बोलूं ह्मणशील तेवढं. न जाणों, इतक्यांत तिचा तो कर्मनष्ट भाऊ वर आला, आणि ती आली तेव्हां मी येथें होता, असें जर त्यानें पाहिलें तर तिला गरीवाला दुप्पट गांजितील !

सगुणा०:—खरंच का ? नको ग वाई. तर मग चला गडे, आपण आपलीं खालींच जाऊं कशीं. मला दिखित तिच्या स्थितीची दया येते. दिव्यांची वेळ झालीच हळु हळू. आतां येईल जया आपली दृष्ट[1] काढाला वरच कदाचित्. तर जाऊं या.

( दोघं जातात. )

## प्रवेश ४ था.

( बाळासाहेब अभ्यासाच्या खोलींत वसले आहेत, इतक्यांत इंग्रजी मास्तर येतात. )

मास्तरः—गुडनाइट[2], बाळासाहेब.

बाळासा०:—गुडनाइट, सैर[3].

मास्तरः—आज कांहीं अभ्यास बिभ्यास झाला का ?

बाळासाहेबः—नाहीं, आज सकाळीं ते तैलंगणांतले प्रसिद्ध ज्योतिषि बुवा आले होते भेटीला; ह्मणून बनलें नाहीं.

---

१ बडे बडे सरदार लोकांत, मोठाल्या स्त्रियांची अगर पुरुषांचीही दररोज संध्याकाळीं दृष्ट काढतात. २ ( इंग्रजी ) नमस्कार. ३ महाराज, रावसाहेब.

मास्तरः–बरें मग दोनप्रहरीं ? ( बाळासाहेब नाहीं ह्मणून मानेनें सांगतात ) बरें संध्याकाळीं तरी ?

( इतक्यांत गुणाजी बावा आंत येतात. )

गुणाजीः–यजमान, खालीं गवई बवा बसले आहेत.

मास्तरः–घेऊन या त्यांना वर. आमचें हं हं ह्मणतां आटपूं.

( गुणाजी बावा जातात )

मास्तरः–बरें, तिसरे प्रहरीं तरी केलें का नाहीं ?

बाळासा०ः–( जरा ओढत ओढत ) दोन–प्रहरीं–जरा–कंटाळा आला.

मास्तरः–असंच ह्मणाना परतें ' कांहीं केलं नाहीं ' ह्मणून. हें काय बरें बाळासाहेब ? अलीकडे आपलें अभ्यासावर फार दुर्लक्ष झालें आहे. आतांशीं आपल्या लक्षाची कोटी कोठें झुकली आहे न कळे.

बाळासा०ः–थोडें बहुत काम असतें मास्तरसाहेब, आतांशीं मला.

मास्तरः–( हंसून ) हं हंः कामानें कोणाला सोडिलें आहे या जगतांत ? सन्याशाला सुद्धां काम आहे. परंतु सर्वांनीं तानमान पाहून वर्तलें पाहिजे. अनी तें काम आपल्या शिवाय दुसऱ्या कोणाला उरकत नसेल नाहीं वरं ?

( गवईबोवा आणि गुणाजी बावा येतात. )

मास्तरः–या, वस्तादजी मी ह्मणतों हें खरें कीं खोटें हो ?

गवईः–आपण काय ह्मटलंत तें मीं ऐकिलें नाहीं.

मास्तरः–मीं ह्मटलें, या जगांत काम सर्वांना आहेच. परंतु मनुष्यानें देशकालवर्तमान जाणून वागलें पाहिजे.

गवईः–याला गैर कोण ह्मणूं शकेल ? तसं न वागलें तर महा अनर्थ उद्भवतील.

मास्तरः–आतांशीं कोठल्या कामांत गुंतलेले असतात कोण

जाणे ? धड्यांची मिळून कांहीं कुरकुर आहेच आपली. गुणाजी-बावा, खरें सांगा आहे कीं नाहीं ?

गुणाजीः—मला कशाला गरीबाला गळ घालितां खरं बोलण्याची ?

बाळासा०ः—( मनांत ) आमचीं माणसें आहेत सारीं पक्कीं; यांचा हा सगळा झोंक मला छेडण्याचा दिसतो. निमूट बसावें कसें आपलं.

मास्तरः—बरें, बाळासाहेब, तो काल दिलेला निबंध तरी ?

बाळासाहेबः—मला फावलें नाहीं. ( गप्प बसतात. )

मास्तरः—मला फावलं नाहीं नी बनलं नाहीं. बाळासाहेब, महाराजसाहेब ह्मणत असतात कीं, "माझ्या बाळासाहेबासारखा एकसुद्धां माझ्या अमीर उमरावांत दागा नाहीं." त्याला का आतां हरताळ लावायाचा आहे भलभलत्या नादाला लागून ? रेसिडेंट साहेबसुद्धां स्वतां आपल्या सभ्यपणा करितां आणि हुशारी करितां वारंवार तारीफ करीत असतात. ह्या सर्वांवर अशानें पाणी पडेल. जवळचे लोक, छिचोर कंचे—श्रीमंतांना वेड्या वेड्या छंदाला लावितात, आणि श्रीमंत लागतात !

गुणाजीः—एरव्हीं त्यांचीं पोटं कशीं जळतील ? "यजमान खुळे, कीं कारभाऱ्यांनीं भरलीं आपलीं विळें" ! !

मास्तरः—खरें आहे जामदार. असो, बवासाहेब आज दोन चिजाच ऐकूं. सहज योग आला आहे.

गवईः—बरं आहे. ( तंबोरा काढतात व तंबोरा वाजवून ) वा, विणा लागलेलाच आहे. ( तबल्यावर थाप मारून ) वा, ठीक आहे. बाळासाहेब आपण घ्या तंबोरा; मी घेतों तबला.

बाळासा०ः—( तंबोरा वाजवून सूर धरतात. ) ( खरज ) आ-आ. ( पंचम ) आ-आ. ( टिपेचा ) आ-आ. 'सा सा;' 'री-री,' 'गा-गा;' 'मा-मा'—

ग्रंथ संग्रहालय

गवईः—जरा उंच, बाळासाहेब. 'मा मा.'

बाळासा॰:—'मा-मा;' 'पा-पा;' 'धा-धा;' 'नी-नी;' 'सा-सा.'

गवईः—बाळासाहेब, तें भैरवांतलें समर्थांचें[1] पद ह्मणा पाहूं.

बाळा॰:—( सूर धरून ) 'आ-आ' ( ह्मणूं लागतात व गवई ववाही त्यांच्या बरोबर ह्मणतात )

॥ मना कांहीं तुला लाज कशी नाहीं रे ॥ मना॰ ॥ ध्रु॰ ॥
॥ परधन परकामिनीसि ॥ विषय सौख्य वासनेसि ॥
॥ जपसि टपसि मांजरसा ॥ परि शेवटीं पडसि फशींरे ॥
॥ मना कांहिं तुला लाज कशी नाहीं रे ॥ १ ॥

मास्तरः—खाशी, खाशी; आर्धी पद समर्थांचें, आणि त्यांतून आपल्या दोघांच्या सारख्या रसाळ वाणींतून. मग काय पुसायचें? साक्षात् राग उभा केला रूडा. अहाहा, क्या बात है. सुभान अल्ला. ( माना डोलवितात ) पुन्हा वेळेला किती जुळन आहे ! इंग्रजींत एक वाक्य अशाच अर्थाचें आहे. "दुर्गुणांची कदाचित् भरभराट होईल; परंतु अखेर त्याचा परिणाम दुर्दशा."

गुणा॰:—( बाळा साहेबांना ऐकूं जाईल असें पण हळूच. ) "मना, कांहिं तुला लाज" ह्मटलं त्या परीस "मुला, कांहीं तुला लाज कशी नाहींरे" असं ज्यास्ती खुमासदार दिसलं असतं, असं मला वाटतं. कां मास्तर साहेब, ( मास्तर गालांत हंसतात. )

बाळा॰:—(मनांत) हें धडधडीत मलाच टोंचून बोलणें आहे. ( उघड ) बवा साहेब, आज माझें कपाळ फार ठणकत आहे. करितां मला आतां रजा मागण्याची माफी असावी. ( कपाळ हातानें चेंपतात. )

मास्तरः—बरें आहे; बवासाहेब त्यांना सोडा आतां. बाळासाहेब, आमच्या बोलण्याचा राग नकाहो धरूं. तुह्मां श्रीमंत

1 रामदास स्वामींचें.

लोकांना हांजी हांजी करून भोंदणारे शेंकडोशें भेटतील. तथापि खरा सदुपदेश करणारे फारच दुर्मिळ असें खूप समजा. तरी "आतां आह्मो येतों लोभ असों द्यावा"–( नमस्कार करून उठूं लागतात. )

मास्तर आणि गवई:–बाळासाहेब, येतों, नमस्कार. गुणाजी-बावा, जामदार येतों, रामराम, रामराम.

बाळासाहेब आणि गुणा०:–यावें, यावें, बरें, नमस्कार; रामराम. ( इंग्रजीमास्तर व गवईबोवा जातात आणि त्यांचे मागें गुणाजी बावा जातात. )

बाळासा०:–( मनांत ) ही मंडळी मजविषयीं कांहीं आतां बोलली तर ऐकूंया काय चर्चा कारितात ती. असें करणें गैरशिस्त खरें; परंतु करतां काय? त्यांच्या मनांत मजविषयींचे भलते भलते तरंग येणें उघड आहे. व आपल्यालाही त्यांची गस्त समजूत करणें भाग आहे. मी त्यांचा उद्देश जाणतों. ते मात्र माझा समजत नाहींत ( असें बोलत बोलत, हळूच त्यांचे मागें मागें जातात. )

गुणा०:–मास्तरसाहेब, आज आपण खूपच शर्त उडविलीत.

मास्तर:–हो असें न केलें तर काम आराठतें कसें? आपण काय कमी केलीत आज सकाळीं तें ज्योतिषाचं बाव्हलं पुढं आणून, येतों जमादार. रामराम. ( इंग्रजीमास्तर आणि गवईबावा जातात; आणि गुणाजी मागें परततो; परंतु बाळासाहेबांना पाठीमागें पाहून चपापतो. )

बाळासा०:–जामदार, इतके दिवस मला शंका होती; परंतु अतःपर पक्की खात्री झाली कीं, सगळ्या तुमच्या मंडळीचा एक कट झाला अहे कीं, नाहाक मला छळावयाचें! आज सकाळीं जो ज्योतिषी आणलात त्याला शुद्ध तुमची नी विश्वासरावाची चिथवणी. काय ह्मणे "परस्त्रीसंपर्क झाला! आणि परस्त्रीसंपर्कांत बुद्धिभ्रंश झाला" हा मर्मभेद मला का कळत नाहीं?

गुणाजीः—बाळासाहेब आम्हांलाही अशीच शंका होती कीं, आपण अजाणपणानें मागें मानेला गळ लावून घेत होतां; परंतु अतःपर पक्की खात्री झाली कीं, आपण समजून उमजून कांत्यावर पाय टाकीत आहां! आपलं गोत कोण? आपलं नांव काय? आपले वडील कोण? आजकालची आपली स्थिति काय? यांचा थोडा विचार ठेवा मनामध्यें.

बाळासा०:—आजकाळीं मी जें करीत आहें तें विचारानेंच आहे.

गुणाजीः—(मनांत) आतां बेतली खरी. तर कानउघाडणी करालाच व्हावी (उघड) आजपर्यंत आपण जें जें केलें तें सर्व अविचारानेंच आहे.

बाळासा०:—माझा अर्थ आपण समजलां नाहीं.

गुणाजीः—आपला अर्थ पाहतां पाहतां अनर्थ पाहिले!

बाळासा०:-(मनांत) यांचें हें करणें जरी स्तुत्य आहे, तरी ह्यांना एकदां खडखडीत जबाब दिल्या खेरीज यांचें तोंड बंद व्हावयाचें नाहीं. उत्तरोत्तर आपल्या उत्तम वर्तनानें त्यांची चूक त्यांना समजेलच. (उघड) जामदार इतके दिवस मी आपल्याला पितृव्यस्थानीं[1] मानून सन्मान देत आलों. परंतु जर एखादा राघोबा[2] भरारी सारखा भरारी मारणारा काका असला, तर त्याचा पुतण्यानें अवमान केल्यास फारसें आश्चर्य नाहीं. आपण सर्वांनीं जो इतका द्राविडी प्राणायाम आरंभिला आहे मला ताळ्यावर आणण्याचा, त्याची इतकी चर्चा आणि खटपट व्हावी होती कशाला? मला कायतें तोंडावर कळवायाचें होतें साफ. निदान आजचें हें भाषण तरी आपल्याला नीटसें शोभलें नाहीं. माझा शुद्ध चौघां देखत पाणउतारा व्हावा, असें आपले मनांत घोळत होतें; आणि अद्याप असेल पण. तथापि असलें हें कर्म इमानी माणसाचें कर्तव्य नव्हे!

१ चुलत्याप्रमाणें. २ रघुनाथराव दादा पेशवे.

गुणाजीः—माझी कामगिरी मी बरोबर रीतीनें बजावीत आहें कीं नाहीं, याजविषयीं ईश्वराला डोळे आहेत. (जरा थांबून) अलीकडे मला असं भासूं लागलं आहे कीं, दिवसें दिवस आपल्याला माझा फार वीट येत चालला आहे. त्या अर्थी आतां म्यां घरीं बसावं तें बरं. इथें राहण्यांत कांहीं उपयोग दिसत नाहीं. असले हे आपले वेडेवेडे विचार आह्मांला खपावयाचे नाहींत; मी बोलल्या वांचून रहायचा नाहीं; आपल्याला राग आल्याविना राहणार नाहीं. याजपेक्षां मीच दूर गेलेला बरा. बाळा साहेब, हा माझा मुजरा घ्यावा. (मुजरा करितात व जरा त्याच्या डोळ्यांना आसवें येतात.) बाळा साहेब, हा बहुधा आतां सरते शेवटचाच आहे! (पुन्हां मुजरा करून जातात.)

बाळासाहे०:—हं, हं; जामदार, हें काय? (सखेदाश्चर्यमुद्रेनें) एकदम ही गोष्ट निघून जाण्याच्या पंथाला यावी काय? (इकडे तिकडे पाहून) अरेरे, खरेंच निघून गेले! लोक मला या संबंधानें काय नावें ठेवितील! मी दोन शब्द खोंचून बोललों काय, आणि ते निघून गेले काय? आज एकवीस वर्षांत घडीभर मला ते विसंबले नाहींत; आणि मी त्यांच्या मुला सारखाच—कितीकदां त्यांना टाकून बोललों असेन; परंतु असें नाहीं कधीं घडलें. मग याचवेळेसच असें कां? (जरा थांबतात) उघड आहे; लहानपणीं अंगावर खेळत असतांना मुलें आईबापांना लाथा मारितात; ह्मणून त्या मोठेपणीं मारलेल्या सोसतील काय? तद्दतच हें. वास्तविक माझ्या कृतघ्नपणाबद्दल मला हें योग्य बक्षीस मिळालें. स्वामिभक्तिपरायण अशा चाकराला व्यर्थ दूषणें दिलीं तर त्याचें प्रायश्चित्त भोगावयास नको का? (जरा थांबून) परंतु हें सर्व कशानें झालें? त्या एका चुकीनें! मागून चुकीची दुरुस्ती करितां करितां "'ड' चा, डोंगळा" झाला. त्या बापडीनेंही निराशेच्या योगानें अलीकडे इकडे पाहण्याचें सुद्धां वर्ज केलें. आणि तिला इकडे तिकडे फिरूं देतो तरी कोण?

सदोदित डागिन्यांच्या पेटीसारखी, खोलीमध्यें टाळें मारून ठेविली आहे, असें ऐकितों ! तरी आतां विश्वासराव आले ह्मणजे त्यांना मुळारंभापासून हें सविस्तर वर्तमान कळवून आपलें या ठिकाणाहून मुळींच बिऱ्हाड उचलून इतर कोठें तरी रहावयास जाऊंया कसे प्रथम ह्मणजे सर्व पीडा टळली. मग पण पुढें असें उत्तमरीतीनें रहावयाचें कीं,—परंतु पुढचे बेत आतांच कशाला? पहिल्यानें जामदारांचा शोध करूं चला कोठें गेले याचा. अरेरे! कोठें बोललों यांना असें झालें आतां—प्रभो शंकरा, त्रास झाला एकंदर जिवाला—

"जांचिलों, जांचिलों, बहुजांचिलों ॥ दीनदयाळा, मज सांभाळीं ॥ दीनदयाळा, मज सांभाळीं ॥ जांचिलों० ॥" (असें गुणगुणत, केंविलवाणें तोंड करून, सुस्कारे टाकीत निघून जातात.)

अंक ३ रा समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

स्थळः—सईबाई थोरातिणीचा वाडा. वेळः—तिसरा प्रहर.

( सईबाई आरसा पुढें घेऊन छपरपलंगावर बसली आहे. )

सईबाई:—अहाहा, परमेश्वरा, मला तूं विपुळ संपत्ति दिलीस; शहाणपण दिलेंस; सुंदर मुखकमळ दिलेंस; ( आपल्या अंगाकडे पाहून ) शरीराचे सर्व अवयव अव्यंग आणि उमदे दिलेस; मेलें मार्कंडेयाचं आयुष्यही घातलें आहेस. असें असून अशा एका गोष्टीचें न्यून दिलं आहेसरे, कीं, त्या योगानें हीं सर्व सौख्यें उलटीं दुःखाला मात्र कारण झालीं आहेत ! सुरेख मुख असल्यावांचून कितीही इतर अवयव गोंडस असले तरी जशी शोभा नाहीं, तसेंच कुंकुवाशिवाय कितीही मुख सुरेख असलें तरी व्यर्थ ! मग कुंकुमाचे ऐवजीं कस्तूरीचा टिळाही कां रेखाना; सर्व फुकट ! ! ( जरा थांबून पुन्हा— ) जळ्ळं मेलं तें झाळशीच्या सारखं मळमळीत कुंकू तरी कशाला व्हावं ! बागेचा धनी दळया असला ह्मणजे मग ती चोरापोरांचीच धन! साधेल त्यानें बहार मारावी ! ! ( आपल्याशींच लाजते ) त्या पेक्षां माझं स्वातंत्र्य काय वाईट ? ( जरा थांबून ) बाळासाहेबां सारखं निधान तिजवर फिदा होतें; माझ्या सारखी आटोकाट बेताची, तिला साह्य करणारी मिळते; आणि हिला त्याचा यत्किंचित् पण सुद्धां फायदा नाहीं ! काय बाई, दैवगति विलक्षण चमत्कारीक आहे. ज्याला जो गोष्ट पाहिजे ती प्राणगेल्या मिळाची नाहीं. ज्यांना मेलीं पोरें पाहिजेत त्यांना नवस सायास करून. पिंपळाचे पार झिजवून, हिंडिसवाणीं कोयाडीं करकरूनही, तीं होत नाहींत; आणि ज्यांना नकोत त्यांना खंड्यावरी लेंडाळ. ज्याला मृत्यु पाहिजे, त्या पासून तो दूर दूर पळतो; नाहीं तर ह्मातार्‍या आईबापांच्या एकुलत्या एक तरण्या ताठ्या,

गुणवान्, अशा पितृभक्त मुलावर, ज्याची बायकोही आपल्या आईबापांची एकटीच लाडकी मुलगी आहे,अनी ऐन तारुण्याच्या भरांत आली आहे, त्याजवर धाड घालतो ! ! सारांश, कर्म मिळून कोणालाही सुखी राहूं देत नाहीं. मनांत होतं कीं, तिचं संधान जुळलं तर आपलेंही मागून पाहतां येईल. पण सगळीं-च पडलीं फुटक्या नशीबाचीं. हें तरी आपलं भाग्यच समजा-यचं कीं, आपल्या इनामाच्या हद्दींच्या तंट्यांत दिवाणसाहेबां-नीं त्यांनाच सरपंच निवडलं. ह्मणून अलीकडे एकदां दोनदां त्यांजवळ पडद्या आड बोलण्याचा तरी योग आला. काय ग बाई, त्यांच्या जवळ बोलाला लागलं ह्मणजे असं चित्त मोहून वेधतं कीं, त्यांच्या जवळ रात्रंदिवस बोलतच रहावं, असं वा-टतं. बरं, आतां पुढला उपाय काय करायचा ? तें मदनमूर्ति गोजिरं ध्यान माझ्या हृदयमंदिरांत जें एकदांचें धरणं धरून बसलं आहे, तें ध्यानीं मनीं स्वप्नांसुद्धां हालत नाहीं. त्या पुरु-षाशीं योग घडला तरच जन्मास आल्याचं सार्थक्य ! ( चपा-पून ) बाई, पण हें मी काय बडबडतें ? कोणी ऐकलं तर मला बाई, बेअब्रूत काढितील ! बाई, कांहीं कांहीं गोष्टींत मनुष्य, जें कर्म करण्याला लाजत नाहीं तेंच कर्म तोंडानें बोलण्याला लाजतें. तथापि मन एकदां एखाद्या रंगांत गुंगलं कीं मग कसचं त्याला भान. ( तोंडावरचे केस सारीत सारीत ) बरं पण अजून ती रांड कां येत नाहीं ? इतक्या वेळेला यावी ह्मटलं ह्मणजे. तरी पण येईल ख-चीत लौकरच. ती बोलल्या बोलाला चुकाची नाहीं. आपण जरा बिछान्याला अंग टाकावं.

( कोंपर बिछान्यावर ठेऊन, हात उंच करून, वर डोकें ठेऊन निजते तों एक शिपाई येतो. )

शिपाईः—महाराज, महाराजानीं मला हुकूम क्यलाय की, " कोनाल वर सोडूं नको " मंग खालीं याक मनुक्ष्ये आल हाये त्यास्नी वर सोडूं का ?

सईबाई:–अरे, तूं जें बोलतोस त्याचा अर्थ तुला समजतो का ?

शिपाई:–जी; व्हय, समजतो.

सईबाई:–रे, तर खुळ्या, ‘कोणाला वर सोडूं नको’ असं ह्मटलं असतां, तो वर आलेला कसा चालेल रे ?

शिपाई:–महाराज, त्ये मनुक्ष्ये तो नव्ह; ती हाये. ती ह्मं-गती “ बाईसाहेबानी मला उब्या उब्या काम सोडून बोला-वलय.”

सईबाई:–मेल्या, तर असं बोल. (मनांत) ती चिमा असली पाहिजे. (उघड) येऊं दे वर तिला. (शिपाई मागें वळतो तों चिमा वर येते.)

सईबाई:–अरे, ही बघ आली तुझ्या मागोमाग. बाबा, जें हुशार तें हुशारच !

शिपाई:–(चिमास) अग ए, माग व्हय. ह्माहाराजांचा हु-कूम तुला अजून सुनवाचा हाये न.

चिमा:–जा मेल्या, माझ्या खेटराला सुनव. काय बया या-नं हुजत खेळली खालीं. काई बी केल्या वर बी येऊं द्येईना न निरोप बी सांगना.

सईबाई:–अशीं बाई, सांगकामी मनुष्यं असलीं ह्मणजे त्या यजमानाची फटफजीती. तरीच तुला वार[1] लागला यायला. (शि-पायाला उद्देशून) पण आव्यता केवढी मेल्याला शहाणपणाची ! अरे ए, शंखोबा, जा आतां खालीं. उभा काय राहिलास तोंडं पहात ? आणिक कोणाला वर सोडूं नको (तो जातो.)

सईबाई:–चिमा, बस ग जरा. मेलं उभ्याउभ्यानें काय सारा दिवस भर ? कंटाळा नाहीं का येत ? (चिमा खालीं ब-सते) ए, तुमच्या इथल्लीं माणसं फार पटाईत. तेव्हांच ‘क’ ह्मटलं कीं, ‘कमळ’ समजावयाचीं.

---

१ वेळ; उशीर.

चिमाः—त्यो म्यला पाव्हना हाये की नाहीं, तो पन याचाच सक्का भाऊ.

सईबाईः—पण वहिणीचे रुपये कसे खाल्लन पहा मेल्यानं घस्कन्.

चिमाः—बाईसाहेब, पैसा का कोनाला नको हाये का? म्येल वरसाच पोर पैसा टाकत, न रुपया उचलत! वया, समदं येवड कराच कशासाटीं? येक 'कनक अनी कांता.'

सईबाईः—(मनांत) मेल्ये, येवढी थेरडी झालीस तरी तुझा अद्याप लोभ सुटेना! दळणांतलं पीठ चोरून नेत असतां तुला झाळसाबाईनें पकडलं; इतक्याकरितां तूं तिच्या हात धुऊन पाठीस लागली आहेस. चोरीमारीनें तर रांडेनं आपलं सर्व घर भरलं आहे; आणि लबाडीविशीं तर बोलालाच नको जवान होती तेव्हां. (उघड) परंतु बाई, आपल्याला बायकांना 'कांतेशीं' काय करायचं आहे? (हांसते) आपल्याला 'कांत' पाहिजे. तो कसा मिळणार?

चिमाः—पैसा खर्चला की समद मिळ्त बाईसाहेब. अव, 'दाम करी काम' ह्ये का खोट हाये का? (माना हालविते.)

सईबाईः—तरी बाई, वेळेस पैसा खर्च कराला राजी असूनही काम होत नाहीं.

चिमाः—ही गोष्ट सोडा बाईसायब. मनुक्षे मातर शाहान व्हाव ह्मजी झाल.

सईबाईः—बरं तर, तूं ह्मणशील तितका दाम तुझ्या पदरांत घालतें. पण बाई, एक वस्तु तूं माझ्या ओटींत पडेलसें करशील?

चिमाः—(मनांत) या पतिव्रतेच एक अठूफळीच वान तर झाल असेलच. आतां मात्क्यान वटींत कोन्ची वस्तु मागते कोनाला ठाव? (उघड, हांसत) पन ती वटींत पडनारी वस्तु कळ्ळाया नग का?

सईबाई:-( हंसत ) तूं तरी बरीच ग बाई 'वेड घेऊन पेडगांवाला[1] जाणारी आहेस.' मला नव्हतं माहीत असं.

चिमा:-आता त झाल न बयासाब ह्माईत. आमी आपले प्येड गावाला जाऊ, न्हाईतर केंड गावाला; कि, व्येड गावाला जाऊ. काईबी करू. पन वस्तु मातर हरहुन्नेर करूनशी पैदा करू.

सईबाई:-( हंसून ) बघ, फिरशील चिमा ?

चिमा:-(हंसून) न्हाई बाईसायब. दोन पावल ह्मोरच जाईन.

सईबाई:-अग, बरं आठवलं. आतांशीं तुझ्या यजमानणीचं कसं काय आहे ? बरी आहेना ? फार दिसांत भेटलें नाहीं तिला.

चिमा:-अन त्यान्ला काय झालया बर नसाला ? खात्यात, पित्यात, मौजा मारित्यात—

सईबाई:-मोज आली आहे तुझ्या डोंबलाची ! बरं, ते आतांशीं बाळासाहेब तिथून निघून दुसऱ्या ठिकाणीं गेले आहेत ह्मणतात राहायला.

चिमा:-व्हय. मरतु वागात न्हायले हायेत हवा खात. हिकड जवा का झाला गाजावाजा अन बजबज, तवा क्यला तिकड 'पौवारा.'!

सईबाई:-चिमा, तूं मोठी शहाणी, हुशार, अनुभवशीर आणि पुन्हा, भरंवशाची बायको आहेस. मी तुला लेंक शोभेन.

चिमा:-मग न्हाई कोनी ह्मटल ?

सईबाई:-हें पहा, लग्नाच्या पाईं ह्माळसाबाईचे अनी माझे सारखेच पोंवाडे झाले. कायतें, माझे हाल कराला कोणी नव्हतं, इतकंच अंतर. मुळीं लग्न झाल्यावर चार वर्षांतच सगळा बाजार आटोपला. वीस वर्षांच्या आंत या देहाला सर्व संस्कार लागले ! आज माझं एकविसावं वर्ष चाललं आहे; अनी तिचं

---

1 पुणें जिल्ह्यांतलें एक गांव.

अठरावं आहे. तर आतां बाकीचे आयुष्याचे दिवस आह्मीं कंठावे कसे ? बोल ?

चिमाः–मांडीवर घ्याव.

सईबाईः–( हांसते ) अग, कोणाला सांगतेस मांडीवर घ्यायला ?

चिमाः–एखाद्या मुलाला. ( हांसते ) हो, होः.

सईबाईः–बाई, ते ह्मातारपणांचे विचार. परंतु तूर्तच आपलं नाक कां लोकांच्या मुठींत द्यावं ?

चिमाः–न्हाई तर आमच्या सारक्याला पगार घेऊन पदरी बाळगाव, ह्मंजे दिस कंठतात.

सईबाईः–तुलाग, काय मेले, चाटायचं आहे नुस्तं ? अगो नाहीं का तूं सुंद्रांताईच्या पदरीं आहेस? पण तुजपासून तिला तो उपयोग काय? माझ्या बोलण्याचा अर्थ नाहीं समजलीस तूं. माझी भाषा नाहीं समजली ! मी ह्मणतें, जो मनुष्य मिळून खातो, पितो, त्याला आणखी काय नाहीं बोल ?

चिमाः–( हंसून ) बोलिल्ये. ह्मोर ?

सईबाईः–तर आतां तूं साह्य हो. 'ह्मोर काय' ?

चिमाः–झाल्ये; ह्मोर ?

सईबाईः–( लाजत लाजत ) अगो असं होईलसं कर कीं–जवळ ये. तुझ्या कानांत सांगतें ( चिमाच्या कानांत कांहीं सांगते; नंतर, उघड बोलते. ) एकंदरींत, त्या अबळेवर ते पायधूळ झाडतील असं करण्याच्या कामीं आह्मांला तुझी पूर्ण मदत पाहिजे.

चिमाः–( आ पसरून ) काय बया, आकाशांतलं नखितर आनायच्या कामी मप न्हाई मागित्ली मदत.

सईबाईः–मीं ह्मटलंच कीं, फिरशील ह्मणून.

चिमाः–बर, पन त्यापून आपल्याला काय फायदा त्येचा ?

---

१ झालसाबाई.

सईबाई:—अग, आपल्या मैत्रिणीचं ज्यांत सुख त्यांतच आपलं. सर्व जगताचं कल्याण चिंतलं कीं, त्यांत आपलं होतंच. ( हांसते. )

चिमाः—( मनांत ) कवटाळीची धरसोड बगा कशी हाये ती ! या रांडेलाच त्यो पाहिजे. ( उघड ) मंग मालाच का या कामाविशी हटकल आपुन ?

सईबाईः—हें काम तुझ्या मार्फतच तडीस जाईल. मी युक्ति योजिली आहे ती मग सांगेन तुला.

चिमाः—मंग कशाला ? आताच का ब्लोलाना ?

सईबाईः—( तिच्या कानांत सांगते ) ( उघड ) या योगानं तिचं नाहीं तर दुसरे कोणाचं तरी ( हांसते ) काम होईल.

चिमाः—( मनांत ) आतां समंद इच विंगीत पल्ड भाईर; ह्ये बर झाल. ( राग आलासें दाखवून, उघड ) असल्या न्हाई बाई, आमी पंचातींत पडाच्या. आमी त्याच्या कड जाव; व्येडवाकड ब्लोलाव; अन मंग जोडे खाव. आमाला का ह्मंता अगदी अब्रू न्हाई वया साब. वा, फार चांगल करता ! मी आपली मौज पाह्यली यवढा व्यळ.

सईबाई:-( मनांत ) ही रांड आतां वश झाली तर बरी गोष्ट. नाहीं पेक्षां सगळं पोम फोडील बाहेर. अरेरे, फार वाईट झालं. ( उघड ) असं काय बरं ? तुमचा आमचा घरोबा बहूत दिसांचा ह्मणूनच इतकं धाडस केलं.

चिमाः—घरोबा, घरोबा, ह्मजी भलत्याच कामाला लावाचा व्हय ? जाते बाईसायब, लई यळ झाला आल्याला.

सई०:—येतजा बरं बाई. घर तुझं आहे. बोलल्याचा राग धरूं नको. मला तरी काय मेली रिकामची पंचाईत होती; पण त्या पोरीविशीं फार दुःख होतं मनाला. ( डोळे चोळते ) पण हें कोठें बाहेर फोडूं नकोहो. शपथ आहे. ( चिमा जाऊं लागते ) येबरं बाई. ( मनांत ) आतां येथें 'दामाचं काम आहे.'

(उघड) ए, हिकडे वघ, जर खर्चासंराला जरूर लागलें तर येत जाहो; संकोच धरूं नको मनांत, वरं. (स्मरल्या सारखें करून) हो, हो; वरं आठवलं. चिमा, हें तुला लुगडं काढून ठेवलं आहे; घेऊन जातेस का? कोरंच आहे. (लुगड्यांचा वस्ता सोडूं लागते; आणि चिमा मागें फिरते.)

चिमाः—नग बाईसाब.

सई०:-अग, घे ग. किती दिवसांचं द्यायचं आहे तुला. मागं एकदां तूं फाटके मागितलं होतंस माझ्याजवळ; तें ह्मटलं जुनं कशाला; नवंच देऊं; ह्मणून लांवणीवर राहिलं. हें घे, ये.

चिमाः—(लुगडें घेऊन, मनांत) सकुर्त[1] दर्सनी बोहानी तलई ब्येस झाली वगा. (उघड) बाईसायब, म्यां तरी आपल मन पघितल मजवर भरोसा हाये कीं न्हाई म्हंगून.

सईबाईः—ह्मणूनच मी तरी ही गुपित गोष्ट काढली बाहर तुझ्याजवळ ह्मणून. गावांत थोडीं का मेलीं इतर माणसं आहेत. बरं पुढें कशी तजवीज?

चिमाः—आपन जो हुकूम करतील तो बजावन्याला मी राजी हाये.

सईबाईः—आणखी ग मग काय पाहिजे याहून? तुला पण अगदीं भरपूर करून टाकीन. आतां असं कर, सध्यां तूं जा; अनी आज संध्याकाळीं ह्माळसाबाईला मी येणार आहें भेटाला; तेव्हां कळवीन पुढली कामगिरी.

चिमाः— (हंसून) बाईसाहेब, बर तर घेते आता रजा (चिमा जाते.)

सईबाईः—ये बरं. (मनांत) अग रांडे आतां आलीस आटोक्यांत; जोखलं तुझं पाणी. आपणही पुढल्या विचाराला लागावें. (जाते.)

(पडदा पडतो.)

---

[1] सकृद्दर्शनीं.

## प्रवेश २ रा.

स्थळः–झाळसाबाईची खासगी खोली. वेळ संध्याकाळ.

( झाळसाबाई अंथरुणावर पडली आहे; जवळ सईबाई बसली आहे. )

झाळसा०:–( रडत ) आज माझी वास्तपुस्त पहायला आलीसना, अडीच तीन महिन्यांनीं; सख्खी बहीण, सख्खी वडील बहीण म्हणवितेस ती अशीच का ?

सईबाईः–रागाऊं नको सुंद्राताई. पण खरं सांग, तूं तरी त्या दिवशीं तशी वागलीस का ? तुला कोठें आहे माझी गरज ? तूं फार मांदी पडली आहेस, असं ऐकून मीच होऊन आलें आहें. तूं तर नाहींना बोलावलंस ? ते दिशीं माझा सल्ला विचारतीस तर अशी छी थू कां झाली असती जनांत आज ?

झाळसा०:–बाई, या चांडाळणीच्या हातून सहस्रावधी अन्याय घडले; तुह्मां सर्वांशीं कृत्रीम केलं, त्याचं आतां पुरं प्रायश्चित्त मला पडलं. आतां तरी तुह्मीं सर्व या पापिणीला क्षमा करा.(डोळ्यांत आसवें आणून ) दया करा; क्षमा करा; आणि या माझ्या सरत्या आयुष्यांत दोन सुखाचे शब्द मला द्या. असं पदर पसरून, नाक घांसून, माझं दीन अनाथ गाईचं मागणं आहे. (नाक घांसते व स्फुंदून स्फुंदून रडते. ) आतां बाई, माझ्यानें यत्किंचित् सुद्धां हे टाक्यांचे घाव सोसवत नाहींत. डोकं इतकं हलकं झालं आहे !

सईबाईः–( तिला पोटाशीं कवटाळून धरून ) उगी. ताई, या योगानं माझं दिखोत बाई, काळीज करपून जातं. ( आपले डोळे पुसते ) ताई, दम कां टाकतेस ? दुःखाला पाठच दिली पाहिजे. आज आपले कष्टाचे दिवस आहेत. उद्यां सौख्याचे

१ अजारी.

येणार नाहींतसे कशावरून ? प्रत्येक गोष्टीला बाई, भरती ओहटी ही आहेच.

म्हाळसा०:–बाई, सौख्याचं आतां नांवच नको.

सईबाई:–असं म्हणूं नको. दैवाची करणी देवाहूनही अघटीत आहे ! तूंच पहा, त्यांची नी तुझी आगगाडींत कधीं भेट होईल, अशी तुला अगापिछा तरी होती का ? बरं बाई, बरा गोष्ट निघाली; तिथें गेल्यासारखं कांहीं फळ झालं का त्याचं ?

म्हाळसा०:–हो. झालं तर.

सईबाई:–तें काय ? ( हांसते. )

म्हाळसा०:–बदलौकिक अनि सौख्याचं मातेरं.

सईबाई:–तसं नव्हेग. कांहीं अंग संग ? ( हांसते. )

म्हाळसा०:–हो झाला तर.

सईबाई:–मग सांग, तो कसा घडला तें.

म्हाळसा०:–त्यांच्या मांडीला माझं डोकं लागलं !

सईबाई:–येवढंच काय तें ?

म्हाळसा०:–आणखी आहे.

सईबाई:–बोल तर तें.मेली सरळ म्हणून उत्तर द्यायचीच नाहीं.

म्हाळसा०:–पंढरीच्या विठोबाला जसं त्याचे भक्त भेटतात, तशी मी त्यांना कडकडून भेटलें एकवार; आम्हीं एक मेकांच्या खांद्यावर हात टाकून त्या डब्यांतल्या आड खोलींत गेलों–

सईबाई:–( हंसून ) पुढं ?

म्हाळसा०:–' पळसाला पानं तीन ' !! त्यांनीं मला मर्दानी ब्राह्मणी पोषाख चढविण्यास शिकविलें; स्टेशनांत गाडी आली; आम्हीं मुकाट्यानें उतरलों !

सईबाई:–जळ्ळी मेली कांहींच्या बाहींच विसंगतवार बोलते. ए, तुझ्या जाण्याचा मूळ हेतु साधला का ? बाई, सुध्या मार्गानं बोलायचं असेल तर बोल. असे हे मेले आढेवेढे नकोत मला तुझे.

झाळसा०:—साधला तर. त्यांनीं मला "अग ए माझ्या लाडक्ये प्रिये झाळसे" असें ह्मटलं; आणि मला एक आपल्या प्रीतीची खूण आंगठी दिली; अनी "होईल तितकं करून तुला अंतर देणार नाहीं" असें त्यांचं वचन मिळालं; याजपेक्षां जास्त कांहीं एक नाहीं.

सईबाई:—( मनांत ) हेंच मला पाहिजे होतं. ( उघड ) हं: इतका वेळ, इतका एकांत, इतकीं एक मेकांवर भाळलेलीं स्त्रीपुरुषें एकत्र असून, अखेरीला स्वप्नागत झालं ? याला काय ह्मणावं ?

झाळसा०:—याला ह्मणावं आपलं कम नशीब, कर्म, दुर्दैव ! बाई, सारी कर्मकाहाणी सांगाला लागलें, तर सारा दिवस पुराचा नाहीं, अनी सांगण्याला मला सध्यां शक्ति पण नाहीं; सांगेन एखादे वेळीं ती गोष्ट. पण बाई, तात्पर्य इतकंच घ्यायचं कीं,'सदोदित आपल्या प्रयत्नांना फळ येईलच असं नाहीं.' आह्मीं दोघें वादविवाद करतां करतां वाट गेली सरून; नौसरी आली नजीक; मग त्यांनीं माझं मन वळवून मला सुखरूपच परत लाविली. ( डोळ्यांत आंसवें येतात.)

सईबाई:—भोळींग भोळी पोर! खूळ सारं. यवढं व्हावं होतं कशाला ? वळकट घट्ट धरायचं ह्मणजे झालं. ( मनांत ) 'पुढल्यास ठेंच मागला शाहणा' मला आली तशी वेळ तर सांगेन कसं काय तें. ( उघड ) सुंद्राताई, 'धीरसो गंभीर.' तुला त्यांनीं वचन दिलं आहेना ? तर मी—

झाळसा०:—बाई, झाले सोहळे तितके खूप झाले. एका मरणा व्यतिरिक्त आतां कशाची मला इच्छा नाहीं. आत्महत्या केली तर भूत होऊन झाडांचा पाला युगांचीं युगं ओरबाडावा लागेल, ह्मणून या घटके पर्यंत जिवंत तरी राहिलें आहें ! ! मनाप्रमाणें कधींच न घडून आल्या कारणानें माझं मन वासनेला, विरहाला, शोकाला इत्यादिकांला पिऊन जाऊन,

आतां शांति धरून, निवळलेल्या पाण्या प्रमाणें, निर्मळ हो-ऊन स्वस्थपणें मरणाची वाट पहात बसलं आहे. त्याला कां उगीच फिरून गढुळवितेस ? या उप्पर या भरीस तूं पडूं नको अनी मलाही पाडूं नको अशी तुला हात जोडून कोंपरापासून विनंति आहे. या संसाराचा मला वीट आणि ओकारी आली आहे. केल्या कर्माचा पश्चात्ताप होऊन, आतां देवाजीचे पाय धरून क्षमा मागूं ह्मणजे अन्य जल्मीं तरी बरं फळ येईल.

( दोघी क्षणभर तटस्थ बसतात. )

सईबाईः–अग पोरी, तुला वेड का लागलं आहे ? मरून काय करायचं आहे ? सुख ह्मणून जें काय आहे तें याच जन्मांत भोगायचं आहे. तीन चिमट्या राखाडी झाल्यावर मग कशाचा दुसरा जन्म ? अनी कशाचा स्वर्ग ? नी कशाचं ग, वेडे, पाताळ ? या दुनियेंत कायतो बाळासाहेबच का एक अद्वितीय पुतळा जन्मला आहे ? ( हंसून ) मेला हा नाहीं तर दुसरा ! अग, जर बोलून चालून आमची लगाम ज्यांचे हातीं असणार, त्यांनींच आह्मांला काव्याकुव्यांच्या खंदकांत ढकलिलं आहे, अनी मग आह्मी वाईट मार्गाला लागलों तर त्यांत कोणी शहाणा मनुष्य आपल्याला दोष देऊं शकेल का ?

ह्माळसा०:–छे, च्छे; आतां या जिवंत शरीराला इतर कोणाचा तिसऱ्याचा विटाळ ह्मणून होणेंच नाहीं ! मेल्यावर मेलीं कुत्रीं का शिवेनात.

सईबाईः–( हात ओंवाळून) अलल ! केवढा ग बाई निश्चयाची ! पोरी, ज्या देशांत सुकेळीं मिळत नाहींत, त्या देशांतलीं माणसं सुखलीं का आहेत त्यांवांचून ? तूं अजून पिल्लूं आहेस; तुला अद्याप पंख नाहीं फुटले. ( जरा थांबून) बरं, पण तेंच रत्न लाधलं तर ?

ह्माळसा०:–याउप्पर ह्मणून कशाचा यत्न कराचा नाहीं.

१ ह्मा वरविशेषजोर.

सईबाईः–( हंसून ) समजलें ग, समजलें. अयाचितवृत्ति धरायची. ( तिला कवटाळून धरिते ) कर्तें बरं तजवीज त्याची.

म्हाळसा०ः–कशाची ? कांहीं नको. ( कपाळाला आंठ्या घालिते. )

सईबाईः–अग, तुझ्या मनांत आहे त्याची. काय मेली ओढून चंद्रबळ आणते पहा. ( तिला हालवून ) ए, ज्या दिवशीं मी तुला बोलावीन त्या दिवशीं माझ्या घरीं येशील का ? म्हणजे झालं. त्याविशीं हल्लीं कोणी कांहीं शंकाही घेणार नाहीं. सर्व जिकडल्या तिकडे विझालं आहे. ( म्हाळसाबाई तोंड मिटून धरिते ) ए, पोरी, बोल कीं ग. छेः आतां नाहींच बोलाची. अग ए, पण ती आंगठी पाहूं.

(म्हाळसाबाई ती पोटकुळीची काढून दाखविते; व तिचें चुंबन करून आपल्या हृदयावर आंवळून दाबून धरिते. )

सईबाईः– ( हंसून ) अगग, जणुं कांहीं गळ्यांतला ताईतच. पण, पुरीं पाहूंतर दे.

( म्हाळसाबाई, ती आंगठी आपल्या तळहातावर ठेवते. )

सईबाईः–खरंच; तळहाताच्या वरला फोडच तो तुझा. ( अंगठी उचलून घेऊन ) अहाहा! घाटपण घाट आहे. अनी असली हिरकणी पण विरळाच. मजजवळ राहूं देशील का, ही दोन चार दिवस ! मलाही एक असलीच करायची आहे. सोनाराला दाखवून हाच घाट उतराला सांगतें. ( आपल्या बोटांत घालते. )

(म्हाळसाबाई भुईकडे दृष्टि करिते; व उत्तर करीत नाहीं. )

सईबाईः–विचार कसचा पडला ताई तुला ह्यांत ? चार राहिले; तीन दिवस; दोन दिवस–एक दिवस; निदान एक वेळ तरी. काय बाई, लोकांना आंगठ्या आहेत कीं नाहींत ? ए बेभरंवशी, परत मिळेलहो, ती.

झाळसा०:—पण ह्मटलं संभाळ हो नीट. (सईबाई हांसते.) हांससनाका, हांसलीस ह्मणून.

सईबाई:—हो हारवली, तर दुसरी देईन इच्याहून ज्यास्त मोलाची.

झाळसा०:—नको मला हीच पाहिजे.

सईबाई:—पुरे; किती सोलवड करितेस जिवाचे? येतें आतां बोलावीन त्यादिशीं ये मात्र हो.

झाळसा०:—येत जा हो, अशीच समाचाराला वरचे वर. ( रडते ) ही तसदी तुला फार दिवस नाहीं पडणार. मजकडे एकदां बघ ह्मणजे समजेल.

( अंगावरलें लेप काढून दाखविते. )

सई०:—अरेरे, हाडें नुस्तीं कातड्यानें सारविलीं आहेत! तोंडावरच्या तुझ्या फिक्कट टवटवीनें मला निखालस फशिवलं. थांब, दोन तीन रोजांत मी आपल्या कडेच घेऊन जातें तुला ठायपालट करण्या करितां. येतें, ( मनांत ) झालं; साधलं कार्य आपलं. काय बाई, झट्ट पट्ट घ्यावे लागले अंगठी साठीं.

झाळसा०:—बरं, ये. जातांना दार ओढून घे जरा.

( सईबाई जाते आणि पडदा पडतो )

## प्रवेश ३ रा.

स्थळ:—बाळासाहेबांचा वाडा.

( बाळासाहेब एक पत्र घेऊन एकटेच विचार करीत बसले आहेत. )

बाळासा०:—( आपल्याशींच ) कसें करावें? जावें कीं न जावें? जावें, तरी पंचाईत; न जावें तरी पंचाईत. इतराला कोणाला याविषयीं मत विचारावें तरी पंचाईत; न विचारावें तरी पंचाईतच. आणि या विषयीं दूरवर विचार करून योग्य मत देणाराला पंचाईत; आणखी योग्य मत देणारा मिळण्याचीही पं-

चाईतच. ( हांसतात ) हं, हंः तिथें जाऊन, समयवशात् ती एखादा अधिक प्रसंग आणील. तो टाळावा, तर वचन मोडतें; न टाळावा, तर आपला सुसंकल्प मोडतो. तिचा अंगीकार करावा तर अडचण; न करावा तरी अडचण!! खाल्लें तर बाधतें; टाकलें, तर श्राप देतें! एवंच दोहींकडूनही पंचाईत. ( जरा थांबून ) याजपेक्षां नच गेलेलें पुरवलें. ( दांतांनीं जरा खालचा ओंठ चावून ) पण ती पत्रांत काय ह्मणते, "मला हा लोक लौकरच अंतरणार! करितां एकवार शेवटची भेट घडावी. यापेक्षां जास्ती कांहीं मागणं नाहीं." ( जरा विचार करीत बसतात ) चमत्कार आहे! पत्र घेऊन येणारी चिमा; जी तिचा पूर्वी पूर्ण द्वेष करणारी व, उलट्या काळिजाची! आणि तीच आतां तिजविषयीं काय कळकळ दाखवते! डोळ्यांना पाणी काय आणते; विनवण्या काय करते. हें एक झालें. आतां भेटीची जागा सईबाई थोरातिणीचा वाडा!! वा, नामी. सईबाई ह्मणजे साक्षात् विश्वासघाताची खाण! 'गरतींत वेश्या, आणि वेश्यांत गरती'!!! पण हो, ह्माळसाबाई ठायपालट करण्या करितां तेथेंच आली आहे. असं चिमा सांगते. संध्याकाळीं गुजरीचे वेळेला मला सडाच येण्याची सांगी कां? परंतु एका अंशीं हें सांगणें विचारीपणाचें आहे. नाहीं ह्मणाला एका अंगठीनें सर्व संशयनिवृत्ति होते. ती बापडी तर अजारानें फार दिवस पचत पडली आहे. ( खिन्न मुद्रेनें ) शिव, शिव! तिला माझ्याकरतां ही दशा आली ना! तरी काय होईल तें होऊ. बेहेत्तर गेली, कोणी नांव ठेवीना; आज तिच्याकडे गेल्याखेरीज रहावयाचें नाहीं. चार बुद्धिवादाच्या गोष्टी सांगून परंतु. ईश्वरा, काय तिची प्रीति! काय तिचा निश्चय! काय तिचें सौजन्य! तिचे एकेक गुण वर्णावे तितके थोडेच! पण नशीब कसें घड दिलें नाहींस! आपणच एखादें सर्वोत्कृष्ट चित्र तयार करावें; आणि

आपणच त्याची मान मोडून टाकावी; तद्वतच नव्हे काय? वा-
वा, तुझ्या इच्छेपुढें कोण धांवेल? (क्षणभर स्तब्ध बसतात)
अस्तु. हा बेत विश्वासरावाला कळवावा हें बरें. तो मोडता
आणणार नाहींसें वाटतें. त्यावेही तोंडांतून तिजविषयीं पुष्कळ-
दां दयार्द्र उद्गार निघालेले आहेत. मात्र तिकडे जातांना एक
गुप्ति आणि एक इसम बरोबर घ्यावा ह्मणजे पुरे. तर असेंच
पहिल्यानें विश्वासरावांना जाऊन भेटावें कसें. (जातात.)

## प्रवेश ४ था.

स्थळः—सईबाईचा रंगमहाल.

वेळः—संध्याकाळीं दिवे लागल्यावर दोन घटका.

(सईबाई भरजरी हिरवा शालू नेसून व मोत्यांचे, हिऱ्यांचे अ-
लंकार चढवून आणि पिंवळी जरीकांठी चोळी तंगदार घालून,
थाटमाटानें बसली आहे.)

सईबाई:—(आपल्याशींच) पहा, बोलावणं पाठिवल्या
पासून माझ्या अगदीं उरांत धडकी भरली आहे; ती कांहीं
केल्या निघतच नाहीं. या पूर्वीं मी पुरुषांशीं बोलल्यें संवरलें;
यांच्याशीं दिवीत बोलल्यें पण असं नव्हतं झालं कधीं. (ज-
रा थांबून) हो, हो. बरी कल्पना सुचली. तसेंच करूंया; ह्म-
णजे आपलें सौंदर्य व आपल्या वस्त्रालंकारांची शोभा त्यांच्या
पूर्णपणें नजरेस पडून थोडा बहुत तरी कार्यभाग उरकेल. (तों-
डावर लफ्याचा पदर घेऊन, टापटीपीनें एका रेशमी कोंचावर
निजते. आणि मनांत) असंच झोंपेचं मीस करून पडूंया. त्यांना
वाटेल कीं, ही सहज येथें पडली असेल तों झोंपी गेली. (च-
पापून) अं महालाच्या बाहेरल्या अंगाला आले वाटतं. होय
(कानोसा घेते.) (पडद्या पलीकडे) "काय हो, पाहरे-
वाल्याशिवाय येथें एकसुद्धां माणूस दिसत नाहीं." "ह्मारा-
ज वाड्यातली बहुत्येक मानस कारबाऱ्या बरूबर लग्नाला

ग्येलीती. बाकीची रातीची घरी ग्येलीती. इकड याव अस. ''

सईबाई:-( मनांत ) आली ग आली, स्वारी!

( इतक्यांत, दासी पुढें फाणस दाखवते आहे, असे बाळासाहेब येतात. )

( ' सईबाईला उठवूं का ? ' अशी ती बाळासाहेबांना खूण करिते; ते नको ह्मणून खूण करून दुसऱ्या कोंचावर जाऊन बसतात; तों दासी हळूच बाहेर जाऊन दार लाऊन घेते. )

बाळासाहेब:-( सईबाईकडे पाहून, मनांत ) हीच का ती त्रिभुवनसुंदरी कोंचावर निद्रिस्त झाली आहे ? अहाहा, कसें गोंडस शरीर आहे ! सौंदर्यलतिका हें नांव इलाच शोभेल. हात पाय पहा कसे केळीच्या गाभ्याप्रमाणें शुभ्र आणि तुळतुळीत दिसताहेत ! क्षणभर असें ह्मटलें तरी चालेल कीं, या यौवनवनांत, ही फलभारानें आनमित झालेली स्वपर्णपरिवेष्टित रंभा, मदनरूपी मदोन्मत्त गजानें दंडासनीं पाडिली आहे ! ( तिच्याकडे निश्चल दृष्टीनें बघतात ) अहो, पण इची ही अशी लुसलुशीत कांति राहिली कशी ? चिमा बोलत होती " अगदीं अस्थिपंजर राहिली आहे '' ह्मणून; आणि हें कसें ? किंवा तें सर्व थोतांड होतें ? असेल बुवा कदाचित् तसें. एरव्हीं मी कसा तिचा इकडे येण्याची विनंति मान्य करणार? असा त्यांचा समज असेल. व तो वास्तविक आहे. बेत तरी पहा कसा फर्मास बठविला आहे कीं, या वेळेला थेट मध्यरात्रींचा भास होताहे! आधींच वाडा पडला अफाट; शहरापासून अगदीं अलग; तशांतून मनुष्येंही सारीं बाहेर गेलेलीं. एक चिलटसुद्धां ' हूं कीं चूं ' करीत नाहीं. सईबाई, किंवा चिमा, अगर एखादी पोरें तरी—ज्या कोठें गडप झाल्या आहेत, त्यांचा मागमूस देखील नाहीं. ( जरा थांबून ) आतां हिला हांक मारून जागी करूं का ? ( उघड पण हळूच ) ए-माझे-( मनांत ) नको. हातांनींच हालवूं या.

१ वेल. २ केळ. ३ दासी.

( हळूच उठून जवळ जाऊं लागतात ) आपले अंगावर रोमांच पहा पण कसे थरारून उठले आहेत! ( अंग कांपून ) अरे, पण हें कोणी पाहिलें तर? ( इकडे तिकडे पाहून ) वा! दारें तर सर्व बंद आहेत. ( हळुहळू जवळ जातात आणि स्तब्ध उभे राहतात. ) हात लावूं का हिला? छे, नको. गाझी झाळसा असली तर ठीक; नाहींपेक्षां रोकडा घात होईल. परंतु तिच्या शिवाय येथें दुसरी कोण असणार? ( तिला हळुहळू हालवितात, व चपापून मागें सरतात. ) अँ हुँः ती नव्हे. ( परत जाऊन कोंचावर बसतात; सईबाई झोपेंत चळवळल्या सारखें करिते; व तिच्या तोंडावरला पदर जरा दूर होतो ) अरे ही सईबाई! पहा एकांत जागीं एकटी तरुणी स्त्री व एकटा तरुण पुरुष असला, म्हणजे क्षणांत कशी चित्तवृत्ति बदलते ती! येथें पाय टाकण्याच्या पूर्वींचा दृढनिश्चय कीं, झाळसा बाईला सुद्धां अंगस्पर्श होऊं द्यावयाचा नाहीं. तोच मी हूं हूं म्हणतां असा बदललों कीं, ही मला प्रथम झाळसाच भासूं लागली! क्षणांत ती माझी झाली!! इतकेंच नव्हे, तर ती झाळसा नाहीं असें जरी वाटूं लागलें तरी तिजविषयीं उत्पन्न झालेल्या रतीला उपरति होईचना. मन लागलं मोकळ्या वर्फागत वितुळायला. ( सईबाईकडे निरखून पाहून ) ओहोहो, किति सुरेख आहे! अंगांत तारुण्याचा भर काय ओतप्रोत भरला आहे! जणु एखादी गंधर्वकन्या अथवा नागकन्या किंवा, अरबी भाषेंतील वर्णिलेली परी, परोपरीचा शृंगार करून उंचमंचकोपरी आरूढ होत्साती, आपल्या प्रियकर रमणाच्या आगमननिमित्त ध्यानस्त बसली आहे! इच्याकडे आपण पूर्वीं कधीं पुरतें लक्ष्य दिलेंच नाहीं. आणखी हा सर्व खटाटोप तिचाच तर नव्हेना? आहे बुवा, ही बायको मोठी अघटित घाट घडवणारी आहे. ही नागकन्या कितीकांना चावली असेल! हिलाहो कशाला

येवढा मोठेपणा? वरून अप्सरा आणि आंतून सुसर[1]!! बऱ्या बोलानें बाहेरच आपला पाय काढू या कसे. या मदनभुजंगाची[2] दुसरी लहर आली तर मूर्च्छित पाडील किंवा हिला स्पर्शदंश करण्याला आपणाला उद्युक्त करील!

(असें ह्मणून दाराकडे जाऊन तें उघडूं लागतात; तों तें बंद आहे असें पाहून)

"हें दार कां वरें बंद? अचंबा आहे मोठा! विक्रम राजाला सावकारकन्येच्या महालांत असतां काय वाटलं असेल याची या क्षणीं मला पुरी कल्पना करितां येते. आपल्याला ही साडेसाती आलीच आहे; तरी त्याच्या दुःखाचा मात्र अनुभव न येवो ह्मणजे झालें. राजा विक्रम तो विक्रम! आणि मी यःकश्चित घुंगुरडें तें घुंगुरडें. त्याची गोष्ट कशाला!!"

(दार हळुहळू खडखडावितात आणि इकडे सईबाई उठून बसते.)

सईबाईः—(मनांत) वहुतेक काम तर उरकलं. आतां शेंपूट राहिलं आहे. (डोळे चोळीत चोळीत, उघड) कोण आहे तें?

बाळासा०:—जो, बाईसाहेब; मला चिमाबरोबर चिठ्ठी गेली होती आज इकडे यायला.

सईबाईः—(हास्यमुख करून) हं, हं; आपली स्वारी का? (चट्कर उठून, लाजत लाजत कोंचामागें उभी रहाते) जरा बाई, अंग टाकलं तों झोंपच लागली!

बाळासा०:—(परत कोंचावर जाऊन बसतात) आपल्या कामाचा लौकरच आपल्या वर्तीनें, निकाल लागेल असा सुमार आहे. आह्मी आपल्याकडून तर सयुक्तिक अभिप्राय देऊन तें प्रकरण आजच दोन दिवस झाले-दिवाणसाहेबांकडे रवाना केलें. पुढें पाहूं काय होतें तें.

---

1 मगरी. 2 ज्याला सर्प, कोल्हा, कुत्रा इत्यादि चावतो तो पिसाळून इतरालाही चावतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय



सईबाई:—( हंसून ) हो हो; आपल्या सारख्यांनीं मजसारख्या गरिबाचं काम उलगडायचं मनांत आणल्यावर तें कां तडीस जाणार नाहीं? त्या करितां ही दासी या चरणांची अक्षयी रुणी आहे. ( हात जोडते. )

बाळासा०:—जेंव्हां सकाळीं इकडून निरोप व पत्र आलें, तेंव्हां ह्मटलें ही बातमी कळवूं आपल्याला व सहजगत्या गांठीही पडतील आपल्या उभयतांच्या. ( मनांत ) चार शब्द मोठ्या आदबीनें बोलूं व रजा मागूं ह्मणजे झालें. ( उघड ) चिमा सांगत होती" झाळसाबाई फार अजारी आहेत. ह्मणून आपण त्यांना चार दिवस ठायपालट करण्याकरितां येथें आणलें आहे" हें फार उत्तम केलें. त्यांचीं जिव्हाळ्याचीं माणसें कायतीं एक आपण व दुसरी बायजी.

सईबाई:—( हळूच ) महाराज, झाळसाबाई काय, मी काय, एकदां ज्या आमच्या प्रकृति वेतोल[1] झाल्या आहेत त्या अखेरच्याच; झिणून झिणून मरायच्या. वेळींच औषधोपचार न केला तर मीही मृत्यूच्या दाढेला वळी पडणार!

( सईबाईचे ओंठ थरथर कांपतात व चर्या चंचल होते. )

बाळासाहेब:—( मनांत) हा कांहीं नवाच रंग दिसतो बुवा! तिची मुखचर्या बघा कशी एकाएकीं बदलली, ओंठ काय थरारताहेत; स्वरांतही किती फरक पडला पहा! मी बोलतों तिच्याविषयीं तों ही आपलेंच घोडें पुढें ढकलिते. हें ठीक चिन्ह नव्हे. ( उघड ) बाईसाहेब परवानगी असल्यास विचारतों—

सईबाई:—हं, हं; महाराज आतां आंतबाहेर पडदा असण्याचं कारण नाहीं. येथें आसपास आपल्या दोघांखेरीज कोणी एक नाहीं.

बाळासा०:—( अंग थरारून, मनांत ) पत्र वाचून जे कुतर्क येत होते ते खरे; आणि विश्वासरावाचेही आक्षेप फार

---

१ बिघडल्या; किंवा अनावर झाल्या.

दूरवर विचाराचे होतें. हें दुसरेंच झोंबट आंगीं येऊं पहातें. ( उघड ) आपली भेट झाली, तशीच ह्माळसाबाईंची झाली असती ह्मणजे घरीं जाण्याला बरं पडलं असतं.

सईबाईः—( मनांत ) इतकं बोलून उमगत नाहींत ! तर हा चाऊन चिकटपणा कांहीं उपयोगी नाहीं. ही स्वारी सुध्या मार्गानें अडाची नाहीं. हें पांखरूं जाळें पसरून पकडिलं पाहिजे. यानींच राजेश्रींनीं पूर्वी बोलून बोलून अखेरीस सुंद्रातांईच्या हातावर वाटाण्याच्या अक्षता दिल्या, तेच हे. ( उघड ) 'ह्माळसाबाईका?' माझ्याच प्रमाणें झुरणीस लागून आपल्या घरीं तळमळत पडली आहे !

बाळासा०:—(मनांत) वारे वा. काय रांडेनें लोणकढी थाप मारली ! हीच ती मघांची आपली झुलती 'परी' आतां नेते आपल्याला आकाशांतून उडवून इंद्राच्या नंदन वनांत ! ( गंभीर मुद्रा करून, उघड ) एकूण त्या येथें नाहींत तर. अजार कशाचा वरें झाला आहे त्यांना ?

सईबाईः-माझ्याचप्रमाणें, तिला या पायांच्या विरहाचं भूत झोंबलं आहे !

बाळासा०:—( मनांत ) झालें; आतां अगदीं उघड झालें. इतका वेळ मूठ भरली होती; आतां स्वच्छ उघड झाली ! येथें बसण्याची आतां मजा नाहीं. ( उघड ) घेतों आतां रजा बाईसाहेब. उशीर झाला.

सई०:—( हंसून ) आपण रजा घेतात पण देताहे कोण ?

बाळासा०:—नाहीं ह्मटलें, उशीर फार झाला; आतां येतों. ( कोंचावरून उठतात )

सई०:—(हंसून) आपण 'येतों' ह्मणतां अनी मग जातां कसे?

बाळासा०:—( वरकरणीं हंसून ) बरें बुवा, जातों.

सईबाईः—बरं तर,यावं. ( मनांत ) जातां कोठें? सर्व चोहींकडे चकडबंद कारखाना आहे.

बाळा०:-( दाराजवळ जातात व दार हालवून ) अहो, हें बंद आहे.

सईबाई:-महाराज, तें तसंच असलं पाहिजे स्त्रीपुरुषें एकांतीं असल्यावर! ( दोघेंही एकमेकांजवळ न बोलतां, कांहीं वेळ आपआपल्या जागीं स्तब्ध उभीं राहतात. )

सई०:-( मनांत ) आतां कोठें जातात ?

बाळासा०:-( मनांत ) अशा या एकांतसमयीं, अशा या मदनपीडित मदोल्लसित मनोमोहिनी रत्नाला सोडून जाणें, ह्मणजे 'भुजंगानें नव प्रफुल्लित केतकीच्या कणसाला सोडून जाण्या सारखें,' 'किंवा भ्रमरानें कमलनीला अथवा अर्जुनानें रंभेला सोडून जाण्या सारखें आहे'! करतां काय ? प्रथम हें पाप कर्म; दुसरें, एकदां शरमिंदें झालें, ह्मणजे मग पुरुष यांच्या ताटाखालचें मांजर. इजविषयीं ही आपल्या नांवाचा बभ्रा होईल; छिनालांच्या पटांत आपलें नांव दाखल होईल; महाराज साहेबांपुढें बिननांवीं पत्रें पडतील. आधीं एका गोष्टींत कपाळाला शुष्काशुष्कीं शिक्का लागलाच आहे. सगळा बाजार बाजार होईल. तशांतून ही बायको दिसते बेसक. येत्या जात्याची पतिव्रता! त्यापेक्षां या मोहपाशांतून वेळेसच सुटावें तें बरें. कोणत्या थराला ही गोष्ट जाते, कोणाला ठाऊक. ( उघड ) बाईसाहेब, रिकामें बसविण्यांत आशय काय ?

सई०:-आशय उघड आहे. व दयाळू होऊन तो आपण तडीस नेला पाहिजे. ( हंसून ) कामा शिवाय कोण कोणाला बाई, उगीच बसवील ?

बाळासा०:-बाईसाहेब, पण आपण या कामीं दूरवर विचार पोहोंचविला नाहीं. पाण्यामध्यें जर देहधर्माचें केलें तर वर येणार नाहीं काय ? पापकर्म अंधारांत जरी घडलें तरी उजेडांत हटकून यावयाचेंच. आणखीः—

"हांसत कर्म करावें ॥ भोगावें रडत तेंचि परिणामीं"

सई०:-महाराज, निकडच पडली ह्मणजे देहधर्मांचं पाण्यांतही करावं लागतं. बरं, याच्या परिणामाविशीं ह्मणाल तर, गांवांतले डाक्तर अनो वैद्य मेले का सारे? ते या कामांत पुरे निष्णांत बनून राहिले आहेत! कोणी तरी मेला उभा राहीलच पाठिराखा!!

बाळासा०:-बाईसाहेब,आपण सुज्ञ अहां. विचार करा,यांत दोन पातकें नाहीं होत? एक व्यभिचार व दुसरें बालहत्या. आणि अशा या गुप्तकर्मांत तो प्रसंग खात्रीपूर्वक यायचाच. ईश्वराला पातक नाहीं खपत. तो असें हें पोराच्या रूपानें ढोळकें फोडतो बाहेर. अशीं दोन नाहीं, चार नाहीं, शेंकडोंशें उदाहरणें सांपडतील!

सईबाई:-तर मग, हा प्रघात नवीन नाहीं, असें आपणच कबूल करतात. करितां, समय विशेशीं तसाच प्रकार घडून आल्यास, जी इतरांची वाट तीच माझी होईल!

बाळासा०:-शिव, शिव, शिव!! बालहत्ये सारखें दुसरें पातक नाहीं. पहा, शंभर गाडे जीवजंतु मारले कीं, एक वृषभ मारल्याचें पातक; शंभर वृषभ मारिले तर एक गोवधाचें पातक; शंभर गोवध घडले, ह्मणजे एका ब्रह्महत्येचें पातक; अशा शंभर ब्रह्महत्या झाल्या कीं एक संन्याशी वधाचें पातक; असे शंभर संन्याशी जेव्हां मारावे तेव्हां एका स्त्रीहत्येचें पातक; आणि शंभर स्त्रीहत्यांच्या बरोबर एक बालहत्या होय! अबबब! केवढें हें अघोर पातक आपल्या माथीं घेण्याला राजी झालां!! त्या पेक्षां हा नादच सोडाना?

सईबाई:-महाराज, आमचे हातून बालहत्येचें पातक जेव्हां घडेल तेव्हां खरें. परंतु सध्यां आपण तर ह्या दोन स्त्री हत्यांचें पाप माथीं. ह्याळसाबाई तुमच्या नांवानें, क्षयरोग लागून, झुरून झुरून मरणार; व मी मरत घातलें आहें. याचा आ-

र्धी स्वतांच विचार करा मनांत, पुरा. अबबब, हें तरी काय थोडं पातक झालं. बालहत्येच्या खालो खालचेंच हें !

बाळासा०:–माझ्या मुळें त्यांची अशी दशा झाली, याविषयीं माझें मनाला रात्रंदिवस खात आहे. म्हणूनच त्यांना भेटण्याला आलों.

सईबाई:–( हंसून ) मग जर तिच्या विशीं आपल्याला दया येते, तर माझ्या स्थितिविशींही आपल्याला दया येईलच. आम्हीं दोघी रंगानें, रूपानें, वयानें, बहुधा सारख्या आहों; आम्हां दोघींना आईबापांनीं विकलं; आम्हां दोघींना नवऱ्या पासून कांहीं मात्र सुख लागलं नाहीं; आम्हीं दोघींनीं हाल अपेष्टा सारखीच भोगिलो आहे; आम्हीं दोघी एकाच सुंदर पुरुषाला भाळलों; तर त्या एकाच पुरुषानें आमचे दोघींचे प्राण रक्षिले पाहिजेत.

बाळासा०:–( मनांत ) अंगावर बिनतोड बाजू येते. ( जरा थांबून उघड ) बाईसाहेब, हा नियम सर्वठिकाणीं लागू पडत नाहीं. पहा, मी प्राणी आहें; तुमचे तीर्थरूपही प्राणी आहेत. मला हात पाय आहेत; त्यांनाही ते आहेत. मी जातीचा पुरुष आहें; तेही जातीचे पुरुष आहेत. मी गोऱ्या रंगाचा आहें; तेही माझ्याच वर्णाचे आहेत. या करितां, आपलें मन जर मजवर जातें, तर त्यांजवरही तें कां जाऊं नये? अलबत जावें ! !

सईबाई:–(मनांत) अरे नष्टा, काळिजाला घर पाडिलंस रे ! काय करूं? ( उघड, वरकरणी हंसून ) महाराज आपल्या सारखी मी विद्वान नाहीं. तरी पण, मला एक उत्तर सुचतं. " आपण माझे तीर्थरूप नाहीं. "

बाळासा०:–तसेंच आपण पण " म्हाळसाबाई नाहीं. "

सईबाई:-महाराज, म्हाळसाबाई काय आणि मी काय, स्त्रियांपासून म्हणून जें काय सुख व्हावयाचं तें दोघींचे ठाई एकच. दूध सोन्याच्या वाटींतून प्यायलं काय आणि करवंटीनें प्यायलं काय, गोडी भिन्न नाहीं.

बाळासा०:—बाईसाहेब, आपले तीर्थरूप काय आणि मी काय, पुरुषां पासून ह्मणून जें काय सुख व्हावयाचें तें दोघांचे ठायीं एकच! मद्य सोन्याच्या वाटींतून प्यायलें काय आणि करवंटीनें प्यायलें काय, येणारी गुंगी भिन्न नाहीं!!

सईबाईः—महाराज, ज्या पुरुषावर माझी प्रीति बसविणं अयोग्य, अशा पुरुषावर ती बसविण्याला आपण कसें सांगतां?

बाळासा०:—बाईसाहेब, ज्या स्त्रीवर माझी प्रीति बसविणें अयोग्य, अशा स्त्रीवर ती बसविण्याला आपण कसें सांगतां?

सईबाईः—( भिंवया चढवून ) हें काय बाई, मी बोललेलेंच बोलणें बोलतात.

बाळासा०:—( भिंवया चढवून ) हें काय बुवा, मी बोलावयाचेंच बोलणें बोलतात.

सईबाईः—महाराज, आपली व माझ्या तीर्थरूपांची बरोबरी लाऊन, इतके शास्त्रार्थ सांगतां; तर ह्माळसाबाईला वचन देऊन फशीं पाडावें हें आपल्या सौजन्याला उचीत काय? ( माना हालविते. )

बाळासा०:—बाईसाहेब, माझी व आपल्या तीर्थरूपांची बरोबरी लावून, इतके शास्त्रार्थ सांगत असतां, ह्माळसाबाईला वचन देऊन फशीं पाडलें हें ठाऊक असून, अशा नीचाधमाच्या नादीं लागावें, हें आपल्या सौजन्याला उचीत काय?(मान हालवितात.)

सईबाईः—( संतापून, क्रोधयुक्त स्वरानें ) शाबास! शाबास! चांगला धडा शिकविला तुह्मीं, यासाठीं, माझ्या बापाच्या ममते करितां व चांगुलपणा करितां त्याला देण्याला जें योग्य बक्षीस तेंच तुह्माला मिळणं रास्त आहे. या वाघिणीच्या गुहेंत येऊन अशी निंदा मांडली आहे तिची?

( असें ह्मणून, कोंचाखालीं ठेविलेली नागवी तरवार उजव्या हातांत धरून उंच करिते. )

सईबाईः—बोला, आतां झट्कन्, स्वीकार कोणाचा करितां?

बोला. ( डावा हात छातीवर ठेवून ) हिचा का ( तरवारीकडे बोट करून ) हिचा ?

बाळासा०:–( उजवा हात छातीवर ठेवून ) बाईसाहेब, हा मर्दगाजी, दोघींचाही स्वीकार करण्याला राजी आहे; परंतु दुष्कीर्ति पदरीं येईल याची भीति वाटते. पहिलीचें शरीर अतिशय कळंकानें मळलें असल्या कारणानें तिचा विटाळही करून घेण्याला मन धजावत नाहीं; आणि दुसरी, पहिलीच्या स्पर्शानें विटाळली आहे. तथापि या बिकट प्रसंगी दुसरीचा अंगीकार करणें अगत्य आहे. (मनांत) आपली गुप्ति आहेच समीप-तर प्रथम इला तर शूर्पनखेची[1] शिक्षा देऊं या. मग तेथून सुटकेचा उपाय. ( असें ह्मणून, उभें राहून गुप्तीकडे बघतात तों ती जागेवर दिसत नाहीं. )

सईबाई:–महाराज, माझ्या दासीबरोबर आपली गुप्ति बाहेर सुरक्षित आहे. तिची काळजी नको !

बाळासा०:–( मनांत ) हर, हर ! घात आहे. हें सर्व पहिल्यापासूनच ठरलेलें असावें. या मगरीनें आपल्या जावड्यांत मला पुरें पकडलें. यास्तव सांप्रत तिला वश होणें भाग आलें. शिपायाला हांक मारावी तर तो पडला लांब देवडीवर. व मग ही अस्वल उलटीच बोंब जास्त ठोकील; आणि येणेंकरून आपण भ्यालों असें दिसून येईल. विश्वासरावाचें ऐकिलें नाहीं त्याचें फळ हें. अस्तु. प्रस्तुत येथें दांडगाईचा पाड लागणें नाहीं; यास्तव कोल्ह्याच्याच वृत्तीचें अवलंबन केलें पाहिजे.

सईबाई:–महाराज, बोला बोला झटकन् या प्रमिलेचा[2] अंगिकार करितां किंवा या तिच्या तरवारीचा ? पुन्हा एकवार विनंति करितें, कीं ही आपली दीनदासी आपल्या करितां जीव देण्याला तयार आहे; व शेवटीं, आपला जीव घेण्यालाही तयार आहे. माझ्या प्रार्थनेचा

---

१ नाक कान कापण्याची शिक्षा. २ स्त्रीराज्यांतली राणी; जिचा पुढें अर्जुनाशीं संग्राम होऊन अखेरीला दोघांचा विवाह झाला.

अवमान करून आपण येथून वाड्याच्या बाहेर गेलां, ह्मणजे हाच माझा दिवाणखाना मला बंदीखाना होईल ! आपण जनांत माझा फजीत-वाडा कराल. शेवटीं अब्रू करितां मरून जायची पाळी येईल ! या परीस, आह्मां अबलांना छळून छळून मारण्या करितां उत्पन्न झालेलें आपलें अति सुरस लावण्य, हेंच कोणी, वरून अति मधुर भावणाऱ्या अशा विषाच्या फळांचें झाड, त्याचीं खांडें खांडें करून त्यांची रास येथें घालावी ती बरी ! मेले लोकांवर तरी उपकार होतील. तेणें करून माझ्यावर काय दोष येईल खुनाचा ? " कामकाजाचा बाहणा करून, मला एकटीलाच गांठून, हे मजवर बलात्कार करूं लागले; ह्मणून एक शस्त्र मी आमच्या दोघांच्या आड केलें; त्याजवर हे बेसावध पणें पडले " असें ह्मटलें कीं निकाल झाला. बोला. तुह्मी माझ्या येथें, भलत्याच वेळीं, पाईं, सडेच, एकांताच्या जागेंत, चालून आलां आहां; आणि ज्या तुमच्या नांवाला ह्माळसाबाई कीड लागलेली अबालवृद्धांना शहरभर आज माहीत आहेच ! बोला आतां या उपर तुमचा विचार. मगाशीं तीन तीनदां थै थै नाचत कोण होतें मला पाहिल्यावर, आठवतें मनाला ?

बाळासा०:–( मनांत ) ही जें जें बोलली तें तें खरें आहे. परंतु उघडपणें ' होय ' ही ह्मणतां येत नाहीं; ' नाहीं ' ह्मणतां येत नाहीं. मोठें बिकट संकट आहे ! हिच्या चरित्राच्या वर्णना वरून आपला जीव घ्यायला ही खचीत कमी करणार नाहीं. अरेरे, ही आमच्या हिंदुस्थानांत, ग्रीकलोकांच्या दंतकथांतील घातक ' सायरीन '[1] च ह्मटली पाहिजे ! !

सईबाईः–महाराज, ही विचाराची ' वेळ ' ही नाहीं अनी 'जागा' त्याहूनही नाहीं. एक 'हो' कीं, 'ना' मला पाहिजे. व्यर्थ

[1] आपल्या वेधक गायनानें वेडाऊन टाकून जीव घेणारी एक चारु गात्रि जल देवता.

कां दोघांचे हाल मांडले आहेत ! ( डोळ्यांतून अश्रु काढते ) महाराज, माझ्या डोळ्यांना भळभळ पाझर फुटले तरी आपल्या पाषाणासारख्या कठीण अंतःकरणाला यत्किंचित्सुद्धां द्रव फुटत नाहींना ! ( दोन्ही ओंठ तोंडांत घेऊन ) कांहीं चिंता नाहीं. हे अश्रु गिळतें. अनी आपल्या हृदयाला पाझर फुटावितें. ( डोळे पुसून ) पहा, महाराज आह्मी स्त्रिया ' वळलों तर सूत, नाहीं तर भूत आहों. ' महाराज अखेरचें सांगतें, एक हिचा प्रीतीनें असो भीतीनें असो, अंगीकार तरी करा; नाहीं तर ही तरवार घेऊन स्वहस्तें माझें गर्दन उडवून--या लोकांतून मला मुक्त केल्याचें यश घ्या कसें. ( तरवारपुढेंकरिते. )

बाळासा:०--( मनांत ) आपल्याला हीं दोन्हीही करणीं ' ना ' आहेत. आणि आतां भीतीमुळें वश होऊन तिचा अंगीकार करणें, याच्या सारखी दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाहीं. मी अजून वश होईन असें इला वाटतें, तर कांहीं चिंता नाहीं. हिला ठकवून तेवढी हातची तरवार मात्र घेऊं या. ( उघड, हंसून) बाईसाहेब, असें बळजबरीनें काम कोठें उठत असतें का? जरा सवडी सवडीनें घ्या. ' घे सुरी नी वाल उरीं ' असें केलें तर कसें होईल? पण असा हा कालीदेवतेचा अवतार कां आपण धारण केलात ?

सई०:--महाराज, आपल्या सारखा कोणी एखादा शुंभनिशुंभ भेटला, तर त्याची निपोता शांति करण्याकरितां.

बाळा०:--(तरवारीकडे बोट करून) बाईसाहेब, आपल्या या कोमल कराला असली ही कराल[1] करवाल[2] कष्ट देईल.

सई०:--खरंच तर. तिच्या करतां[3] तुमचं कठोर अंतःकरण जास्ती कष्ट देत आहे. ही त्याला कबूल करवील, समजलांत?

बाळा०:--( हंसून ) समजलों, समजलों; केंव्हांच उमजलों. मनांत पूर्ण दया भरली आहे; आणि हातांत ही कशाला उ-

१ भयंकर. २ तरवार. ३ पेक्षां.

गीच शोभेला? ठेवा खालींती. (असें बोलत बोलत तरवार हिसकून घेण्याला पुढें सरसावतात.)

सई०:-( दर्डाऊन ) मागें हटा; अहो, कपटमूर्ति, मागं व्हा. समजल्यें तुमचं कापट्य. ( दणूदण् पाय आपटीत ) कोण आहेत ग, पेरी-

(इतक्यांत एक चोर दार उघडून चार धिप्पाट दासी येतात.)

दासीः—जी, हुकूम सरकार.

सईबाईः—यांना पकडा.

( बाळासाहेबांना, दोहीं कडे दोन दासी जखडून धरितात. )

बाळा०:—बाईसाहेब,आतां मात्र आपण प्रमिलाराणी शोभतां खऱ्या.

एकदासीः—( बाळासाहेबांस उद्देशून ) महाराज, ह्येरीच का मरता उग? सरकार सांगतात तस कराना? त्ये काय वंगाळ हाये व्हय?

दुसरीदासीः—अग, तस कराया त्यांप जवळ काई नसलच तर? मंग काय करित्यात?

पहिलीदासीः—ह्ये अस भळूवानी काय कराव, आपुन बी मर्द असून शानी?

दुसरीदासीः—( हात ओंवाळीत ) अर बाबा, आमच्या धनिसाब तुमास्नी आडव घालघालू, घालघालू, प्वोटात अमृत क्वांबितात; अन तुमी कपाळ करव्यावानी नको का ह्मनता?

बाळासा०:—( मनांत ) काय शिंच्या अचकट आहेत, 'यथा राजा, तथा प्रजा' ( दीन वदन करून, उघड ) प्रभो; असला हा नीच जन्म तरी कशाला दिलास? स्वतांला त्रास; लोकांना त्रास! बाईसाहेब, या जिवाचें आतां आपण चाहील तें करा. एका अर्थी हा जीव मेलेलाच बरा! मज चांडाळासाठीं दोन स्त्रीहत्या घडणार यापेक्षां मरण पुरवलें.

( बाळासाहेब आपली मान पुढें करितात व सईबाई तरवार खालीं करते. )

बाळासा०:-तर बाईसाहेब, आतां उशीर लावूं नका. 'एक घाव दोन तुकडे.' ( मान आणखी पुढें करितात. )

सईबाई:-(मनांत) या वेळीं, यांला जर आतां प्रीतीचें चिन्ह दाखवलं तर खचीत वश होतील. तर यांचं आतां चुंबन घ्यावं. ( उघड ) अग, पुढें आणा त्यांना. ( चुंबन घेण्याला आपली मान पुढें करिते. )

बाळासा०:-( मनांत ) या मांगिणीच्या गात्रांला पाझर तर सुटला ! ( उघड ) हर, हर ! म्हाळसाबाई, तुमचें शांतवन करण्या करितां तुमच्या जिवलग मैत्रिणीकडे आलों असतां, मजवर असा कहर गुजरावा काय? एका कवीची उक्ति शब्दशः खरी आहे:-

" धरायाला जातां उदकिं बुडत्या, हाचि बुडतो ॥
हरूं इच्छी व्याघ्रानिं पडत त्या, हाचि पडतो !! "॥

सईबाई:-महाराज, वाघिणीच्या तोंडांत अजून पडलां आहां कोठें ? पडायचं तें अजून पुढंच आहे !

( पडद्या पलीकडे गलबला होतो. )

" दुष्टे, चांडाळणी, कधीं पडणार नाहीं! सरळ मार्गानें चालणारा मनुष्य कधीं पडणार नाहीं; समजलीस ! ! धाड्, धड्; धाड्, धड् ! ! ! "

एकदासी:-( सईबाईस ) सरकार, पळा ! ह्ये बघा, दरोजा फोडून शी कुनी ह्रोन काळे काळे भिल् तरवारी घेऊन येताहेत! !

(इतक्यांत भयंकर वेष घेतलेले दोन पुरुष येतात; व सर्व भयाभीत होऊन जागच्या जागीं थबकतात. )

बाळासा०:-(त्यांस निरखून पाहून) हे विश्वंभरा, हे जगन्नाथा, तुझा महिमा अचिंत्य होय. हा माझा गुणनिधी गुप्तठेवा येथें कोठें प्रगट झाला? ( धांऊन जाऊन एकाच्या कंबरेला मिठी

१ 'हे' चा उच्चार लांब.

घालतात; व स्फुंदून रडूं लागतात.) माझी गाउली आह्मां वांसराला सोडून कोठें गेली होती? माझ्या बोलण्याची मला क्षमा करशील का ग बये? मी फार फार चूक केली. माझ्या प्राणदात्यांनो, तुह्मी मला क्षमा करा. या तुमच्या लेंकरावर गय करा. (दुसऱ्याच्या कमरेला मिठी घालतात.)

दुसरा पुरुषः–बापजी, ये वखत तमे आमाला छोडेल, तो ए-बयरीच्या गर्दन काटतो. ( सईबाई वर दांत ओंठ खातो. )

पहिला पुरुषः–( सईबाई पळूं लागते, तिला भुईवर लोटून देऊन) बाजार बशव्ये, कोण वाघिणीच्या तोंडांत पडणार? बोल जलदी. ही पहा वाघीण आली ( तिच्या उरावर तरवार ठेवतो. )

दुसरा पुरुषः–अरे भाई, कापी नाख रांडेच्या मान !

बाळासा०:–( पुढें होऊन ) बाबांनों, तुह्मांला पदर पसरतों, तिला मारूं नका. इतकें मला मागणें द्या. हल्लीं आपला उलटा काळ आहे ! ही गोष्ट आपणाला फार जड जाईल. तशांत, तुमच्या शूरांच्या शुद्ध तरवारी त्या अपवित्र अवलेच्या रक्तांत रंगून पडण्याला पात्र नाहींत.

पहिला पुरुषः–बाळासाहेब, ही विषाची वेल मुळासकट ठार केलेली बरी. पुढें मागें नडेल बघा.

बाळा०:–नको, नको जामदार. आपल्याला तिच्याशीं काय करायचें आहे? अतःपर तिच्या सावलीचाही विटाळ होऊं दिला नाहीं ह्मणजे झालें. सोडा तिला. आपल्या उभयतांना मजकरितां फार श्रम झाले.

दुसरा पुरुषः–बापजी,हमारा सरमनुं सारथक तो थयुं;एच बहु.

पहिला पुरुषः–( तरवार उचलून ) बाळासाहेब, तुमच्या ह्मणण्याकरितां ह्मणून सोडतों इला. पण नीट विचार करा. आपण ही दुखावलेली नागीण जिवंत राहूं देतांहों, हें ठीक नव्हे.

---

१ गाय.

बाळासा०:–आपण तिचे दांत पाडिल्या प्रमाणेंच झालें. तर चला आतां घरीं जाऊं. घरची मंडळी काळजींत असतील.

पहिला पु०:–निदान तिचे खरोखरीचे तरी बत्तीस कोसळाला पाहिजे होते. ( सईबाईस उद्देशून ) जा, पापिणी; या पुण्य प्राण्याकरितां तुला जीवदान देतों. ( बाळासाहेब व ते दोन पुरुष निघून जातात. )

सईबाई:–( उठून, दांत ओंठ खात खात, व डोळयांत अश्रु आणून ) गेले, मेले मांग ! मला दुःसह दुःखाच्या, लज्ज्येच्या, निराशेच्या खंदकांत गाडून गेले ? आतां मी आहें अनी माझा कावा आहे. अरे, ही दुखावलेली नागीण–तुमच्या नरड्यांचा घोंट घेईल, तेंव्हांच शांत होईल. ( छातीला हाताचें मधलें बोट लावून ) अरे, मूर्खांनों, ही विस्तवाची ठिंगळी–तुमच्या घरादारांची होळी पेटिवल्याखेरीज राहील ? माझ्या अंगाला आग लावून गेलां काय ? ठार करतेत, तर भूत होऊन मानेस बसलें असतें–( एका दासीला उद्देशून ) अग, ए, इकडे ये; अनी मी सांगतें त्या मनुष्याला, "मी ताबडतोब बलाविलं आहे" असें सांगून घेऊन ये. ( तिच्या कानांत कांहीं पुटपुटते ) जा, नीघ. ( ती जाते. )

सईबाई:–( इतर दासींना ) अग, मी खालीं जातें. तुह्मीं सर्व येथले दिवेबिवे मालवून, आटपाआटप करून या लौकर. (सईबाई जाते. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश ५ वा.

स्थळ:–सईबाईच्या घराजवळचा बाग. वेळ:–संध्याकाळ. ( म्हाळसाबाई व सईबाई हवा खात, गोष्टी करीत बसल्या आहेत. )

म्हाळसा०:–बाई, तुझ्या येथें आल्यापासून आज चार दि-

वस जिवाला फार आराम वाटतो. शहर काय मेलं एक सारखं कलकलून गेलेलं असतं. तशांतून घरीं घड वेळेस पथ्यपाणी दिखील मिळावयाची मारामार. अनी तेंही असो; पण सारा दिवसभर हिडिस का फिडिस करीत असायचं. मेला सुखाचा एक शब्द तरी? यानं तर बाई पित्त जास्तीच भडकतं.

सई०:—बरं बाई, तुला सुखास पडलं म्हणजे माझी आणण्याची बूज. आणखी, तूं आल्या पासून माझ्या पण जिवाला फार करमणुक झाली. आज दोन वेरार झाले, चित्ताला जें म्हणून भ्रमग चाललं आहे, तें सांगतां पुरवत नाहीं. अन्नपाण्याचा दिखील द्वेश झाला आहे, तुझ्या बरोबर म्हणून तरी चार घांस खातें; अशा स्थितींत कोणी जिव्हाळ्याचं भेटलं तर बरी गोष्ट. नाहीं तर माणूस फट्कन् वेडं व्हायचं !

म्हाळसा०:—हो खरंच तर. माझी नव्हती का तशीच दशा झाली एकदां? डोक्यावर डावें सुद्धां द्यायला तयार झाले होते घरांत.

सईबाई:—पुरे मेल्या त्या दुःखाच्या गोष्टी आतां. गडे, जरा गमतीकरितां नाटक काढूं का एखादं वाचाला?

म्हाळसा०:—बाई, आतां मला कशाची गोडी राहिली नाहीं! बरं, पण तुला गोड वाटेल तर काढ एखादं चांगलेंसं. कोणतें काढितेस?

सईबाई:—अग, तें; ज्याची आपण पूर्वी पारायणांची पारायणं केलीं आहेत, तें. माधुक 'जयपाळ नाटक'! ( हांसते ) तुला आठवतं का, तूं व्हायचीस कमळजाबाई, नी मी व्हायची सारजा; अनी मग आपण वाचूं लागलों कीं खाशा बाबांनीं खो, खो, खो, हंसावें. काय ग बाई, ते गमतीचे दिवस गेले; तें निष्काळजी वय गेलं; तीं मोकळ्या मनाचीं मुढाळ माणसं गेलीं; अनी तसलीं रसिक व मार्मिक नाटकं पण आतां बहुशा गेलींच.

---

१ पंधरादिवस. २ लाल; डाग.

म्हाळसा०:-खरंच तर. बाई भविष्यकाळाचा विचार करूं लागलं,तर भूतकाळ फार बरा म्हणवितो. सारं मेलं मागलं आतां स्वप्नवतं भासतं. त्या गोष्टीं काल घडल्याशा वाटतात ! बाई, आपण जेव्हां सगळ्या सरकारवाड्यांत होतों खाशा बाबांबरो- बर, त्या वेळच्या गमती तुला आठवतात का ? कितिदां ग बाई रुसायचं नी फुगायचं दिवसांतून; अनी कितिदां समजा व्हायच्या. ती, मेली मुजुमदारांची चिटकी होती, ती- तिचं कांहीं झालं कीं ' तुझी गडी फू '

सईबाई:-( खिन्नमुद्रा करून) अग ए, ती पानशांची बनी होती, ती-ती कन्हाई ग-चार रोज झाले-दु वेतून गेली !

म्हाळसा०:-अरेरे, बायको पण बायको होती. साखसुर- त; बांधेसूध; अनी स्वभावानें पण फार कोमळ. तिचा चेहरा कनाईग-सगुणाबाईंना लपवावी अनी तिला काढावी. जशा कांहीं एकमेकींच्या पाठीवरच्या सख्ख्या बहिणीच !

सईबाई:-एकदां आपण बाबांशीं गप्पा करीत बसलों होतों मोतीबागेंत, अनी तितक्यांत आली बाई, तेथें सगुणाबाई, तुझी संवत. ( हांसते ) काय ग, बाई तिचं तं नखऱ्याचं चालणं; अनी काय मुरके माराचे ! अनी बोलाची तरी कशी बाई, खु- ब्बीदार. अनी अगदीं मोजकेच शब्द बोलाची. तुमच्या आम- च्या सारखं वायफळ बोलणं नव्हे. बाबा सुद्धां तिच्या तोंडाक- डे टकटक पहायला लागल्या ! !

म्हाळसा०:-बाई, यांनीं तसं कां नसावं ? मागल्या जल्मीं हरताळकाच तशा पुजल्या आहेत त्यांनीं. तुमच्या आमच्या- गत नव्हे.

सईबाई:-गडे ताई, आतां विचारतें ह्याचा राग नकोहो आ- णूं मनांत. ( हंसून ) आतां कांहीं बाळासाहेबांच्या विशीं तु- झ्या मनांत येतं का ?

म्हाळसा०:-कांहीं एक नाहीं. बाई, असें आहे, एखाद्या

गोष्टी विषईं अहोरात्र आशा करतां करतां ती अखेरीला मिळत नाहीं, अशी मनाची एकदां पक्की खात्री झाली, अनी मनानें एकदां उलट खाल्ली कीं, मग त्याला त्या गोष्टीचा उलटा तिटकाराच येतो; अनी तो इतका येतो कीं, कांहीं केल्या पुनश्च निघायचा नाहीं. तें स्वभावानें फारच थोरमनाचे असल्या कारणानें, त्यांजविशीं मनांत तिटकारा मात्र आला नाहीं. वारंवार मनाला येवढंच अतिशय वाईट वाटतं कीं, माझ्यापाईं त्यांच्या अब्रूला फार फार धक्का पोंचला. ( जरा दुःखाची मुद्रा दाखवून, व स्तब्ध बसून ) नाहीं झटलं तरी आठवण कशी मोडेल ? (किंचित् प्रफुल्लित मुद्रा करून ) बाई; गेल्या वर्षींचे हेच दिवस ते. एक दिवस काय झालं, मी उभी होतें आपल्या सज्यांत अनी ते होते आपल्या गच्चीवर; तेंव्हां त्यांनीं आपल्या हातांत एक मोठा थोरला आरसा धरून, व इकडे तिकडे कोणी नाहींसें पाहून, तो मज पुढें धरिला. नंतर, त्यांत जें माझं प्रतिबिंब पडलं होतं तें "तुझं आहे" असं मला खुणांनीं दाखवून, त्यांनीं त्याचें दोनदां तीनदां प्रीतिपूर्वक चुंबन केलं. काय बाई; विषयलंपटपणा आहे हा !

सईबाई.—( हंसून) काय मेली बोलते. आपल्या चेष्टा कमी होत्या का ? तें राधाकृष्णाचं चित्र स्मरतं का ? 'त्यांतला कृष्ण तो ते' अनी 'राधा ती तू' चना ? हें कोणीं प्रथम त्यांना दाखविलं ? आणखी ती, संगमरवरी मुरलीधराची मूर्ति, जिचें आवडीचें नांव तूं 'बाळकृष्ण' ठेविलें होतेंस ! काय मेल्ये, त्यांच्या देखत, त्याच्याशीं एकमेकांच्या गळ्यांत फुलांच्या माळा अडकऊन लग्न काय लावाचीस; त्याच्या खांद्यावर हात काय टाकाचे; अनी त्याचे मुके काय घ्यायचे ! अशा चोरून चोरून मी तुझ्या शंभर युत्त्या पाहिल्या असतील.

( दोघीही जरा मुकाट्यानें बसतात. )

सईबाईः—( मनांत ) इचं मन आतां बरंच खुललं आहे. त सोईसोईनें तो बूट काढूं या. रंगोपंताकडून फौजदाराकडला बार तर भरून ठेवलेला आहेच. कायती हिला तेथें न्यायची खोटी आहे. ( उघड ) सुंद्राताई, मी फार गोष्ट वाईट ऐकिली आहे कीं, बाळासाहेबांनीं ह्मणतात अंथरूण धरलें आज पंध्रा दिवस. इथल्या वैद्यांनीं तर हात टेंकले. आतां शेवटला उपाय, मुंबईहून गोरा डाक्तर रोज रोजी पांचशें रुपये ठरवून आणिवला आहे. कोणत्या थराला जाते गोष्ट कोण जाणे? एकदां तर भुईवर उतरले होते ह्मणतात! कायबाई, आई ह्मातारी—बायको तरणी ताठी पोर—( डोळ्यांना पाणी आणते. )

ह्माळसा०:-( घाबरून ) हरि, हरि! काय झालं त्यांना?

सईबाईः—कोणी ह्मणतात 'सन्निपात,' कोणी ह्मणतात 'विषम!'

ह्माळसा०:—अग, पण मग हें इतके दिवस गुप्त कसं ठेवलं तुला माझ्यापासून?

सईबाईः—( मनांत ) गोळी तर लागू पडली. ( उघड ) ह्मटलं, उगीच तुला तरी कशाला कळवूं? त्यानं तुझी दिखीत जास्तच प्रकृति बिघडायची! हल्लीं कांहीं तुझी चर्या बरी वाटली ह्मणून आतां काढली गोष्ट!

ह्माळसा०:—( तिच्या अंगावर अंग टाकून ) बाई तुला आतां सर्व लाज सोडून सांगतें, मीं त्यांना मनानें वरिलं आहे. करितां तुझ्या पायां पडतें, या क्षणीं तूं कृपा करून मला एक वार शेवटची त्यांच्या चरणांची भेट करीव. बाई, ही माझ्या पोटांतली गोष्ट, तूं माझ्या जिवाची जिवलग ह्मणून तुजजवळ बोललेंहो. माझं सर्व आउक्ष त्यांना जावो. बाई, तुझ्या पायां पडतें, मला भेट करव.

सईबाईः—( मनांत ) साधलं ग, साधलं संधान. ( उघड )

---

१ पगार.

हातातिच्या इतकंच ना! आज रात्रींसच करतें. तर चल लौकर जेवण खाण आटपून घेऊं.

झाव्ळसा०:—गडे, आतां मला कांहीं नको!

सई०:-( उठून ) पण घरांत तर चलशील आधीं. काय मेले, मानलेला पति तो काय! अनी इतका जीव जाळाला व्हावा कशाला त्याच्यापाईं! गेलं; भेटलं; आलं. ( हंसून ) मानलेले आईबाप आहेत. मानलेले भाऊ, बहिणी, गुरुही आहेत. परंतु बाई, मानलेला नवरा आजच ऐकला! वेडी कन्र्ची! चल घरांत जेव. मग आहेच तिकडे जायचं. ( मनांत ) मला हेंच पाहिजे.

( दोघी उठून जातात. )

अंक ४ था समाप्त.

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला.

स्थळः—मस्तुबाग; वेळः—रात्रींस दहा वाजण्याचा समय.

( बाळासाहेब, सगुणाबाई, आणि गुणाजीबावा सईबाई कडील झालेल्या गोष्टी दूरच्या एका बंगल्यांत बसून, बोलत बसले आहेत. )

बाळासाहेबः—काय सांगूं जामदार आपल्याला, मला तर वाटलं पहिल्यानें कीं, ही कैदाशीण आतां मला कंठेस्नान घालणार. कारण, मी तिच्या तीर्थरूपांची केली होती उद्धारगति.

गुणाजी०:—तो आहे यथंभूत सारा व्रत्तांत माहीत. मीं अनी रस्तम भाई तिच्या रंगमहालाच्या बाहेरल्या अंगालाच होतों तिच्या पाळथींवर बसलेले.

सगुणाबाईः—जामदार, आपल्याला रस्तमभाईनें घेतलं ना खालीं दोर टाकून; परंतु तो स्वतां कसा गेला वर चढून ? सईबाईचा वाडा तर उंच आहे.

गुणाजी०:—सूनबाई, हें कसब पडलं त्याच्या घरचं. दोन तीन घटका रात्र झाली होती; साधारण काळोख होता; अनी त्या वाड्याच्या मागल्या अंगाला मनुष्याचं वारं सुद्धां फिरत नव्हतं, असं पाहून त्यानं भिंतीला खिळे मारून त्यांजवरून गेला वर चढून. व मग मला दोरानं वर घेतलं. अनी तिचं घर आमच्या सरावांतलंच; मोजकेच गेलों त्या ठिकाणीं. दैववशात् तेथें कोणीं भेटलेंही नाहीं.

बाळासा०:—जामदार, त्या दिवशीं त्या वाड्यांत माणसंच

---

१ गर्दन उडविणें.

न्हतीं; तर भेटणार कोठून ? ( जरा थांबून ) हें पहा, शहाणे मित्र आणि विश्वासु पिढोजात चाकर लागतात ते येवढ्याच कामा करितां. मीं आपल्याला टाकून बोललों, व आपण निघून गेलां. त्या वेळेस आपल्याला विश्वासरावांनीं राहविलें नसतें तर ते दिवसचा प्रसंग निभता ना.

सगुणाबा०:—हें काय बाई, भलतंच बोलणं ? रावसाहेब भावोजींनीं यांना न जाण्याविशीं आग्रह केला, हेंहो खरं आणि यांचे पाय तरी आह्मांला सोडून नौसरीस जाण्याला घेत होते कोठें ? ज्यांनीं आह्मांला हाताखांद्यावर खेळवून वाढिवलं, प्रत्यक्ष पोटच्या पोरां पलीकडे आमच्यावर माया केली, ते आतां वृद्धापकाळीं आह्मां लेंकरांना सोडून जातील ? आणि आह्मीं त्यांना जाऊं देऊं ?

गुणाजीः—बाई; तुझे बोलण्यानें तानभूक हरते. ( हंसतात. )

सगुणाबाईः—( हंसून ) हें काय बाई, पोरांचीं वेडीं वांकडीं बोलणीं वडिलांना गोड लागायचींच. ( बाळासाहेबांकडे बघून ) भाऊजी यांची खबर सांगतपर्यंत मला चार दिवस अन्न सुद्धां गोड लागलं नाहीं !

बाळासाहेबः—(हंसून)यँव, केवढी ममतेची आली आहे ? जसं कांहीं लोकांना कांहींच नाहीं ? मला तर जामदारांची भेट होईपर्यंत रात्रीची झोंपसुद्धां लागली नाहीं ! झोंपेंत सुद्धां जामदार दिसत ! ! ज्या वेळेस हे भेटले तेव्हां माझ्या सुटकेसाठीं मला आनंद नाहीं झाला इतका, यांच्या भेटीसाठीं डोळ्यांना खळ खळ धारा वाहूं लागल्या.

सगुणाबाईः—एकदां मी लहान होतें, तेव्हां गुणाजीबावा ( गुणाजीरावांकडे पहाते ) गेले होते नौसरीस आपल्या वडिल मुलाच्या लग्नाला. मग काय ? मला वाटलं, आज माझी आईच सोडून गेली मला या जगांतून ! मी रड रड रडल्यें !

गुणाजीः—सूनबाई, रुस्तमभाई झाला, मी झालों, आह्मीं

आतां पिकलेलीं पानं. तुझांला केव्हां सोडून जाऊं याचा नेम नाहीं. कल्पना कर आज मी मेलों तर तूं काय करशील!

( इतक्यांत एक पाल चुकचुकावते. )

सगुणाबाईः—मेल्ये, चुक चुक कशाला करतेस कर्मोला? ‘कृष्ण, कृष्ण’! ( गुणाजी बावांस उद्देशून ) मामाजी, आपण जर मेलां, तर जसं वाघाला, मगराला पेंढा भरून ठेवतात, तसं आपल्याला कापूस भरून ठेवीन! ह्मणजे माझे मामंजी जन्मावेरीं मजजवळ राहतील. ( हांसते. )

गुणाजीः—( हंसत ) आहाहा, बोलली सून बाई! उजेड; एजेड!!

बाळासा०:—अहो पण जामदार, विश्वासरावांकडे गुप्तपणें सव्वा आठवडापर्यंत रहात असतां मला त्याचा मागमूससुद्धां कसा कळला नाहीं हो?

गुणाजीः—यांतला मूळ मुद्दा इतकाच कीं, तेणेंकरून आपल्या मनांत माझ्याविषईं काळजी वसून घडलेल्या गोष्टींचा कांहीं तरी पश्चात्ताप व्हावा. आपण सुजाण आहां ह्मणून हे सर्व आमचे उद्योग. असो, मग ज्या दिवशीं आपण सईबाई कडे जाण्याविशीं रावसाहेबांची सल्ला विचारली त्या दिवशीं "नजाणों कदाचित् आपल्या बाळासाहेबांवर एखादी भलतीच वेळ येऊन ठेपेल, यासाठीं आपण व रस्तमभाई असे दोघेजण उभयतां त्यांचे पाठोपाठ असावें." असें विश्वासरायानें आह्मांला दोघांला कळिवलं.

सगुणाबा०:—रस्तम आमचा एक इंद्रनीळमणी[1] आहे! असले असले धुरंधर आमचे वाली आहेत, ह्मणूनच बरं. कितिदां जिवावरलीं संकटें आलीं त्या रांडेच्या नादीं. काय काय जामदारांनीं व भाचेजींनीं उपाय केले; पण ऐकतं कोण येथें? ( बाळासाहेबांकडे वांकड्या डोळ्यांनीं बघते. )

1 हें रत्न काळें असतें.

गुणाजीः–( हंसून ) मूलबाई, आतां पुरे. उगीच न को छळूं त्याला. पण बाई, तूं कांहीं ह्मण, तुला सागतों, एकंदरींत ह्माळसाबाई सारखी पोर होणं नाहीं.

बाळासा०:–( हंसून ) अग ए, रिकामे डोळे कां फाडतेस मजवर ? पहिल्याप्रथमची मात्र मी आपली चूक पदरीं घेतों. आणि ती तरी माझी नव्हे;माझ्या दयाळु स्वभावाची ह्मण. ही पहा त्याला साक्ष. ( असें ह्मणून एका संदुकींतून एक लहानशी मोहोरबंद केलेली पुडी काढून तिच्यापुढें ठेवितात. )

सगुणाबा०:–आपल्या खोलपणाची हा शिक्कामोर्तब पक्की साक्ष देतो. फोडूं का ही ? ( बाळासाहेब फोडण्याविषयीं मान हालवतात. )

सगुणाबा०:–(ती फोडून )अगबाई, हें त्या रांडेचं पत्र का? जशी कांहीं दहा हजारांची हुंडीच असं जपून ठेवलं आहे! आणखी हें दुसरं काय या किनखापी चिंधींत ? ( हंसून ) अरे त्या हिरकणीची आंगठी ! ! झाल्याबाई, आतां एकाच्या ऐवजीं दोन घणकोर साक्षी झाल्या–पुऱ्या पटल्या. (पत्र वाचूं लागते):–

" श्रीमंत, सकलगुणालंकरण, अखंडितलक्ष्मी अलंकृत,–

( इतक्यांत एकटा पिंगळा बोलतो. )

गुणाजीः–एकटा पिंगळा बोलला ? हें वाईट आहे. ( सर्व तिकडे कान देतात. )

बाळासा०:–आजचसा काय; पण असा तेवींपासून बोलत आहे ! आणि आतांशीं कुत्रीं तरी, जशीं कांहीं माणसें रडताहेत, अशीं रात्रीस हेल काढून रडत असतात ! काय आठवलें आहे त्यांना न कळे ! !

सगुणा०:–आजची एकादशी,सोमवार ना ? आजच तीन दिवस झाले. घरून स्वारी गेली होती महाराजसाहेबांबरोबर बेचरांजीस[1]. मला होता शुक्रवार. तेव्हां तिनसांजची प्रदोषपू-

---

[1] बडोद्याजवळ एक देवीचें महास्थान आहे

नेला देवघरांत बसलें असतां कौलारावर "गुड्गुड् गुड्गुड्"! असा तीनदां घुमलेला आवाज झाला. तो काय असावा याचा विचार जों उपाध्ये बोवा अनी मी करतें तों असा भयंकर रडवा शब्द एका प्रकारच्या दिवाभीतांची नरमादी वाड्याजवळच्याच दोन झाडांवर बसून करूं लागलीं. तेव्हां मी इतकी भ्यायलें कीं, हातांतलं जळतं निरांजन फट्कन् खालीं पडलं!! उपाध्ये बोवांना लगेच शांत करण्याविषईं सांगितलं; पण दिवस तुटके आल्या कारणानं अजून ती राहिली आहे. दूधपाणी त्या जागीं तेव्हांच्या तेव्हांच शिंपडवून तुळशीपुढें निरांजन ठेवलं. पण मनाची मिरमिर कोठें जाते?

बाळासा०:—जामदार, हें काय बरें असें? मला अलीकडे मनाला अगदीं उदास उदास वाटतं. रात्रीस माजघरांत सुद्धां एकटं फिरण्याला मला भीति वाटते. परवांच्या दिवशीं स्वप्नांत, काय सांगूं आपल्याला, जें भय वाटलें तें!

( गुणाजीबावा हुकार देऊं लागतात. )

सगुणाबा०:—जामदार, 'हुकारा' देऊं नका. रात्रीं स्वप्नाला हुकार देऊं नवे!!

बाळासाहे०:—"मी जसा कांहीं खोल रानांत गेलों आहें, पुढें एक भयाण मैदान लागलें. तेथें चोहींकडे समाधींच समाधी[1] दगडी बांधलेल्या आहेत. कोठच्यांत तुळस आहे तर आहे; कोठच्यांत नाहीं. त्यांच्यामध्यें एकच कळंबाचा वृक्ष, पानांनीं फुलांनीं, विरळ विरळ फळांनींही गजबजून डंवरलेला, व त्यावर एक, सुवासिक फुलांनीं ओथंबलेली मोगरीची वेल चोहीं अंगांनीं लपेटून राहिली आहे; आणि एक जवळच्याच बाजूला कुसरीचीही वेल वाढून, आपलया फुलांच्या भारानें लवलेल्या शाखा त्या वृक्षाच्या खांद्यावर टाकीत आहे. असा चमत्कारिक देखावा पाहून, मनांत विस्मय होऊन त्यांची शोभा पहात तट-

---

1 मृतशरीरावर स्मरणार्थ जें तुलसीवृंदावन बांधितात तें.

स्थ उभा राहिलों. एक निमिष लोटलें न लोटलें तों आकाश गडगडून मोठ्या वादळाला प्रारंभ झाला! काळोख नी वारा ह्मणतो मी! इतक्यांत कड् कड् कड् कड् कडकडाट करून त्या झाडावर वीज काड्कन पडली!!"

सगुणा०:-( कडकड बोटें मोडून ) जय जगदंबे, आई तुळजापुरच्या भवानी, ईडपीड टळो! अमंगळ जळो! ( भूईची ढेंपळी काढून अंगारा लावते. )

बाळासा०:-जमादार, " मला वाटलें मी उंच वायुमंडळांत उडून, गरगर भ्रमण करूं लागलों व मग धाड्कन खालीं पडणार " तों जागा झालों!!

गुणाजीः-मलाही तसंच स्वप्न पडलं बाबा. कालरात्रीं थोरल्या दिवाणखान्यांत निजलों होतों एकटाच. मध्यरात्रीच्या सुमाराला मला वाटलं, माझा ऊर कोणी झोपेंत दडपला. तसा जागा झालों. पुन्हां डोळा लागतो न लागतो तों " एक मोठा काळा काळा कभिन्न मस्त रेडा आहे! विस्तवासारखे डोळे लालबुंद झालेले आहेत; रक्तासारखी लांब जीभ लळलळ करीत आहे; त्याचीं अवाढव्य शिंगें टवकारून उभारलेलीं आहेत; असा तो चवताळून, रेंकत रेंकत त्यानें माझी खूप लगट केली! मी धूम जीव घेऊन पळतें; तों अखेर त्यानं धडक ठोकन टाकली माझ्या अंगावर!!" असें स्वपन पाहून दचकून जागा झालों. तेव्हां ऐन मध्यरात्रीचा भर होता. जांवळी हंडी एकटीच मंदमंद तेवत होती; मी बसल्याबस देवाचं नांव घेत असतां माझा जरा डोळा लागला मात्र, तों इतक्यांत एकाएकीं माझ्यापुढें अक्राळविक्राळ मनुष्याकृति छाया उभी राहिली. डोळे उघडून पहातांच चकूकन् डोळ्यांपुढें अंधेरी येऊन पडलों; तो पुन्हा डोळे उघडण्यास छाती होईना. अंमळशानें डोळे लिकलिके करतों तों पुन्हां ती सावली खडीच उभी पुढें. पुन्हां डोळे मिटले,

पुन्हां उघडले; तरी तेंच. मी धीटांतला धीट. पण त्यावेळेस माझीसुद्धां पांचांवर धारण बसली ! पुढें आतां–

( इतक्यांत एक हुजऱ्या वरती येतो. )

हुजऱ्याः–जामदार, खालीं दोन मोठे सरदार आलेत भेटीला. मग कसं ?

बाळा०ः–एवढ्या रात्रीं भेटीला ! जामदार, कसें ?

हुजऱ्याः–फार जरूरीचं काम आहे, ह्मणून सांगतात. थोडंच आहे ह्मणतात.

गुणाजीः–सडेच आहेत ?

हुजऱ्याः–जी, व्हय.

गुणाजीः–येऊंदे वर. सूनबाई, जरा आंत व्हा.

( सगुणाबाई पडद्यापलीकडे बसते; आणि पायांपर्यंत पोकळ जोमे घातलेले, डोक्यावर भरजरी मंदील बांधलेले; व कानांत चौकडे घातलेले, दोन तरुण सरदार येतात व बाळासाहेबांस मुजरा करितात. )

बाळा०ः–( मुजरा घेऊन ) बसावें उभयतां आपण.

गुणाजीः–आपल्या पोषाखावरून आपण हैदराबादेकडले असावेतसें वाटतें.

एक सरदारः–होय तिकडचेच.

सगुणाबा०ः–( मनांत ) अरे वा. काय तिकडचे लोक सुबक असतात हो ! शुद्ध चित्रं रेखलीं आहेत !

बाळासा०ः–( मनांत ) हं. एक सरदार तर आले ध्यानांत. आगगाडीच्या डब्यांतलेच ! दुसरा कोण ? अं. हं. आलें ध्यानांत; पण पुरेसें नाहीं आलें अद्याप. तर आतां ?

दुसरा सरदारः–( बाळासाहेबांकडे पाहून ) एकांतीं चार शब्द बोलायचे होते.

गुणाजीः–असं का ? तर मी जातों ह्मणजे झालं. मलाही कालचं फार जाग्रण आहे. ( जाऊं लागतात. )

---

१ पायघोळ अंगरखे.

बाळासाहेबः—( तिच्या तोंडाकडे निरखून पाहून ) अरेरे, तुला मात्र क्षयानें पुरें गांठलें. शिव, शिव ! ( तिला कवटाळून धरितात व वारंवार तिचें चुंबन करित ) असलें हें शांत, सुशील, सुस्वरूप रत्न लौकरच हरपणार कीं काय? प्रिये झाळसे, राजसे, तुझे प्रयत्न व एकनिष्ठपणा पाहून फार फार मनाला विस्मय आणि खेद होतो. आतां तूं खचीत दयेला पात्र आहेस. आतां तुझा अंगीकार तर करतोंच. मग मला पाप काय डसेल तें डसो;लोकें काय नांवें ठेवितील तीं खुशाल ठेवोत.तुझ्या सारख्या प्राण्याला पतिही स्तुत्यच पाहिजे होता ! याला म्हणावें दैवयोग ! ! खरोखर, प्रिये, तुझ्या प्रतीची स्त्री मिळणं फार दुरापस्त आहे. अहाहा, किती धन्य मी कीं, मला देवानें तसलेंच एक रत्न दिलें आहे. ( हंसून ) ए—माझ्या—लाडक्ये—प्रिये—झाळसे, ( तोंड कुरवाळून ) हा तुझा क्षयानें क्षीण झालेला मुखचंद्र या माझ्या अंकरूपी पर्यंकावर विश्रांति घेऊन याक्षणीं अक्षय हो. ( असें म्हणून तिला आपल्या मांडीवर बसवूं लागतात. )

झाळसा०:–( जरा दूर होऊन प्रफुल्लितमुखश्रीनें ) नको महाराज, ही दासी त्या बहुमानाला योग्य नाहीं. जरी मी या पायांना अनन्यभावानें वरिलं आहे, तरी त्यांची ही केवळ दासी आहे. ती महत्पुण्याई सगुणाबाईचीच. त्यांच्या नखाग्राची सुद्धां मला योग्यता नाहीं. या पायांच्या संबंधानें त्याही मला परम पूज्य आहेत. कारण, या चरणांच्या त्या अर्धांगी आहेत. त्यांच्या मानाचा अपलाप करून त्यांच्या पायरीला पाय या त्यांच्या दासीकडून कधींही न लागो. ( हात जोडून पुढें उभी रहाते. )

सगुणाबाई:-( एकाएकीं पुढें येऊन ) शाबास ! झाळसाबाई, शाबास ! बाई, मला तुला एक वार कडकडून भेटूंदे. ( दोन्ही हात पसरून पुढें होते. )

पहिला सरदार:—याचा आपणास राग मात्र न येणें, असें मागणें आहे.

गुणाजी:—आपण आल्यानें येथून लौकर तरी माझी सुटका झाली. नाहीं तर मला ह्माताऱ्याला वाराची तोफ होई तों कोण सोडतो ? आपलेच आभार मला उलटे मानणं भाग आहे. ( जातात. )

दुसरा सरदार:—मी पण खालीं जातों त्या तजविजीकरितां.

( तो जातो; आणि पहिला सरदार दार बंद करून जामा व मंदील अंगावरून घाईनें काढून टाकतो आणि बाळांसाहेबांच्या गळ्याला मिठी घालतो. )

सगुणाबाई:—( मनांत ) अग बाईग, ही तर ह्माळसाबाई ! !

ह्माळसा०:—( रडत ) प्राणनाथ ! प्राणनाथ ! ( निचेष्ट पडते. )

बाळासा०: ( तिला पोटाशीं धरून व तोंड कुरवाळीत ) अरे, ही शुद्धीवर नाहीं ! प्रिये ह्माळसे, ऊठ, ऊठ; सावध हो. ( तिला वारा घालतात. )

सगुणाबाई:—( मनांत ) आतां पाहूं गम्मत काय होते ती.

ह्माळसा०:—( सावध होऊन दूर उभी राहते ) महाराज, आपल्याला संन्निपात, का विषम झाला होताना ? बोलाला जीभसुद्धां वळत नाहीं.

बाळासाहे०:—अग, तुला वेड तर लागलें नाहींना ?

ह्माळसा०:—आज संध्याकाळीं बाई ऐकलं कीं, इथें विषमज्वर होऊन अगदीं शेवटची पायरी आली ह्मणून ! ! माझ्या जिवांत जीव नव्हता हे पाय दृष्टीस पडत तोंवेरीं.

बाळासाहे०:—वेड सगळं. बरें पण तुझी प्रकृति बरी आहेना ?

ह्माळसाबा०:—महाराज, माझी प्रकृति ! तिला जी एकदां विकृति झाली आहे, ती आतां शेवटचीच ! !

( दोघीजणी एकमेकींस कंवटाळून धरितात; व झाळसा-बाई स्फुदूं लागते. )

सगुणाबाई:—बाई, रडूं नको. ( तिचे डोळे पुसते ) तूं माझी धर्माची बहीण आहेस; तुला अभय आहे मजकडून, भिऊं नको. बाई, तूं फार थोरमनाची आहेस. तुझ्या सारख्यालाही तसलाच बहुमान योग्य ! परंतु बाई, दैवाचे पुढें कोणाच्यानें धांववत नाहीं ! तुझ्या खऱ्या प्रीतीचीं व सुस्वभावाचीं मीं अनेक लक्षणें पाहिलीं आहेत. त्या अर्थीं मीच होऊन तुला तो मान देतें. ( बाळासाहेबांना उद्देशून ) हें पहा, हिच्यावर आतां दयाच करणं योग्य आहे. नाहीं पेक्षां ही असत्या आयुष्यांत मरेल ! तरी इचा माझ्याकरितां माझ्यावर जें आपलें प्रेम आहे, त्याच प्रेमानें अंगिकार करावा, असें माझें हात जोडून मागणें आहे. ( झाळसा बाईचें चुंबन करून ) बाई, डोळे पूस. मीच तुला त्यांच्या स्वाधीन करतें. ( तिचा हात धरून बाळासाहेबांच्या हातांत देते. )

( बाळासाहेब दोघींचें चुंबन करून दोघींच्या खांद्यावर हात टाकितात. )

बाळासा०:—( सगुणाबाईकडे बघून ) प्रिये, तुझ्या तोडीची कोमळ व सदय अंतःकरणाची आणि उदार अशी सुलक्षणी बायको लाखांत मुद्दां विरळाच. ( झाळसाबाईकडे पाहून ) आणखी प्रिये, तुझ्या तुलनेची शुद्ध अंतःकरणाची आणि दृढनिश्चयाचीही दुर्मिळच. धन्य आहां दोघी जणी !

झाळसा०:—( सगुणाबाईस उद्देशून ) बाईसाहेब, आपले अतिशय उपकार मी तोंडानं काय बोलून दाखऊं ? आपण उभयतांनीं माझा फारच उत्कृष्ट परामर्ष घेतला, तेणें करून अतोनात सुख झालं. आतां जरी या घटकेस मरण आलं तरी मी मोठ्या सुखासंतोषानें मरेन.

सगुणा०:—बाई, येथें मला फार बफतं. तर मी जरा वरल्या दिवाणखान्यांत जाऊन वाऱ्यावर पडतें. ( निघून जाते. )

बाळासा०:—( झाळसाबाईचें चुंबन करून ) प्रिये, तुझ्या मनाजोगें आतां तिनें केलें ना? याला ह्मणावें चतुर परोपकारी. प्रिये, ये तर येथें येऊन बैस.

( आपण कोंचावर बसतात व तिला मांडीवर बसवतात. )

झाळसा:०—प्राणनाथ, शोकाचा अनी हर्षाचा कळस एकदम झाल्या कारणानें पाळी पाळीनें ज्या त्यांच्या लाटा उठतात त्यानीं माझा जीव गलबलून देहभानावर नाहीं. तर क्षणभर मी शांत पडतें. ( दोन्ही हात बाळासाहेबांच्या गळ्यांत घालून, अगदीं मलूल होऊन, डोळे झांकून बाळासाहेबांच्या दंडावर डोकें लोंबकळत ठेवते. )

बाळासाहेबः—( तिचें तोंड कुरवाळीत ) पहा, सुशील स्त्रियांचें मन कुसुमा सारखें सकुमार असतें, असें जें ह्मणतात तें खरें आहे. उन्हांत पडलेल्या[1] फुला प्रमाणें, नुकेंच प्रफुल्लित झालेलें इचें हें मुखकमल पुन्हा म्लान झालें (तिचें पुन्हा पुन्हा चुंबन करितात) (पुन्हा आश्चर्यमुद्रा करून) मोठा जबर अचंबा आहे—पण ही येथें आली कशी? मी अतिशय अजारी आहें, अशी कोणीं वाड मारिली? हिच्या बरोबर आलेलें दुसरें माणूस कोण? पुढें, तें जें गेलें मगाशीं त्याची वाट काय? ही घरांतून इतका वेळ इकडे आली हें घरच्या माणसांना कसें नाहीं समजलें? समजल्यास आमची इची दशा काय उडेल?

( पडद्या पलीकडे ओरडून ) सरकार, मारलं मारलं माला; मारलं, मेलों, मेलों; धांवा, सरकार; अहो, धांवाहो! मेलों ( रडण्याचा स्वर होतो. )

बाळासा०:—( ससंभ्रमानें ) अरे, हा कोण बरळताहे? कां रडताहे?

---

१ उष्मा होतो.

( बाळासाहेब दरवाजा उघडून बाहेर जातात. )

म्हाळसा०:-( सावध होऊन ) हे गेले कुठें ? ( कानोसा घेऊन ) 'मारलं! लागलं'!! (ओरडून) महाराज, एकटे जाऊं नका खालीं.

बाळा०:-( पळत पळत वर येतात ) तरवार! तरवार! झटकन्; हे पहा, दड्दड् वर आले! एक-दोन-तीन;-किति हे!! ( ओरडून ) प्रिये, मागल्या पाई धांव आतां; पळ, पळून जा मागल्या पाई.

( इतक्यांत, काळे पोषाख चढविलेले कांहीं लोक नागव्या तरवारींनिशीं वर येतात. )

बाळासा०:-( त्यांस दरडावून ) खबरदार पुढें याल तर; खालीं व्हा. तुह्मी कोणाच्या हुकुमानें वर आलां ?

त्यांपैकीं एकः-तुमच्या कर्माच्या हुकुमानें आलों! मला ओळखलं पुरं ? मी भवानराव फौजदार! तुह्मांला याराला आणि या कसबिणीला पकडण्याला आलों! समजलांत नीट!!

बाळासा०:-घातरे घात!! ( चित्रा सारखे उभे रहातात. )

फौजदारः-( म्हाळसाबाईकडे बोट करून, बाळा साहेबांला ) ही कोण? बाळा साहेब, तुमची आईस ? ( बाळासाहेबां कडे बोट करून, म्हाळसाबाईस ) काय ग ए, छिनाल, हा तुझा बाप ? भीमनाथाच्या रानांत " आपल्या आईला धर " ह्मणून कोण बोललें, आठवतें? ( एक लाथ मारतो. )

म्हाळसा०:-( रडत ) हो, हो; आठवतं मेल्या. चांडाळा, अधमा मी तुझी आई; अनी हे तुझे बाप! मेल्या, मज अबलेचे विनाकारण जे जे हाल केलेस, नी आतां करताहेस त्यांचीं फळं याच जल्मीं भोगशील मेल्या! तुझे पापाचे घडे अद्याप पुरे भरले नाहींत. ( ओरडून ) देवा, दीनोद्धारा, सोडीव असल्या या निर्दय नऱ्याच्या हातांतून आह्मांला, उडी घालून!

फौजदारः-( सक्रोध, हंसून ) यौं, यौं; खाशी! बोलल्या-

हे पहा कशी नाटकांतल्या पोऱ्याला पढविल्यासारखी. ( शिपायांना ) कायरे, ही कांहीं दिवस तमाशांत नाचत होतीरे ? ( ह्माळसाबाईस ) निर्लज्ज्ये, लाज नाहीं वाटत बोलाला ? "कावळ्याच्या शापानें कोठें ढोरें मरत असतात ?" बरें असो. हा जामा आणि मंदिल कोणाचा ? या पोषाखानें येत असतेस काय वरचे वर इथे ? दिवट्ये, फार उजेड पाडलास नांवाचा ! ( शिपायांना ) शिपाय, या दोघांना कैदी करून चला.

( शिपाई बाळासाहेबांच्या दंडाला काडण्या लावून ह्माळसाबाईच्या दंडाला रुमालानें बांधून दोघांना कैदी करून चालवितात. )

शिपाई:—चलं ए, फुड व्हय. कायग, ए, मांग मांग का ! चाल ह्मोर.

बाळासा०:—( हळुहळू रडत, मनांत ) दैवा असा घाला घातलासना अखेरीला ? पहा, माझ्या दयेनें मला कसें परिणामीं फसविलें ! अस्तु, आतां काय त्याचें ? ईश्वरावर हवाला. ( जरा थांबून ) बरें, मोठ्यानें ओरडून जामदाराला हांका मारूं ? किंवा याच निष्करुण अजगराची विनवणी करूं सुटण्याला ? ( जरा थांबून ) नाहीं; छेः कांहीं एक नाहीं. एकवार जो परमेश्वरावर हवाला ठेवला तोच कायम. मनुष्याला काय शरण जायचें ? प्रभो, अनाथाचा नाथ तूं.

( शिपाईलोक दोघांना जिन्यावरून ओढीत, दस्ते मारीत मारीत नेतात. )

( इतक्यांत सगुणाबाई धांवत त्यांचे पाठीमागून जाऊन दीर्घाक्रोश करिते. )

सगुणाबा०:—( रडत रडत ) अरे बाबानों, नकारे नेऊं त्यांना त्यांच्याकडे काय अपराध आहे ? अरे बाबानों, पदर पसरतें, मला येवढें चुडेदान द्यारे. पहा मी तुमची सगळ्यांची धर्मकन्या आहेरे !

( शिपाई ह्माळसाबाईस ओढीत ओढीत नेऊं लागतात. )

सगुणाबा०:—नकारे, तिला गाईला ओढूं. रे, रे; रे ! ए, शिपाई बवानों, ए, ए, नकारे ओढूं ( धांवून जाऊन तिला सोडवूं लागते ) गरीब विचारी ! अशा फरफरवग्यानें तेव्हांच मरेल रे. तिचा नुस्ता हाडांचा पिंजरा राहिला आहेरे, बाबानों.

झाळसा०:—बाई, तूं काय दयाळू आहेस ! मरावं नी तुझ्या उदरीं जन्म घ्यावा. ( रडत ) बाई, हे अधम मांग आहेत; यांना कशाची दया अनी कशाची माया ? दगडाला द्रव कसचा? आतां आपण मागं जा. हे कोल्हे आपली व्यर्थ विटंबना करतील. आतां आमचा वाली नारायण ! ! ( झाळसाबाई मूर्छित पडते. )

( शिपाई झाळसाबाईला " ऊठ ऊठ " ह्मणून ओढितात. )

सगुणाबा०:—( रडत ) अरे निष्ठुरांनों ओढतां काय तिला? ती बेशुद्ध पडली आहेना ? ( बाळासाहेब झाळसाबाईकडे पहात जरा थांबलात, तों त्यांस शिपाई ठुस्से मारून ढकलीत ढकलीत चालवितात. )

सगुणाबा०:—( मोठ्यानें गळा काढून ) अरे, पाषाणहृदयांनों कोणाच्या तरी हृदयाला दया येऊं द्या त्या दोघांविषयीं. तुमच्या पायां किरे पडतें. ( पायां पडते; वाटेंत आडवी पडते) अरे, आधीं माझी मान काप; नी मग त्यांना मार. ए तूं मांगा, तिच्या वारचं मला फरफराव. ( झाळसाबाईच्या अंगावर जाऊन पडते ) अरे बवा, या दोघांच्या जिवाकरतां धन देतें, दौलत देतें व्हावी तेवढी. हे घ्या माझे डागिनें सारे. ( अंगावरले अलंकार तडातड तोडून त्यांच्यापुढें फेंकते. व त्यांबराबर तिच्या हातांत असलेली झाळसाबाईची अंगठी व पत्र हींही खालीं पडतात ) अजून तरी सोडारे सोडा यमदूतांनों त्यांना. काय ? तुझीं माझे डागिने बळकाऊनही तुह्मां लांडग्याची भूक तृप्त होत नाहीं; अनी त्या हरणांचे हाल हाल मांडलेत काय ? ( मोठ्यानें हंबरडे फोडून ओरडूं लागते ) अरे देवा, धांव—जामदार,

अहो जामदार, ए रस्तमभाई, रे, रस्तम. धांवा, धांवा; इकडे मोठा घात झाला रे. आज आमचे वांसरांचे त्राते कोठें गुंतला रे. देवा आतां तूं आहेस रे—

फौजदारः—अरेच्या! अरे, ही लांवसट मध्येंच कोठें उपस्थित झाली? अरे, कोणत्या झाडावरून उतरली ही? अरे, टिटवी सारखी एका क्षणांत बघा, कशी एकच बोंबाबोंब पाडून दिली आहे ती! अहो, ही रांड त्या दोघांच्यामधली कुंटण असेल नाहीं तर! (नीट पाहून) बरोबरच; घरगुतीच मध्यस्तीण आहे! (रागावून) जाव, बहान्चोद पिछे हाट्. (तिच्या पोटावर लाथा मारून पायांनीं रस्त्याआड लोटतो; आणि ती तेथें लत्ताप्रहारानें व्याकुळ होऊन निचेष्ट पडते.)

रंगोपंतः—(डागिने गोळा करून, हळूच) फौजदार साहेब, तूर्त तूंबडीतर भरली. (फौजदाराला ते रस्त्याच्या उजेडांत दाखवतो) अच्छाछा! बहार उडाली. हें पाहिलें मुद्याचें पत्र, हिनें बाळासाहेबांना लिहिलेलें. आणि ही बहुशा तिची चोरीस गेलेली अंगठी असावी हिऱ्याची. (रस्त्यावरल्या दिव्याशीं पाहून) होय हो होय. तीच. बरें आतां त्या दोघांकडे जाऊन पहातों आणखीं कांहीं मिळतें का? (हंसून) मला वाटतें या दोघांना पहांटपर्यंत आपल्या फौजदारी कोठड्यांत एककटें कोंडून ठेऊन दिवसापूर्वीं सोडून द्यावीं. ह्मणजे 'दामच्या दाम; आरामच्या आराम'!!

(पडद्यापलीकडे मोठा गोंगाट होतो—रस्तम, जलदी करा, जलदी करा! अनी तिकडून तोफखान्याच्या अघाडीवर व्हा. वेडांनीं इकडे मोठा अनर्थ करून पळताहेत. सांपडतील तिथें कापा—तोडा—छाटून काढा मुंडकीं खाटिकांचीं. हे आह्मीं इकडच्या बाजूनें होतों.)

रंगोपंतः—(घाबरून) फौजदारसाहेब, गति बरी नाहीं.

---

१ शहरांत एक लहानसा भुईकोट किल्ला आहे.

हे गुणाजी, नी रुस्तम आले आपला पाठलाग करीत. आतां तोफखान्यांतच शिरण्यांत शहाणपण आहे.

फौजदारः–( शब्द गाळीत गाळीत) चला–बुवा–ओढवलेंरे-कर्म ! तरी तुह्मांला नको नको ह्मणून ह्मणत होतों नी ! ( लटलट कांपतो. )

( सर्व तोफखान्यांत शिरतात. )

## प्रवेश २ रा.

स्थळः– सूरसागराजवळ; तोफखाना.

वेळः–मध्यरात्र; बारांचा अम्मल.

( श्रीमंत खंडेराव महाराज आणि दिवाण भाऊसाहेब शिंदे, लढाऊ पोषाख करून गुप्त गस्त घालीत येतात. )

भाऊसाहेबः–सरकार, तोफखान्याच्या पिछाडीवरच हा गिल्ला दिसतो. ( कानोसा घेऊन ) ह्या पहा तिकडे केवढाल्या आरोळ्या चालल्या आहेत. तर आपण पुढच्या दरवाज्याकडून व्हावें. (तोफखान्याच्या पुढच्या दरवाज्याकडे जातात. )

( महाराजांस ग्यारीसनची सलामी ) " सौडर हम्. तुड् तुड् तुड्, तुडुम् तुडुम् तुम्. '

खंडेरावमहाराजगायकवाडः– ( एका ग्यारीसनच्या शिपायास ) कौं किसनसिंग, उधर ये काहेकी धामधूम चली है?

ग्यारीसनचा शिपाईः–( लवून ) महाराजसाब सरकार, कुई एक छिनाल मरद और कुई एक छिनाल औरत, साहरके फौजदारने कैदी करके लेकर आया, उसवास्ते ये भिल्लोंका हल्ला होता है.

खंडेराव महाराजः–किसनसिंग, तुम् दौर करके व्हां जाव; और ये सब दंगा करनेवाले लोगनकूं बोलो के, ' तुमारकूं महाराज साबकी दुवाही है; हल्ला मत करो. '

ग्यारीसनचा शिपाई:—अछा. होकोम फरमा देतां हूं, सरकार. ( जातो. )

( दोघे पुढें चालूं लागतात. )

भाऊसाहेब:—अँ, मधल्या पटांगणांत मशाली पेटवून हा संगिनींचा गराडा कोणाला घातला आहे? ( जवळ जावून ) सुभेदार, ही काय गर्दी आहे?

सुभेदार:—( घाई घाईनें ) सरकार, यांनीं माझ्या देवडीवाल्याला घायाळ पाडून आंत बेहुकुम गैरकायदा शिरले येथें चारपांच पोलीस छाटून काढून; आह्मीं पोलीसला मदत गेलों, तों आमच्यांतलेच तीन असामी या दोघांनीं जखमी केले! आणि शहरफौजदाराला ठार करणार, इतक्यांत आमच्या लोकांनीं त्यांजवर संगिनींचा मारा करून त्यांना वेढा दिला. आणखी—

खंडेराव महाराज:—काय? तुह्मीं पन्नास नी ते दोघे आंवरत नाहींत! शाबास त्यांची!!

सुभेदार:—सरकार, ते सरकन तिरासारखे तरवारीसकट उंच उडतात! आह्मीं त्यांना संगिनींनीं चित् पाडलं आहे.

खंडेराव महा०:—बरें पुरे; व्हारे, सारे मागें.

(सारे दूर होतात;आणि महाराज ढालतरवार चढवून पुढें होतात.)

खंडेराव महाराज:—( पुढें पहात ) अरे मशाली घ्यारे पुढें. आणखी पुढें धररे. ( जखमी झालेल्या एका मनुष्याकडे पाहून ) दिवाणजी, पाहिलेंत का? हे गुणाजीबावा बाळासाहेबाचा झातारा जामदार रक्तबंबाळ होऊन पडला आहे! बरें तो कोण तिकडे? ( पुढें जाऊन ) रुस्तम! अरेरे, हा डोळे पांढरे कराताहे!! काय हो, हे घाव याच्या अंगावर!!!

रुस्तम:—( निजल्या निजल्या तरवार उचलून ) अरे नफर फौजदार!

खंडेराव महा०:—( मागें सरून ) ना. हूं तमारा पालक राजा.

रस्तमः–( डोळे उघडून ) सरकार, माफ करो; अने बाळा-साहेबनें राखजो. ( दीर्घ स्वरानें घसा ओढत ओढत ) सरकार, सलाम ! सरामे[1] ! ! ( प्राण सोडतो. )

भाऊसा०:–( ओरडून ) सरकार, घर बुडालें. घर बुडालें ! आपले बाळासाहेब, कांठेवाडदिवाणजींचे चिरंजीव, भडभडू र-क्ताच्या गुळण्या ओकत इथें पडले आहेत ! ! ( शिपायांस ) अरे, हकीम साहेबांकडे जारे, तूं.

खंडेरावमहा०:–(त्याजवळ जाऊन) खरेंच ! शिव शिव, मा-झ्या बाळासाहेबाची, नी ही दशा ! ! अंगावर जखम तर कोठें नाहीं. दिवाण साहेब, दंडाला काडण्यांचे करकोंचे पाहिले का रक्ताला कसे भिडून गेले आहेत ! आणि पलीकडे कोण ही मू-र्च्छित पडली आहे ? ( जवळ जाऊन ) झाळसाबाई ! ही येथें कशी ? इतकी कृश झाली आहे कीं, ओळखूं सुद्धां येत नाहीं ! ! अरे, पाणी आणा.

भाऊसा०:–अरे, कोणी जलदी बिछाने आणा.

( शिपाई बिछाने आणून बाळासाहेबांस, झाळसाबाईस व गुणाजी बावांस वर ठेवतात. )

भाऊसा०:–असें नको. सुभेदार, झाळसाबाईला म्यान्यांत घालून संभाळून त्यांच्या घरीं पोहोंचती करा. तुह्मी स्वताच जा; आणि घरच्या माणसांना सांगा कीं, हिला कांहीं मारूं बोलूं नका, असा सरकारचा हुकूम आहे.

( झाळसाबाईला म्यान्यांत घालून नेतात. )

गुणाजीः–( सावध होऊन, निजल्या निजल्या रड-तात ) अं, वेदना लागल्यारे अंगाला. ( ओरडून ) रस्तम, मार मार त्या थेडाला; त्याच्या नरड्याचा घोंट घे; तर मी सुखानें मरेन ! ( घोगऱ्या गळ्यानें रडत ) अरे माझा बाळासाहेब कोठें ?

भाऊसा०:–जमादार, सावध व्हा; तुमचा बाळासाहेब म-हाराजसाहेबांजवळ खुशाल आहे. तो पहा–(हातांनीं दाखवितात.)

---

१ मरतांना रामाचें नांव तोंडांत येतें त्याच्या.

गुणाजीः—कोण ? भाऊसाहेब ? माझा बाळासाहेब खुशाल आहे ? ( धडपडत उठून ) कोठें आहे ? ( बाळासाहेबांस पाहून, धाऊन जाऊन त्यांच्या अंगावर पडतात. )

गुणाजीः—( त्यांचें चुंबन करून रडत ) बाळा, आतां ही माझी सरतेशेवटची भेट रे तुला. मी क्षणाभऱ्यानें जाणार तुला सोडून ! बाळा डोळे उघड रे. ते दिशीं तुला लावून बोललों, ह्मणून आतां रुसून बसलास का ? मी येव्हांच मरणार असं मला कळतं तर नसतों रे बोललों. बाळा, माला कोठची दुष्ट बुद्धि आठवली, अनी माझ्या पांडसा, तुजपासून पंधरा कीरे दिवस दूर राहिलों-( रडत, अश्रु ढाळीत ) बाळा, लहानपणीं तुझे बाबा रागें भरले, तर त्याची कागाळी मजजवळ करीस; आईनं मारलं तर त्याची कागाळी मजकडे करावीस; अनी मी मेल्याची कागाळी कोणा पुढें गाशील रे—

बाळासाहे०ः—(चावळतात ) पळ, पळ प्रिये; आतां धडगत दिसत नाहीं ! हे तरवारी उगारून आले ! हां थांब. यांच्या हातांचीं खांडेंच करतों. तरवार ! तरवार झटकन् ! ( पुनःनिचेष्ट पडतात. )

( बाळासाहेबांच्या तोंडातून रक्ताच्या गुळण्या भड्भड् पडतात. )

गुणाजीः—( गुळण्या पाहून ) बाळाला माझ्या बुकलिलं हो, सरकार, बुकललें त्या दुष्ट राक्षसांनीं ! बाळासाहेब, हें रक्त नव्हे, तर आह्मां हतभाग्यांचें दुर्दैव ओकताहेस ! (रडती ) अरे, हंहंः, ज्या तुझ्या नाजुक शरीराला कोमळ बायकांच्या कोमळ हातांनींसुद्धां इजा होत असे, अशाला कठोर मनाच्या कठीण हातांनीं मर्दिलं असतां, काय झालं असेल रे, परमेश्वरा ! अरे, तूं गुडघाबर बिछान्यावर लोळणारा, तुला त्यांनीं खड्यांतून, कांट्यांतून, धुळीमध्यें लोळिवलं ? बाबा, काय तुझं अंग धुळीनं रक्तानं माखलं आहे ! काय दैवगति !

( डोळे मिटून बाळासाहेबांच्या अंगाला आपल्या हातांनीं गोंजारितात )

खंडेरावमहा०:–( हळूच ) भाऊसाहेब, या जखमांनीं या झातान्याचा शेवट होणार! रक्त पहा भळभळ वहात आहे अंगांतून. हें बंद झालें कीं आटपलें !

गुणाजी:–( किंचाळून ) भाऊसाहेब, माझ्या छातींत फट्ट होऊन ती फुटली बरं. ( टाहो फोडितात ) बाळा–बाळा, मला भेटरे, बोल तरी रे, ए, बाळा–बाळा–बाळासाहेबा–

बाळासाहे०:–( जरा सावध होऊन निजल्या निजल्या ) कोण? जामदार! त्या लांडग्यांनीं त्या हरिणीला व मला आपल्या जबड्यांत धरलें तर धरलें! आणि मज पाप्या करितां आपल्यालाही कोंडलें आहे? ( रडूं लागतात) हे पहा ते लांडगे कोंडाळें धरून बसले आहेत ( डोळे मिटून गुणाजी बावांच्या गळ्यांत हात टाकून रडत ) नका रे माझ्या झातान्याला मारूं तुमच्या पायां पडतों. ( हात जोडतात ) ( त्यांच्या अंगावर हात फिरवून ) जामदार, किती वार हे आपल्या अंगावर! काय रक्त चाललें आहे! हर, हर! ह्या जखमा नव्हत ! जामदार, हीं अनेक तोंडं उघडून आपली प्रीति आणि माया या पापिष्टा करितां ढळढळ रडताहेत. धिक्कार असो माझ्या जिण्याला!! ( बाळासाहेबांना रडण्याचे मोठमोठ्यानें हुंदके येतात. )

गुणाजी:– ( त्यांचें चुंबन करून ) बाळासाहेब, रडूं नको बरं बा. ( त्यांचें तोंड कुरवाळतात ) तुला रडतां पाहून माझे डोळे भरून येतात. मला झातान्याला आतां रडणं शोभत नाहीं. अनी तूं रडूं लागलास कीं, माझ्या पोटांत कालवून दम निघत नाहीं! उगी.

बाळासा०:–( वर पाहून ) काय? मी रडताहें ? आणि त्या मुळे आपलं दुःख दुणावतें ? तर हें मी आपलें रडं बंद करितों ( असें ह्मणून हातांनीं तोंड गच्च दावून धरितात व डोळे मिटतात; तों हुंदके जास्तीच येतात. )

गुणाजीः—बाळारे, बोल, बोल. आंतल्या आंत दम कां कोंडून धरितोस ? ऐकूं दे मला, शेवटीं जितके तुझे शब्द ऐकवतील तितके. ( चुंबन करितात व रडतात ) आतां कशाचा बोलतो ! दिवाणसाहेब, याला मूर्च्छेनं घेरलं वरं पुरें ( त्यांच्या तोंडावर तोंड ठेवतात व डोळे मिटतात. )

खंडेरावमहा०ः—जामदार, जामदार; अहो जामदार, आतां शेवटीं कांहीं इच्छा राहिली आहे ? बोला.

गुणाजीः—( डोळे मिटूनच रडत ) माझ्या बाळासाहेबाला मुलगा व्हावा, येवढी इच्छा राहिली होती. ती नाहीं पुरली कर्मानं ! बाकी, यजमानाच्या दयेनं माझ्या मागं कांहीं नाहीं उणं.

भाऊसाहेबशिंदेः—जामदार, सरकार विचारितात, आपल्याला कांहीं मागणें मागायचें आहे का ?

गुणाजीः—होय हो, माझ्या बाळाला ह्मणावें नीट जपा. त्या झाळसाबाईला दया करा. दिवाणसाहेब, दोन्हीं हीं मुलं फार सुस्वभावाचीं आहेत. मजकरितां त्यांना क्षमा करा सरकार.

खंडेरावम०ः—हायरे थोरांचें हृदय ! ( डोळ्यांत अश्रु येतात ) मरेतावत्काल पर्यंत लोककल्याणाचीच इच्छा. यंवरे, यंव. हे सत्पुरुष !

गुणाजीः—भाऊसाहेब, कृपा करून रुस्तमभाईला इकडे बलावा. मला त्याला मरतां मरतां भेटूं द्या.

खंडेरावम०ः—( भाऊसाहेबांच्या कानांत ) भाऊसाहेब, तो मेला असें आतां यांना कळूं नाहीं. जवळ मात्र त्याला आणून ठेवावा. यांचे डोळे मिटलेलेच आहेत हें एका अर्थी बरेंच. ( शिपायांना खूण करितात व ते त्याला हळूच आणून जवळ ठेवतात. )

खंडेरावम०ः—गुणाजी बाबा, हा पहा रुस्तम तुमच्या जवळ आहे.

गुणाजीः—( त्याच्या अंगावर हात टाकून ) अरे भाई,

रामराम. या उपर तूं तरी बाळासाहेबाला घटकाभर विसंरूं नको माझ्या मागं; मरतों. ( जरा थांबून ) अरे, तूं बोलत कां नाहीं रे बावा ? ए, बोल रे—

खंडेरावमहा०:—जामदार, तो शुद्धीवर नाहीं. त्याला जखमा झाल्या आहेत.

गुणाजीः—( डोळे उघडून ) मेलारे देवा, मेला. अरे, माझ्या खेळगड्या मला टाकून गेलास ? थांब मी पण येतों तुजबरोबर! (रडत) आतां माझ्या बाळाच्याविषयीं काळजी ती त्या आकाशांतल्या सूर्य नारायणाला, अणी माझ्या सरकाराला. माझ्या खेळगड्याला सोडून कसा राहूंहो आतां. शाबास! रुस्तम भाई. यजमानाच्या अन्नाचें सार्थक्य केलंस. धन्य तुझी! ( रडत ) अरे माझा भाई मला सोडून पुढें गेलारे. रुस्तम—रुस्तमभाई—ए रुस्तम.

( बाळासाहेबांकडे वळून ) आमची दोघांची ही गति ! आतां तुझी कायरे बाळा ? सरकार, बाळ अजून सावध होत नाहीं. त्याचा शब्द ऐकण्याला माझा जीव घुटमळत आहे खालवर! ( रडतात ) हंः हंः, माझ्या यजमानाचं सोज्वळ नांव मात्रळणार काय ? ईश्वरा, येवढं मूळ तरी सुरक्षित राहूंदे रे ! हर हर, या पुण्यवान् कुळाची ही दशा अँ ? हा येवढाच अंकूर, अनी त्याची अशी दशा व्हावी ? सरकार, या माझ्या हतभाग्य हातांनीं या लेंकराला मोत्याच्या दाण्या प्रमाणें, लहानपणीं कापसा वर कींहो, संभाळलं; अनी तोच मी हा फुटक्या नशीबाचा जांवुवंत, त्याची ही असली विटंबना पाहण्याला रहावें काय ? या परता आधींच कां नाहीं हा माझा श्वासोश्वास बंद झाला ! ( रडत रडत डोळे मिटतात) ज्यांनीं विनाकारण वैर धरून हा अनर्थोद्भव केला, त्यांना वाईट शब्द बोलून मी आपली जीभ प्राण जातांना विटाळीत नाहीं. ईश्वर त्यांना क्षमा करो !

खंडेरावम०:-(डोळ्यांचे अश्रु पुसून) जामदार, आतां अंत-

काळीं कांहीं देवाचें नांव घ्या ! भाऊसाहेब, ह्मातार्‍या माणसाचे-ह्मातारा, त्यांतून सदय परोपकारी ह्मातार्‍या माणसाचे अश्रु पाहून कोरडे पाषाणही रडतील ! !

गुणाजी :-( डोळे उघडून) कोण सरकार ? सरकार, अंतर माळा सुकल्या. हे पहा, बैरागी माना डोलवून मला बोलावतात ! आतां मी चाललों, चाल्लों बरें. सरकार, माझ्या बाळाला ओटींत द्या हा ! ( बाळासाहेबांचा हात महाराजसाहेबांच्या हातीं देतात. )

खंडेरावमहा०:-( आसवें ढाळीत ) जामदार, हा माझा पुत्रतुल्य आहे बरें ! झालें ?

गुणाजीः-(हास्यमुख करून) झालं. सरकार, रामराम! दिवाणसाहेब, रामराम ! सर्व देवब्राह्मणांना दंडवत ! सर्व वडिलांना दंडवत! ईश्वरा, माझ्या बाळाहेबाचें कल्याण कर ! राम ! राम ! राम! ! !

( गुणाजी बावांचें प्राणोत्क्रमण होतें. ) ( सारे अश्रुढाळतात. )

खंडेरावम०:-(अश्रुढाळीत) हाय हाय ! दिवाणसाहेब, याला ह्मणावें स्वामिभक्ति. चोहींकडे बाळासाहेब दिसत होता ह्मातार्‍याला. रुस्तमभाई तरी पहा; जातीचा भिल्ल; आणि त्याचें बाळासाहेबाकडे काय प्रेम ! जे सुजन ते सुजन. तेथें जातीवर, मातीवर, कांहीं नाहीं. हीं घ्या दोन ठळठळीत उदाहरणें. अहो, पण बाळासाहेब अजून सावध होत नाहींत ! हकीमसाहेबांना कां बरें वेळ लागला ?

( इतक्यांत, एक स्वार दौडत येऊन महाराजसाहेबांस मुजरा करतो. )

भाऊसाहेबशिंदेः-( स्वारास ) तुह्मी कोणी कडून आलां हो?

स्वारः-( त्यांस मुजरा करून ) सरकार, हकीम साहेबांनीं आमच्या यजमान साहेबांना घरीं पाठवण्याची विनंति

केली आहे. आमच्या यजमानीन सगुणाबाईसाहेबांना फौजदारानं लाथा हांटल्या ह्मणून त्यांचा गरभपात होऊन त्यांना उनमत्त वायू झाला आहे. त्यांना ते आउषध उपचार करीत बसले आहेत.

खंडेरावमहाराजः—ठीक आहे. भाऊसाहेब, चला तिकडे बाळासाहेबांना मेण्यांत घालून. " आलियाभोगासी असावें सादर."

भाऊसाहेबशिंदेः—( ग्यारीसनच्या शिपायांस ) अरे येथला जमादार कोण ?

जमादारः—( पुढें होऊन दोघांस मुजरा करून ) हां, जी सरकार.

भाऊसाहेबशिंदेः—जमादार, आधीं बाळासाहेबांना मेण्यांत घालून चला आमच्या बरोबर. त्या पोलीस फौजदाराला व त्याच्या शिपायांना सक्त पाहऱ्यांत ठेवा. या गर्दींत जे लोक जखमी झालेले इथे असतील त्यांची दवा पाण्याची तजवीज पहा; गुणाजीबावा जामदार, व रस्तमभाई नाईक, यांखेरीज बाकीच्या मुर्द्यांची मूठमातीची व्यवस्था करवा. आणि त्या दोघांना जपून आणून ठेवून त्यांजवळ एक पाहरा असूंद्या. उदयीक प्रातःकाळीं त्यांना लष्करी सलामी देऊन, वाजतगाजत, त्यांच्या सर्व सग्यासोयऱ्यांकडून पूर्णसंस्कार झाला पाहिजे.

( सर्व निघून जातात. )

## प्रवेश ३ रा.

स्थळः—मस्तुबागेंतला बाळासाहेबांचा वाडा.

वेळः—रात्रीं एकाचा सुमार.

( विश्वासराव, इंग्रजी मास्तर वगैरे मंडळी चिंतातुर बसली आहे. )

खंडेरावमहाराजः—( आंत येऊन ) रावसाहेब, कशी काय हाल हवाल ?

विश्वासरावः—सरकार, कांहीं सुचत नाहीं. वहिनी साहेबांना पुत्र होऊन तो मृत झाला असें पाहून त्यांचा जो वायु भडकला आहे तो बोलतां येत नाहीं. भरींत भर-बाळासाहेबांच्या मातोश्रींना त्यांचविषयीं कांहीं दुश्चिन्हें झाल्यावरून, गुणाजीबावांचा मुलगा घेऊन नौसरीहून येथें आतां बारांच्या पासें-जरनें आल्या. बाळासाहेबांना कैद केल्याची व सुनेच्या गर्भपाताची वार्ता ऐकून धाड्कन ज्या एकदां पडल्या त्या-श्वासोश्वास मात्र तुरळक चालला आहे; बाकी कांहीं नाहीं. जामदाराच्या मुलानें तर आकांत मांडला आहे.

मास्तरः—इकडे, सगुणाबाई, बडबडताहेत काय ? केंस काय तड्तड् तोडले ! बांगड्या दातांनीं कडकडाऊन खात होत्या; तों पोरींनीं जलदी करून तोंडांत हात घालून कांचा काढल्या.

खंडेरावमहा०:—हॅं. होईल तें थोडं. यावरून मास्तर, मला असं वाटतं कीं, नवऱ्याच्या एकंदर स्थितीविषयीं तिला अतोनात दुःख होऊन आत्महत्येचा हा तिचा गुप्त प्रयत्न असेल. तर या दोघींच्या नजरेस बाळासाहेबांना पाडूं या ह्मणजे हेंच त्यांना मोठें औषध होईल.

विश्वासराव व मास्तरः—खरी युक्ति आहे. असं करूं.

खंडेरावमहा०:—(बाळासाहेबांस) बाळासाहेब, बाळासाहेब, उठा.(त्यांस बसवितात)बाळासाहेबा, ए—बाळा—साहेबा, सावध होरे बा. ( त्यास कुरवाळतात ) असं आळसावाला काय झालं वरं ?

बाळासा०:—( जरा डोळे उघडून, घसा ओढत ) "ह्माळसाबाईला काय झालं ?" ( रडत रडत ) तिला मेल्यागुरासारखें ओढीत नेलं हो, नेलं. ती जिवंत आहे अजून ?

खंडेरावम०:—( हळूच) भाऊसाहेब, ( बाळासाहेबांकडे न-

१ हे शब्द जरा लांब उच्चारावयाचे.

जर करून ) भ्रमांत आहेत ! मी ह्मटलं " अळसावाला " त्याला वाटलं " ह्माळसाबाईला "—

बाळासाहे०:—( किंचित पाहून ) तुह्मीं कोण ?

( सर्व मंडळी मागें सरतात. )

विश्वासराव:—( पुढें होऊन ) मी विश्वासराव बाळासाहेब.

बाळासाहे०:—( त्यांच्या गळ्यावर हात ठेऊन रडत ) विश्वासराव, ती माझ्या कारणानें मेली; आतां मी तिच्या करितां मरणार. सोडा मला. ( उठूं पाहतात. )

विश्वासरा०:—छे हो, ती मेली कुठे ? जिवंत आहे; चला दाखवतों ती.

खंडेरावमहा०:—( हळूच मास्तरच्या कानांत ) झट्कन जाऊन सगुणाबाई जवळच्या सर्व पोरी दूर करवा. ( मास्तर जातात. )

विश्वासराव:—चला, बाळासाहेब, चलताना ह्माळसाबाईकडे ?

बाळासाहे०:—( डोळे उघडून ) हां काय ह्मटलेंत ! ह्माळसाबाईकडे ? येतों उठा ( उठण्याचा प्रयत्न करीत ) रावसाहेब, उठवत नाहीं !

( विश्वासराव आणि महाराज साहेब बाळासाहेबांस धरून सगुणाबाईच्या बिछान्यावर नेतात. )

सगुणाबा०:—( त्यांजकडे पाहून रडत) अरे काळ पुरुषांनों सोडारे सोडा त्यांना. तुह्मांला तुमच्या देवाची शपथ आहे ! माझे प्राण तुमच्या हातांत आहेत रे. अरे चोरांनों, माझे सगळे दागिने गिळंकृत केलेत; त्या ह्माळसाबाईच्या अंगावरले ओरबाडलेत ! आणखी पाहिजे तर लुटा आमचा जामदारखाना; पण त्यांना सोडा. ते जर इथून आतां गेले, तर जीभ आंसडून मेल्या बेरडांनों, शिंपुरड्यांनों, प्राण देईन! ( उठूं लागते. )

विश्वासरा०:-( हळूच )सरकार, आपला तर्क खरा. आपल्याला भ्रांतीनें ही पोलीस समजते! तर आपण एकीकडे होऊं कसे.

( सर्व लपतात. )

सगुणाबाईः-( इकडे तिकडे बघून बाळासाहेबांचें हळूच चुंबन घेऊन ) आपलं बरं आहेना? ( त्यांचे अंगावर निजते. )

बाळासा०:-( डोळे उघडून व तिच्या अंगावर हात टाकून ) प्रिये, तूं निभावलीस बरी? तुला त्यांनीं फरफरावीत नेलेंना, ग? ( रडत रडत ) माझ्या बायकोची, बापडीची काय ग, दशा झाली असेल? ( झांपड येऊन पडतात. )

सगुणाबाईः-( जरा सावध होऊन ) अरे देवा, माझ्या बाळाच्यावर घाला कसारे आणलास? बाळा-बाळा-( पुन्हा मूर्छित पडते. )

बाळासाहेबः-( सावध होऊन ) अग, मी बाळासाहेब जिवंत आहें. तूं भलतें भलतें बरळतेस काय? ( उठून बसले राहतात, व सगुणाबाईकडे निरखून पाहून ) अँ? ही ती नाहीं! तर मग ती कोठें गेली? मी कोठें आहें? हिला कोणीं इकडे आणलें? हिचा बाळा तो कोण? मगाशीं ज्यांणीं मला येथें आणलें ते कोण? हा घोंटाळा काय?

( भ्रमिष्टासारखे भिरभिर चोंहीकडे पहातात. )

विश्वासरावः-( पुढें होऊन ) बाळासाहेब, भिऊं नका. आपल्याला सरकारनीं येथें आपल्या घरीं आणिलें आहे.

बाळासाहेबः-काय ह्मणतां रावसाहेब? या कुलांगाराचें काळें तोंड महाराजसाहेबांनीं जिवंत पाहिलें काय? धिक् धिक् हें जिणें! अरेरे, ह्माळसाबाईला कोणी खोटेंच सांगितलें कीं, मी मरणोन्मुख झालों आहें. ह्मणून ती बापडी आली माझ्या येथें भेटीला. आणि नष्टांनीं ती संधी गांठून आह्मांला दोघांला बंदिवान केलें! आतां याला लोकें आणि महाराजसाहेब काय

बोलतील! या पेक्षां जीव गेलेला पुरवला!! बरें, रावसाहेब, जामदार कोठें दिसत नाहींत? रुस्तम कोठें आहे?

विश्वासराव:–( मनांत ) आतां पंचाईत झाली! ( उघड ) बाळासाहेब, ते कोठें आहेत, याचा शोध आणवतों. आपण जरा–

( पडद्या पलीकडे रडव्या स्वरानें )

" सरकार, माझा बाबा गेला माला पोराला सोडून या जगांतून! अनी रुस्तमभाई पण गेले त्यांच्यासंगें! आतां मी माझ्या बाबाला कोठें पाहूं हो"!!

बाळासा०:–(चकीत होऊन) रावसाहेब, हा माझ्या धाकट्या जामदाराचा शब्द आहे! तो काय बोलताहे रडत रडत. ( तिकडे कान देतात ) ( पडद्या पलीकडे ) " बाबा, शेवटची भेट नाहीं रे, घडली या पाप्याला. अंतरवैरी झालों रे तुला. बाबा, आह्मीं चार पोरगे असून शेवटीं तुला मांडी द्यायला एकसुद्धां जवळ नाहींना! अरे मी रडत काय बसूं? सरकार, माझ्या बाबाचा शोध नको कराला. इकडे आईसाहेब आपल्या मेलेल्या तान्हुल्याजवळ कासावीस पडल्याहेत, त्यांना धांवत येऊन सावध कराल तर बरं."–

बाळासाहे०:–काय? जामदार गेले मला सोडून? रुस्तमभाई गेला? अनी माझ्या मेलेल्या तान्हुल्याजवळ आमच्या आईसाहेब कासावीस पडल्या आहेत? ही माझी येथें प्रियाही मृततुल्य पडली आहे!! विश्वासराव, आमच्या घराण्याचें व कीर्तीचेंही वाटोळेंच झालें! आतां सर्वस्वाचा नास नास झाला!!! ( मनांत ) खरेंच, या उपर जगण्यांत आतां मौज नाहीं. ही रात्रच आपली शेवटची हो! आपल्या फजीतीला या दयाळू बाईनें आपल्या काळ्या प्रावरणानें पुष्कळच झांकून ठेविलें आहे. ती

---

१ जामदाराचा मुलगा जामदारीचेंच काम आपल्या बापाच्यामागें करावयाचा, असें पिढ्यानपिढ्या चालावयाचें अशी मराठीराज्यांत चाल आहे. २ हंसील; अर्थ.

गेली कीं, जो तो मनुष्य माझ्याकडे बोटं दाखवून आंतल्या आंत कुजबुजतील; व मला खराब मनुष्य ह्मणतील तर तिच्या जाण्याच्या पूर्वींच आपण गेलेले बरे! ( उघड ) रावसाहेब, धांवा, धांवा तिकडे, आईसाहेबांकडे. हा मी पण येतोंच मागो-माग हळुहळू.

( विश्वासराव तिकडे धांऊन जातात. )

बाळासाहेबः–( आपल्याशींच ) विश्वासराव गेले. ( चो-हींकडे पाहून ) ही वेळ बरी आहे मनांत आलेली गोष्ट तडीस नेण्याला.

( इकडे तिकडे सोधून एक तरवार उचलतात. )

बाळासाहेबः–( आपल्याशींच ) मना, विचार कर, या उपरची मानहानी आणीक 'छी थू' पाहण्याला राहून उपयोगीं नाहीं; आणि त्यातर आतां कपाळच्या चुकत नाहीत. पुढें हृद्रोगानें सडून सडून मरण्यापरीस याक्षणींच क्षणिक होणाऱ्या यातना पुरवल्या. आतां याला लोक आत्मघात ह्मणतील ह्मणोत. पण जेथें सर्वस्वाचा घात झाला आहे, तेथें याची ती पर्वा कशाला? ( डोळ्यांत अश्रु येऊन ) मात्र येणें करून आणखी किती कलेवरें पडतील तीं पडोत! ह्माळसा, बाई तुझा खरा एक निष्ठपणा! ही बातमी ऐकून तूं तात्काळ मरशील! बरें, ही माझी प्रिया येथें आहे ही काय करील? करणार काय, बिचारी झिणून झिणून मरेल! बिचारी आई सावध झाल्यास माझी होणारी रडारड ऐकून पुन्हा जी पडेल ती अखेरचीच! तर मग कसें करावें? या माझ्या दुर्दैवी शरीरवृक्षाच्या वर अवलंबून असणाऱ्या या वेली खालीं पडून एकदम मातीला मिळतील!!

( जरा विचार करून )"त्यांची ही दशा चुकत नाहीं. मात्र अशानें मी असेन तों पर्यंत त्यांची दुर्देशा [illegible]र्देशा उडेल. एवंच

[1] मज करितां होणारी.

जास्तीच अपेष्टा होणार! तर थांबा, तुह्मांला विपत्तिकूपांत लोटून देणाऱ्या कृतघ्नाला आतांच देहांतप्रायश्चित्त देऊन सर्वांना मोकळें करतों." (तरवार पुसून रडत रडत) आई, तुला मज कुपुत्राकडून काडीमात्र सुख लागलें नाहीं ग. मग पांग फेडायची गोष्ट कशाला? जामदार, रुस्तम, माझ्यावर आभाराचा ओझीं लादून गेलां; पण मला काडीमात्र उतराई होऊं दिलें नाहीं. अस्तु. माझे ह्माळसे, या ठकाला क्षमा कर. प्रिये सगुणें, तुझें ऋण तसेंच राहिलें. पण, एकवार मला तुझी शेवटची भेट घेऊंदे. (तिच्या जवळ जाऊन तिच्या मुखाचें व हातांचें चुंबन करितात.)

"उठूंया लौकर, नाहीं तर ही एखादी जागी होईल. शिव शिव! प्रसववेदना, मानसिक दुःखें यांनीं ही मृतासारखी निचेष्ट पडली आहे. (तिच्याकडे पहात) प्रिये, अशा स्थितींतही किती गोंड[1] मुख दिसत आहे, ग. खरोखर तूं सगुणा आहेस (पुन्हा चुंबन करून अश्रु ढाळतात.)

"हर हर! प्रिये, आई पिकलेलें पान तेव्हांच गळून जाईल! पण तुला निराधार वेलीला खरें खरें सारा जन्म मातींत लोळावें लागणार! बापुडे, मज शिवाय खरी अनाथ आहेस! आईना बाप; पोरना बाळ; नाहीं नवरा! कसे दिवस कंठिशील? आपण लहापणीं एकत्र खेळत असतां देखील त्वां हार खावीस मला बरें वाटण्या करितां; प्रिये, ज्याजवर जीव ठेवून प्रत्यक्ष आईबापांच्या पश्चात त्यांचीही त्वां फारशी खंत घेतली नाहीं; तो मी दैवहीन निर्लज्ज चांडाळ—आतां तुझा गाईचा गळा कापून जावें काय?" थु, थू या जिण्यावर!

(जरा विचार केलासें दाखवून) "हो, हो. याजकरितां[2] गळा कापून गेलेलेंच बरें! क्षणिकदुःख सोसून दुःसह दुःखभोग चुकवावे ते फार चांगले!! तर प्रिये, चल, नेतों तुला आ-

१ 'गो' चा उच्चार लांब. २ पेक्षां.

पल्या बरोबर ह्मणजे मागें तुला काहीं एक विवंचना राहिली नाहीं " !

( बाळासाहेब तरवार उगारतात, इतक्यांत सगुणाबाई किंचाळते. )

सगुणाबाई:–( रडवा शब्द ) हां–हां–आं. सा–साप. ! ! आई ! अग आई; घरांग, अंगावर पडला ! ( अंग चाळवते. )

बाळासा०:–(तरवारीचा हात आटोपून ) शंकर! शंकर ! हा दुष्टा, ब्राह्मणकुलाधमा, तिला कोठें नेणार ? आपल्या बरोबर नरक पुरींत वास करण्याला? तुला नीचालाच एकट्याला तो योग्य.

सगुणाबाई:–( दचकून उठून ) हां····हां! पळा. साप, साप.

बाळासा०:–( पुढें होऊन ) भिऊं नको, कोठें आहे तो ?

सगुणाबाई:–( बाळासाहेबांना कडकडून मिठी मारते ) नाहीं.भ्यायल्यें मी आतां स्वप्नांत नी उठल्यें घाबऱ्यां घाबऱ्यां !! कायसासा 'एक मोठ्ठा थोरला,कासराभर काळा कुळकुळीत साप' त्याचे ते गुंजेसारखे डोळे, जिभल्या चाटीत चाटीत, फोंफावत, तो माझ्यामागें न मी पुढं, असे माडीवरून दडदडत, इकडे आलों तों त्या काळानं मला सोडून आपल्या अंगावर उडी घातली ! ( इकडे तिकडे भयाभीत पहाते ) मला बाई, असं वाटतं कीं, जसा कांहीं तो या खोलींतच दडून मेला बसला आहे ! ( तिच्या नजरेस तरवार पडते ) पण बाई ही बिछान्यापाशीं तरवार–पुन्हा नागवी कशाला ? येथें आली कशी ?

बाळासा०:–प्रिये, मीं आपल्या संरक्षणाकरितां ठेविली आहे.

सगुणाबाई:–असं का ? (किंचित् हंसून) तर मग येथें कोणी माझ्या अंगावर जरा हात टाकला, तर थोडी झोंप तरी येईल. ( बाळासाहेबांकडे पहाते ) सासूबाईंचं कसं आहे ?

बाळासाहेब:–बरें आहे, बरें. प्रिये, नीज. टाकतों अंगावर हात. ( जवळ जाऊन तिच्या अंगावरून हात फिरवीत, मनां-

त ) हर, हर ! प्रिये, खरोखरच हा दुर्जन, मी—जरा कां ह्मणतेस? पुरा हात टाकण्यास सजलों होतों; आणि तुला अक्षयी झोंप लावीत होतों ! ( उघड ) प्रिये, निर्धास्त नीज. ( सगुणाबाई मान हालवून, त्यांच्या मांडीवर डोकें ठेवते. )

बाळासाहेबः—( मनांत ) प्रिये, माझी मालाच कीं ग लाज खाते मनाला. तूं भोळी शेळी, या खाटिकाच्या मांडीवर ममतेनें निर्धोक मान टाकितेस! अनी मी—अरेरे,पुन्हा निचेष्ट पडलों ! आतां हा मोहपाश फसवील; आईला एकदां भेटून यावं; पण नको भलताच कोणी येऊन मध्यें प्रत्यवाय आणील. त्यापेक्षां उठा कसे?

( एकवार तिचें चुंबन करून तिचें मस्तक हळूच उचलून ठेवून पुन्हा तरवार हातांत घेतात. )

" देवा, नारायणा, मोठमोठे अजामेळासारखे पातकी तारिलेस, त्या तुजवांचून कोणालारे या पाप्याची करुणा येईल ? जन्मादारभ्य जें जें पातक घडलें असेल त्याची या निर्याण[1] समयीं क्षमाकर. देवा, अनाथांचा मायबाप तूं ; पाप्यांना त्राता तूं; तुझ्यावीण कोणाला आठवायचें ये वेळीं ? ( डोळ्यांत आसवें आणून ) आतां इतकंच मागतों कीं, मजमागें विचारीं दोन दुबळीं आहेत.त्यांचं रक्षण कर नी या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सोडीव.(डोळे मिटून,डाव्या हातानें शेंडी ताठ धरितात;व उजव्या हातानें तरवार उचलून ) " नारायण, नारायण, जयगोविंद हरे॥ नारायण, नारायण, जयगोविंद हरे,॥ ( उच्चस्वरानें ) प्रभो, शंभो, तारकेश्वर; तारकेश्वर; पाहिमां—पाहिमां—पाहिमाम् ( वार करण्या करितां तरवार लांब खेंचतात. )

( पडद्या पलीकडे अति उच्चस्वरानें ) " हां, हां, हां; बाळासाहेब, संभाळा; गायकवाड खंडेराव महाराजांना तरवार लागेल मागें " ( बाळासाहेब भीतीनें चपापून मागें पहातात आ-

---

१ प्राणांताचा समय.

णि खंडेराव महाराज पुढून येऊन त्यांच्या हातांतली तरवार घेतात. )

खंडेरावमहा०:–(बाळासाहेबांना कवटाळून धरून ) बाळासाहेब, काय हें साहस ! अरे, इतके बळी पडलेले अजून तुला पुरे नाहीं झाले ! दुःखातिशयामुळें तुला कर्तव्याकर्तव्य विचार सुद्धां राहिला नाहीं ! अरे मूर्खा, आपल्या निरपराधी बायकोला सुद्धां मारण्याला उद्युक्त झाला होतास !! हंः विचार कर, बाळासाहेब, तूं एक मेलास ह्मणजे तुझी आई मरेल; तुझी बायको मरेल; उन्हांत पडलेल्या मत्सी प्रमाणें पटापट प्राणास मुकतील; वंशच्छेद होईल ! हें काय मांडिलेंस ? तुझा अंकुरच्छेद तर झालाच. नीट शुद्धीवर ये. वेडा पोर कनूचा! अरे बाबा, एखाद्या गोष्टीची खंत किती घ्यायची अशी ? ( तोंड कुरवाळतात. )

बाळासा०:–(महाराजांच्या पायांवर डोकी ठेवून ढळढळ अश्रु गाळीत, अस्पष्ट स्वरानें ) हें काळें तोंड सरकारला कसें दाखवूं ! महाराज क्षमा करा; क्षमा–( त्यांचा स्वर उमटत नाहीं. )

खंडेरावमहा०:–(त्यांस पोटाशीं धरून) उगी बाळासाहेब. तुलारे पोराला कशाला पाहिजे क्षमा ! आणि तूं काय असा मोठा अपराध केला आहेस ? जें झालं तें झालं. मनुष्याचे हातून चूक होतच आहे. आतां स्वस्थ ऐस. शें दोनशें माणसें तुझ्या पदरीं आहेत. तूं गेल्यावर तीं उघडीं पडलीं कीं नाहीं !

बाळासा०:–( रडत ) सरकार, पण मला कोण घेणार पदरांत आतां.

खंडेरावम०:–वेड तें हेंच बाळा. अरे, तूं'बा,ब्बा, ब्बा'असें बोबडें बोलत असतांना मीं आपल्या स्वतांच्या ताटांत देखील तुला घेतलें. ( हंसून ) बाळा, तुरतुरी सोडून माझ्या पदराला कितिदां खारट केलें असशील हें कोठें तुला माहीत आहे ! बरें,

१ या शब्दावर जोर पाहिजे.

तें असो; बाळा, ज्याला एकदां आह्मीं पदरांत घेतलें, त्याला केव्हां तरी सोडलेलें तुला स्मरतें का ? भ्यायलेंरे पोर अगदीं भ्यालें! पण चल, आधीं तुझ्या ह्मातारीची चौकशी करूं. अरे, कोणी पोरी इकडे या; आणि सगुणाबाई येथें पडली आहे इची नीट तजवीज राखा.

( बाळासाहेबांस हातीं धरून महाराजसाहेब जातात. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश ४ था.

स्थळः—मल्हाररावाचा वाडा.

वेळः—पहांट.

( ह्माळसाबाई गडबड गडबड अंथरुणावर लोळत आहे; नवळ मंडळी तटस्थ बसली आहे. )

हकीमः—काय उलटी झाली? होऊंद्या. ( वांति पाहून ) कोश्यांत तर कांहीं विकार दिसत नाहीं. ( नीट पाहून ) अहो, पण हें त्यांत काय चमकतें ? ( पुन्हा पाहून ) छी, छी, छी: घात झाला ! ही हिरकणी पहा. झालें ! हरले सर्व उपाय आमचे ! ( नाडी पाहून ) नाडी सोडीत चालली. घटके दीडघटकेची सोबतीण !

भाऊसाहेबशि०:—पण अजून सरकारस्वारी कां येत नाहीं? हलकारा तर मगाशींच पोंचला असेल. तिकडलें वर्तमान काय आहे, तेंही कळत नाहीं. पण त्या मशाली कोणाच्या ? हो आले, आले. एक हकीम साहेब शिवाय करून बाकीची सर्व गर्दी मोडा.

( सर्व बाहेर जातात व आंत बाळासाहेबांसह महाराजसाहेब येतात. )

खंडेरावमहा०:—भाऊसाहेब, हें आज तिसरेंच? आजची ही काळरात्र कशी जाते !!

भाऊसाहेबशिं०:-परिणाम बरा नाहीं. अनी हिनं तर घोष घेतलाहे "बाळासाहेब भेटवा."

खंडेरावम०:-म्हाळसाबाई, म्हाळसाबाई; डोळे उघडा.

म्हाळसा०:-( डोळे उघडून ) कोण? सरकारस्वारी? हे-( शब्द ओढत ) दिवाण साहेब; आणि हे-बाळासाहेब. तुम्हां-सर्वांला माझा शेवटचा नमस्कार. ( नमस्कार करून ) सरकार, थोड कांहीं बोलण्याला आपल्या सर्वांना मी प्रार्थना करतें. या वेळीं मला बाळासाहेबांची क्षमा मागणें आहे.

खंडेरावम० आणि भाऊसाहेब शिं०:-बोल बरें बाई; खुशाल बोल.

म्हाळसा०:-( शब्द घुटमळत, व स्फुंदत ) सर-काड्, अंतड-माळा ओढया! जीभ सुखयी !! ( हातांनीं खूण करिते "बोलवत नाहीं." )

भऊासाहे०:-अरेरे, बिचाराची जीव कांहीं बोलण्याला घुटमळत आहे! अहो, थोडें गंगोदक आहे का?

( म्हाळसाबाई एका चंबूकडे बोट करिते. )

भाऊसाहेबशिं०:-होय घालतों हां तें. (तिच्या तोंडांत गंगोदक घालतात ) हकीम साहेब, इला कांहीं मेहेरबानीं करून असा दवा द्या कीं, ही घटकाभर स्पष्ट बोलेल.

हकीमः-बरें आहे. 'त्रैलोक्यचिंतामणीच्या मात्रेचे' सात वेढे देतों उगाळून म्हणजे झालें. ( मात्रा उगाळून देतात. )

म्हाळसा०:-( घसा ओढत ओढत ) स्ट्री-जाट्-पडयें! लॉज वाट्टये बोळाला!

खंडेरावम०:-बाई जरा थांब; अंमळशानें बोल बरें. आतां घसा सुटेल बोलाला. ( सर्व जरा स्तब्ध अधोवदन बसतात. )

म्हाळसा०:-( खांकरून ) अं हं हः सरकार, थोड्याच वेळांत ही येथून जाणार! हें पहा कंबरेपर्यंत अंग थंड झालं. (वर डोळे करून टक लावते) हे आले-हे आले; आले(किंचाळी

फोडते ) सरकार, मला लपवा; मला संभाळा! हे पहा, मघांपासून तीनदां चारदां विरऱ्या घालून उडून गेले. मी ह्या घरीं, त्या घरीं दडून पळालें. तरी आतां आले फिरून मेले! हे बघा, मेले काळे बेरड, चोर, माझी वेणी धरून ओढतात; कोणी गळ्याला फांस लावतात. ( किंचाळते ) आं-आं, मारा, मारा! आले ( जरा बेशुद्ध होते; पुन्हा ) अहो, माझं काळीज चरचर सुऱ्यांनें कापून पळताहेत! धरा, धरा त्यांना. हे गेले–हे गेले–गेले–ले. ( वर पहात पहात मूर्च्छित पडते. )

हकीमः–भाऊसाहेब, मात्रेचा अम्मल अजून पुरा बसला नाहीं. बाकी ती अजून घटका दीडघटका सावध होऊन बोलेल. ही मात्रा दिली नसती तर याच झटक्याला निकाल व्हायचा. हिऱ्यानें आंतडीं चरचर कापून जातात!!

खंडेरावम०:–हकीम साहेब, वादळांत पडल्या सारखी माझी अक्कल थक्क झाली आहे. शिव, शिव, शिव! या मृत्युलोकींची वस्ति किती क्षणभंगुर आहे! कांहीं कांहीं वेळ, आतां हेंच मनुष्य पहावें; अनी एका प्रहरांत कांहीं नाहीं! अहो, ठेंच लागते काय? शिंक येते काय? आणिक प्राण जातो काय? परंतु, मनुष्याला माज कोण! मनुष्याची हाव काय! मी हें करीन; तें करीन; त्याला मारीन; सर्व जेथच्या तेथें राहतें! मी ज्ञानी; मी शूर; मी राजा; 'कशाचें काय, नी कशाचें काय? एकदां यमाजीभास्करचा पाश पडला कीं कसला राव नी कसला रंक! एका निमिशार्धांत चूर!! याकरितां सदोदित मनुष्यानें सदाचरणांत वागावें; उद्योग करीत असावा–

( ह्माळसाबाई अंग चाळवून सावध होऊं लागते. )

शुद्धीवर येऊं लागल्या वाटतें–प्रभु जसें ठेवील त्यांत सौख्य मानावें; मग काय तड लागेल ती लागेल! " कर्म कर्त्ता करविता नारायण ॥ आह्मीं बाहुल्या नाचतों तयाधीन "

१ मोठी लांब रुंद सुरी. २ दिंडीच्या चालीवर, हें " विठ्ठल कवि " नांवाच्या कवीचें जुनें पद आहे.

ह्माळसा०:-( सावध होऊन, रडत रडत ) बाळासाहेब, एकदां इजकडे डोळेभर पहा. ( बाळासाहेबांकडे पाहून ) ईश्वरा, पति देणें असेल, तर असलाच सुजन दे अन्य जल्मीं; नाहीं तर मेलं किड्यांच्या जल्माला घाल. ( महाराजसाहेबांकडे पाहून ) "सरकार, हें माझें बोलणें, हें करणें,आपल्यांना निलाजरेपणाचें वाटेल. परंतु खरें ह्मटलें तर, यांच्या पायांना म्यां मनानं- अनन्य भावानं "-( लाजून स्तब्ध राहते. )

" महाराज, आतां क्षणांत मला मरायचं आहे. आतां मला या लोकांतल्या सुखाची, लौकिकाची, कशाची देखील, चाड राहिली नाहीं;मला आतां-दुःखाची, दुर्लौकीकाची,हाल अपेष्टांची, कांहीं एक भीति नाहीं. तर मग खरें बोलण्याला काय हरकत आहे ? मला मागल्या गोष्टीचं मनस्वी दुःख होतं; पश्चात्ताप होतो-( अश्रु ढाळते व शब्द उमटत नाहीं ) सरकार, ऐका; तिटकारा आणूं नका- " सरकारसाहेब, दिवाण साहेब, ह्या लोकांतलं कोणतेंही सुख, स्वप्नांतसुद्धां या खंक देहाला लागलं नाहीं हो, नाहीं ! हें खचीत, खचीत, खचीत. याला त्या ( डोळे व हात वर करून ) वरल्या देवाची शपथ ! सरकारच्या पायांची शपथ ! ! ( महाराजांच्या पायाला हात लावते. ) दोन शिवाय करून या पृथिवीवरचे सर्व पुरुष आज या घटके पर्यंत मला बाप भाऊ आहां. याला त्या देवाची शपथ ! त्या दोघांपासूनही या हतभाग्येला कांहीं एक सुख मिळालें नाहीं ! विनाकारण ह्यांच्या नांवाला डाग मात्र अक्षय्य बसला. ह्मणून आपल्या सर्वांच्या देखत त्यांची क्षमा मागतें; व सर्वांना हा खरा प्रकार सांगतें; अनी मरतें. ह्मणजे बरें वाटेल. ( रडते. )

भाऊसा०:-बाळासाहेब, व्यर्थरे, बापड्या तुला ही लोकापवादाची काळोखी लागली तर शुष्काशुष्की !

ह्माळसा०:-दिवाणसाहेब,ते निष्पाप आहेत;दयाशीळ आहेत; पण म्यां पापिणीनें डाकिणीनें त्या कैदासिणी सईबाईच्या नादा-

ला लागून यांना खोटें नाटें पत्र लिहिलें. आज पण त्याच रांडेनें मला खोटं खोटं सांगून, वळंच पुरुषाचा पोषाख घालून नेलं यांच्या कडे. आणखी तो मेला चांडाळ फौजदार, अनी तो रामोशी, खाटीक रंगोपंत–मला मेले भुलवण्याला काय काय प्रयत्न करीत हो, देवा, देवा, देवा! बोलवत नाहीं आतां–भीमनाथाच्या रानांत त्यांनीं माझा छळ छळ केला!!–त्याच मेल्या मगरांनीं आज गांठून पुरा शेवट केला. सरकार, हीच माझी विनंति होती. यांजकडे कांहीं एक दोष नाहीं. सर्व दोष माझा आहे. आणि याकरितां मी मरणार! बाळासाहेब, सरकार, दिवाण साहेब, मला क्षमा ह्मणा; नी मग माझे सुखें प्राण जावोत. (बाळासाहेबांकडे एकसारखी टक लावते.)

खंडेरावम०:–(तिजकडे बघून) (हळूच) दिवाणजी, ही पहा तंद्री लागली. हर, हर! काय हो, पण पोर सुबक! शहाणी, दृढ निश्चयाची!बाई नशीब तुझं टुंकं पडलं, त्याला तूं काय करशील? तुझ्या योग्यतेला बाळासाहेबासारखाच भ्रतार पाहिजे होता. (त्यांच्या डोळ्यांत आसवें येतात.)

झाळसा०:–(महाराजांकडे पाहून, रडत) महाराज, या पापिणी करितां रडूं यायला नको. लोकांनीं मजकरितां 'मेल्यें' ह्मणून रडावें अशी इची योग्यता नाहीं. महाराज, या एका कृत्येच्यामुळं स्वतांला नरकवास; (बाळासाहेबांकडे बोट करून) यांना कोरडा कळंक व अपेष्टा; दोन्हीं कुलांना हीणत्व अनी सर्व लोकांना फुकाफुकी कटकट, झाली रे देवा. अरे, अरे, अरे, मी जन्मल्यें कशाला? जन्मतांच मेल्यें कां नाहीं?—(जरा थांबून)

"देवा, वैऱ्यालाही हा स्त्रीजन्म देऊं नको; दिलास, तर रूप देऊं नको; रूप दिलेंस, तर तुंबडी भरू आईबापांच्या पोटीं घालूं नकोस; अनी शेवटीं, या मराठी जातींत नकोरे नको!!

१ अल्प.

महाराज, एखाद्या नांगऱ्याला मला दिली असती, तर मोठ्या सुखासंतोषानें संसार करून राहिल्यें असतें. देवा, आतां या पापिणीला क्षमा कर; आपण सर्व मला क्षमा करा; माझ्या घरच्यांचें कल्याण असो; मी तर त्यांना सोडून आतां निघाल्येंच-त्यांना कृपाकरून इकडे आणवा——ज्यांचं ज्यांचं मी वाईट केलं असेल, ज्यांना ठकविलं असेल, बोल्यें असेन, त्यांना हा पदर पसरतें. ( पदराला हात लावते ) सरकार, जातें बरं–जातें बरं–जातें–हो–हं–( इवळते. )

खंडेरावमहा०:–झाळसाबाई, झाळसाबाई; शांत हो! शांत रहा ! तूं पश्चात्तापानें पाप पार धुतलेंस ! पातकाचा अंशही तुझ्याकडे फारसा नाहींच मूळापासून. मुळींच नाहीं म्हटला तरी चिंता नाहीं ! ईश्वर तुझें अन्यजन्मीं कल्याण करील बरें.

( तिच्या तोंडांत स्वहस्तानें गंगोदक घालतात व ती डोळे मिटते. )

खंडेरावमहा०:–( डोळ्यांना पाणी आणून ) जा बरं बाई आतां ! जा बरं !!

हकीमः–( नाडी पाहून हळूच ) सरकार संपत आलें! इतका वेळ तग निघाला हेंच आश्चर्य ! !

( सर्वजण डोळ्यांना पदर लावून स्फुंदतात. )

झाळसा०:–( डोळे उघडून ) काय ? मी मरतांना सुद्धां लोकांना दुःख दिलंना ? असली कसली मीही ! हरि हरि !! ( तिच्या डोळ्यांना पाणी येतें. )

खंडेरावमहा०:–उगी बाई. मरतांना रडूं नाहीं. मी रडत नाहीं बरें. माझ्या डोळ्यांना उगीच पाणी आलें !

( महाराजसाहेब डोळ्यांवर रुमाल दडपून धरितात. )

भाऊसाहेबशिं०:–बाई, तुझी दशा बघून कोणाला बरें रडूं येणार नाहीं ? दोन देवाचीं नांवें घे आतां–म्हण,हरि,हरि,हरी.

झाळसा०:–( डोळे मिटून ) बरं. हरि, हरि, हरी–हरी–री शेवटीं तोंडानें क्षमा ह्मणा! बाळासाहेब—

बाळासा०:–( रडत रडत ) सरकार, मगासची तरवार कां हो, हिसकून घेतलीत! (मोठ्यानें ) बाईसाहेब, मीच आपल्याला पदर पसरतों; या कर्मचांडाळाला क्षमा ह्मणा. (पदर पुढें करून रडतात व झाळसाबाई, "रडूं नका" अशी त्यांना हातांनीं खूण करते. )

खंडेरावमहा०, आणि भाऊसा०, व हकीमः–क्षमा. जा बरं बाई, क्षमा!

बाळासा०:–( मोठ्यानें ) या निर्दय मगराची; ( जास्त उंच ) आपल्याला भर संसारांतून ओढून काढणाराची; ( अति उंच ) तुमचा विश्वासघात करून बळी घेणाराची–क्षमा–क्षमा–क्षमा–मा!!

( बाळासाहेब धाडकन् भुईवर मूर्छित पडतात. )

झाळसा०:–(बाळासाहेब पडलेले पाहून) शिव, शिव! आतां हें वांचणंच पुरे! ( घसा ओढत ओढत ) सरकार, यांच्या( बाळासाहेबांकडे बोट करून) खऱ्या प्रेमाची खूण, जी हिरकणीची आंगठी, ती चाऊन मीच होवून प्राण देतें. आतां सर्वांस नमस्कार! तुळशी माते नमस्कार! त्यांचें कल्याण कर. ( डोळे मिटून ) हरि, हरि····री!!

खंडेरावम०:–हकीम साहेब, मल्हाररावाला बोलावा मांडी द्यायला. ( हकीम साहेब बाहेर जातात ) भाऊसाहेब. चला.

भाऊसाहेबशिंदेः–आतां काय करावें? सरकार, हा बेशुद्ध घटके घटके पडतो. याला आतां घरीं घेऊन जातों याच्या आईकडे.

खंडेरावम०:–होय. तसेंच केलें पाहिजे. चला तर.

( मल्हारराव, येसबा वगैरे आंत येतात. )

मल्हा०:–( तिच्याकडे बघून ) ग्यली? अललललल!

बुडालले तारू बुडाल समद ! ( बाळासाहेबाकडे पाहून ) अले, या कल्मनष्टाच्या, पांढ्ले पायांच्या पाई बुडाल माझं सहाज. आतां माझी जहागिली जाईल; घल जाईल; दाल जाईल. अन या कपाळकल्याला कशाला आन्ल इथे? अन तूं म्यलास का नाहीं मगाच ? ( तरवार उगारून बाळासाहेबाच्या अंगावर धांवतो. )

खंडेरावमहा०:–( मध्यें आड होऊन ) मागें हो थेर्ड्या ! लाज नाहीं वाटत बोलाला ? आतां तुझा वर उचललेला हातच छाटून काढला असता. पण हा तो प्रसंग नव्हे. अरे, अप्रयोजका, तुझी बायको मरत आहे, तिला मांडी द्यायची सोडली; आणि हा मरत पडला आहे, त्याजवर शस्त्र धरतोस? अरे, तुझें शहाणपण गेलं कोठें ? त्या दोघांच्या सौजन्याचा सहस्रांश सुद्धां नाहींरे तुला. मूर्खा, अशा या गाढवपणानें अशा या होतकरू पोरीला नाहाक रे चिखलांत डुबवलीस. या परीस तूंच कां खपला नव्हतास ? चंद्राळा खळें नसतें पडलें. म्हाताऱ्या, तुला चारचौघा शिष्टांनीं सांगितलें, दिवाण साहेबांनीं सांगितलें, मी खुद्द सांगितलें, कीं, " आतां हें म्हातारपणीं लग्न नकोरे करूं. एक लग्न झालें; दुसरें झालें; म्हातारा झालास. तुझ्या वतनवाडीला कांहीं धक्का लागूं देत नाहीं. " पण मुरदाडा, तुला सोस किती लग्नाचा ! घे आतां आपल्या ' असुरी विवाहाचा परिणाम' ( मल्हाररावाला मागें लोटून ) बाळासाहेब, बाळा साहेब, उठा, ( त्यांचें तोंड कुरवाळतात. )

बाळासाहे०:–( सावध होऊन ढळ ढळ रडत ) सरकार, म्हाळसाबाई मेल्या ? अनी मी कसा मरत नाहीं अजून ? मी, इतक्या बळींची मुळी ! मृत्यु या पाप्याला आपल्या दाढेंत कां धरीत नाहीं हो ? यापेक्षां मरण फार चांगलें !!

खंडेरावमहा०:–पुरेरे बाळा. रडून रडून डोळ्यांचीं मुटकुळीं झालीं. अरे वेड्या, आपल्या आईचा, बायकोचा, कांहीं विचार कर. भाऊसाहेब, याला आतां काय बोलावें ?

भाऊसाहेबशिंदेः—बाळासाहेब, तुझ्याकडे काय त्याचें ? हें बाबा भवितव्यच. तें कोठें चुकतें का ? उगी रहा कसा अगदीं निमूट आतां. ( बाळासाहेबांचे डोळे पुसतात ) उगी; उगी, बाळा साहेब.

खंडेरावमहा०:—भाऊसाहेब, म्हाळसाबाईनें जीं जीं नांवें मघांशीं घेतलीं ते ते इसम आपल्याला माहीत आहेत ?

भाऊसाहेबशिंदे०:—जी सरकार, सर्वांना मी पुरें ओळखतों.

खंडेरावमहा०:—तर आतां आपण त्यांना लगोलग कैदीकरून मग घरोघरीं जायचें. अरे ! फटफटीत उजाडलंच.

( सर्व जातात. )

## प्रवेश ५ वा.

स्थळः—सरकारवाडा. वेळः—सकाळचा प्रहर दिवस.

( महाराजसाहेब सिंहासनावर बसले आहेत; दरबार पूर्ण भरला आहे. )

खंडेराव०:—सर्व सभासदहो, हा वेळपर्यंत जी चौकशी झाली त्यांत इतकें निष्पन्न झालें कीं, कालच्या सर्व अनर्थांचीं मुळी सईबाई आहे. तिनें बागेच्या माळ्याला वश करून घेतला; व रंगोपंताच्या मार्फत या कृत्यांत भवानरावाला मिलाफी करून घेतलें. मध्यरात्रीं माळ्यानें बागेचे पिछाडीचा दरवाजा खोलून पोलिसाला आंत घेतलें; देवडीवाला आंत जाऊं देईना, व त्याणें ओरडा ओरड करूंनये, ह्मणून भवानरावानें त्याला छाटून टाकलें; व बाळासाहेबांना पकडलें. अशी हकीकत आहे. तरी याविषयीं त्यांना शिक्षा असाव्या त्या—

"प्रथम, फौजदाराच्या हातून मनुष्यवध घडला असोन बालहत्येला कारण झाला; ह्मणून त्याला निर्विवाद देहांतप्रायश्चित्त पाहिजे. रंगोपंत व सईबाई हीं या अनर्थाचीं उत्पादक आहेत ह्मणून त्यांनाही असलीच शिक्षा पाहिजे. पण आमच्या रा-

ज्यांत ब्राह्मणांना व स्त्रियांना देहांतदंड नाहीं; करितां रंगोपंतानें सन्यास ग्रहण करावा; व सईबाईनें निरंतर द्वारकेस बेटांत रहावें. हें न पथकरल्यास मरणाची शिक्षा चुकणें नाहीं; त्या माळ्याला सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा देतों; आणि याकामांत पोलीसनें आपल्या अधिकारा बाहेर फार बेकायदेशीर वर्तन केलें आहे; त्याचा तपास सवडी प्रमाणें करूं. बोला, यांत कोणाला कांहीं उणें अधिक वाटल्यास.

राजोपाध्ये:—महाराज, असलीच एखादी शिक्षा भवानरावालाही नियत ठरवावी म्हणजे बरें.

खंडेराव०:—नियत ठरवूं?हत्तीचे पायीं बांधून तुडविण्याची!

राजोपाध्ये:—याजपेक्षां कमी मानाची असावी.

खंडेराव०:—अंगाला चिंध्या बांधून जाळण्याची !

राजोपाध्ये: ( हळूच ) भाऊसाहेब, महाराजांचा व त्यांचा संबंध आहे.

खंडेराव०:—हो, हो; तर मग जिवंत गाडून टाकण्याची !! त्याच्या संबंधीं मी बिलकुल रदबदली ऐकणार नाहीं. त्यानें आपल्या अधिकाराचा गैर उपयोग केला आहे. याला सोडिलें, तर दुसरेही असेंच करूं लागतील. समजलांत नीट.

( जरा थांबून पुन्हा बोलूं लागतात. )

खंडेराव०:—इतका वेळ आह्मीं या गोष्टींत ज्याचा निकट चाच केवळ संबंध आहे, अशा विषयांचा विचार केला. आतां दूरचा, परंतु थेट मूळचा ज्यांचा संबंध आहे त्यांजविषयीं येथें थोडा विचार करणें अप्रासंगिक होणार नाहीं.तो विचार असा— आपल्या लोकांत एक ह्मण आहे कीं "खिळ्यासाठीं नाल गेला; नालासाठीं घोडा गेला; घोड्यासाठीं स्वार गेला; इतका अनर्थ खिळ्यानें केला" या न्यायानें पाहूं जातां, ह्माळसाबाईला ह्मणा अगर सईबाईला ह्मणा, ज्यांणीं विकलें, किंवा विकत घेतलें, ते दोघेही या दोषाला सारखेच पात्र ठरतात. पहा, या-

दोन्ही पोरींच्या पालकांनीं, द्रव्यलोभानें मेंढपाळाप्रमाणें, निर्दयकरणी करून, मल्हाररावासारख्या निःसत्व, निरुपयोगी अशा अविचारी ह्मातारड्याच्या पदरीं त्यांना बांधिल्या! तेणें करून साहजिकच त्यांच्या चित्तवृत्ति बदलून त्या परपुरुषांविषयीं लोभाविष्ट झाल्या; अशा त्या तारुण्यमदरूपी अपस्मार वायूनें वेडावलेल्या पाहून, जसे गृध्रपक्षी आमिषाला लुब्ध होऊन दुर्बळ कोंबडीच्या पिलांवर झडपा घालतात, तसा फौजदार व तो चांडाळांचा नायक नवरंग्या, हे त्या दीन अबलेच्या पिछेस लागले; इकडे ती धाधावलेली वाघीण सईबाई, इनें त्या बिचाऱ्या बाळासाहेबाची पाठ पुरवली. परंतु त्यांत त्यांना सिद्धि न आल्यामुळें त्यापासून झाला मत्सर; मत्सरापासोव[1] झाला द्वेष; आणि त्या द्वेषापासून हा रुधिरस्राव होय. तस्मात्, ह्माळसाबाईच्या भावाला आमच्या राज्यांतून हद्दपार करण्याची आणि मल्हाररावाला सर्वसंगपरित्याग करून श्रीकाशी क्षेत्रीं राहण्याची शिक्षा ठरवितों. सईबाईचे बाप भाऊ असल्यास त्यांसही हद्दपार करावेंच. या अशा मूर्खपणाच्या लग्नांच्या योगानें आजपर्यंत अनेक अनर्थ झाले; सांप्रत होताहेत; आणि पुढें होतील. यासाठीं मी हा असला शिक्षेचा एक नवीनच मासला करून ठेवतों. आतां याला न्यायनिपूण काय नावें ठेवतील तीं ठेवोत. परंतु मी तर पुनरपि असलें कोणी वेडगळपणाचें लग्न केल्यास, करणारास व करविणारास याजहूनही अधिक शासन मारीन!

भाऊसाहेबः—छावड्या छावड्या मुलांच्या लग्नाविषयीं असेंच कांहीं तरी झालें पाहिजे.

खंडेरावमहाराजः—त्याजविषयीं दुसऱ्या एखाद्या वेळेस पाहूं. सध्यां चालू असलेल्या प्रकरणाविषयीं एक मनांत राहिलें आहे. तें हें कीं, "अतःपर आमच्या राज्यांत, निदान माझ्या

1 पासून.

कारकीर्दींत तरी, कोणी असें पाजीपणाचें लग्न केलें असतां कडक दंड होईल; व त्या विवाहापासून होणारी संतति कायदेशीर रीतीनें 'औरस' गणली जाणार नाहीं; अष्टमांशाचें भय कोणी मानूं नये. दत्तकसंबंधानें इतर कोणी राजे तो घेतील तर खुशाल घेवोत. पण मी तरी तो घेणार नाहीं." अशा अर्थाचे, आमच्या सर्व राज्यांत, सर्व भाषांत जाहिरनामे लावावे व दवंडीही पिटवावी. तोंडाचें खोवळें झालें, तरी निपुत्रिक लोक वतन जाईल ह्मणून पोरांकरितां लग्नें करितात. ती भीति या योगानें दूर होईल.

एक शास्त्रीः—महाराज, पहिल्या मुद्याविषयीं माझें येवढेंच ह्मणणें आहे कीं, साठीच्या पुढल्या पुरुषानांही मुलें झालेलीं आहेत !

खंडेरावमहाराजः—शास्त्रीबोवा, आपण ह्मणतात अशीं क्वचित् उदाहरणें जरी सांपडलीं, तरी आह्मांला सर्वसामान्य नियम करणें आहे. आधीं त्यांना संतति होईल कीं नाहीं याची मारामारच—असें बोललों ह्मणजे हंसाल मात्र मला. अशी स्थिति कदाचित् झालीच तरी असल्या नवऱ्यांपासून त्यांच्या बायकांना कितपतसें सौख्य होत असेल बरें? हा शुद्ध जुलुमाचा रामराम आहे ! त्यांच्या आईबापांच्या गळेकापूपणाकरितां यावज्जीव त्यांनीं अपेष्टाच भोगावी कीं काय? बरें, असें वारंवार घडतें कीं नाहीं कीं, अशा बुडविलेल्या पोरींची आपल्या नवऱ्यांविषयीं अनास्था होते; त्यांवर कोणीना कोणी तरी भुलथाप्या मैंद मोहपाश टाकतो; त्या वाईट मार्गाला हळहळू लागतात; मग त्यांचे हाल सुरु होतात; मग उठून जातात; तेथें कोणी त्यांची सर्वस्वीं नागवणी करितो—बुचाडतो—लाथाबुक्या करितो—अखेरीस सोडून जातो; आणि शेवटीं त्या पोटाकरितां वेश्या बनून धर्मभ्रष्ट, जातिभ्रष्ट, नीतिभ्रष्ट होतात ! ! अशीं शेंकडों उदाहरणें प्रतिवर्षीं घडतात. यांत कोणता हो चांगला धड परिणाम आहे? आतां प्रजापालकत्वाच्या नात्यानें, प्रजेच्या

सौख्याविषयीं आह्मांला अलबत अक्षयी काळजी वाहिलीच पाहिजे. यास्तव याच दरबाराला, वळी पडणाऱ्या आमच्या असल्या धर्मकन्यांच्या कल्याणासाठीं असा ज्यारीचा कायदा केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. बरें, तर भाऊसाहेब, ह्या जाहिरनाम्याची एक प्रत करून आमचा त्यावर शिक्कामोर्तब घेऊन शहरभर दौंडी पिटवा. दौंडी झाल्यावर अन्नग्रहण करावयाचें. ह्मणजे केल्या कर्माचें सार्थक्य झालें. शेवटीं मल्हारराव सईबाई यांच्या जाहागिरीसंबंधें इतकेंच करावयाचें कीं, त्यांना दत्तक द्यायचेच; परंतु एक अष्टमांश दंडादाखल कापून घेऊन त्यांतून गुणाजीबावा, व रुस्तम यांच्या प्रामाणिकपणाकरितां त्यांच्या मुलांना वंशपरंपरेचीं इनामें करून द्यावयाचीं; व त्यांच्या निराश्रित नातेवाईकांचें चालवावयाचें व दत्तकांचे पालक बाळासाहेबानांच नेमावयाचें. कसें काय येतें बुवा मंडळीच्या बेताला हें?

**सर्व सभासदः**—वाः उत्तम; यांत कांहीं वाउगें नाहीं.

**खंडेरावमहाराजः**—तर आतां आह्मीं घेतों रजा.

**भालदार चोपदारः**—आस्ते. सलामपर निगाकीजियें मेहेर्बान्.

( दरबार बरखास्त होतो. )

**अंक ५ व प्रवेश ५ वा समाप्त.**